

श्रीसंत सद्गुरु वासुदेवराव देव महाराज
टेंभुर्णीकर (जालना)

# ॥ ओवीबद्ध चरित्र ॥



डॉ. यशवंत बाळकृष्ण भुसनळे
एरंडोल, जि. जळगांव.

श्रीसंत सद्‌गुरू वासुदेवराव देव महाराज
टेंभुर्णीकर (जालना)

# ।। ओवीबद्ध चरित्र ।।

## मंगल कामना

**जय जयवो शुद्धे । उदारे प्रसिद्धे । अनवरत आनंदे । वर्षतिये ।। १ ।।**

**विषय व्याळे मिठी । दिधलिया नुठी ताठी । ते तुझिये गुरू कृपादृष्टी । निर्विष होय ।।२।।**

**तरी कवणाते तापु पोळी । कैसेनीवो शेकु जाळी । जरी प्रसाद रस कल्लोळी । पुरे येसी तू**

**पाप ताप दैन्य जाय उठा उठी । झालीया भेटी हरीदासाची ।। ३ ।।**

**दृष्टांतो नैव दृष्ट त्रिभुवन जठरे सद्‌गुरोर्ज्ञांन दातु ।। ४ ।।**

**लोंह परिसाची न साहे उपमा । सद्‌गुरू महिमा अगाधची**

कासवी आपल्या पिलांना नुसत्या दृष्टीने पुष्ट करते. तसेच नव्हे का सद्‌गुरूची दृष्टी । आपल्या कृपा दृष्टीने प्रसाद पूराच्या लाटा भक्त जनावर सातत्याने चालू ठेवतात म्हणूनच ज्ञानेश्वर माऊलीनं (अनवरत) असे म्हणले आहें आणि तो आनंद

**जो नाईक जता नांदू । असौरभ्य मकरंदू**

**आंगाठिला आनंदु सुरतेंनविण ।।** ज्ञानेश्वरी

विषय व इंद्रिय यांच्या संगातून, निपजणारा आनंद विटणारा असतो क्षणिक असतोत आणि सद्‌गुरूनाथ सगावाचून आंगातील आनंद आपल्या कृपादृष्टीने देत असतात. असा आहे सद्‌गुरू महिमा. सद्‌गुरूच्या कृपादृष्टीने

मुका बोलू लागेल, लेखक नसलेला चांगले लिहू लागेल यात शंकाच नाही.

डॉ. यशवंतरावाचे जीवन त्रिदोष (वात, पित्त, कफ) पहाण्यातच जात असुनही त्यांनी संतपरग्रंथ लिहिणे सद्‌गुरू नाथाच्या कृपादृष्टीचे फल आहे. हे वासुदेव चरित्रामृत खरेच अमृत आहे. यांत सौ. सुलोचना बाईच्या निर्याणानंतर ५, ६, ७, ८. या अध्यायात महंत अमरदासांची भेट झाल्यानंतर जोपर्यंत हजर होते. तोपर्यंत संत वासुदेवांनी आपल्या भक्तांना पतीव्रताधर्म एकादशी महात्म्य, अतिथीपूजन पंचमहायज्ञ, यज्ञोपविताचा अर्थ यथार्थ सांगून गायत्री मंत्र माहात्म्य व तेणे पापनिवृतीचा उपाय व मार्गदर्शन, माळेतील १०८ मण्यांच्या रूपाने ब्रम्ह शद्वदर्शन, तसेच कर्मकांड व ज्ञानकांड आणि उपासना कांड वगैरे सांगून हा ग्रंथ अमुल्य झाला आहे.

त्यामुळे सदर ग्रंथाचे नित्यवाचन करणाऱ्यास डोळसज्ञान झाल्यावाचून राहाणार नाही. एरंडोल येथे लोकसेवा करीत असतांना डॉ. यशवंतांनी गुरूकृपा दृष्टीनेंच असा हा अमुल्य ग्रंथ लिहुन भक्तजनावर उपकारच केले.

ह्या देहावर विशेष कृपा व्हायची आहे म्हणूनच की काय (प्रसाद चिन्हांनि पूर: फलानी) हा देह चारीधाम यात्रा करून क्षेत्र दुसखेडे येथे दिनांक २५ फेब्रूवारी १९८१ ला समर्थ चरणी भेटी वाचनाचा योग आला आणि त्यामूळे ११ जून १९८० मी श्रीक्षेत्र सिद्धपूरला असतांना स्वप्नात झालेल्या संत दर्शनाचा उलगडा झाला तो असा

**स्वप्नात प्रकटले संत । येतो आता आम्ही म्हणत**
**तुम्ही थांबा उद्धारार्थ । मी निश्चित जाहलो ।। १ ।।**

ह्या स्वप्नाचा मला उलगडा होईता, कोंणते संत असावे ते याच विचारात मी असतांना घरी श्रीक्षेत्र दुसखेड येथे आलो तोच श्रीसंत वासुदेव चरित्रामृत हा ग्रंथ मजकडे परिक्षणार्थ आला व त्यातील ११ जून ८० हीच तारीख वासुदेवराव देवांची वैकुंठाला गेल्याची पाहिली व मग सिद्धपुरला असतांना देव महाराजांनीच दृष्टांत दिला असे मला नक्की ज्ञात झाले व आनंदाने ह्रदय भरून आले. आपला परिचय नाही, नाव गाव ज्ञात नाही तरी पण ग्रंथ रूपाने संतचरण घरी आले, खरच सांगू का यशवंता तू यशवंत आहेंस अरे ! संत कृपा झाली । इमारत फळा आली ।

**कृपाळू सज्जन तुम्हीच संतजन । एवढे कृपादान द्यावे मज ।। १ ।।**

प्रासादिक ग्रंथ लिहून डॉ. यशवंतांनी फार मोठी वाड्मय सेवा केली. नाटक कादंबऱ्या, गोडगोष्टी कोण लिहीत नाही ? धर्मपर संतपर संतलेखन कृपादृष्टीनेच होत असते. त्यात गुरूकृपादृष्टीनें आपले लेखन सातत्यानें होत राहून आमचे हें डॉ. यशवंत सागरात नदी मिळते त्याप्रमाणे गुरूच्या स्वरूपात लीन होवोत हीच संतचरणी प्रार्थना.

चैत्र वद्य एकादशी शके १९०३ रोज गुरवार ता ३०-४-८१

संतचरणरज मत्सेंद्रनाथ पाठक दुसखेडकर

**ॐ नमो सद्‌गुरू वासुदेवाय**

ॐ नमो सद्‍गुरू वासुदेवाय

# ऋण मोचन

माझे परमपूज्य सद्‍गुरू वैकूंठवासी श्री संत वासुदेवराव देव महाराज उर्फ तात्यासाहेब टेंभुर्णीकर यांची प्रथम भेट इ. स. १९६६ साली झाली. ते उत्तम लेखक कवी असल्याचे समजले. त्यांनी बऱ्याचशा संतांच्या पोथ्या लिहिल्या आहेंत, ह्याच वेळी मी एरंडोलचे सिद्धेश्वर महात्म्य छोटीसी ओवीबद्ध पुस्तीका लिहून आटोपली होती. त्यासाठी कोणीतरी संताची प्रस्तावना हवी या विचारात मी असतांनाच गुरूदेवांची व माझी प्रथम भेट झाली. त्यांना माझा उद्देश कळवला, त्यांनी पोथी वाचून लागलीच प्रस्तावना लिहून दिली. यावरून त्यांची निरभिमानी वृत्ती कळून आली. त्यांचा शांत प्रेमळ, मनमिळाऊ स्वभाव, अथांग ज्ञानसागर निस्पृहता, निर्लोभ व निरहंकारी स्वभाव पाहून मी त्यांचा गुरूपदेश घेतला त्यांच्या कृपाप्रसादाने व ईशप्रेरणेने त्यांच्या चरित्रावर ओवीबद्ध पोथी लिहावी असा सुविचार मनात तरळला व मी या कार्यास लागलो.

गुरूवर्य वैकुंठवासी गेलेले, त्यांची याबाबतीत अनुज्ञा कशी मिळेल या विवंचनात असतांना त्यांनी स्वप्नात दृष्टांत दिला मी व तू अजून तुझ द्वैत गेले नाही का ? मी सर्वाभूती आहे माझा सदैव आर्शिवाद आहेच कार्याला लाग.

गुरूदेवांनी बरीच संतचरित्रे ओवीबद्ध लिहिली व पुढेही लिहिले असते परंतु त्यांच्या हातून घडलेले कार्य यावर परमेश्वराची

समाधानी झाली असेल म्हणून की काय परमेश्वराने त्यांना बोलावणें केले असावे. देवाज्ञा, गुरू आज्ञा सूज्ञ माणसे मोडत असतात. त्याप्रमाणे देवाज्ञेने त्यांना इच्छा मरण प्राप्त झाले होते तरी ते लवकरच स्वच्छेने आनंदाने वैकुंठात गेले. यापूर्वी इच्छामरण भीष्माचार्यांना मिळाले होते. कलीयुगातही इच्छामरण गुरूदेवांना मिळाल्याचे पाहून ह्रदय प्रभुभक्तीने भरून येते, व देवाबद्दलची अस्तिकता वाढते.

गुरूदेवांच्या विरहामुळे एकदम पोरका झालो. आईवडिलांच्या विरहाने मी जितका भयाण झालो नव्हतो त्यापेक्षा गुरूदेवांच्या विरहाने मी अधिक दु:खी झालो. अशा भयाण वादळात कानावर गुरूदेवाचा आवाज आला –

**येऊनिया नरदेही, तू काय सांग केले ।**
**उमजतू, हीत तरी आपुले ।। धृ ।।**
**पिता पितामह कितीतरी तुझे, आले आणि गेले ।**
**तू तरी आता सावध होऊनी, साधूनी घे आपुले ।।**

ब्रम्ह व माथेने तयार झालेले हे सारे ब्रम्हांड नश्वरच आहे. जन्म मृत्यू रहाट गाडगे चालू रहाणारच. त्यासाठी गुरूदेव नेहमी उपदेश करीत –

उमज तू काही, काही बाप्पारे । चूकवी जन्म मरण फेरे । तरीच नरदेही, देही येऊनी । शरण जा पांडुरंग चरणी ।। २ ।। गुरूमाऊली जरी अंतरलेली वरून वाटली तरी त्यांची स्फूर्ती ह्रदयात भरून उसळत आहे. त्या प्रेरणेनेच मी सद्‌गुरूवर ओवीबद्ध चरित्र लिहिण्याचे काम हाती घेतले. त्यांचे अनुभविक प्रसंग गावोगावी खूप आहेत. परंतु जे थोडे फार प्राप्त झाले तेवढेच पोथीत

उधृत केलेले आहेत. तेवढ्यावरूनच फूल नाही तर फूलाची पाकळी तरी सद्‌गुरूचरणी अर्पूया. हा ग्रंथ आपल्या हातून लिहून पार पडेल की नाही ? मला जमेल की नाही याच विचारात मी होतो. भगवंताची कृपा असल्यावर मग कसली उणीव भासणार. त्याप्रमाणे मी सद्‌गुरूचे ध्यान केले, त्यांना लेखणी चालविण्यास विनंती केली व खरोखर आश्चर्य म्हणजे त्यांनी कसा काय हा ग्रंथ मजकडून लिहवुन घेतला हे मला समजले.

ते पहिल्या भेटीतच इतके शांत, मनमोकळे निरहंकारी, प्रेमळ असतील याची मला कल्पनाच नव्हती परंतु त्यांनी पोटच्या मुलाप्रमाणे अरे यशवंता अशा प्रेमळ शद्बात बोलतांच मला दुसरे गुरूदेवच वाटले, तसेच माता पित्यांची स्मृती जागृत झाली व द्वैतभाव जाऊ व एकात्मता वाढली त्यामुळे फारच आदर वाढला त्यांना स्वत:ला वयोमानानुसार कमी दिसत असतांना देखील त्यांनी मोकळ्या मनाने त्यांचे स्नेही श्री राजाराम पाटील यांच्याकडून ही पोथी वाचून घेऊन यांतील प्रमाद काढून टाकले. व शुभकामना लिहूनही दिली. इतकेच नव्हे तर त्यांनी माझे यथोचित स्वागत करून गौरवही केला. याबद्दल त्यांचे आभार मानून सदैव ऋणी आहेच. दुसखेड्याचे श्री. राजाराम पाटील यांनी पोथी नाथमहाराजांना वाचून दाखविली त्यामुळे त्यांचेही आभार मानणे जरूर आहे. तसेच मित्र मंडळी व हितचिंतक प्रेम महाराज दामू शेठ भावसार नाईक सर, साळी सर, शिवराम शेठ शिंपी, नंदलालशेठ मिनियार, चिंधू शेठ वाणी अप्पा, एकनाथ गुरूजी, कासार गुरूजी वगैरे स्नेही मंडळींनी प्रोत्साहन दिले व शंका कुशंका विचारल्या त्यामुळे पोथीत त्यांचे शंकेचे निरसनही केले गेले. तसेच मालेगावचे सुप्रसिद्ध व्यापारी नथ्थूशेठ वाणी, गोंडगावचे मोतीराम शेठ व पंढरीनाथशेठ वाणी, बदनापूरचे राधेशामजी तापडीया, जळगांवचे मधुकरराव जोशी नाझर, वगैरेनी त्यांना आलेले स्वानूभव कळविल्या बद्दल त्या सर्वांचे आभारी आहे तसेच देणगीदारांनी उदार सहकार्य करून हा ज्ञानवृक्षवेल

वाढींस लावला त्याबद्दल त्यांचे अत्यंत ऋणी आहेच तसेच एरंडोलचे प्रसिद्ध चित्रकार श्री. अढळकर सर, तसेच छापखान्याचे मालक श्री चंद्रकांत त्र्यंबक नाईक यांनी श्रीसंत सेवा म्हणून अल्प खर्चात धार्मिक ग्रंथ छापून दिला. याबद्दल त्यांचेही आभार मानणे योग्यच ठरेल श्री समर्थ रामदास स्वामी म्हणतात –

**नाना सद्विद्येचे गुण । याहीवरी कृपाळूपण ।**
**हे सद्‌गुरूंचे लक्षण । जाणिजे श्रोती ।। १ ।।**
**याहीवरी वैराग्य प्रबळ । वृत्ती उदास केवळ**
**विशेष आचारे निर्मळ । स्वधर्म विषयी ।। २ ।।**

ही वरील सर्व संत लक्षणे जशी वासुदेव महाराजांमध्ये दिसली तसीच ती वेदमूर्ती मत्सेद्रनाथ पाठकांमध्येही आढळली श्रीमदभगवतगीता ही संतशिरोमणी ज्ञानेश्वर महाराजांनी प्राकृत केली तद्वत संस्कृत सप्तशती देवी माहात्म्य, आध्यात्म रामायण समश्लोकी मराठीत केले असे बरेच ग्रंथ हुबेहुब मराठीत लिहून त्यांनी ज्यांना संस्कृत येत नसेल त्यांच्या हातूनही ईश्वरसेवा व्हावी या सद्‌हेतूने लिहून जनता जनार्दनावर अनंत उपकार केलेले आहेत. या त्यांच्या थोर वाड:मयावरून ते अलिकडील श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांचेच अवतार असावेत असे माझे ठाम मत आहे माझे तयांना शत:शा प्रणाम. श्री समर्थ रामदास स्वामी म्हणतात –

**आधीच सिकोन जो सिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी ।**
**गुंतल्या लोकांस उगवी । विवेक बळे ।। ३ ।।**

ह्या उक्ती प्रमाणे दोघा संतांनीही ज्ञानदान केलेले आहे. पोथ्या ग्रंथ लिहिले आहे. आपण ते जर विवेकपूर्ण वाचून अभ्यासिले तर आपला उद्धार होण्यास वेळ लागणार नाही.

**तुझीया सत्तेने तुझे गुण गावू । तेणे सुखी राहू सर्वकाळ ।। ४ ।।**

असे विश्वात्मक देवाला व सद्गुरूना तुम्ही मला ऋणमुक्त करा अशी प्रार्थना करून विरमाभ.

आपला

सत चरणरज
डॉ. यशवंतराव उर्फ बाळासाहेब भुसनळे
एरंडोल जि. जळगाव

**श्री संत वासुदेवराव देव महाराज**

**टेंभूर्णीकर (जालना)**

**चरित्र प्रकाशन**

**मार्गशीर्ष शु।। १५ शके १९०४**

**श्री दत्तजयंती बुधवार दिनांक २९-१२-८२**

## अध्याय १ ला

श्रीगणेशायनमः ।। श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरूभ्योनमः । श्रीगोपालकृष्णाय नमः ॐ नमोजी गणनायका । ऋद्धिसिद्धीच्या विनायका । सुखदाता विघ्ननाशका । शंकरात्मजा गणपते ।। १ ।। तुझे करिताचि स्मरण । विघ्ने पळती जिव घेऊन । तरी ग्रन्थाची पूर्ती व्हावया पूर्ण । बुद्धिदाता होई तूं ।। २ ।। तुझा तो आशिर्वाद असावा । मग न भी मी त्या शद्ब अभावा । यालागी केलासे तुझा हा धावा । धांवुनी येईबा सत्वर ।। ३ ।। नमन माझे सरस्वती जननी । सकळ विद्येची तूं स्वामिनी । कृपा हस्त तो शिरी ठेऊनी । सदैव रक्षी या बालका ।। ४ ।। जरी का असे मी अल्पमती । तव कृपे नसेति चिंता चित्तीं । मातेविण त्या बाळका प्रती । कोण धांवुनी येईल ।। ५ ।। तुझा बालक असतां मी सान । तै निपजल्या पासुनी बुद्धीहीन । ऐशियाशी न रक्षितां तूं येऊन । निंदितील सर्वचि तुज प्रति ।। ६ ।। परीस लागता लोहासी । तात्काळ सुवर्ण होय बावन कशी । तैसा आशिर्वाद देऊनी तूं मजप्रती । निजब्रीदा त्या रक्षिका ।। ७ ।। प्रत्यक्ष शारदापती तो गणपती । मी काय वर्णु शके त्या अल्पमती । तरी तूच देऊनीया मज ती स्फुर्ती । सेवा ती करवोनि घेईजे ।। ८ ।। तुझी कृपाती जहालीया वरी । अस्खलीत बोल बोले ही वैखरी । ऐसा विश्वास ठेऊनी अंतरी । कार्य हाती मी घेतले ।। ९ ।। तूंचि मातापिता गुरूजाण । तव

वचनाचे मी अनुकरण । करूनिया चरित्र हे करीन पूर्ण पूर्णताहि निश्चये वि तुझेनि ।। १० ।। नमन माझे जगदंबे प्रति । उत्पत्ति स्थिती लय हे जियेवे हाती । ब्रह्मा, विष्णु महेशहि पुजीती । माता म्हणोनी तुजलागी ।। ११ ।। जै चंडमुंडादी करीती आक्रमण । तै करीसी तूं सर्वांचे रक्षण । आलीस रक्षावया धावुन । निजब्रीद आपुले तूं रक्षीले ।। १२ ।। धैर्य दिलेसी सर्वांना । समयीं धांऊन येइन रक्षणा । सदैव पाठी मी असेन जाणा । भक्ताधिन सदैव असेची ।। १३ ।। तरी भक्त म्हणवोनी मी दिनवाणी । लोळण घेतले ते तुझे चरणीं । धाऊंनी आई या ग्रंथ रचनी । सदैव रक्षी तूं जननीये ।। १४ ।। आई आळवुनी प्रथम तुजसी । मागुता ह्रदयमंदिरी पुजीले गुरूसी । ज्यावेनी दर्शन होऊनी मजसी । धन्य धन्य मी आजी जहालो ।। १५ ।। साक्षात्कार होताचि तुझा चित्तीं । प्रत्यक्ष देखिली सद्गुरू मूर्ति । उचंबळोनी मम प्रेम चित्ती । पायी मिठी घातली ।। १६ ।। आद्यगुरूस्थानी ते आदिनाथ । तयापासून काकासाहेब प्रख्यात । तिसरे ते राजारामपंत । चौथे ते भाऊसाहेब ।। १७ ।। ऐसे आदीनाथ सद्गुरूनाथ । ज्यांची परंपरा ती प्रख्यात । त्यामाजी पाचवे श्री गुरू रंगनाथ । पितामह गुरू जे मजप्रती ।। १८ ।। गुरूचरणी असे ते ज्याचे मन । त्याशी ऐश्वर्यादि न पडे न्युन । काळ मृत्यू भया पासून । रक्षी तो येऊन निजांगे ।। १९ ।। ब्रम्हनिष्ठ असे तो माझा गुरू । वासुदेव महाराज केवळ ज्ञान सागरू । तयांच्या

अधिकारांचे केवी करू । वर्णन ते कळेना मजप्रती ।। २० ।। नमन करीता गुरूपरंपरेवरी । अधिष्टीत जहाले ते ह्रदय मंदीरी म्हणूनीं प्रार्थी मी जोडूनीं करीं । कार्य सिद्धीं ती करावी । असो ज्याचे उदरी पावलो जनन । आणिक सृष्टी हे देखीली ज्याचेनी जाण । तैसाची हा आज सुदीन । ज्याचेनीं मीं देखींला ।। २२ ।। भुसनळे कुळींचा कुळभुषण । पिता माझा बाळकृष्ण । माता सुशीला ती पतीव्रता जाण । मूळ पुरूषापासोनी दंडवत ।।२३।। नमन माझे नारायणा । लक्ष्मी नांदे ज्यांचे भुवना मार्ग दावी मज अज्ञाना । हा ग्रंथ वदावया ।। २४ ।। नमन श्रींगुरूदत्तात्रया । त्रिगुणातीता अत्रितनया । अवतार घेतलाशी जग उद्धाराया । आशिर्वचन मज तू देईका ।। २५ ।। नमन माझे अंजनी माते । पुनीत मी जहालो प्राशुनी तव जलाते । आता तव प्रतापी सुत त्या हनुमंते । साह्य असावे ते मजप्रती ।। २६ ।। नमन माझे त्या ज्ञानेश्वरा । संतामाजी शोभे जो का हीरा । भरवीं ज्ञानामृताचा मज चारा । ग्रंथ पूर्ण करावया ।। २७ ।। नमन माझे संत सज्जना । आणि योगिया मुनीजना । सकल श्रोतीया साधुजना । नमन माझे साष्टांगी ।। २८ ।। आतां ग्रंथ ऐकावा सावधान । मनी आळवावा नारायण । तेणे मनकामना होतींल पूर्ण । विश्वास मानसी असो द्या ।। २९ ।। जराही येता मनी किंतु । मग विघ्नचि होईल गणतु । श्रीहरी कैसा येईल कार्यार्थु । सांगा सकळ तुम्ही विबुध हो ।। ३० ।। टेंभुर्णी औरंगाबाद

जिल्ह्यात । जाफराबाद तालुक्यांत । राजा देऊळगाव लगत । जीवरक्षा नदीं तटी ।। ३१ ।। जेथे वास्तव्य केले रंगनाथ स्वामींनी । श्रीगुरूदत्तात्रयाचे मंदींर बांधुनी । बऱ्याच संतांची पदधुळी लागली ज्यास्थानी । तेथे संत वासुदेव अवतरले ।। ३२ ।। जै धर्माची होय ग्लानी । अवतार घेतसे चक्रपाणी । संत निर्मिसी भक्तोद्धारा कारणी । संत वासुदेवा पाठविले ।। ३३ ।। नृसिंह संस्थान असे खानदान । सरकारी तनखा पाचशे रूपये मास जाण । तीनशे एकर इनामी जमीन । महदभाग्य ज्यांचे ।। ३४ ।। पुजारी ऋग्वेदी कुलभूषण पिता त्यांचा लक्ष्मण । माता ती सुंदराबाई जाण सुशील शांत स्वभावी ।। ३५ ।। सेवा फळलीं कृपे नरहरी । शंकर, वासुदेव, गंगाधर, हरी । मथुरा सुभद्रा चंपाबाई पुत्री । सत्प फळ लाभले तया ।। ३६ ।। वडील बंधु शंकरराव । पेशकार तहसीलदार । द्वितीय वासुदेव लाड फार । आजोबांचा आवडता ।। ३७ ।। नावडे कधी शाळेत जाणे । मोडीं बालबोध लिहिणे वाचणे । तोंडी हिशेब झटपट करणे । वैदिक कर्म तत्पर ।। ३८ ।। माहीत नाही शाळेत जाण । सदा देवधर्म भजन पुजन । गणेशोत्सवांत घेती पुढारपण उनाडटप्पुंत गणती ।। ३९ ।। काळजी करितीं मातापिता । शिक्षण घेंण्यासी आग्रह धरता । प्रयत्न फोल होई जाणता । पूर्वकर्म म्हणून सोडिती ।। ४० ।। आजोबा श्रीकृष्णदेव महान अधिकारी । पाहून वासुदेवा म्हणती आदरी कोहिनूर हीरा असे हा

वंशांतरी । परी उपहासे हासती सारे ।। ४१ ।। किर्ती देवाची करणी अघटीत । पदार्पण करता सोळाव्यावर्षात । उपरती झाली जावे सरकारीं शाळेत । घ्यावे शिक्षण म्हणोनी ।। ४२ ।। ऐसे ऐकोण सारे हासंती । शिक्षणासाठी जातो म्हणती । निदान मॅट्रीक व्हावे अंती । म्हणुन गांव सोडीले ।। ४३ ।। ब्राह्मणाची मुख्य दीक्षा सांभाळून । घेऊ आपण सर्व शिक्षण । जालन्या पर्यंत पायी जाऊन । संध्यापळी गींता बरोबर घेतली ।। ४४ ।। परभणीस रेल्वेने जाऊन हायस्कूलांत प्रवेश मिळावा म्हणून । खटपट करीतो गुरूजीना भेटून । अशक्य काय पाठी देव असता ।। ४५ ।। नसे पुर्व दाखला ना काही । गुरूजी भेटले देवमाणूस पाही । चौथीत बसवले लवलाही । विचारपूस करिती प्रेमाने ।। ४६ ।। ओळखीचे आहे कां कोणी । जेवणाची चौकशी केली मास्तरांनी । वासुदेव म्हणती मी ब्राह्मण जाणी । भिक्षा माधुकरी मम धर्म । ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा । ॐ भवती या पक्षा । रक्षिले पाहिजे ।। ४७ ।। ऐसे ऐकोन मार्मिक उत्तर शिक्षका फुटला दयोचा पाझर । सोय करीन तव लावुनी वार । मम गृही रहावे ।। ४८ ।। ध्येय साधून अभ्यास करून । तहान भूक झोपेस विसरून ऐसे घेता पक्के मनान । यश येई निश्चित ।। ४९ ।। उर्दु कायदा इंग्लींश प्रायमर । रात्रीतून केले पाठांतर । प्रश्नोत्तर देती झर झर । जणू अभ्यास पूर्वीचा ।। ५० ।। दोन दिवसांनी घरमालक येऊन भेटती

गुरूजीस । पवनसूक्त अभिषेक करण्यास । नेम माझा असे श्रावणमास । ब्राह्मण धूंडून मिळेना ।। ५१ ।। ऐकताच आनंदले वासुदेव । नका करू काळजी ठेवा भाव शुद्ध आंतकरण असतां ठाव । अभिषेक सांगेन निश्चये ।। ५२ ।। ऐकोनि स्वर संथायूक्त । घरमालक आनंदले बहूत । वासुदेवा ठेविले गृही मुलाप्रत । स्वखर्चे शिक्षण देण्यासी ।। ५३ ।। एकाच वर्षात होती सातवी पास । दुसऱ्याच वर्षी मॅट्रींक मद्रास । सर्व विषय असून इंग्लीश । उत्तीर्ण होती उत्तम ।। ५४ ।। फोटोग्राफी करून शिक्षण घेती । अठरावे वर्षी कश्टम खाती । सरकारी नोकरीत पाहुन प्रगती । इन्स्पेक्टर जहाले ।। ५५ ।। धर्मपत्नी नामे सुलोचना । महासाध्वी पुरवी कामना । परमार्थाची आवड जीवना । कोंदण हिऱ्यास भेटले ।। ५६ ।। सुलोचनाबाई साध्वी महान । माहेर धावडे तालुका भोकरदन । उच्च घराण्यातील रत्न । दैवे लाभले वासुदेवा ।। ५७ ।। पत्नी मिळता सुस्वभावीं । स्वर्गसुख किती वाखाणावी । दु:खेही हासत सोसवी । गृह लक्ष्मी कृपे ।। ५८ ।। पतीपत्नीचे एकचित्त । तेथे नांदे भगवंत । काय कमतरता सुखांत । श्रीहरी कृपे ।। ५९ ।। नोकरी करीत असता । परमार्थ मार्ग चोखाळता खंड कधी न पडू देता । प्रवचनही चालूच ।। ६० ।। दीन दुबळ्यांचा होण्या उद्धार । रात्रदिन तळमळ फार । भजा भजारे रमावर । तेणे सार्थक जन्माचे ।। ६१ ।। ऐशा त्या संसार वेलीवर । उमलले फूल सहा सूंदर । प्रभाकर

दुर्गादास भास्कर । कुसूम प्रेमला सूमनही ।। ६२ ।। परमार्थांची आवड दोघांचे मनी । आईसाहेब महा सनातनी ब्रह्ममयवृत्ती सदा ध्यानी । वासूदेव वागती ।। ६३ ।। सणवार हव्य कर्म । ब्राम्हणद्वारा करूनी धर्म जाणी जीवनातले वर्म । महासाध्वी पतीव्रता ।। ६४ ।। ब्रह्मवृत्ती वासुदेवांची बाणली वृत्ती साची । सर्वाभूती परमेश्वराची । दिसे ठायी ठायी ।। ६५ ।। जाऊनी गरीबांचे घरी । दया उपजे अंतरी । स्वखर्चे सण त्यांचे साजरे करीं । ज्या ह्रदयी भगवंत ।। ६६ ।। परमार्थ मार्ग जरी भिन्न । परीं न दुखविती एकमेकांचे मन । एकमेकास स्वातंत्र्य पुर्ण । गुण्या गोविंदे नांदती ।। ६७ ।। ऐंसा चाले भरभर । तींस वर्षे गेले झरझर । करूनी सुखी संसार । परमार्थी जीवन साधियलें ।। ६८ ।। इन्स्पेक्टर असता कस्टमखातीं । रात्री छापा घालण्या वनी जाती । तोच लागली फांदीं डोळ्यावरती डोळा जाय पूर्णत्वे ।। ६९ ।। तरी मानिती देंवाचे उपकार । ब्रह्ममय दृष्टी एकच जरूर । म्हणून नेलास एक नेत्र । कसोटी ही संताची ।। ७० ।। नोकरी करितो चोख पूर्ण । रात्री मेळवन जनगण । उपदेशिती प्रवचनांतून । नित्य कर्मे हेच ।। ७१ ।। इन्स्पेक्टरची नोकरी करीतो । लांच घेण्यास वाव बहूत रितीं । परी निर्लोभवृत्तीं मूळच अती । गुन्हा समजती देवाचा ।। ७२ ।। नोकरी करूनही वेळ काढिती । अंत:करणात ज्ञान प्रीती । वेदशास्त्रादि ग्रंथ बहु वाचितीं । जणू ज्ञान सागर भांडार ।। ७३ ।। लोकास

परमार्थी लाविती । स्वत: त्या प्रमाणे आचरती । विनामूल्य उपदेश करिती । म्हणून ओहोळ वाहे भक्तांचा ।। ७४ ।। पूर्वसुकृत बलवत्तर । ज्याचे आहे तोच नर विरक्त होतो निर्धार । पुर्व भाग्य करूनी ।। ७५ ।। लोकासांगती ब्रह्मज्ञान । आपण स्वत: कोरडे पाषाण । नसे बोलल्या प्रमाणे आचरण । महादांभिक म्हणावे ।। ७६ ।। जे प्रवचन किर्तनाचे पैसे घेती । सेवा न घडेच कधी त्याप्रती । पोटार्थी म्हणुनी धंदा करिती संत नव्हेत बहुरूपी ।। ७७ ।। करोनिया हरीकिर्तन । कोणी घेती धन । तयाचे अधोगती पतन होणार अंती निश्चये ।। ७८ ।। कीर्तनास द्रव्य देती घेती । दोघे सत्य नरका जाती । ऐसी संत तुका रामाची उक्ती । ठाऊक असे आपणा ।। ७९ ।। जाणून बुजून कवणे तरी । पाय ठेवावा अग्नीवरी । ज्ञान असोनि अंतरी । कांही विष प्यावे बळे ।। ८० ।। कीर्तन करूनी पोटभरणे । हे अत्यंत लाजीरवाणे हरी नामाचा विक्रय करणे । हे योग्य नसे ते ।। ८१ ।। श्रीहरीं माझा जगन्निवास । नाही बाजारचा जिन्नस । किंवा पिकल्या मळ्यास । म्हणोन त्यास विकावे ।। ८२ ।। प्रवचन कीर्तन दोहोची तयारी । अस्खलीत गंगा वाहे तीरीं । गरूडापरी झेप भारी । सांगती रसाळ भाषेत ।। ८३ ।। राज घराण्यांतून त्यांना । पदव्या मानपत्रे मिळती नाना प्रवचन केसरी, प्रवचनपटू, धर्मभास्कर माना । शंकराचार्यही अर्पिती ।। ८४ ।। संतांच्या पोथ्या लिहिती कितीक । परी न घेती छदामही एक ।

दुसऱ्यास करून प्रकाशक । उत्पन्नही त्यास देती ।। ८५ ।। ऐसी पाहुन निर्लोभ वृत्ती । त्यांत ज्ञान गंगेचीं भरती । भक्तांचा लोंढा वाहे चरणावरती । ज्यास सद्‌गुरू पारख ।। ८६ ।। लोक वासुदेवास सांगती । अनुग्रह द्यावा आम्हाती । आम्हा लाभले सद्‌गुरू सांगाती करू सार्थक जीवाचे ।। ८७ ।। वासुदेव म्हणती मीं तो संत सेवक । अधिकारी पुरूषाचा घ्यावा उपदेश । माझे मल च कव्ळेंना हितोपदेश । संसारी अज्ञानी मी ।। ८८ ।। मी असे अनधिकारी अनुग्रह देण्यातरी । उपदेश करी करून नोकरी । नामस्मरणाविण जाणेना ।। ८९ ।। लोक म्हणती ऐंकून तुमचे प्रवचन । ठाव घेतला अंत:करणाचा पूर्ण । नि:स्वार्थी आचार विचार महान । आपणा सारिखा दिसेना ।। ९० ।। आपली भाषा सोपीं रसाळ । सांगती उपदेश कळवळून । कोणतीही शंका करिती निरसन । शास्त्राधारे परिपूर्ण ।। ९१ ।। पेन्शन घेतल्यावर हैद्राबाद स्टेंट मद्रास म्हैसुर । बेंगलूर महाराष्ट्रभर । भक्ति बी पेरींले ।। ९२ ।। किर्ती फैलली जैसे दुर्वांकुर । दिवसें दिवस भक्तपरिवार । वाढू लागला भराभर जैसी चंद्र कला शुक्ल पक्षी ।। ९३ ।। लोक शंकराचार्यांस भेटती । जगद् वंद्य तुम्ही सर्वाती । महाराजास अनुग्रहास द्या संमती । जाणता लोक प्रियता तुम्ही ।। ९४ ।। जगद्‌गुरू सांगतीं वासुदेवासी । गाढा अभ्यास आहे आपणासी । सनद लिहुन देतो अनुग्रहासी । दीनोद्धारा कारणे ।। ९५ ।। वासूदेव नम्रत्वे

म्हणतो । मज शिरसावंद्य तुम्ही असती । तुमची आज्ञा प्रमाण मज ती । परी गुरू परवानगी पाहिजे ।। ९६ ।। शंकराचार्य वासूदेवा म्हणतीं । आपले गुरू समाधीत गेलेती । कैसी परवानगी ते तुज देती । अशक्य ऐसे बोलसी ।। ९७ ।। वासुदेव । म्हणती नम्रते । जरी गुरू गेले समाधीते । परी सदैव वास मम ह्रदयाते । उत्तर देतील निश्चये ।। ९८ ।। नाराज होती भक्तगण आम्हास अशक्य वाटे जाण । कैसे देतील अनुग्रहा अनुमोदन । नका हो अम्हा अव्हेरू ।। ९९ ।। वासुदेव म्हणती भक्तासी । तुमची श्रद्धा पुर्ण मजसी । तैसी मम श्रद्धा गुरूसी । गुरू आज्ञेविण कैसे वर्तू ।। १०० ।। जैसी श्रद्धा तैसे फळ । संत तुकाराम सांगती सकळ । भाव ठेवता प्रबळ । तो येतसे धावुनी ।। १०१ ।। त्यांची एक सुंदर । गोष्ट सांगतो सत्वर । तुम्हास ती आवडेल फार । म्हणून ऐकावी ।। १०२ ।। एकदा एक ब्राम्हण गंगातीरी । स्नान आटोपुन संध्याकरी । नाक दाबून प्राणायाम करी । सर्व विधी

देवा तूच खरा अससी । तर तुला बांधतो झाडासी । बोलावून आणतो ब्राह्मणासी । तुजसी ओळखावया ।। ११४ ।।

आटोपले ।। १०३ ।। तेथे जवळच होता शेतकरीं । नाक दाबलेले पाहुन विचारी । ऐसे कैसे कर्म तू आचरी । काय कारण तयाचे ।।१०४।। ब्राम्हण विचार करी । संध्येचे न समजेल शेतकरी । काय

सांगावे याला तरी । म्हणून सांगे गमतीने ।।१०५।। नाक धरावे दाबून श्वास घ्यावा रोखून । म्हणजे भेंटे भगवान धांवुन येंतसे लवकरी ।।१०६।। ऐसे ब्राह्मणाचे ऐकून वचन त्यावरी श्रद्धा ठेंवून आपलें काम आटोपून स्नान केले गंगेसी त्याच जागी तीरावर बसून । बसला नाक दाबून । श्वास घेतला रोखून वरच्यावर खालचा खाली ।।१०८।। जींव झाला कासावीस । परी नाक न सोडीच । काळजी पडली देवास । विनाकारण हा मरेल ।।१०९।। देव आलें धावून सत्वर । म्हणे मी देंव तुझ्या समोर । काय मागणे तुजला वर । मागून घेई लवकरी ।।११०।। नाक सोडून उघडीले डोळे । तो चतुर्भूज जवळ दिसलें । आपण देव कसलें । याची न पारख मला ।।१११।। माझा गुरू असे ब्राह्मण त्यास येतो मी घेऊन । तो तुला जर देव म्हणेन । तरच ठेवीन विश्वास ।।११२।। देव म्हणें मी थांबतो येंथें । लवकर घेऊन यें ब्राम्हणानें । शेंतकरी म्हणें ऐंसें न होते । तू पळूनी जाशील ।।११३।। देवा तुच खरा असशी । तर तुला बांधितो झाडासी । बोलावून आणतो ब्राम्हणासीं । तुजसी ओळखावया ।।११४।। झाडासी बांधिले देवाला । बोलावून आणले ब्राम्हणाला । दाखविले बांधून ठेवलेले । परी ब्राम्हणाते देव दिसेंना ।।११५।। शेतकऱ्यास दिसें देव । कारण होता शुद्ध भाव । ब्राम्हणा ढोंगी स्वभाव । म्हणून दिसें तयासी ।।११६।। शेतकरी विनवी देवासी । तु देव खरा म्हणसी । मग दिसला पाहिजे

ब्राह्मणासी असुडानं पाठ फोडील ।।११७।। तेव्हां देवाने केला विचार । पाप्यासही दर्शन देणें जरूर । चतुर्भुज रूप दाविले सत्वर । ब्राम्हणालाही ।।११८।। ब्राम्हणाने केला नमस्कार । तो शेतकऱ्याशी बोले सत्वर । धन्य धन्य तूं खरोखर । देव दर्शन घडले तुझ्यामुळे ।।११९।। शेतकऱ्यानें केला नमस्कार । देवा मी अपराधी फार झाडालाही बांधिले येईतो वर । मारण्याचाही धाक दाखविला ।।१२०।। क्षमा करावी देवा मला । जो अपराध माझे हाती घडला । अपराध पोटी घाला । या अज्ञान बालकाचा ।।१२१।। तुमची श्रद्धा मजवर पूर्ण । मी कार्यकरी निष्काम । जाउ आपण एकतुनी ग्राम । रंगनाथ स्वामीसी विनवुं ।।१२२।। माझी श्रद्धा रंगनाथ स्वामीवर । सद्गुरूविना न होतसे उद्धार । सर्वस्व भार टाका गुरूवर । तोच ईश्वर जाणावा ।।१२३।। भक्तासह निघती जावया । एक तुनींस गुरूसमाधी पहावया । वाट असे घोर अरण्यातुन जावया । पायी मार्ग आक्रमिती ।।१२४।। नागमोडी पाउल वाट । रस्त्यानें काटेही बोचत । खाच खळगे दऱ्या निकट । तेणें चालती हळुहळु ।।१२५।। शिष्यासह दरी जवळुन जांतांना । वाघाची डरकाळी ऐकतांच कर्णी । बघून भक्तास थरथर कापतांना । वासुदेव सांगती ।।१२६।। ललाटी असेल जे जे लिहिले । ते न चुकणार मग का भ्याले । विंचु सर्प व्याघ्रादी सगळे । प्रभु आज्ञेविण न वर्तती ।।१२७।। जीव प्रिय नसे कोणा ।

कोणताही कां जन्म असेना । रूचतसे तो सर्वांना । सृष्टीक्रम असे तो ।।१२८।। साचुल लागतांच हरणास । जीव घेउन पळे वाचण्यास । मानव कसा ठरेल अपवाद त्यास । शिष्य लपती दगडा आड ।।१२९।। काही चढती झाडावरी । परी वासुदेव स्थिर जाग्यावरी । वाघ उभा राहीला सामोरीं । शेपटी आपटीत जमिनीवर ।।१३०।। डरकाळी फोडिलीं मोठ्याने । रान दुमदुमले नादाने । थरकाप भरला तेणें । रानांतील प्राण्यांना ।।१३१।। वाघासी समोर पाहुन । रंगनाथ स्वामींचे नांव घेऊन । वासुदेवांनी घातले लोटांगण । जमिनीवर तत्क्षणी ।।१३२।। वासुदेव पहाती उठोनी । वाघ ना दिसे त्या स्थानी । पाहती आजूबाजूस बळोनी । तो बरोबरचे दिसले लपलेले ।।१३३।। वासुदेव पुसती तयासी । वाघ कोठे गेला सांगा मजसी । ते सांगती वासुदेवासी : आम्हा न दिसला जातांना ।।१३४।। सर्व येंती गावी एकतुनी । रंगनाथ स्वामींच्या समाधि स्थानी । तेथे बसला होता वाघ शांततेनी । औदुबर छाये खाली ।।१३५।। इतर घाबरले वाघ पाहुनी । वासुदेवराव जाती समाधीस्थानी । मस्तक ठेविती गुरूचरणी । तो वाघ झाला अदृष्य ।।१३६।। वासुदेव भक्ता सांगती । गुरू माझी परीक्षा घेती । गेली की नाही मनातींल भीतीं । म्हणून व्याघ्ररूप दाविले: ।।१३७।। इतरही झाले विस्मित मनी । मस्तक ठेवितीं गुरूचरणी । गुरूसी आळविती नम्रवाणी । रंगनाथ

स्वामीसीं वासुदेव ।।१३८।। जय सद्गुरू रंगनाथा । तुजवीण मी पोरका अनाथा । तूच लाविले मज परमार्थां । मोक्षदाता उदारा ।।१३९।। तु कृपेचा कृपाधन । तू सच्चिदानंद नारायण । इच्छित घेऊन भक्तगण । आशेने आलो दारासी ।।१४०।। तू जरी माते उपेक्षिसी । तरी मी प्राथूं कवणासी तु परम समर्थ कृपाराशी । तव आज्ञा मम प्रमाण ।।१४१।। तूच मातापिता सद्गुरू । तुच माझा कल्पतरू । तुच भवसागरी आधारू । तुजबीण अन्य नसे मज ।।१४२।। भक्तांची विनंति अनुग्रह देण्यासी । परी तव आज्ञेवीण न करेची । इच्छा असेल तव मानसी । तरीच देईन अनुग्रहा ।।१४३।। या तव समाधीस्थानी दगडांच्या पादुकां मधुनी । औन्दुबर उगेल ह्याच स्थानी । तरच अनूग्रह समजेन ।।१४४।। किती गुरूंची अद्भुत शक्ती । जाणून वासुदेवांची निःसीम भक्ती कोण्या गुरूस नावडे शिष्याची महती । गुरू ह्रदय द्रवले ।।१४५।। त्या दगडांच्या पादुकांमधुनी । अवघ्या दोंनच महीन्यांनीं । दाखविलेल्याच स्थानी । औन्दुबर पहा उगवले ।।१४६।। अवघे जयजयकार करिती । रंगनाथ स्वामीची । गाती महती । अशक्यही शक्य करती । आश्चर्य वाटें सकळीका ।।१४७।। जरी भक्त झाले चिंतातुर । परि वासुदेव बिनघोर । सत्याला नको कसला आधार । सत्यास न बाधा कशाची ।।१४८।। जो असत्य वदे वाणी । तो पातक्यांचा शिरोमणी । तयासी तो चक्रपाणी । न भेंटे

कधींही ।।१४९।। सत्य वाक्य बोले जो सदा । पांडुरंग तत्पर झेलण्या शब्दा । जपतपाची न आवश्यकता
तदा । सत्यापुढे वापुडें ।।१५०।। सत्य साक्ष पटवी पुण्याईची । सत्यवक्ता धर्म राजा प्रसिद्धची । पुण्याईने रथ चाले अधांतरीचीं । पुराणांतरी लिहिले असे ।।१५१।। सत्याची देव घेतसे कसोटी । दु:सह हाल होती संकटी । सत्यासाठी प्राणही देती राजा हरीश्चंद्रासारखे ।।१५२।। सत्यासाठी धांवुनि आले रंगनाथ पट्ट शिष्य वासुदेवा पाहुनी अनाथा परीक्षेस उतरवितो धरूनि हात । धन्य धन्य गुरूवरा ।।१५३।। धन्य गूरवरा रंगनाथा । तूच माझा रमानाथा । अष्टसिद्धी राबता हाता । अशक्य काय तुज जगती ।।१५४।। वासुदेव गूरूसी प्रार्थिती : तुज त्रास दिलासे अती । क्षमा करावी दासातीं । धन्य माय माऊली ।।१५५।। वत्सासाठी धावुनी आली । लाज माझी राखली । द्रोंपदीसाठी वनमाळी । जैसा धावुन आलास ।।१५६।। अशक्य दगडांतून अंकुर निघणे । त्यातच औन्दुबर उगवणे । मी गळ घातला गुरू कारणे । लाजिरवाणे मजसी ।।१५७।। गुरू घेती भक्ताची कसोटि । परि माझी रित असे उफराटि । गुरूपरीक्षा घेतली संकटी प्रेमासाठी मी जाण ।।१५८।। भय व्याघ्र घालूनी उडी । पहा धरली माझी नरडी । देखोनी ऐसें शीघ्र सोडी । तूच खरा सद्गुरू ।।१५९।।

सद्‌गुरूवीण जन्म निर्फ्रळ । सद्‌गुरूविण दु:ख सकळ । सद्‌गुरूविण तळमळ न ये कवणासी ।।१६०।। तव आशिर्वाद जाणूनी सत्य । तव आज्ञेत राहीन नित्य । धनाचा लोभ न सूटो मजप्रत । रक्षी विषापासूनी ।।१६१।। तव कृपे कामाक्रोधादि मद मत्सर लोभ मोहादि बंदीस्त केले तुरूंगामधि जन्म ठेंप काळे पाणी ।।१६२।। त्वा घातिले नेंत्री अंजन । दिसो लागले ब्रम्हधन । सद्‌गुरू वचनें ज्ञान । प्रकाश मिळें ।।१६३।। सदद्दीत जाहला कंठ । फुटेना शब्द हलती ओठ । दिसू लागलें ब्रम्ह विष्णू निळकंठ । दत्तात्रय अवधूत ।।१६४।। आनंदाश्रु वाहती नयनी । पवित्र गंगा यमुना बहिणी । आल्या अभिषेका सदगुरू चरणी । करावया पाद्यपूजा आरती ।।१६५।।

आरती सदगुरूनाथा । रंगनाथा समर्था ।
आदी सद्‌गुरू आदीनाथा । चरणी ठेविला माथा ।।धृ।।
काकासाहेब राजारामभाऊ । भाऊसाहेब रंगनाथ गुरू ।
भवसागर तरण्या तारू । तुम्हीच आम्हा आधारू ।।१।।
किती वर्णू निज मुखे । वर्णिलिया होती सूखे ।
शक्ती भव दु:खे । पुर्व पुण्य फळले देखे ।।२।।
अज्ञाने जन किती । निज स्वरूपा नेणती ।

पाहुनी जन दु:खा । सर्वा देती निजसुखा ।।३।।
अधिकार तुझा जाण । शेषालागी पडले मौन ।
ब्रम्हादिक स्थिर झाले । आहे सामर्थ्य आगळे ।।४।।
पाहुनी निज दृष्टी । सुखी झाली उठाउठी ।
म्हणोनि वासुदेव । चरणी मागतसे ठाव ।।५।।

हा अध्याय नित्य वाचतां । कुशाग्र बुद्धी होईल तत्वता । सद्बुद्धी वाढेल परमार्था । यांत नसे संशय ।।१६६।। आपण गुरूशोधात असता । तळमळ असेल बहु चित्ता । गुरू भेटतील अवचिता या अध्याया वाचने ।।१६७।। स्वस्ति श्री वासुदेव चरित्रामृत । सदगुरूच प्रेंरक असती येथ । निमित्त मात्र मुख यशवंत ।

।। प्रथम अध्याय गोड हा ।।१६८।।

# अध्याय २ रा

श्री गणेशाय नमः ।। ॐ नमोजी गणनायका । गौरीपुत्रा विघ्नांतका । कृपाळा त्रिनाप हारका । पाव माते गणपती ।।१।। ॐ नमो शारदे सरस्वती । विद्येची तू देवतास्फूती । यशवंतास देई स्फूर्ती । गुरूचरित्र वदावया ।।२।। जेथे वेदासही पडला विचार । तेथे मी अज्ञान पोर । काजव्याने कां भास्कर । दीपवील दयाळा ।।३।। ऐसा जो जगदाधार । परम दयाळू सर्वेश्वर । तो कृपा करी माझेवर । दीन नाथा दीनबंधु ।।४।। मागिले अध्यायी कथन । वासुदेवांचे बालपण । दोन वर्षातच शिक्षण । बालवर्ग ते मॅट्रीक ।।५।। नोकरी करूनी मिळविती । अर्थ परमार्थ साधिती । कीर्तन प्रवचन करती । दीनोद्धारा कारणे ।।६।। ज्ञान लालसा फारच मोठी । वेदशास्त्रादि अभ्यासिती ।  वेळांत वेळ काढिती । नोकरी करीत असतां ।।७।। मूळचीच परमार्थ वृत्ति । पैसा लोभ स्वन्पाती । न कधी शिवलेती । ज्ञानभांडार लुटे फुकट ।।८।। निःस्वार्थ बुद्धी देखोनी । त्यावरी सरस्वतीची मोहिनी । ह्रदयी विराजें चक्रपाणी । शांतदांत उदार ।।९।। भक्त लागती मागे । अनुग्रहासी द्या वेगे । गुरूमाऊली धांव वेगे । येऊनि वत्सा शांतवी ।।१०।। वासुदेव सांगती तयांना । गुरू आज्ञेवीण कवणा । न देई अनुग्रह जाणा । दृढ निश्चय

गुरूपदी ।।११।। कशास लावता मज उपाधी ।। गुरूंनी घेतलीं समाधी । ना केला अभ्यास कधी । अधिकारी पुरूष पहावा ।।१२।। मी तो संताचा सेवक । माझे मलाच कळेना देख । सर्वाभूती परमेश्वर एक । नामस्मरण करावे ।।१३।। परी भक्ताग्रहास्तव । करूणेने घेतला ठाव । रंगनाथ गुरूराया धांव । सोडवी संकटांतुनी ।।१४।। मी तो अज्ञान आपुला दास । आग्रह करितो अनुग्रहास । आज्ञा शिरसावंद्य खास । उल्लंघी न कदापीं ।।१५।। बांधीव समाधी दगडांची । पादुकांतुन औदुबर उगवेची । पाहुनी गुरू चमत्कारचीं । आशिर्वाद देती वासूदेवा ।।१६।। अनुग्रह देती भक्तांसी । भेद ना रावरंकासी । पैका न लागे गुरू करण्यासी । ऐसे निर्लोभी गुरूदेव ।।१७।। रंगनाथस्वामीस गुरू करण्यासी । दोनच पैसे लागती त्यासी । जैसी लागे साईबाबासी तैशीच यांनाही ।।१८।। रंगनाथ स्वामी पूर्ण काम । दोन पैशाचे काय काम । कैसे म्हणावे त्या निष्काम । शिष्यासी दाम मार्गे ।।१९।। निष्टा आणि धैर्य दोन हेच ते पैसे महान । मी ते तेव्हांच टाकिले देऊन । वासुदेव सांगती ।।२०।। तैसेच ते दोन पैसे मजसी । द्या अनुग्रह घेण्यासी : तेणे सार्थक जीवासी । निरंतर लाभेल ।।२१।। वरी यशाचा वांटा । विपत्ती पळती बारा वाटा । तेथे न राही अविचाराचा काटा । सुयश सर्वदा लाभेल ।।२२।। गुरू जरी महाप्रबळ । अपेक्षी शिष्य प्रज्ञा केवळ । गुरूपदी निष्टा प्रबळ । धैर्यबळ सबुरी

।।२३।। बाबाँची मनमोहन  वाणी उपदेंशाची अलौकीक सरणी पदोपदी अभिनव करणी मस्तक चरणी तयाचे ।।२४।। न येता दैव उदयासी । गांठी न पडे साधुसंताशी । तो जवळअसता उशापासी । पाप्यासीं दिसेना ।।२५।। तात्पर्य संत समागमा । ना मिळे अभागी अधमा । होता ईश्वरी कृपा सुगमा । अन्यथा दुर्लभ हा योग ।।२६।। साधी रहाणी उच्च विचार सरणी । गर्व नसे अंत:करणी । राव रंका घरी जाऊनी । भेटती निरहंकारे ।।२७।। शिष्यास मानीती पुत्र । सुखी व्हावे ध्यास अहोरात्र । उद्धार करण्याचे घेतले सत्र परम पवित्र तारक ।।२८।। कर्णोकर्णी जाहली मात शिष्य वाढती अगणित । गावोगांवी बोलावित । आग्रहे घेऊन जातीच ।।२९।। नोकरी केली व्यावहारीक । लाच न घेतली कधी देख । कर्तव्य करूनी सकळीक । रिटायर जाहले ।।३०।। रिटायर होती नोकरीत । आनंदी आनंद मानत । संसार अर्जुन श्रीहरीप्रत । परमार्थासी मोकळे ।।३१।। ज्याने अध्यात्मज्ञान जाणले । हळू हळू संसारातून निघाले । विरक्तीस अंगिकारिले । मोहपाश तोडुनी ।।३२।। निर्वाह पुरते अन्नआच्छादन । तैसेच आपुले लालन पालन । लावती अध्यात्मिक उन्नती लागून । जन्म मरण चुकवावया ।।३३।। वडील मुलगा प्रभाकरपंत । व्हेटरनरी डॉक्टर असत । दुर्गादास शेतकी खात्यात । भास्कर तो शिकतसे ।।३४।। कुसुम प्रेमला सुमन कन्याचे विवाह करून । जाहला मुक्त ऋणांतून ।

नरहरी कृपे ।।३५।। वडिलीपार्जित घरदार तशीच इनामी जमीन वर । सोपवूनी मुलांवर हळूहळू माया तोडिली ।।३६।। राहिली ना काळजी घराची । फक्त दीनोद्धार करण्याची । तळमळ रात्रंदिनची । ब्रीद ज्याने घेतले ।।३७।। पेन्शन जे मिळतसे । तेणे गांवोगांव हिंडतसे । परमार्थी मार्गी खर्च होतसें । लिंपित ना पै चाही ।।३८।। शिष्य फारच आग्रह करूनी । बळजबरी देती गुरूदक्षणी । ते मिळालेले दुसऱ्या देतीं वाटुनी । किंवा पैसे पाठविती सनातन धर्म मंडळा ।।३९।। जिकडे तिकडे झाली प्रसिद्धी । शिष्यमंडळी वाढे अल्पावधी । संसाराची सोडली उपाधी । दीनोद्धारा जुंपले ।।४०।। मद्रास म्हैसूर हैद्राबाद । बेंगलूर खानदेश वऱ्हाड । घरी जाण्या ना सवड । अवघा महाराष्ट्रही आकर्षिला ।।४१।। ज्यांची स्थिती झाली विदेही । सणावारीही न जात स्वगृही । अवघ्या चराचरी प्रभु पाही । विश्व हेचि घर माझे ।।४२।। काम्यकर्मे द्रव्योपार्जन । एतदर्थ न शरीर पोषण । यावच्जीव तत्वज्ञान संपादन । हेच जीवन साफल्य ।।४३।। वेदशास्त्रांदि बहूत वाचन । परी न करिती तसे आचरण । त्या नसे उपदेशा कारण । अधिकारही योग्यसा ।।४४।। जगण्यापुरते घेती अन्न । पंचप्रांणाहूनी समजुन । भात भाकर पोळी शिळेही समाधान । जठराग्निशांत विण्यासी ।।४५।। ना आवड ना रूची कशाची । जो ब्रह्मांड घोळून पिण्यासी । तदाकार वृत्ती जाहली ज्याची । देहभान त्या नसे ।।४६।। ऐसा काळ आनंदे

चालता । दृष्ट लागेल म्हणून देखा । देवही घेती कसोटी भक्ता ज्ञानीच होती उत्तीर्ण ।।४७।। जेथे पतीपत्नीचे एक चित्त । तेथे नांदे रमाकांत । कसोटी घेती ज्वलंत । भक्तिभाव पहाण्या ।।४८।। सुलोचनाबाई परमार्थ मार्गी । वासुदेवास लाभली सुगी । सत्संगे राहील कैसी अभागी । परीस लागता होय सुवर्ण ।।४९।। सुलोचनाबाई प्रेमळभारी । शक्तिक्षीण सदा आजारी । रोगाने घायाळ केले तरी । हिंमत महा दांडगी ।।५०।। देह भोग जोवरी असणे तोवरी प्रारब्धकर्म भोगणे । भोगून शिल्लक ना ठेवणे । पुढील जन्माकुर ।।५१।। संतसांगती भोग भोगावा । पुढील जन्मासाठी ना ठेवावा तेणे गुणे त्या मानवा : पुनर्जन्म खंडण ।।५२।। सुलोचना बाई ही व्रताचारी । सनातन मार्ग आचरी । सदाही देवदेव करी । महाधार्मिक पतिव्रता ।।५३।। काय सांगू पतिव्रतेचे फळ । देवही कापती चळचळ । तिच्या पुण्ये न चाले बळ । सामर्थ्यहीन देवही ।।५४।। या विषयीची गोड कथा । ऐका तुम्ही भाविक भक्ता । शांडिल्या आणि सुमंता । दोघी बहिणी राहती ।।५५।। एकच घर खोल्या दोन त्यात वेगवेगळ्या रहाती जाण । कर्म आले ते धांवून अग्नी लागला घरास ।।५६।। दोघी होत्या सख्या बहिणी परी कर्माची अघटींत करणी । शांडिल्याची खोली गेली जळोनी सुमंताची राहिली ।।५७।। शांडिल्या पुसतसे सुमंता । दोघांचे घर एकच असता माझेच कां जळाले सर्वथा । काहीतर चेटूक

असेल ।।५८।। शांडिलेशी सांगे सुमंता । मी खरी असे पतिव्रता अग्नीहि भीतसे स्पर्शता । ऐसे सामर्थ्य पतिव्रतेचे ।।५९।। तू आहेस अजून कुमारी । तुला कैसी समजेल पातिव्रत्य थोरी । मनापासुनी इच्छा असेल जरी । कर सांगितल्या प्रमाणे ।।६०।। प्रात:काळी जा देवळांत । जो प्रथम पुरूष भेंटेल सत्य । त्या पतिमानोनी निश्चित । सेवा करी मनोभावे ।।६१।। प्रात:काळी गेली राऊळांत । पुरूष बसलेला दिसेदारात । जवळ जावून त्या प्रत । चरणी माथा ठेविला ।।६२।। मनोभावे वरिले तुम्हासी । आज पासून मी तुमची दासी । नका अव्हेरू हो मजसी । कृतार्थ करा मजलागी ।।६३।। पुरूष बोले तियेंसी । पहा निरखून मम शरीरासी । गलित कुष्ट व्यापले सर्वांगासी । दुर्गंधी येत असह्य ।।६४।। तेणे मी बसलो बाहेरच । किळसवाणे होईल मनसाच । सहवासें लाभ न काहीच । व्यर्थ नादी न लागें ।।६५।। शांडिल्या म्हणें प्राणनाथ वरिले मणोमावे शंकराची शपथ । अढळ निश्चय न सोडील साथ । चलावे मज बरोबरी ।।६६।। पांगळा न चालवे तयासी । म्हणुनी पाटीत घातलें पतीसी । आणूनि आपुल्या घरासी । सेवा करी आदरे ।।६७।। सूगंधी उटणे लावूनी अंगासी । रोज स्नान घाली पतीसी । मनोभावे रात्रे दिवणी । सेवे तल्लीन जाहली ।।६८।। कधी न दुख वले मनासी । पतिआज्ञा शिरसावद्य मानसी । कसूर न केला पतिमेंवेसी तेरा वर्ष लोटले : ।।६९।।

एकदा पती बोले पत्नीसी । घेऊन मज खांद्यासी । गावातुनि फिरवुनि आणसी : बैस बैसोनि कंटाळलो ।।७०।। ऐकताच उठली त्वरीत । बैसविले पतीस पाटीती हिंडवत असता नगरात सूंदर वेश्या देखिली ।।७२।। खिडकीत बसली होती । पहा तांच मन चळले अती । भोगावी एकवेळ रती । वासना प्रबळ जहाली ।।७३।। स्त्री असे वासनेची खाणी । बळी कोण न पडले जाणी । देवही भाळले स्त्री पाहुनी । पाड काय मानवाची ।।७४।। ब्रम्हदेव सृष्टी पीता । तोच घडवी प्राणिमात्रा । आपण सारे कन्यासुता । इतके नाते जवळचे ।।७५।। अतिशय सुंदर स्त्री केली । मती ब्रम्हाची पालटली । वाईट बुद्धी चळली । पहा स्वकन्येवरी ।।७६।। पत्नी वेदमाता गायत्री । ऋषी मूनी जिला ध्याती । दुसरी पत्नी सावित्री । असतांहि मती चळली ।।७७।। महादेवासी मोठे मानिती । असतां सुंदर पार्वती अती । स्त्री वासने चळली मती । धांवे भिल्लीणी मागे ।।७८।। नाथांचा नाथ मच्छिद्रनाथ । देवही ज्यास चळचळ कांपत । तिलोत्तमने स्त्रीराज्यांत । वश करूनो ठेविवले ।।७९।। स्त्री असे विषयाची खान । नाश पावले कित्येक जण । भद पडले इंद्रा महान । अहिल्येंसी भोगता ।।८०।। स्त्रीला उपमा देती चंद्राची खाण समजती कवी लाबण्याची । त्यासही कलंक लागला असेची । गुरूपत्नीसी रमता ।।८१।। शिव देती भस्मासुरासी वर । ज्या शिरी तू ठेंविसी कर । भस्म होईल सत्वर । क्षण न लागता

||८२|| ऐसे असूनी विषयी गुंतला | पार्वती मातेच्या रूपासी भूलला तिच्याच पाठी मागे लागला | अखेर भस्मिले मोहिनीने ||८३|| लंकाधीपती रावण | ज्यास चळचळ कापे त्रिभूवन | देव ग्रहासी बांधून सेवा करवी स्वेच्छेने ||८४|| रावण तो शिवाचा भक्त | शिव रामप्रभूसी ध्यात गुरूचे गुरू असता नात | मती चळली स्त्रीं वासने ||८५|| महाबलाढ्य ज्ञानी रावणासीं | दुर्बुद्धी सुचली ऐसी | म्हणे सीतेस करावी दासी | म्हणून चोरून आणिले ||८६|| त्या सीतेसाठी रावणासी | व्यर्थ मुकला प्राणासी | बंधू पुत्र गेले स्वर्गासी | विषयाच्या संगतीने ||८७|| विश्वामित्र महातपस्वी | इंद्रादि देवहि घाबरती ज्यासी | मोहिला अप्सरा मेनकासी | विषयी तपश्चर्या निष्फळ ||८८|| ऐशा स्त्री वासनांती | मोहित झाला शांडिल्या पति | नवल नसे काहीच जगती | उदाहरणे बघितली ||८९|| फिरवूनि आणिले घराशी | जेवणास वाढीले त्वरेसी पाटावर बैसवोनी पतीसी | जेवण्या विनवीयले ||९०|| परी रूसून बैसली स्वारी | बोलेनाच तिळभरी | घाबरली पतिव्रता नारी | प्राणनाथा रूससी कां ||९१|| मी आहे पतिव्रता अबला | कधी न अपुला शब्द मोडीला | नेत्राश्रू वाहती घळघळा | स्फूंद स्फूंदोनी रडें ||९२|| तेरा वर्षे सेवा केली | कधी नच उणे पडू दिली | रात्रंदिन मी झटली | पतिसेवे कारणी ||९३|| माझे काही चुकले असेल तर | क्षमा करावी स्वामी मजवर | मी आपुल्या चरणाची

चाकर पाया पडते तुमच्या ।।९४।। नका रागावू मजवरी । तुम्हावीण मजलातरी । आधार न कुणाचा या धरी । बोला बोला प्राणनाथा ।।९५।। नाथ म्हणे प्राणसखी । तुझे न काही चुकलेची । विनाकारण शोक न करसी । कसे सांगू कारण ।।९६।। मी दुर्गंधी महाकुष्टी कधी न झालीस तू कष्टी । तूच जीवाधार मज एकटी । धन्य धन्य पतिव्रते ।।९७।। मज लागली एक उपाधी । सांगू मी कवण्या तोंडी । जाळतसे अंतरामधी । शांतता कैसी लाभेना ।।९८।। शांडिल्या म्हणे पतीसी । संकोच न करता सांगसी । मी तुमच्या पायाची दासी । सांगेल ते करीन ।।९९।। पती म्हणे गावातुन हिंडतांना । निळ्यामाडीत शनिपेठी वारांगना पाहुन सौदर्यं वेधली कामना । घ्यावे रतिसुख एकदा ।।१००।। त्यावीण मजला काही । शांतता लाभणार नाही । मज नको अन्नपाणीही । पैशाविण व्यर्थ ।।१०१।। तव हाती मम जींवन मरण । तू पहा खटपट करून । जरा तिचे मन वळवून । तुझे स्वाधीन सर्वही ।।१०२।। ऐकून पत्नी बोले मधूर । प्रयत्नासी न करील । कसुर । करील मनोरथ पूर्ण जरूर । जेवण करावे सत्वरी ।।१०३।। पतीचे जेवण जाहल्यावरी । विचार ती सारखी करी । वेश्या असती पैशा आहारी । पैसा तो जवळी नसे ।।१०४।। काळजीने झोप लागेना । विचार सुचला तिचे मना । सेवा करून वळवुं मना । निश्चय केला त्वरीत ।।१०५।। उठली आधीच रामप्रहरी । सामसुम होती अजून

नगरी । जाऊन लगबग वेश्येच्या घरी । शांत झोपलेले पाहीले ।।१०६।। आंगण झाडुनी साफ केले । सडा संमार्जन शिंपडले । रांगोळीने सुशोभविले घरी त्वरीत परतली ।।१०७।। सकाळी उठली वारांगना । दर्शन घेता सूर्यनारायणा । सडासंमार्जन रांगोळी अंगणा । पाहून चकीत जहाली ।।१०८।। म्हणे आज कैसे हे अघटीत । दिसे अंगण स्वच्छ सुशोभित । कोणी केले कोडे न उलगडत । धन्य मानी देवाला ।।१०९।। रोज सकाळी उठुनी पाहे अंगणी सडा रांगोळी आहे । दिवसानू दिवस जात लवलाहे ।। आश्चर्य वाटे मानसी ।।११०।। एके दिवशी कल्पना आली । कोण सेवा करितो आपुली । मी हीन पापिणी असली । उपकार न केला कोणाते ।।१११।। रात्रभर काढली जागून अंगणातील चाहूल ऐंकून । हळूच दार उघडून । दिसली रांगोळी काढतांना ।।११२।। पाऊल न वाजविता त्वरे । त्याबाईस मागुन धरीले करे । घाबरू नको ताई चल अंतरे । घरात मोकळे बोलू ।।११३।। तू तीन महिने सेवा केली । तेण मी प्रसन्न झाली । काय मोल देवू तुज बोली । सांगेन ते मी देईन ।।११४।। ऐकून ऐसे मधूर भाषण । शांडिल्या रडै स्फूद स्फुदुन । बाई मी बोलू कैसी जाण । भीति मज वाटते ।।११५।। ताई तुज त्रास असेल घरी । तर चाकरी मम घरी बहीण समजून वागवीन थोरी । मोकळे करी मन तुझे : ।।११६।। शांडिल्या सांगे वारांगनेसी । बाई किती तू दयाळू दिससी ।

देवच भेंटला वाटे मजसी : आधार मजना कोणाचा ||११७|| ताई मम पती पंगू कुष्टी | पहाताच होसील तु कष्टी पाटीत हिंडवता त्याची दृष्टी | पडली तव सौदर्ये ||११८|| सौदर्य पाहु न कोमल अती अप्सराच भासे भूवरती | मिळावी एकदाच तव रती | रूसला अन्नपाणी वर्जोंन ||११९|| पतिदेवच देव आर्यस्त्रीशी | म्हणून वचन दिधले पतीशी | इच्छा पूर्ण करीन सावकाशी | स्वच्छ चित्ते जेवावे ||१२०|| पैसा न मजजवळ पूर्ण जेणे पती इच्छा करीन पूर्ण | म्हणून सेवा तुमची करून | प्रेम संपादन केले ||१२१|| एवढे काम करावे विनंती सर्वस्वी आहे ते तुमचे हाती | एकदाच करा कृपा पुरती | या दीन दासीवरी ||१२२|| ऐकून तिचे मधुर भाषण | चित्त द्रवले गेली विरघळून | म्हणे मी श्रीमंताची दासी असून | करीन पुर्ण तव इच्छा ||१२३|| उद्या रात्री घेऊन ये पतीसी | आज्ञा मिळताच शांडिल्यासी | नमस्कार करूनीं आली झटदिशी | आनंदाने स्वगृही ||१२४|| पाटीत बैसविला पती घेंऊन ती डोक्यावरती | निघाली तीं मध्यरात्री | वेश्ये घरी जावया ||१२५|| सुटला सोसाट्याचा वारा वरून पडती पावसाच्या धारा | वादळात झाला जीव घाबरा | रस्ता चुकूनी गेला ||१२६|| आली बाहेर वेशीं पाशी | जेथे राजाज्ञे मांडव्य ऋषीसी | चोर समजून शूळासी | चढविले होते ||१२७|| वादळाने तोल जाऊ लागला | मुळीच दिसेना रस्त्याला जाता ऋषीस धक्का लागला |

तेणे विव्हळला ऋषी ।।१२८।। त्याने शाप दिला स्त्रीला । तुझा धक्का लागला मजला । तेणे जीव कासावीस झाला । म्हणून तुजसी शापितो ।।१२९।। सुर्योदय होण्यापुर्वी जाण । तुझा पती पावेल मरण : कळवळली शांडील्या ऐकून । चरण धरीले ऋषींचे ।।१३०।। क्षमस्व मुनिराया ते बोले । जाणून बुजून ना केले । वादळाने फेकली गेले । पंगू पतीस नेंतांना ।।१३१।। अपराध घाली पोटी । स्वामी तूच जगजेठीं । सौभाग्य रक्षी संकटी । तुमच्या ह्या मुलीचे ।।१३२।। स्वामी म्हणती ऐंक कन्या । शाप न जाई कधी वाया ।। माझ्या जवळ नसे उपाया । सौभाग्य तुझें रक्षणी ।।१३३।। पती सेवा एकनिष्टे करीता । वैधव्य आले आकस्मिता । पतीसेवा जाईल व्यर्थता देवा धाव लवकरी । ।।१३४।। धर्माचरणे असेन खरी पतीव्रता । सुर्य उगवणार नाहीच आतां । सर्वसाक्षी परनेंश्वराची सत्ता । शपथ तुज नारायणा ।।१३५।। पतिव्रतेचे शाप वचन ऐकून । पूर्वेस खालीच थांबला नारायण । तेणे सर्वत्र अंध । कार महान । व्यवहार बंद पडियले ।।१३६।। हा हा : कार झाला सगळीकडे । जप करून देवा घालती साकडे । अजून कैसे नाही उजडे । देवही घाबरले ।।१३७।। ब्रम्हा, विष्णू महेश । पत्नीसह येती तेथे जाणूनिया सर्व इतिहास । हतबल तेही जहाले ।।१३८।। शांडिल्यास विनविती देवादि । सुर्यास उजवू दे आधी उपकार करी जडादि । सर्व प्राणिमात्रा ।।१३९।। शांडील्या म्हणे

देवासी । सूर्य उगवता आजसी । येईल  मज वैधव्यासी । म्हणून मी ना ऐके ।।१४०।। मजला दुख होईल भारी । माझे दु:ख कोण निवारी । माझी चूक नसताजरी । मी कां भोगू वैधव्य ।।१४१।। पतिव्रतेंचा बोल न जाई व्यर्थ । खोटें न होई ऋषीवचन समर्थ । दोघेही  समबल सांगू किमर्थ । कोडे पडले देवास ।।१४२।। शांडिल्या ऐकेना देवांचे मुळीच । वैधव्याची कल्पना कैसी तुम्हास । समान शीले ऐकेन खासा महा पतिव्रता अनूसुयेचे ।।१४३।। अनुसूया महापतिव्रता नारी । तीच होईल माझी कैवारी । तिची कोणास न ये बरोबरी । किंचितही त्रिभुवनी ।।१४४।। माता अनुसूया कांडत असता । ब्रम्हर्षी नारद ये अवचिता । तात्काळ मूसळाचा हात सोडिता । वरच्यावरी राहीले अधर ।।१४५।। आश्चर्य वाटते नारदासीं । कथा कथिली स्वर्गासी । खोटे वाटले देव पत्नीसी । आम्हाहून श्रेष्ठ कोण ।।१४६।। पत्न्यांच्या सांगण्यावरून । ब्रम्हा, विष्णु महेश तीन । आले सत्व करण्या हरण । अनुसूयेचे घरी ।।१४७।। वाढी भोजन होऊन नग्न । तरच आम्ही करू जेवण । नाहीतर जातो परतुन । विन्मुख होउनी ।।१४८।। सत्व हरण । करण्या आले । अनुसुयेने हे जाणले । पतीस स्मरूनि हो म्हटले । चला उठा जेवणा ।।१४९।। पाटावर बैसले झडकरी । अनुसूया आतां विचार करीं । पतींच तारतील निर्धारी चिंतन केले अत्रीचे ।।१५०।। अत्रीचे चरणतीर्थ घेउन ।  शिंपडले तिन्ही देवा वरून

| तीन झाले बालक सान | दत्तात्रय अवतरले ||१५१|| विवस्त्र होऊन झटकन | घेंतले बालकांना उचलून | पाजण्यास लावी स्तन | पान्हा फुटला | सत्वरी ||१५२|| नारदाची फेरी आली | बाळे झालेली पाहिली | ब्रह्मा विष्णू महेश झोळी | झोका देतसे अनुसूया ||१५३|| नारद गेले स्वर्गी झटकन | सांगितले त्यांच्या पत्नीस बोलावून | अनुसयेचे कुशी तिन्ही जण | बाळ होऊनी लोळताहे ||१५४|| गर्वाचे घर होतसे खाली | सावित्री लक्ष्मी पार्वती आली| अनुसूयेस शरण गेली | भिक्षा मागितली पतींची ||१५५|| अनुसूया सांगे तयांसी घ्या ओळखून आपुल्या पतींसी | झटकन गेल्या पाळण्यापासी | परी न ओळखे कोणीच ||१५६|| परत शरण जाता अनुसूयेसी | अनुसूया सांगे बालकांसी | धारण करा पुर्वरूपासी | तात्काळ जहाले पुर्वरूप ||१५७|| प्रसन्न जहाले विधी हरी हर माग कोणता देऊ वर | अनुसूये तू धन्य खरोखर | त्रिभूवनी अजरामर ||१५८|| अनुसूया सांगे दैंवासी | पुत्र नाही मजशी | तुम्हीच पुत्र म्हणून घरासी | रहावे सदैव येथेंच ||१५९|| तथास्तु म्हणून देव बोले | दत्तात्रय रूप धारण केले देवादिकहि आनंदले अत्री ऋषीचे सदनी ||१६०|| अजुनही श्रीगुरूदत्त | स्नानास जाती काशीत | माध्यान्ह भीक्षा करवीरांत | विडा खाण्यास तुळझापुरी

।।१६१।। निद्रेस जाती माहूरगडी । जेथे रेणुका जमदग्नी ऋषी । अनुसूया पीता ऋषी । वास्तव्य करिती ।।१६२।। हा अध्याय वाचता नित्य । शांतता नांदेल निश्चित । कृपा करतील श्रीगुरूदत्त । आनंदी आनंद होईल ।।१६३।। स्वस्ति श्री वासुदेव चरित्रामृत । सद्‌गुरूच प्रेरक असती येणे निमित्त मात्र मुख यशवंत ।

।। द्वितीय अध्याय गोड हा ।।

# अध्याय ३ रा

श्रीगणेशाय नमः ।। हे देवा नृसिंह नरहरी । प्रल्हाद रक्षण्या धांवला त्वरी । स्तंभातून निघे बाहेरी । हिरण्य कश्यपु वधावया ।।१।। भक्तासाठी धावुनि येसी । अनंत रूपे तू घेसी । वासुदेवांच्या घरासी । तूंच कुळदैवत ।।२।। स्फूर्ति द्यावी मजसी बरवी । सद्गुरूसेवा मजकडोन घडावी । वासुदेव रावांची मदती गावी । तेणे कृतार्थ जीवन ।।३।। असो मागले अध्यायांत । शांडिल्या सांगे देवाप्रत । अनुसुयेचे ऐकेन सत्य । विश्वास पूर्ण तिजवरी ।।४।। ऐसे ऐकून देवांनी । अनुसुयेस आणिले बोलावूनी । सारा इतिहास ऐकुनी । स्तब्ध झाली अनुसुया ।।५।। अनुसुया बोले शांडिल्यासी । स्त्री धर्मं ठावे मजसी । काळजी न करी जरासी । हित तुझे साधेल ।।६।। शांडिल्य ऐक माझे जरासी । आज्ञा दे उदया सूर्यासी । दोघांचीही वचने सत्यासी ।पाळून कार्य साधेल ।।७।। येतांच सूर्य उदयासी । शांडिल्यापती गतप्राणासी । झाला पाहुन घाबरली मानसी । मांडव्य वचन पाळिले ।।८।। लगेच थांबूनि क्षणभर । अनुसया विनवी शारंगधर । शांडिल्य पतीस उठविले सत्वर । ब्रिद राखिले दोघांचे ।।९।। क्षणभर वैधव्य प्राप्त झाले । ते सर्व स्त्रियांस वाटून दिले । तेथे अस्पर्श बसू लागले । चार दिवस पर्यंत ।।१०।। ऋतुकाली अस्पर्श दरमास । चार दिवस न लाविती कुंकवास । वैधव्य

दर्शक होय तेच । प्रथा पडली तैपासून ।।११।। खण नारळ देवतांनी । शांडिल्याची ओटी भरूनी । निर्व्यंग करूनी पतीस विमानी । उभयता नेले स्वर्गासी ।।१२।। ऐसी सेवा करितां पतीची । पातिव्रत्य धर्म फळथोरची । इहपर लोकी सौख्याची । प्राप्त होईल निश्चये ।।१३।। पती आज्ञेत सदा रहाती । कोणतेही कार्य करण्यासाठी । पती आज्ञा न उल्लंघिती । पातिव्रत्य धर्म हाच ।।१४।। पत्नीसी पती हाच देव । त्यावरी ठेंवी सदा भाव । प्रसंगी कुरवाळून जीव । साफल्य जरी जीवाचे ।।१५।। ऐसी सुलोचनाबाई पतिव्रता । महाराज गांवोगांवीं हिंडता । कधी नजेवी नैवेद्य दाखवता । वासुदेवांच्या फोटोशीं ।।१६।। आर्यस्त्रीचे लक्षण । पतीचे जेवण झाल्याविण । कधी न जेवी आपण । पतीव्रता धर्म नियम ।।१७।। जरी होते बालबोध वळण । आवडभारी पोथ्या पुराण । आचरणांत स्वत: आणून कर्मे करी स्वानंदे ।।१८।। नित्य देवपुजा करी । सहस्त्रनाम श्रीहरी । गीतेचा पाठ करी । वाचणाची आवड ।।१९।। नित्य गोपूजा करून । तिला गोग्रास अर्पुन । पंचमह यज्ञ तेणे घडून । पुण्य पावण जाहली ।।२०।। सद्गुरू वासुदेव खाण । ज्ञानाची अगाध जाण । भक्तास सांगती हितकल्याण । पंचमहा यज्ञ करा हो ।।२१।। प्राण्यांत प्राणी मानव सूज्ञ विवेक शस्त्र दिले महान । पुनर्जन्म टाळण्याकारण । बंधन तोडण्याते ।।२२।। रोज करतां पंचमहायज्ञ । अजाणता पंचसूना पापगहन । तयांचे होय निर्दहन । पापवृत्ती ठायीच ।।२३।। कंडणी चुल्ली पेषणीं । उदकुंभी आणी मार्जनी ही पंचसूना या नांवांनी ।

ओळखली जातसे ।।२४।। कंडणी म्हणजे कांडतांना । न जाणुन जीव हिंसा नाना । होतसे सर्वास अज्ञाना । पाप ते लागतसें ।।२५।। चुल्ली म्हणजे चुल पेटवितांना । पेषणी म्हणजे दळतांना । चुकुन होतसे जीवहत्या नाना । परी दोष लागतसे ।।२६।। उदकुंभी घासताना भरतां जीवहत्येस उदकुंभी म्हणता । मार्जनी म्हणजे झाडता चालता । सडासंमार्जनी जींवहत्या ।।२७।। ऐसे पंचप्रकारचे पातक । जैसे फवारता पीकास । पंचमहायज्ञ नाशक । पापनिवृत्ती होय ।।२८।। याने चित्तशुद्धीचे बळ शूद्ध ज्ञानउपजे सोज्वळ । ज्ञानानंतर मोक्ष अढळ । मिळे सुफळ भाग्याचे ।।२९।। स्त्रियांनी जरूर करावा पुरूषांनीही अवलंबावा । चालता श्वास घेता पाहावा । जीव हत्या कितीतरी ।।३०।। जेवण्यास बसण्यापूर्वी । आपल्यातुन थोडे गाईस अर्पी अतिथी भोजन अथवा भिक्षा देई । तरी घडें पंचमहायज्ञ ।।३१।।

श्लोक :- तेनाग्रयो हूता सम्यक पितरश्चपि तर्तीता ।
देवाश्च पुजीतास्तेन यो ददाति गव्हानिकम ।।३२।।

अर्थ - देता आहुती अग्नीत । तैसेच पितरांना अर्पीत । देवपुजा लाभ लाभता एक गोग्रास दिल्यानें ।।३३।। दिवसा मागुन दिवस जाता । फ्ल्यूची साथ आली असतां कोणास बळी घेईल अवचिता । कर्मभोग न सुटे ।।३४।। विविध ताप कोणा न सुटला । त्याने जो असे पोळला । तोचि एक अधिकारी

झाला । परमार्थांसीं ।।३५।। पहिला ताप अध्यात्मिक । दुसरा तो अधिदैविक । तिसरा आदिभौतिक । ताप त्रय जाणावे ।।३३।। देहातुन जे उद्भवले । इंद्रिये प्राणा दु:ख झाले । त्यास अध्यामिक बोलींले । ताप पहीला जाणावा ।।३७।। खरूज देवी गोवर । फोड मुळव्याध विकार व्रण गजकर्ण तिडक फार । आव मुरडा हगवण ।।३८।। क्षय पंडु दना पोट दुखी । रातांधळे कर्ण नेत्र दुखी । मुके बहिरें पांगळे देखी ऐसे अध्यात्मिक तापे जाणावी ।।३९।। ठेवा लागती काटे मोडती । गांधिल माशि विंचु सर्प डसती । चेगरण कापण वरून पडतो । या नांव आदि भौतिक ।।४०।। सासुरवास मारणे डागणे । गरम पितांना जीभ पोळणे । अंगावर किंवा दरीत कोसळणे । ऐसे ताप आधिभौतिक ।।४१।। शुभाशूभ कर्मांने जना । देहांती भोगे यमयातना । स्वर्ग नरक भोग नाना । यास आधि दैविक बोलीले ।।४२।। अविवेके कृत्ये केली । स्वार्थे दुसऱ्यास लुबाडली । नीती सारी सोडून दिली । भोगसी यमयातना ।।४३।। वेदाज्ञेने न चालती । हरिभक्ति न करिती । त्यांस यमयातना जाचिती । ऐसे ताप आधि दैविक ।।४४।। आधींच फार अशक्त पण त्यात रक्त कमी जाणा । पोरांसाठी खस्ता नाना । खूप सोसल्या ।।४५।। पंचभूतांचे हे शरीर । कोठवर धरील धीर । सारखी झीज अनिवार । रोज रोज होतसे ।।४६।। संसार म्हणजे रबरी फुगा । हवा कोंडुन बांधती धागा । रबर होता जीर्ण बघा । नाश पावतसे ।।४७।। संसार म्हणजे सवेच स्वार । नाही मरणास उशीर । मापी लागले शरीर तरा

इमिदास उक्ती ||४८|| नित्या काळाची संगती | न कळे होणाराची गती | कर्मा सारिखे प्राणी पडती | या महीवरी ||४९|| सरता संचिताचे शेष क्षणाचा नसे अवकाश | भरता न भरता निमिष | देह सोडोंनी जावे लागे ||५०|| मृत्यू न म्हणे हा भूपति | श्रीमंत असों वा मंत्री | लोकप्रिय पुढारी अती | जावे लागे सर्वासी ||५१|| जन्मतांच नूतन बालक | त्या मातेस नेई बेधडक | तेथे न उधारीचा सौदा देख वेळ भरता नेतसे ||५२|| मृत्यू न म्हणे हा पंडित शास्त्रज्ञ | बहु पदव्या डॉक्टर महान संत योग्यासही लागे जाण | बोलविणे येताचि ||५३|| दोन तिन दिवस अगोदर | सुलोचना बाईनी जाणले सत्वर | देव बोलावणे आले नेण्यास वर | तयारीत असावे ||५४|| वासुदेव असती फिरस्ती वर | त्यांनाही दृष्टांत दिसला सत्वर घरीच जाणे योग्य फार सत्वर आले घरासी ||५५|| लेकी सुना मुलास बोलाविले | त्यांच्याशी मनमोकळे बोलिले | पतीराजासहि भेटलें आनंदी आनंद जहाला ||५६|| वेळ होती संध्याकाळची | फाल्गुन वद्य अमावास्येची | अशक्त पणा वाढला फारची | उठताही येईना ||५७|| अन्नही जाईना पोटात | दूधहीं घोटवेना घशात जीव फार घाबरत | तरी बोंलणें सुरूच ||५८|| भेटून बोलून सर्वास | घेऊन जाते सौभाग्यास | माहेरी जाते वैकुंठास | बोलूनि प्राण सोडला ||५९|| सर्वास दुख झाले भारी | परी आशा असते खोटी जरी | डॉक्टरास बोलावून आणले घरी | उपचारार्थ ||६०|| कारण बोलता चालता गेली ||६१|| नाडी न | लागे

हातास । स्टेंथस्कोप लाविला छातीस । परी न ठोके लागती त्यास । सारेच होते अटोपलें ।।६२।। डॉक्टर झाले निराश । असेंल मृदु सावकाश । इलाज खुंटला हताश । स्वर्गवासी जहाले ।।६३।। डॉक्टर परतले घरी । सर्वास दु:ख झाले भारी । बांध दु:खाचा फुटला सत्वरी । आक्रोश तो पाहवेना ।।६४।। आक्रोश पाहुनी शेंजारी पाजारी । आले भेटण्या सत्वरी । हळहळले फार भारी । दु:ख पाहुन ।।६५।। सुलोचनाबाई सालस फार । शांत प्रेमी करी उपकार । गल्ली गावात महशूर । कोंणासही न दुखावले ।।६६।। वासुदेव बसती सुन्न मनी । पाहुन पोरांची तोंडे चिमणी । आईची सर ना ये कोणी । इलाज काही नसेच ।।६७।। सारी जनता कुजबुजती खरी । घराणे सनातन धार्मिक भारी आयुष्य गेले देव सेवांतरी । मग अमावास्या मृत्यू कां वाया ।।६८।। आजचा दिवस गेला असतां । झाली असती जिवाची सार्थकता । हळहळ लागली सर्वता । त्यास काय इलाज ।।६९।। ऐकून ऐसी जनता वाणी । वासुदेवांच्या डोळ्या आले पाणी । धावा करिती चक्रपाणी लाज राखी म्हणतसे ।।७०।। मी तो ब्रह्म जाणतसे । नश्वर मायामय सारे असें । नाटकांतला पार्ट करीतसे । तव आज्ञेनुसार ।।७१।। देवा वार तिथी सारे शुभचि असती मला सारे । तूझे हातचे वाईट कांरे । मजला न भासे कल्पांती ।।७२।। रात्र दिवस तुच निर्मिती । विश्रांती मिळण्या जीवासी । ऐसे न कधी करसी । तर कंटाळवाणे वाटेल ।।७३।। कोणतेही असो तिथी दिया सर्व असती समसमान । परी पहाण्याचा दृष्टीकोन दोष

असे अमुचा ।।७४।। तुझे कार्य सर्वच चांगले । कोण म्हणेल त्यास वांगुले । जैसी दृष्टी तैसे भासले । दृष्टी दोष दोषच ।।७५।। पांढरा स्वच्छ सुर्यप्रकाश । परंतु काविळ झालेल्यास । पिवळा दिसू लागल्यास । दोष कोणाचा विबुध हो ।।७६।। एकदा भगवान श्रीकृष्णान । बोलविले धर्मराज दुर्योधन । परिक्षा घेण्या कारण । दरबारा मध्ये ।।७७।। कृष्ण सांगती दुर्योधनासी धुंडून आपण नगरासी सज्जन असेल त्यासी । आणावे मजकडे ।।७८।। मग सांगती धर्मराज सी दुष्ट असे त्यासी । धुंडून आपण नगरासी । आणावे मजकडे ।।७९।। दुर्योधन गेला कृष्णापासी सज्जन न भेटला कोणी मजसी । गाव सारे धुंडण्यासी । वेळ खूप घालवला ।।८०।। धर्मराज भेंटले कृष्णासी । मी हिंडलो सारे नगरासी । परी न दुष्ट दिसला मजसी सज्जन सारे वाटले ।।८१।। तैसेच सारे मजसी शुभ । कोणतेच ना अशुभ अज्ञाने माजविर्ती दंभ । दोष त्यांचा अज्ञान ।।८२।। हे देवा नरहरी । कुळदैवत तूं मुरारी जमले अज्ञान सारी । त्यांचाही लाड पुरवी तूं ।।८३।। तू सर्वांची आहेस माऊली । कुणासही उणे न मानली । अज्ञाना दे साउली कृपाछत्र सर्वांवरी ।।८४।। मला रहाणे त्यांच्यांत तुझी भक्ती वाढविण्यांत । सर्व आयुष्य वेचले सेवेत त्यांना नाराज न करी ।।८५।। मी निष्काम सेवा केली । असेल तर धांव यावेळी । कसोटीची वेळ आली । तुझे चरण ना सोडे ।।८६।। भागवत धर्माचा प्रचार करतो । अज्ञानांना प्रकाश दावितो । तुझे नामस्मरण करण्या लावितो । नको झिडकारू तयांना

।।८७।। सर्व सारी तुझीच लेकुरे । तूं कां पहाणार उणे पुरे । आमुचेच कर्म आडवे येरे । तरी येई धांवूनी ।।८८।। माझी विनंती असे तुजसी । दीर्घायुष्य न दे पत्नीसी । टाळुन अमावस्या दिवसासी। घेउन जा खुशाल ।।८९।। यांत तुला कांही न उणे । ना लोभ मलाही जाणे । परी महती नामस्मरणें । किर्तीं तुझी वाढेल ।।९०।। असेल माझी पत तुजजवळी । धावूनि येई तू वनमाळी । द्रौपदीची पुरविली आळी । तैसी माझी पुरवावी ।।९१।। देवास फुटला पाझर । संतासाठीं धावले सत्वर । कृपा दृष्टी सुलोचनेवर केली असे तात्काळ ।।९२।। श्वास सुरू झाला हळूवार । पापण्या हलती वरचेवर । दृष्टी उघडुन संपूर्ण । पाहिले चहुकडे ।।९३।। जवळच बसलेले सर्वजणी । नाथ द्या मज थोडे पाणी । चहा द्या कपभर करूनीं । मधुर स्वर बोलली ।।९४।। गीता वाचा तुम्ही स्वत:च । मज त्राण नसे बसण्यास । मी शांत झोपली होती साच । मज कां उठवलें ।।९५।। बोलावून आणले डॉक्टरांना । आश्चर्य वाटले पाहुन त्यांना । प्राण कसा परत आला घ्याना । उमजेंना काहीच ।।९६।। शुक्रवार पाडवा उगवला । सण आनंदाने करविला । सवाष्ण ब्राम्हण जेवणाला । घातलें सुलोचना बाईनें ।।९७।। सर्वांची जेवणें आटोंपली । दोन घास आईने खाल्ली । सर्वांना बोलावून जवळी । प्रेमभरे बोलली ।।९८।। तुम्ही माझी सेवा केली फार । तूम्हास कमी न कधी पडणार । नाथांनी दिला सौभाग्यालंकार । घेंऊन चालले माहेरी ।।९९।। लोभ असो द्यावा आतां । दु:ख करितां । मरण सदा पाठीच असे

जन्मता । ते न चुके कोणासी ।।१००।। देवानें निर्माण केले स्त्रीशी पुरूषासी देवा करण्यासी । कार्य संपताच मजसी । जावे लागे स्वगृही ।।१०१।। तुम्ही सारे नोकरी करीता सरकारची मुदत संपता । पेन्शन घेऊन परतता । स्वगृही ।।१०२।। कन्येस पीता । वयात येई पर्यंता । तिचे लग्न करून देता । मूळ धाडी सासरी ।।१०३।। तैसेच मी आले सासरी । तुमची सेवा चाकरी करी । आता जातसे माहेरी । मुदत संपता ।।१०४।। तुमची आमची पडेंल गाठी । काही दिवसांनी वैकुंठी । होऊ नका व्यर्थ कष्टी । हृदय कठीण करावे ।।१०५।। प्रेम लोभ असू द्यावा । सेवेत घडल्या असतील उणवा । क्षमा करावी वासुदेवा पतिदेवा दासीला ।।१०६।। श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे । हे नाथ नारायण वासुदेव । ऐंसे बोलुनी झाली शांत । मालवली ज्योत प्रशांत । प्राण गेला वैकुंठात । माहेरी भेंटण्या ।।१०७।। शके अठराशे सत्त्यांशी । चैत्र शुद्ध प्रतिपदेसी । शुक्रवारी दुपारी दोन वाजेशी । निजधामा गेंलीसे ।।१०८।। दोन एप्रिल एकोणाविसशे । पासष्ट इसवी सन असे संतोसे भेटण्या गेलीसे संतोषमाते जवळी ।।१०९।। समाचारा येती जन ते बैसत अधोवदन । उलट त्यांचे समाधान । वासुदेव करित मधुर वचने ।।११०।। मरण आहे सर्वांसी । कोण वाचला भूमीसी । सांगा तरीं आम्हासी । आज पर्यंत ।।१११।। पुर येता गंगेत । नाना परीची कष्टे वाहत । एकत्र येऊन मिळत । फांकती पुन्हा चहुकडे ।।११२।। तैसा हा संसार असे । पूर्व कर्मे भेटी होतसे । केव्हा ताटातूट होईलसे । न जाणे सूज्ञही

||११३|| संसारात न रहावे मोहुन | कार्य करावे कर्तव्य म्हणून | रामकृष्ण नामस्मरण | भार त्यावरी सोपवावा ||११४|| ज्या ज्या वस्तु दिसती दृष्टीसी | त्या त्या नाश पावती निश्चयेसी | भक्ष योजिले काळासी | शोकास कारण दिसेना ||११५|| उदयास येता दिनकर किरण पसरे पृथ्वीवर | जनास होई आनंद थोर | काम करीत असतांना ||११६|| अस्तास जातो दिनकर | प्रकाश मावळे त्याबरोबर | त्या करीता या पृथ्वीवर | रडतसे का कोणीतरी ||११७|| ग्रह नक्षत्रे आकाशांत | रात्री दिसती लुकलुकत | प्रकाशतांच लोप पावत | दुःख कोण करीतसे ||११८|| पाण्यावर बुडबुडे नाचती मनास आनंद होतो किती | हवा लागता सहज फुटती | रडते कां कोणीतरी ||११९|| नभोमंडळी पोखरे विहरतीं | सायकाली घरट्यास येंती आकाशास नसें काही खंती | रडते कां कुणीतरी |||१२०|| प्रातःकाली फुले उमलती | सुगंध पसरे अवती भवती | ऊन लागता कोमेजती रडतसें कां कोणींतरी ||१२१|| परमेश्वर पाठवी जीवासी | तेज घालुनी कामासी तीन अवस्था देहासी | निर्मिल्या असती ईश्वरे ||१२२|| बाल तरूण आणि वृद्धपण | परी देवास इच्छा होता जाण घेऊन जाई न लागता क्षण | सत्ता बळे करोनी ||१२३|| हा सृष्टीक्रम असे जरी | कां दुख करावे अंतरी | सर्व आहे मायामय नश्वरी | ब्रम्ह जाण याने ||१२४|| जगही असे नाटक शाळा | त्यांत मिळविला आपुला मेळा | पार्ट करण्यासी आगळा | पाठविले भूवर ||१२५|| काम आपुले

आटोपताच । परत बोलविता त्यास । कर्तां करविता परमेश्वरच । सर्व सत्ता तयाची ।।१२६।। विधात्याची सारी लेकरे । क्षणभर खेळण्या जमलोरें । ज्यास बोलावणे येईल रे । परत जाती स्वगृही ।।१२७।। खेळ असे हा भातुकलीचा सारा । लग्न लाविती नवरी नवरा । संपताच व्यवहार न्यारा । जो तो जाई स्वगृही ।।१२८।। पराचिया धना करीता । कां करावी व्यर्थ चिंता । ज्याचा तो घेऊन जाता । दु:ख कां करावे ।।१२९।। ज्याचे होते त्याने नेले । त्यांत आपुले काय गेले अनायासे बरे झाले । जबाबदारी कमी झाली ।।१३०।। अशाश्वतेचा । सारा बाजार । तेथे शाश्वतेचा विचार । न करावा साचार । हे योग्य सूज्ञाते ।।१३१।। कोणी कोणाचे नसती सर्व आहे भ्रांती । त्यांतच लुब्ध मूढमती । होऊ निया रहातात ।।१३२।। कोणी नसे कोणाचे । अवघें माया पटल साचे । सारे सोबती असत्त्याचे । मिथ्या सत्य मानितां ।।१३३।। ऐंकून वासुदेव वाणी म्हणती संतच हा कोणी । जन्मा आला या अवनी । त्याविण वैराग्य ना दिसे ।।१३४।। हे अख्यान वासुदेवांचे । वैराग्य युक्त अमृताहुन गोड साचे । श्रवण करिता संकटांचे निरसन होईल निश्चये ।।१३५।। आजाराचे गंडातर असता । वासुदेवांवर भार टाकतां । भक्ती भावे शरण जाता । धांवुनि येतील निश्चये ।।१३६।। त्यांच्या सारखा प्रेमळ शांत सापडेंल धुडिता क्वचित । ऐसा हा महानसंत । लाभे पूर्वपुण्याईने ।।१३७।। हा अध्याय जे नित्य पठती । त्यांची गंडांतरे दुर होती । स्वत:रक्षी रमापती तया लागे सर्वथा ।।१३८।।

– चाल तरज –

संसार शकट है पतिपत्नी का एक दुसरे पर निर्भर है ।
सत्ता जबतक है दोनोकी सौदर्य तभी तक इसका है ।।धृ.।।
एक दुसरे का वियोग होते संसार शकट टूट जाता है ।
है दोनो की सत्ता जब तक बेखटके ये चलता है । ।।१।।
पत्नी बिना पती जीवित होकर निष्प्राण वही बन जाता है ।
पत्नीभी तो बिना पतीके समान मृतके होती है ।।२।।
देव असुर हो मानव कोईभी पत्नी बिना पती आधा है ।
सभी जगतमे हो कोई उसपर इसी नियमका बंधन है ।।३।।
राधेबिन है श्याम आधे आधे है रघूवीर सीताविन ।
फिर वासुदेव का आधा होना इसी नियम के आधीन है ।।५।।

स्वस्तिश्री वासुदेव चरित्रामृत । सद्गुरूच प्रेरक असती येथ । निमित्त मात्रमुख यशवंत । तृतीय अध्याय गोड हा ।।१३९।।

# ध्याय ४ था

श्रीगणेशायनम: जयजयाजी लक्ष्मी रमणा । आदिपुरूषा नारायणा । असुरांतका राधारमणा । भक्तिप्रिया कमलापते ।।१।। भक्ताचे करावया सत्यवचन विटेंवरी उभा नारायण । अद्यापिही उभा राहुन । भक्तवचना पाळिले ।।२।। ब्रम्हांड चालक जगत्पती । उत्पत्ती स्थिती तुझे हाती । मायेचा गोंधळ कवणासी न उमजे काहीच ।।३।। तुज जाणतीते संत । तुज पासोनी जें नसती विभक्त । चराचर जग समस्त । तुझेच रूप पहाती ।।४।। संत भक्तांचे मन । तुझे रूपी गेलो विरोन । जेंवी जलांत घालना लवण । भिन्नपण न दिसेची ।।५।। भक्त संकटी पडता जाण । धांव घेंसी तू आपण होऊन । वासुदेवासाठीही आला धावून । ब्रीद आपुले राखीले ।।६।। प्राणाहूनी तुज भक्त आवडती । ऐसी असे तव कीर्ति प्रख्याती । तरी वासुदेव कथामृत पुढती । बोलवी दयाळा येथूनी ।।७।। मागिले अध्यायी केले निरूपण । शांडिल्येंच्य हट्टा साठी आणिले बोलावून । महासती अनुसुयेचे एकून । भले जाहले दोघांचे ।।८।। तैसेंच वासुदेवरावांची पत्नी । सुलोचनाबाई अमावास्यादिनी वैकूंठवासी गेली असतांनी । परतविले भक्तास्तव ।।९।। हिरा कोंदणाविण शोभेना । तैसेच वासुदेव संतांना । तेज ना सुलोचनाविना । दोघेही मौल्यवान ।।१०।। फुलांच्या संगतीने दोऱ्यास । सुवास दरवळे त्यास ।

त्यालहि मान मिळे तसाच । तोहि कंठी रूळतसे ।।११।। सुलोचनाबाईचे बोलणें संतांच्या वाणीचे तोलणे । सत्संग पतीचा लाभणे । भाग्य कोणते याविण ।।१२।। किती गोड मधूर वाणी । सर्वांसी घालती समजावणी पतीराजासही बोलती आदरान वैकुंठी जातांना ।।१३।। समाचारा येंती जन । वासुदेव सांगती समजावून । सर्व हे नश्वर जाण मायामय निर्मिले ।।१४।। ताप न राहीला वासुदेवास । मोकळे झाले हिंडण्यास । मूळचाच वैराग्य अभ्यास । लोभ मोह कधीच जाळीले ।।१५।। पीडीत जनांसी देखून । तळमळती रात्रंदिन । गरीब श्रीमंत भेद न ज्यांच्या जवळी कधीच ।।१६।। त्यांची ती मधुर वाणी । जनास बोधिती कळवळुनी । करा उद्धार या जन्मी । सार्थक करारे जन्माचे ।।१७।। महाराजांचे सभोवती । जमू लागले शिष्य अती । जैसे कमळा भोवती । भूंगे घिरट्या घालत ।।१८।। शिष्यवर्ग वाढला फार । जाती भेदास ना थार । यवनही देती आदर । कंठी भूषण सर्वांचा ।।१९।। देवास जो आवडे तो कोणास नावडे । किर्ती पसरली चहुकडें देवकृपे ।।२०।। देवाची जडता प्रीती । त्यास काय कमी जगती । अनंत कराने देव कसोटीस देतीं उतरल्यावर ।।२१।। ग्रँजुएट उत्तीर्ण झाला त्यास फर्स्टक्लास फर्स्ट मिळाला नोकरी न देईल त्याला । हुषारी पाहुनी त्याची कर्तबगारी । बढतीमिळे पाहुनीवरी । वशिल्याची ना जरूरी देवकृपा असतांना ।।२३।। देव विचार करीतत्वता । पेन्शनर अशक्तता कृशता फारसे येणार नाही हिंडता । काहीतरीं सोय लावावी ।।२४।। देवाने घेतले

असता मने आणखी सेवा करण्या भक्ताने । उशिर न लागें फळ मिळणे । कृपा सागर वळता ।।२५।। एसे गावो गावी हिंडता । हैद्राबादेत प्रवचन असता । त्या ठिकाणी समजले महंता । अमरदास नामे ।।२६।। महंत ही महातपस्वी । योगमार्गी लावी समाधी । ब्रम्हचारी ना उपाधी कसलीही तयाचे मागे ।।२७।। वय तरूण कोवळे शरीर जसें तांबडे पोवळे । रक्ताने रससरलेले पक्कटमाट्यापरी ।।२८।। वय होते अवघे पंचवीस । भिक्षा मागणे धर्म त्यास । काही न दुसरे काम त्यास । समाधी अभ्यास करणे ।।२९।। बालपण बरे खोटे यौवन । त्यास सांभाळणे कठीण । ब्रम्हचर्य पाळणे तपस्या महान । विश्वामित्रही गडगडले ।।३०।। अमरदास दीक्षा घेती । नाथपंथ कठीण अती । तारूण्य उमजू देना त्याती समाधी कारणें ।।३१।। ऐकूनि वासुदेवांची कीर्ती । अमरदास आले भेटण्याती । पहातांच मनांत ना भरती । किरकोळ यष्टी पाहून ।।३२।। प्रवचन आले रंगांत । ऐकण्यास येती महंत । लोक म्हणती आम्हा न समजत । ब्रम्ह समजावुनी सांगा ।।३३।। वासुदेव म्हणती शिष्यास : मी प्रश्न विचारीतो तुम्हास त्याचे उत्तर सावकाश । विचार करूनी द्यावे ।।३४।। दाखवा मजसी मोटार शिष्या मन अवघड फार । लगेच दाखविली मोटार बाहेर उभी असलेली वासुदेव म्हणती दुरूनी । मला न दिसे अजूनी । तरी दाखव हात लावुनी म्हणजे मला कळेल ।।३६।। मोटारीवर हात ठेवित । ह्यास तर टप म्हणत । दरवाजावर हात ठेवित । हा तर दरवाजा असे ।।३७।। गाडी उघडून हात ठेविंत

। ह्यास तर बैठक म्हणता मला मोटार दावत त्वरीत । सांग कोणती मोटार असे ।।३८।। हीच असे मोटार सत्य । मी न सांगे असत्य । गुरू सांगती शांत । सर्व मिळून नांव मोटार ।।३९।। तैसेच हे विश्वचराचर । जे दिसे दृष्टीगोचर । ते ब्रम्ह मायामय साचार । दुसरे तिसरे न काही ।।४०।। ब्रह्म असे निर्गुण निराकार । ते दृष्टीसी न दिसणार । मायेचा मिळता आधार । चैतन्य रूप प्रगटे ।।४१।।

(चाल - भक्तिने आकळीला दयाघन)

ब्रह्मचि हे सगळे जगी बा । ब्रह्म हे सगळे ।।धृ।।
विवर्त रूपे जग भासे परी । स्वरूपाचि ते न कळे ।।१।।
भूत चराचरी कल्लोंळी अथी । जळ जैसे भरले ।।२।।
ब्रह्मांडी या ब्रह्मचि असुनी । संशयीं मन भ्रमले ।।३।।
दृष्टी व्यापुनी कवळे म्हणती । चंद्रासी पिवळे ।।४।।
वासुदेव ब्रम्ह विचारी । ब्रम्हचि मन जहाले ।।५।।

इलेक्ट्रीक वीज दाखवा म्हणता । ते अशक्य असे दाखवता । बटन लावून दिवा लावतां । त्याची प्रचिती दिसतसे ।।४२।। ग्लोब लागतसे दाबता बटणे । निगेटीव्ह पॉझिटीव्ह जोडण्याने । त्याविण नच मिळणे । प्रकाश आपणा ।।४३।। डॉक्टरांना आहे रोगाचे ज्ञान । रोग्याला गरज डॉक्टरांची

जाण । रोग्याचे डॉक्टरांचे होता मिलन । रोग बरा होतसे ।।४४।। संतांना आहे मोक्षाचे ज्ञान आम्ही असे हो गरजवान गरज व ज्ञान एकत्र आल्याविण । साध्य होणार नाहीच ।।४५।। जे निराकार निर्गुण । त्याची काय सांगावी खूण । परी ते स्वरूप जाण सन्निधचि असे ।।४६।। जसा आकाशी भासे भास । आणि सकळांमध्ये आकाश । तैसा जाणिजे जगदीश । सबाह्य अंतरी ।।४७।। उदकांत भिजेना पृथ्वीत झिजेना अग्नीत भाजेना । स्वरूप देवाचे ।।४८।। स्वये मिच असें ब्रम्ह हा असे अहंतेचा भ्रम । ऐंसे सूक्ष्माहून सूक्ष्म । पहातां दिसे ।।४९।। करावे तत्व विवरण । शोधावे ब्रम्ह निर्गुण । पाहवे आपणांस आपण । म्हणजे कळे ।।५०।। धरू जाता धरितां नये । टाकू जाता टाकितां नये । जेथे तेथे आहेच आहे परब्रम्ह ते ।।५१।। मायेच्या आधारे । परब्रम्ह झाले साकारे । म्हणून अवघे नश्वर सारे । ब्रम्ह ते अभंग ।।५२।।

श्लोक – दृग दृशौ द्वौ पदार्थोस्त: परस्पर विलक्षणौ ।

दृग ब्रम्ह दृश्यं मायति, सर्व वेदांत डींडीम् ।।५३।।

ब्रम्ह एक असे जाण । सर्व वेदांती असे लिखाण । मायेने दिसती दोन आभास भ्रमामुळे ।।५४।।

चाल – (परवशता पाश दैवे ज्याच्या गळा लागला)

ब्रम्हची हे विश्व नोहे । काही विचारी मनी ।।धृ.।।

हे अलंकार पहाता भेद बहु वाटें चित्ता । परी तेथे भेद कैसा ।।१।।
घट मृत्तिकेशी पाहुनी । द्वैतभाव उपजे स्वपनी । घटतोचि मृत्तिका हे ।।२।।
रज्जु वरी सर्प भासे । ब्रम्ही पाहता विश्वनासे । परी रज्जु, सर्प तोची ।।३।।
ब्रम्ही पहाता वासुदेव सत्य ज्याचा तोचि देव । तू मी असे सर्व मिथ्या ।।४।।

आपण विश्व पाहतस ते ब्रम्हापासून बनल असे । परी ब्रम्ह हे वेगळे असे याचा विचार करावा ।।५५।। अलंकारात असते सोने । परी त्यासी सोने न म्हणती कोणें । ते रूपांतरीत झाल्याने । भिन्न दिसती दोघे ।।५६।। तैसेच घट मृत्तिका असे । रज्जू सर्पही भासे । अज्ञान जेव्हा निरसतसे । तेव्हा समजे ब्रह्म ।।५७।। आपण व्यवहारांत । उलटेच बोलतो सत्य । परी येईना ध्यानात । काय बोलतो ते ।।५८।। पायात बूट घालतो म्हणतो । परी बुटांत पाय घालतो । तैसेच ब्रम्ह जाणावे म्हणतो । मायेचा न विचार करी ।।५९।। आपण स्टँडवर जातो उशीरा । मोटार निघून गेलेली असते बाहेरा । स्वत:ची चूक झाकण्या उशिरा । म्हणतो मोंटार चुकली ।।६०।। धान्य निवडतो म्हणतो । माती खडे बाहेर टाकतो । धान्य तसेच ठेवितो । ही पद्धत निवडण्याची ।।६१।। आम्हा न जाणाचे ब्रह्म । कारण आपण आहो ब्रम्ह । माया जाणतां समजेल वर्म । ब्रम्ह आपोआप ।।६२।। आपणांस पाहिजे तांदुळ । त्या करीता काढावे लागे टरफल । तैसे माया होता निरसन । आपसुक ब्रम्ह लाभेल ।।६३।। शुद्ध

परमेश्वर प्राप्ती इच्छा असेल दृढ चित्ती । अहंकार मायेच्या टरफलाती । सद्गुरू कांडतील ।।६४।। उखळांत डोके घालता जाण । घाव बसणार जाणून । सद्गुरूसी जाता अनन्य शरण । गुरू आज्ञा पाळणे धर्म ।।६५।। परी आहे ऐसा विधी । शरण सद्गुरूस जावे आधी । झालीया मग चित्तशुद्धि । मोक्षलाभ सहजगती ।।६६।। सामर्थ्य आहे अग्नीचे । पाणी कराया सुवर्णाचे । परी प्रयोजन स्वागीचे । तेथे असते अवश्यक ।।६७।। राम कृष्ण अवतार पूर्ण । जाणत नव्हते कां ब्रम्हपूर्ण । धडा शिकविण्या आपणा कारण । गुरू करती स्वत: ।।६८।। स्वत: रामकृष्ण भगवान लाकडे आणती वाहून । गुरूंची सेवा केल्याविण ज्ञान न मिळेच ।।६९।। विद्वान मानती ग्रंथास गुरू । तो असे मार्गदर्शक आधारू । गुरूच्या न बसता तारू । खांच खळगे तोच जाणी ।।७०।। साळी पुन: पुन: पेरून । येजा होतसे जाण । परी मोकळा तांदूळ पेरून । पुनरपि अंकुर न येत ।।७१।। गुरू काडीती अहंकार कोंडा । पुनर्जमासि जो वावडा । तांदळापरी शुद्ध ब्रम्ह निधडा त्यासी कैसा पुनर्जन्म ।।७२।। गुरू करावा ज्ञानी । नसावा अहंकार मनी । ब्रम्ह माया करी निरसुनी तोच अधिकारी जाणावा ।।७३।। ज्या जवळी तपश्चर्येचे फळ । भक्ता साठी सदा कळकळ । दया क्षमा शांती जवळ । आचरणी असे ज्यांच्या ।।७४।। काही असती दांभिक गुरू । ते कैसे होतील तारू ते लोभी नुसते पोटभरू । पारखून पहावे सूज्ञाने ।।७५।। गुरू जाती शिष्या घरी । उत्तम घोडी देखिली बाहेरी । मनांत ती फारच

भरली । युक्ती योजिती उत्तम ।।७६।। आज असे पर्व घडी । गुरूसी द्यावी आपुली घोडी । नश्वर सारे माया न जोडी । सार्थक करी जन्माचे ।।७७।। शिष्य जाणुनी बोले झटकन । शब्द तुमचा मी राखीन । अवश्य घोडी देईन दान । उत्तम पर्वणी साधेल ।।७८।। जरी म्हणतां पर्वकाळ प्रसाद द्यावा आपुली शाल । ऐकतांच ऐसे बोल । गुरू मनी चरकला ।।७९।। सौदा अंगाशी आला । मौल्यवान शाल जाईल त्याला । बोलू नको ऐंशा बोला । तुझे तुला माझे मला ।।८०।। ऐसे गुरू असती लोभी । ज्यांना नसे लोभाची उपाधी । सार्थक करा त्यांनाच साधी । तेण जन्म साफल्य ।।८१।। तांदळात असता मळ माती । कांडून निवडून घेती । त्या भाताचा स्वाद अती । आनंद होईल खातांना ।।८२।। किंवा उदक प्राशना । स्वच्छ पात्र नसतांना । आनंद होईना मना तृषार्थ पितसे नाइलाजाने ।।८३।। आरसा भरला असता मळानी । मुख न पाहे त्यात कोणी । आनंद वाटावया लागोनी । आरसा स्वच्छ करणे लागे ।।८४।। तैसा आपुल्या आत्म्यावरील मळ । सांचल्याच मुळ केवळ । आनंद घेता न ये विमल । आपणासीच ।।८५।। जसा आरश्यावरील मळ । आरशास काढता न ये केवळ । तैसा आपल्या आत्म्यावरील मळ । काढीता न ये आपणास ।।८६।। आत्म्यावरील मल काढण्या लागून । लावावा लागेल साबण । त्यासाठी गुरूची योजना करून । निर्धास्त हो अंतरी ।।८७।।

श्लोक – तद्विती प्रणिपातेन परि प्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिन स्तत्व दर्शिन: ।
गीता अध्याय ४ श्लोक ३४

गुरूस जे नमस्कारी । गुरू सेवा उत्तम करी । जे गुरू शद्वासी आदरी । गुरू उपदेशी तयासी ।।८८।। संत साईबाबा म्हणती । पुसऱ्या ओळीचा शद्व चुकलाती ज्ञाना ऐवजी अज्ञान पाहिजे ती । शद्वासी बदलणे ।।८९।।

।। उपदेक्ष्यंति ते अज्ञानं ज्ञानिन स्तत्व दर्शिन: ।।

ज्ञान असे हे शद्वातीत । अज्ञान विषय वाणीत । शद्वातीत जे असत । त्या विषयी बोलणे अशक्य ।।९०।। शद्वांतीत असे आकाश । त्यास मर्यादा नसेच । बुध्दीही न तेथे पोहचेच आकलनीय म्हणुनी ।।९१।। वार गर्भासी घाली वेष्टन । निखाऱ्यासी राख टाकते झाकून । तैसे ज्ञानावर अज्ञानाचे आवरण । आवरण काढितां ज्ञान दिसे ।।९२।। पाण्यास झांकते वरील शेवाळ । त्या बाजूस सारता । दिसे शुध्द जळ । तैसे ज्ञानासी झाकी अज्ञान पटल । अज्ञान सारीता ज्ञान दिसे ।।९३।। ब्रम्ह असे शाश्वत । तसेच अभंग सत्य । त्याची रहावी स्मृती नित्य । म्हणुन माळ गळा घालती ।।९४।। माळेत मणी असती । एकशे आठच ती । कमी जास्त कां नसती । विचार करा सूज्ञ हो ।।९५।। शद्व कसा

बनला ब्रम्ह चार व्यजने ब र ह म । त्यांची एकशे आठ बेरीज वर्म । कशी होते सांगतो ।।९६।। क पासून ब तेविसावे । क पासून र सत्ताविसावे । क पासून म पंचविसावे । क पासून ह तेहतीसावे ।।९७।। ऐसी गोळा बेरीज । एकशे आठ सहज । त्यातील एक व आठ बेरीज । नऊ होतसे ।।९८।। नवाची उजळणी म्हणता येणाऱ्या आकड्यांची बेरीज करतां । नऊच होतसे तत्वता । तेच अढळ ब्रम्ह दर्शक ।।९९।। या सर्व चराचरी राम भरलासे अंतरी दृष्टीसी न दिसला जरी । संत तुलसीदासे जाणला ।।१००।। माझा राम अवघाची आपण । दुसरे नाही त्याचीच आण । जगी भरलासे जनार्दन । अंतरी विचार करीबा ।।१०१।। श्रीसंत तुलसीदास दोहा –

नाम चतुगुण पंचतत्व मिले, वाको द्बिगुण प्रमाण ।
तुलसी आठ सो भाग दिजीये, निचे बचा सो राम ।।१०२।।

कोणत्याही पदार्थाचे नांव घेऊनी । तितक्या अक्षरांची चौपट करूनी त्यांत पाच मिळवुनी । दुप्पट करावी ।।१०३।। आलेल्या आंकड्यास । आठाने भागावे त्यास उरलेला आंकडाच । दोन अक्षरी राम असे ।।१०४।। संत संगती संक्षीप्त । ते न बोलती कधी असत्य । परी त्यात काय भरला भावार्थ । ज्ञात्याने उलगडावा ।।१०५।। आंकड्याचे चौपट करण्याचे कारण । चार पुरूषार्थ साधावयाचे म्हणून । धर्म अर्थ काम मोक्ष जाण । हेच ते असती ।।१०६।। त्यांत पाच मिळविण्याचे कारण ।

पंचमहाभूतें सर्वात जाण त्यांची दुप्पट करण्याचे कारण । सुख दुःख भोगावे लागते म्हणून ।।१०७।। आलेल्यास भागावे आठाने । अष्टधा प्रकृती मायेची होता उणे जे रहाती खाली जाणे । तोच राम शाश्वत ।।१०८।। टेबल नांव अक्षरी तीन । त्याची चौपट बारा जाण । सतरा होती पांच मिळवून । त्याची दुप्पट चौतीस ।।१०९।। आठाने भागतां त्यास । बाकी उरे दोनच । हाच तो राम शाश्वत ऐसेच पहावे प्रत्येकात ।।११०।। संत म्हणती खरोखर । ज्याचे साधन बरोबर । विश्वासपूर्वक आचार । करावा त्या प्रमाणे ।।१११।। एकदा गांवी जातांना । तिकिटे साधने घेतली नाना । परी दोहो बाजूच्या गाडी स्थाना उभ्या असती ।। ११२।। संत असती अनुभविक ज्ञानी आंत घुसती बोर्ड वाचुनी । दुसऱ्या मार्गाचेही गर्दी पाहुनी घुसती त्यांत ।।११३।। जरी साधन होते तिकीट । परी दुसऱ्याच मोटारीत बसत तेणे पैसे जाई फुकट तैसाच वेळही ।।११४।। या करता संतांचे धरावे पाय । मार्ग दाखवी तरूणोपाया अनुभविक सुलभ साधन उपाय निश्चित मोक्ष प्राप्ती ।।११५।। आम्हा बसवी पायरीचे चिरे । त्यावरूनी जाढी संत हिरे । चरणरजे आमुचा उद्धार रे । नामदेव म्हणतसे ।।११६।। जो जाणेल भगवंत । तया नांव बोलीजे संत । जो शाश्वत आणि अश्वासत । निवाडा करी ।।११७।। कासया करावे उग्रतप । न लगेचि काही मंत्र जप । सत संगे विविध ताप । निवतील सर्व क्षणमात्रे ।।११८।। संत पूजा आदरे करीतां । ब्रम्हा विष्णु महेश देवता । संतूष्ट होंती भक्ता पूजनाने

।।११९।। संत वसती देव ह्रदयी । देव वसती संतांह्रदयी । जैशे माया ब्रम्ह परस्परी । द्वैतभाव विसरेल ।।१२०।।

पद - संत दयाळु कसे । राजा रंक जया सारिखे ।।धृ।।
देऊनी भेटी निरसिती माय । नेऊनी बसविती निज पद ठाया ।।१।।
श्रवणी पाजिती अमृत वाणी । नयनी दाविती चिन्मय खाणी ।।२।।
श्लोक - पृथिव्यां यानि तीर्थानि स्नान दानेषु यत्फलम ।
त फलं कोटि गुणित ब्रह्मज्ञान समोपम ।।१२१।।

सकल तीर्थांची संगती । स्नानदानाची फळश्रुती । त्याहून ब्रम्हज्ञानाची स्थिती । विशेष कोटी गुणे ।।१२२।।

श्लोक  यावत सर्वेशु भुतेशु स्थितंचात्मनि न स्मरेत ।
तावन्मामच यद्दवं प्रतीमादौ स्वकर्मभि ।।१२३।।

अर्थ :- सर्व चराचरातील भूती । जोवरी परमेश्वर न जाणती । तोवरी प्रतीमा पूजा असे ती करावया मान्य ।।१२४।।

श्लोक - अभिशेकाने आत्मशुद्धी । गंधती पुण्य मिळतसे ।

आयुवृद्धी पुष्पदाने । धूपान लक्ष्मी येतसे ।
ज्ञानप्राप्ती दीपानें । नैवेद्यें सुख भोगतसे ।
द्रव्याभाव असतांना । अक्षता देवास अर्पण ।।१२५।।

तीर्थं तिन वेळा कां घ्यावे ?

प्रथम देह शुद्धर्थ । द्वितीयं धर्म साधनम् ।
तृतीय मोक्षदा प्राप्तं । एवं तीर्थ त्रिधा पिवेत ।।१२६।।

एकादशी व्रत करीता । एकदाच घ्यावे तीर्था । दुसऱ्यांदा तीर्थ घेता उपास जाय सुटूनी ।।१२७।। गुरू तीर्थ घेतांना पुढील प्रमाण म्हणावे

श्लोक – अज्ञान तिमिर हरण जन्म कर्म निवारणम् ।
गुरूपादोदक पित्व । महापातक नाशनम् ।।१२८।।
अज्ञान तिमिर जावो । जन्मकर्म नाश पावो ।
महापातकही नष्ट होवो । पिता गुरूपादोदक भावो ।।१२९।।

दशेंद्रियाचे दमन । या नांव बोलीजे दशमी जाण । ब्रम्ही स्थिर करूनिया । मग एकादशी व्रत आचरी ।।१३०।। अनेकी एकची भान । द्वैताद्वैताची बोळवण आपण राहे नाहीच होऊन । हेचि उपोषण

एकादशी ।।१३१।।

श्लोक – धृती क्षमा दमोंस्तेयं शौचमिंद्रिय निग्रहम

धी विद्या सत्यक्रोधो दशकं धर्मे लक्षणम् ।।१३२।।

अर्थ – धैर्य क्षमा असंग्रह दमन संयम इंद्रिय

निग्रह बुद्धी विद्याही सय शांती दशलक्षणे ।।१३३।।

श्लोक – एकादश्यां व्रतं जाता भोजने करूते यदि ।

तांबुलं भक्षयेश्चैव सद्य: गोमांस भक्षणम् ।।१३४।।

अर्थ – निराहार करावी एकादशी । भोंजन तांबूल जे खाती ।

गोमास भक्षण पाप त्याती । लागेल निश्चये ।।१३५।।

कठीण असेल रहाणे निराहार । तर अल्प फराळ किंवा फलाहार

किंवा देवास जेवढा नैवेद्य दाखवणार तेवढाच खावा एकदां ।।१३६।।

पंधरा दिवस एकादशी । करूनी सांग किती रे खाशी

केळी साबुदाणा खीर । वरी खातोसी खजूर ।।

पोट भरूनी इतके खासी । तरी म्हणसी एकादशी ।

भजन पुजन कां होईना । म्हणती उपास आज आहे ना ?
वासुदेव म्हणे त्यासी जाणा । नरक यातना चुकेना ।।१३७।।

मानवाचा होण्या उद्धार । लावले असे कुळाचार । परी त्यांतील वर्माचे सार कुणी विचार न करती ।।१३८।। नवरात्र विधी सर्वत्र । घरोघरी असे व्रत । वर्षांतून एकदा येत परी न जाणती अर्थ ।।१३९।। आठ अंध:कार असती नवरात्रात । ज्ञान ज्योती तेवून सतत । अष्टपाशातून हो मुक्त । तेच नवरात्र साध्यता ।।१४०।।

श्लोक – घृणा लज्जा भयं शंका जुगुप्साचेति पंचमी ।
कुलं शीलं तथा ज्ञाती अष्टो पाशा प्रकीर्तित: ।।१४१।।

अर्थ – तिरस्कार लाज भय, संशय मत्सर असे ।
कुलशील जात, पात, सोडावे आठ पाश हे ।।१४२।।

जेष्ठ शुद्ध प्रतिपदे पासून । दशहरारंभ गंगा स्नान । गंगालहरी स्तोत्र पठण श्रवण दशदिन नित्य करावे ।।१४३।। एतानी दशपापानी हरते तस्माच दशहरा । सञ्ज्ञिका । याचा अर्थ घ्या जाणून । कायीक पापे तीन । वाचीक चार जाण । मानसिक तीन पापे असती ।।१४४।। दिल्यावाचून वस्तु घेणे । शस्त्राज्ञे वाचून हिंसा करणे । पर स्त्री गमन करणें । ही पापे कायीक ।।१४५।। कठोर बोलणे खोंटे

बोलणे । तैसेच चहाडी करणे । असंबद्ध काहीही बोलणे । ही चार पापे वाचीक ।।१४६।। परद्रव्य हरण विचार । दुसऱ्याचे वाईट चिंतणार । खोटाच आग्रह धरणार । ही तीन पापे मानसिक ।।१४७।। या साठी देवाची करावी लागे भक्ती । तेणेच होई पापनिवृत्ती । तैसेच मिळेल मुक्ती । सोपा मार्ग सकळिका ।।१४८।।

व्याधस्या चरणं ध्रुवस्यच वयो विद्या गजेंद्रस्य कां ।
का जाती विदुरस्य यादवपते रूग्रस्य की पोरूषं ।
कुब्जायाः कमनीय रूपमधिकं किंतत् सुदाम्नोधनं ।
भक्तया तुष्यति केवलं नतु गुणै र्भक्तिः प्रीया श्रीपती ।।१४९।।

अर्थ – भक्तिस न लागे जात पात । जरी वय विद्या रूप धन नसत ।
व्याध ध्रुव गज कुब्जा विदुर भक्त । उद्धरिले भक्तीने ।।१५०।। देव म्हणतात –

आर्या – मी भक्ताचे ह्रदयी, माझे ह्रदयी सदैव भक्त बसे
भक्ति रहीत जन केवळ माने सप्राण भासती गवसे ।।१५१।।

भक्तह्रदयी वसे देव । देव ह्रदयी भक्त सदैव । भक्ती रहित जो मानव । तो नुसता सजीव प्राणी ।।१५२।।

श्लोक – हरौ भक्ती विना नृणां वृथा जन्म प्रकीर्तम ।

सर्वे नश्यति ब्रह्मांड प्रभवंती पुन: पुन: ||१५३||

अर्थ - व्यर्थ जन्म हरिभक्तिविना | ब्रह्मांडांत जन्म मरण असे पुना | भक्ताते नाश कधीच ना | पोहचे तो परमेश्वरा ||१५४|| उत्तम कुळी जरी जन्मला श्रुती अभ्यास उदंड केला परी भक्तिविण वाया गेला | शास्त्री वंद्य नाही तो ||१५५|| भक्ते जै जे मनी धरावे | ते ते देवे आपणची करावे | तेथे वेगळे भावावे | नलगे कदा ||१५६|| गोपिकांची शुद्ध भक्ती गूढी | अविद्या धांकेची प्राण सोडी | सूर्योदय देखता दृष्टी जैसे चंद्र नक्षत्रे मावळती ||१५७|| भाग्य केवढे स्त्रीयांते | त्यांना न अवघड कर्मांते | फक्त करावे पती सेवेते | तेणेच होय पूर्तता ||१५८||

श्लोक - नारीणांच सदा तीर्थ भर्ता शास्त्रेषु पठ्यते |

भर्तु: प्रसादाच्च सर्व लभतें नाग संशय ||१५९||

स्त्रीयांचे तीर्थ पती | पती सेवेनेच उद्धरती | संशय नसावा मनाती | तेणे सर्वच प्राप्त ||१६०|| पती हाच स्त्रीचा देव | तोच तिचा पंढरीराव | पतीपदी शुद्ध भाव | ठेवूनी रहावे आनंदे ||१६१|| पती रागावता नम्रता धरी | प्रपंचात साह्यकरी | तीच होय धन्य नारी | गृहलक्ष्मी जाणावी ||१६२|| सासू सासरा दीर जावा | यांचा न कधी द्वेष करावा | सवतही वागवा प्रेमभावा | तेणे प्रेमच मिळेल ||१६३||

श्लोक – नास्ति स्त्रीणा पृथक यज्ञो न व्रतं नापि उपोषणम् ।
पती शुश्रुषते यन तन स्वर्गे महियते ।।१६४।।

अर्थ – यज्ञ व्रत उपोषणादी । स्त्रियासी । करण्या आवश्यकता नसेचि । पती सुश्रुषेनेच तिसी । स्वर्ग प्राप्ती निश्चित ।।१६५।। करावयाचे असल व्रत पती अज्ञेविण ना संमत । पतीची इच्छा नसतां करत । ते पुण्य व्यर्थ जाय ।।१६६।। पती पत्नीचे एकचित्त । ज्या गृही असेल निश्चित । तेथ वसे लक्ष्मीकांत उणे पडो न देईच ।।१६७।। याचे कारण असेल काय । सात्विक भाव उमटे ह्रदय । म्हणून परमेश्वर सहाय । येतसे धांवुनी ।।१६८।। सात्विक भावात असे देव । तो कैसा उपजे भाव । पूवकर्म पुण्य प्रभाव । त्यानेच मातृपितृ सेवा घडे ।।१६९।। सर्वतीर्थ मयी माता । सर्व देव मय पिता । मातरं पितर तस्मात् सर्वयत्नेन पूज्यते ।।१७०।। मातृ पितृ सेवा करतां । पांडुरंग येती भेटी करीता । परी न पुंडलिक झाला सोडीता । आपली सेवा ।।१७१।। माझी सेवा आटोपल्यावर । भेटीस येतो सत्वर । तोवरी उभे रहा विटेवर अजून उभें रहाती भक्तासाठी ।।१७२।।

श्लोक – पृथ्वीव्यां भुम्यां त्रिणी, वाराणस्यां द्विलक्षयों: ।
शतकोटी हिमं स्नान, तत्फलं मातृ वंदनम् ।।१७३।।

अर्थ – पृथ्वी प्रदक्षिणा केल्या तीन । दोन लक्ष वेळा काशीयात्रा करण । शतकोटी गंगेचे स्नान । मिळे

केवळ मातृवंदने ।।१७४।।

श्लोक – सुशीलो मातृपुण्येन पितृपुण्यन चातुरः ।
दातृत्वं वश पुण्येन आत्म पुण्ये सभाग्यतः ।।१७५।।

अर्थ – मातृ पुण्येन सुशील होई । पितृ पुण्येन विद्या चतुराई ।
वंश पुण्येन दाता होई । स्वपुण्येन मिळे भाग्यता ।।१७६।।

मात्रु पित्रु सेवा करीतां त्यास कुठे न लागे हिंडण्यास । तीर्थ व्रतादी पुण्य लाभे त्यास देवही संतुष्ट होती ।।१७७।। हा अध्याय वाचणारासी । संतुष्टता लाभल मनासी । नित्य मनन करी त्यासी । मोक्ष मार्ग सुलभ होय ।।१७८।। ऐसे महान पुण्य मिळतसे । मात्रु पित्रु सेवेन घडतसे । परी न कोणी जाणतसे त्याचे महत्व ।।१७९।। हा अध्याय वाचण्यान । ब्रह्म मायेचे होईल निरसन । दिव्य दृष्टी जाण । दिसे परमेश्वर सर्वाभूती ।।१८०।। स्वस्ति श्री वासुदेव चरित्रामृत । सद्गुरूच प्रेरक असती येथ । निमित्त मात्र मुख यशवंत ।

चतुर्थो अध्याय गोड हा ।।१८१।।

# अध्याय ५ वा

श्री गणेशायनम: जयजयाजी लक्ष्मीरमणा । दुष्टजन संहारक राजीव नयना यदु कुल भुषणा कंस कंदना । मायातीता लक्ष्मीपते ।।१।। तू असुनीया जग निर्माता निर्विकार तसा तू म्हणविसी अकर्ता । विलक्षण ऐसी ही तुझी सत्ता उमज पडेना तो कवनाशी ।।२।। जवळी असुनीया तू श्रीपती । वायाची हिंडीती तीर्थोतीर्थो शेवटी मनाची मग न होता शांती । उदास होऊनी बैसती ।।३।। तुझी प्राप्ती ती व्हावया लागून । व्हावे ते आधी तुजसमान । तरी गवसे त्या तू नारायण मतीतार्थ येथीचा एवढाची ।।४।। तुझी कृपा जाहाली वरी । मग मायेची असे ती काय थोरी । दीन दयाळा तू येवून श्रीहरी । पुढे चरित्र बोलवी ।।५।। मन एव मनुष्याणां बंधन मोक्षयो: ।।६।। मन हे ओढाळ वासरू: तपस्वीही थकले धरू । जो त्यास पक्के धरे आवरू । खरा ब्रह्मनिष्ठतो ।।७।। मन असे महाचंचल । त्यावरी चालवा अंमल । मग तो नसे वेळ । मुक्ती प्राप्तीसी ।।८।।

श्लोक – मन हे ओढाळ गुरू, परधन परकामिनी कडे धावे ।
यास्तव विवेक पाशे कंठी वैराग्य काष्ठ बांधावें ।।९।।

अर्थ – मन असे ओढाळ गुरू । परधन परकामिनी पडता नजरू । धांवे सैरा वैरा पळू । म्हणून वैराग्य लोढणे घालावे ।।१०।।

विश्वामित्र परशरादी मुनयो वातांबु पर्णाशना ।
स्तेपि स्त्रीमुख पंकज सुललितं दृष्टैव मोहं गता: ।।
शाल्यन्न सघृतं पयोदधियुते भुजंति ये मानवा ।
स्तेषामिंद्रिय निग्रहो यदिभवते विंध्यस्तरे त्सागर ।।११।।

अर्थ – विश्वामित्र ऋषी महान । वायुउदक पर्णे भक्षुन । खडतर तपश्चर्या वाया जाण । स्त्री मोहान गेली ।।१२।। ध्रुत दधि दुग्ध शर्करादि खावून । जर इंद्रिय निग्रह होईन । तर विंध्याचलही सागरी तरेन । मन सामर्थ्य केवढे ।।१३।।

श्लोक – मात्रा स्वस्त्रा दुहित्रा वा नो विविक्तासनो भवेत् ।
बलवान इंद्रियोग्रामो विद्वांसमपि कर्षती ।।१४।।

गोष्ट – अर्थ – व्यास ऋषी शिष्यास सांगती । माता बहिण कन्या एकांती । बसतां झोपता जवळ अती । मन न राही ताब्यांत ।।१५।। विद्वान असला जरी महान । तरी काम विकार जागृत होऊन । बलवत्तर

इंद्रिये आवरणे महा कठीण । ऐसे मन चंचल ।।१६।। जैमिनी शिष्य सांगे गुरूसी । बलवान इंद्रिये जरी असरसी । विद्वान न चळूं दे मनासी । ऐसा बदल करावा ।।१७।। ऐसे ऐकून व्यास स्तब्ध राहिले । कांही दिवस लोटू दिले । त्याची परीक्षा घेण्याचे ठरविले । व्यास ऋषीनी ।।१८।। जैमीनीची गुंफा होती गंगातटी । दूर शांत एकांती । जैमिनी बसला अमतां ध्यानाती । गुरूंनी माया निर्मिली ।।१९।। झिमझिम पाऊस पडू लागला । मंद शांत वारा झौंब अंगाला । षोडष वर्षाचे स्त्री रूपाला । घेतले गुरूंनी ।।२०।। उर्वशीपेक्षा अती सुंदर । त्यात नटलेली वस्त्रालंकार । भिजू नये म्हणून आधार जैमिनीच्या वळचणींत उभी ।।२१।। बांगड्याचा मधुर नाद ऐकून । जैमिनीची समाधी गेली भंगून । बाहेर कोण उभे असे म्हणून । लागलीच आला बाहेरी ।।२२।। नवयौवन चंद्रमुखी गौरवर्णी । रेखीव सुंदर सुहास्य वदनी । पाहुनी त्यास पडली मोहिनी । मदन तो उफाळला ।।२३।। जैमिनी बोले त्या मोहिनीस । जोड नसे त्रिभुवनी तव रूपास । पाऊस पडतो म्हणून यें निवाऱ्यास । मम कुटीरामध्ये ।।२४।। आपण आहोत दोघेच शंका मनी नको आणूच । एकांत स्थळ न कोणी येईच । घडवी मजला सहवास ।।२५।। मोहिनी म्हणे जैमिनीसी । मी तर स्त्री जरा विचार करसी । तूं महाविद्वान तपस्वी । हे न तुज योग्य दिसे ।।२६।। जैमिनी म्हणे तीस । तू हो मज वश । मी तुझा दासानुदास । अव्हेरू नकोस

मजला ।।२७।। मोहिनी म्हणे त्यास । पाऊस पडे म्हणुन निवाऱ्यास । उभी राहिली अडचणीस । अज्ञानपणा भोवला ।।२८।। त्याने मी न होतसे ऋणी । परी तुझी अती काकुळती पाहुनी । वागशील मम बोलावाणी । वश होईन तुजसी ।।२९।। तू गुढगे टेकून घोड्यावाणी । त्यावरी मी स्वार होऊनी । गुहे भोवती घाल तीन प्रदक्षिणी तर मी होईन वश ।।३०।। जैमिनीने ते मान्य करूनी । घोडा झाला तत्क्षणी । त्यास तोंडी लगाम घालुनी । स्वार झाली मोहिनी ।।३१।। चाबुक मारत मारत । तीन प्रदक्षिणा केल्या त्या प्रत मग हळुच मोहिनी बोलत माझी शंका निवारी ।।३२।। विद्वांसमपि कर्षति । किंवा विद्वांस नाप कर्षती । यातील खरे कोणती । सांग मज ।।३३।। ऐकतांच ऐसे बोलणे । खजिल झाला लाजिरवाणे । रूप पालटले ऋषीने । व्यासगुरूंनी ।।३४।। जेमिनीने धरले चरण । क्षमा करा अपराध महान । गुरू महाराज दयावान । नका मजसी अव्हेरू ।।३५।। तत्पर्य ज्याचे ताब्यात असे मन । त्यास देवही करिती नमन । त्यास मोक्ष प्राप्ती जाण । निश्चयेसी ।।३६।। एकदा राम लक्ष्मण सीता । वनवासातुनी फिरत असता । राम गेले मृगये करिता । शंका मना चाटली । शंका असे फार वाईट । मनांस लाविते नसतां चुटपुट अधिकाधिक गोवतां त्यात । पुरेच वाटोळे होतसे ।।३८।। याचे सांगतो सुंदर उदाहरण । काशी क्षेत्री गेला एक ब्राह्मण । गंगा स्नाने होऊं पावन । म्हणून गंगेत उतरला

||३९|| स्नान आटोपून पाण्यातच । अर्घ्य दिले सूर्यनारायणास । पाणीपी चूळ भरण्यास । तो भाताचे शीत गेले तोंडात ||४०|| भाताचे शीत पहाता । ब्राह्मण झाला संतापता । माझी एकादशी बुडली आतां । आता काय करावे ||४१|| डोक्यात आला सुविचार । भाताचे शीत कसे आले इथवर । म्हणून पहातां सभोवार बाई धुतसें खरकाटे भांडे ||४२|| रागाने ब्राम्हण गेला तिथवर । खरकाटे भांडे घासतात कां नदीवर । रागाने बोलला तिजला फार । परी शांततेने बाई बोले ||४३|| क्षमा करावी महाराज । मी महार आहे अंत्यज । विटाळशी आहे म्हणून येथे आली नदींवरी ||४४|| ऐकतांच ऐसे उत्तर । कपाळास लावी कर । झाले गेले झाले फार । प्रायश्चित्त घ्यावे आता ||४५|| काशीतील साधूकडें गेला । सर्व वृतांत त्याला सांगीतला । यावर उपाय कळवा मला । प्रायश्चित्तासाठी ||४६|| साधूस जरूरी भासली । गडी हाताखाली । संन्यास घेऊन मज जवळी । रहाता होय चिंत्तशुद्धी ||४७|| संन्यास घेऊन राहू लागला । दोघे हिंडती गावोगावला । ब्राह्मणास बोलाविले जेवणाला एका ब्राह्मणी बाईने ||४८|| जेवणास बसला ब्राम्हण । सुग्रास होते जेवण । ब्राह्मणास विद्वान पाहुन । बाई शंका विचारी ||४९|| साधू महाराज ऐका माझा प्रश्न । पूर्वी मी होते मुसलमान । आता ब्राह्मण झाली म्हणून । प्रश्न पडला मोठा ||५०|| पहिल्या नवऱ्या पासून मुलगा

सुरेख छान । मुंज करू की सुंता म्हणून । उत्तर द्यावे मजसी ।।५१।। ब्राह्मणाने घास खाली टाकला । हात लाविला कपाळाला । विचार तो करता कसला । काय करूं मी सांगा ।।५२।। साधू म्हणे मी करितो विचार । काय करावे मेल्यानंतर । समाधी घ्यावी कां थडगे बांधणार संशय पडला मजसी ।।५३।। असो संशय शंका असें जहर । तेणे मनात माजे कहर । तेणे काय अनर्थ घडणार । याचा नेम नसे ।।५४।। आपण आलो येथे लक्ष्मण सीता राहिली एकांते । काय करीत असतील तेथे । दोघेही तरूण ।।५५।। रामाने पोपटाचे रूप घेतले । जेथे होते तेथे आले । लक्ष्मण मांडीवर होते शीर ठेवले । निद्रा लागली सीतेसी ।।५६।। पोपट रूपी राम बैसले वृक्षासी : पृच्छा करिती लक्ष्मणासी ।

श्लोक – पुष्पं दृष्टवा फल दृष्टवा स्त्रीणांच यौवनम् ।
त्रीणि रत्नानि दृष्टैव कस्या नोच्चलते मनः ।।५७।।

फल पुष्प स्त्री यौवन । दृष्टीस पडता एकांत स्थान । कोणाचे मन निश्चल जाण । राहतसे सांगे मज ।।५८।। लक्ष्मण म्हणतो –

श्लोक – पिता यस्य शुचिर्भूतो माता यस्य पतिव्रता ।
उमाभ्यां यश्च संभूतस्तस्य नोच्चलते मनः ।।५९।।

शूचिर्भूत ज्याचा पिता । पतिव्रता ज्याची माता । ऐशा उभयांपासून जो जन्मता । निश्चल राहे मन त्याचे ।।६०।। रामप्रभू विचारतात -

श्लोक - अग्निकुंड समा नारी घृतकुंभ समोनर: ।
जानुस्थिता परस्त्रीचेत कस्य नोच्चलते मन: ।।६१।।

नारी अग्निकुंडा समान । पुरूष घृतकुंभ जाण । परस्त्री मांडीवरी झोपली असून । निश्चल मन कोणाचे ।।६२।। लक्ष्मण म्हणतात -

श्लोक - मनो धांवति सर्वत्र मदोन्मत गजेंद्रवत ।
ज्ञानांकुशें समुप्तने तस्य नोच्चलते मन: ।।६३।।

मदोन्मत गजेंद्रापरी । मन धांवे सैरावैरा जरी । ज्ञानांकुश उपजे ज्या हृदयांतरी राही निश्चल मन त्याचे ।।६४।। रामप्रभू म्हणाले -

श्लोक - हे लक्ष्मण सत्यवादिन सूमित्रायाश्च नंदन ।
इश्वाकोष्च कुलोत्पन्न ब्रह्मचारिन्नमो नम: ।।६५।।

सत्यवादी सुमित्रेचा पुत्र । इक्ष्वाकु कुळी जन्मला सत्य । सांष्टांग नमन तुजप्रत । लक्ष्मणा माझा

||६६|| लक्ष्मण वदे प्रभूसी | हे विपरीत वाटे मजसी | मी लहान असून मजसी | कसे करीता नमस्कार ||६७|| श्रीराम प्रभु बोले लक्ष्मणासी | हे नमन तव ब्रह्मचर्य व्रतासी | धन्य तू व्रतधारक शिरोमणी शोभसी भाग्यवान बंधू लाभला ||६८|| ऐसा ब्रह्मचारी व्रतस्थ लक्ष्मण | कधीच न चळू दिले मन | कधीच न पाहिले सीतेचे वदन | चरणाविण न माहित ||६९|| एकदा ब्रह्मर्षी नारदमुनी | तलावांत गेले स्नाना | लागोनी तेंथे मत्स्ययुग्माची कामक्रीडा पाहूनी | मन चळले तयाचे ||७०|| धीर धरवेना म्हणुनी काय करावे विचार करूनी | आले श्रीकृष्ण चरणी | त्यास सांगती विचार ||७१|| तुला आहेत सोळा सहस्त्र नारी | त्यातील दे एक तरी | कृष्ण म्हणे घेऊन जा सत्वरी जेथ मी नसेन ||७२|| जेथे जेथे जातसे | तिथे दिसे कृष्ण बसे | त्याने हिरमोड झालासे | नारदाचा सर्व ||७३|| पाहून ऐसी माया केली नारदे स्नान करता तळे | नारदी झाली लवलाही | घाबरला तो ||७४|| मायेन पुरूष केला निर्माण | नारद शी संसार करी पूर्ण | नारदी गेली होती कंटाळून | शरण आली कृष्णासी ||७४|| कृष्णाने परत नारद केले | कोणते सुख चांगले विचारिले | नारद म्हणे पुरते भोवले | आता न चळू दे मन ||७५|| ह्या कथा असती पुरातन | आता कलियुगांतील छान | अलीकडील कथा ऐकून | अमृत पान करावे ||७६|| श्रीसमर्थ स्वामी अक्कलकोट | जे दत्तावतार

गणले जात । त्यांची कथा अघटीत । सांगतो तुम्हाते ।।७७।। आजपर्यंतचा इतिहास । संतासी छळती दुर्जन खास । कसोटीच असते ती संतास । क्रोध शांत ठेवण्यां ।।७८।। संत ज्ञानेश्वरांचा छळ केला । विद्वान ब्राह्मणांनी पैठणला । संत तुकारामाचा छळ केला । सालोमालो बुवांनी ।।७९।। संत एकनाथ महाराजास । यवन थूंकी अंगावर बहु वेळास । परी न रागावले त्यास । ऐसे कितीक असती उदाहरणे ।।८०।। श्रीसमर्थाची कीर्ती ऐकून । दुष्ट दुर्जन चडफडती मनांतून । कारण दुष्ट कल्पनांचीच खाण परीक्षा पाहण्यासी ।।८१।। स्वामीची परीक्षा घेण्यासी । गाठले सूंदर नर्तक राधा वेश्येसी । देऊनिया बहूत धन तिसी । वश करण्या पाठविले ।।८२।। वीस वर्षाचे अवघे वेश्येचे वय । गौर कोमल उत्तम रूप सौदर्य । जैशी स्वर्गातील रंभा उर्वशी होय । वेश्या तैशीच भासतसे ।।८३।। नृत्य गंधर्वासारखे गायन । आकर्षिले सर्वाचे मन अवघे एकाग्र लक्ष लावून । विलोकिती जन राधेसी ।।८४।। ठरलेल्या दुष्ट संकेता प्रमाणे । दुरूनी पहाती खल संभावित पणे । परस्परे हळूंहळूं संभाषणे । वेश्येसी खुणांनी सुचविती ।।८५।। वेश्या उच्चस्वरे संभाषणाचा । प्रयत्न पुष्कळ करी साचा । परंतू मुखातून एकाही अक्षराचा । उच्चारच करतां येईना ।।८६।। राधा चिंतीतसे अंत:करणी । मी रूप सौंदर्याची अपूर्व खाणी । सहज अडकवूं स्वामीस मोहुनी । देवांगनाच मी शोभतसे ।।८७।। माझ्या

सारख्या स्त्रीचा समागम । यतीश्वरासी विषय काम । दाखवू आपण करून पराक्रम । ऐंसा भ्रम जहाला ।।८८।। जाणुनी वेश्येच्या मनीचे विपरीत । अंतर्साक्षी निर्विकार अवधूत मोठ्याने पुसत स्त्री पुरूष काय भेद ।।८९।। अंतरीचे सत्य जाणले म्हणुनी । भयचकित झाली कामिनी । तेव्हा तोंड खाली करूनी । मनी विस्मित जहाली ।।९०।। नंतर वेश्या वदे हळूच । भगेंद्रिय आणि स्तन स्त्रियांस । पुरूषाहुनी वेगळें हेच । हाच भेद असे ।।९१।। योगीश्वर वेश्येस बोदितो । मेंद नसें पुरूष प्रकृती । जैसे कार्यकारण असती । भेद रहिंत सर्वदा ।।९२।। परमात्मा सदाशिव एकच । सर्वाच्या ठायी व्यापक । तेथे न भेंद भाव देख । परमात्म्यासी ।।९३।। हे वेश्ये तुझे अवयव । ब्राह्मणांस अर्पुनी सर्व वैभव । त्वा होऊनी । निरामय निरवयवा । देव सेवेत वेळ घालवी ।।९४।। स्वामी वदे तीसी लवलाही । तुझ्या अवयाची झाली लाही । कपाळ फोडीले दुष्ट खलाही । भजन करीत बसा आता ।।९५।। तेव्हां राधा स्तनाकडे पाहत । तव ते मुळीच ना दिसत । ज्याचे कुडे तयासीं सत्य । बाधे पुढे अवश्य ते ।।९६।। विषय मदोन्मत्त होती माजली । स्तन गेल्यावर फार लाजली । पश्चात्तापे विषयवासना जळाली । आणि कीर्ती गाजली श्रीगुरूची ।।९७।। पुष्ट कोमल स्तन मंडळ । कोणी नेले हो अचल । नाना कल्पना बाष्कळ । करिती लोंक त्या काळी ।।९८।। शेवटी राधा शरण आली । स्वामींच्या

चरणी लागली । दास तुमची मी बनली । देव भजन करीन यापुढे ।।९९।। सांगण्याचे तात्पर्य जाण । ताब्यांत ठेवावे लागे मन । ते मोक्ष प्राप्तीचे साधन । साधतां सुलभ मार्ग ।।१००।। यासाठी संतांसी छळणे । म्हणजे विस्तवाशी खेळणे । पतंग होरपळे विस्तवाने । तैसी स्थिती होतसे ।।१०१।। स्वामी रामकृष्ण परमहंस । खरोंखरच असती राजहंस । त्यांची सर ना ये कोणास । कोहीनूर हीरा संतात ।।१०२।। हिरा असे मौल्यवान । घणांचा घाव हाणिती त्यावरून । अभंग राही कसोटीत म्हणून । मूल्य वाढे तयाचे ।। १०३ ।। राम – कृष्णांची महान तपश्चर्या । प्रत्यक्ष कालीमाता ये भेटाया । महान कसोटींस लावले उतराया । दिव्य परीक्षा मधुनी ।।१०४।। एकदा कालीका माता आली ब्राह्मणीचे रूप घेतलेली । सवे षोडश वर्षीय बाली । सुंदर अप्सराच दुसरी ।।१०५।। सायंकाळ झाल्या नंतर । रामकृष्णास भेटण्या तत्पर । कसोटी घेण्यास सत्वर । आले त्यांचे गृही ।।१०६।। रात्रीचा समय शांत घोर । ब्राह्मणीने तरूणीस केले विवस्त्र । बसवून रामकृष्णा समोर । आज्ञा करिती जहाली ।।१०७।। रामकृष्णा बैस सुंदरी अंकावरी । रात्रभर नाम जप करी । ते ब्राह्मणीस नमस्कारी आज्ञाशिरसावद्य म्हणे ।।१०८।। बैसले ते नग्न स्त्री मांडीवर । सुन्न जहाले डोके बधिर । कानांत गर्जना वाजती घोर । सावध रहा सावध रहा ।।१०९।। रामकृष्ण गेले भांबावूंन । मनास बांधले

साखळ दंडाने । जराही न दिले चळूं मन । समाधी लागली तत्क्षणी ।।११०।। रात्र केव्हा गेली निधोन । हेही न उमगले जाण । शेवटी ब्राम्हणी कालिका देवीन । जागृत करूनी उठविले ।।१११।। थोपटली पाठ देवीने । सुंदर नग्न स्त्री सहवासाने । जराही न चळूं दिले मने । तुज ऐसा न कोणी त्रिभुवनी ।।११२।। म्हणून रामकृष्ण परमहंसास । कोहिनूर हिरा म्हणती त्यास । कोणतीही उपमा पडे कमीच । बुद्धीही कुंठीत होतसे ।।११३।। अकीत ठेवितो रामकृष्ण स्वामी लक्ष्मण मनासी । नारद विश्वमित्र बंधनी झाल फसी । बलवान शक्ती मनाची ऐसी । मनास लगाम घाला हो ।।११४।। मन स्थिर झाल्याविना । ब्रह्म दर्शन घडेना । संत सांगती परी ऐकेना । फळ कैसे मिळेल ।।११५।। एका राजाचे नगरीत । अधिकारी साधू होता रहात । ज्यास सिद्धी होती प्राप्त । तेणे तो नांवाजला ।।११६।। ऐशा साधूची ऐकून कीर्ती । दर्शनास होई भीड अती । ही बातमी पसरली भोवती । राजासही समजली ।।११७।। तेणै राजास इच्छा झाली । दर्शना आला साधूजवळी । नमस्कार करून बसे जवळी । विनवितसे साधूते ।।११८।। तुम्ही आहांत पुरूष अधिकारी । यानें मनास आनंद झाला भारी । माझी ईच्छा एवढी पूरी करी । ब्रह्मदर्शन घडवावे ।।११९।। साधूने विचार करून सांगितले राजा कारण । उद्या सकाळी करून मंगल स्नान । यावे जरूर माझ्याकडे ।।१२०।। परंतु माझ्या अटी आहेत आहेत

दोन । त्या घ्याव्या ऐकोन । पहिली अट येण्या आधी तास दोन । बासुंदी एकशेर व चांदीचे भांडे पाठवावे ।।१२१।। दुसरी अट माझी असे ऐसी । आपण निघाल जेव्हा येण्यासी । ते समयी जे कोणी दिसेल प्रथम दृष्टीसी । तया चांगले निरखुन यावें ।।१२२।। त्या विषयी मी आपणास । जें जें प्रश्न विचारील खास । उत्तरे द्यावी लागतील  तुम्हास । चुकता कामा नये ।।१२३।। तुम्ही येईपर्यंत । ब्रह्म दर्शनासी जे लागत । त्या गोष्टी तयार ठेवित । करून तुमच्यासाठी ।।१२४।। राजा उठला भल्या पहाटे बासुंदी सांगितली पोहोचवण्याते । मंगल स्नान आटोपून निघण्याते । पोषाख चढवला ।।१२५।। साधू सांगती सुंदर शिष्यीणीला । उत्तम पोषाख करून जा राजवाड्याला । दरवाजांत उभी रहा राज भेटीला । तो पर्यंत हलू नको ।।१२६।। तो तुझे निरीक्षण करील पूर्ण । संकोच न करता बोल आदरानं । मीच सांगितले असे जाण । तरी एवढे करावे ।।१२७।। ती उभी राहिली बाहेरी । दरवाजा उघडतांच सत्वरी । राजास दृष्टी पडली समोरी । त्यास आठवण झाली ।।१२८।। राजाने तिला थांबवले । चांगले निरीक्षण केले । रूप पोषाख खाणाखुणा पाहिले । उत्तरे देण्यासाठी ।।१२९।। सारखा ध्यास तिचा लागला । रूप खुणा पोषाख तरळू लागला । कारण कोणता प्रश्न विचारील  आपुणाला । याची चिंता वाटे ।।१३०।। राजा जवळ येताच । साधूने विचारिले त्यास ।

प्रथमच कोण आपणांस । भेटले ते सांगावे ।।१३१।। राजाने सांगितले साधूस । प्रथम पाहीले मी स्त्रीस । साधु सांगे राजास । बासुंदी ती प्यावी ।।१३२।। चांदीचा पेला घेउन । त्यात थोडी थोडी घालून पिऊन टाक संपवून । पण माझी अट पाळावी ।।१३३।। बासुंदी पित असतांना । ती स्त्री जर दिसली ध्याना । तर पेला थांबवा पितांना । तोंडाला लावू नये ।।१३४।। बासुंदी पिऊन संपल्यावर । ब्रह्म दाखवितो मी सत्वर । याचा न करावा विचार । लवकर आटोपावे ।।१३५।। राजा बासुंदी तोंडास लावत । तो ती स्त्री येई नजरेत । डोळ्यापुढे न आणू म्हणत । तर काय उत्तर द्यावे प्रश्नासी ।।१३६।। बासुंदी लावतच तोंडाला । स्त्री येतसे नजरेला । तेण साराच इलाज खुंटला । बासुंदी राहिली तशीच ।।१३७।। साधू सांगे राजाला । बासुंदी पिल्याशिवाय आपणाला । कैसे दाऊ ब्रह्म दर्शनाला । इलाज माझा न चले ।।१३८।। राजा समजला मनात । आपण स्त्रीस विसरू न शकत । याचे कारण सांगा मजप्रत । साधूस विचारिले ।।१३९।। ज्या अर्थी न पडे स्त्रीचा विसर । त्या अर्थी तुझे मन अजून अस्थिर । विषयांचा तू भोग घेणार । मनात येईल त्याचा ।।१४०।। राजा विचारी साधूसी । याचा उपाय सांगा मजसी । मनाची शुद्धी करण्यासी मनबुद्धी लाव परमेश्वर ठायी ।।१४१।। मनाचिये आधारी । सर्व इंद्रिय असती निर्धारी । म्हणून मनास तू आवरी । जेणे इंद्रिय

निग्रह ।।१४१।। तैसेच सर्व इंद्रियांना । शुद्ध सात्विक लावा वळणा । इंद्रिय निग्रह असे महत्व जाणा । संत सांगती परोपरी ।।१४३।। घेई घेई माझे वाचे गोड नाम विठोबांचे ।। श्रीसंत तुकाराम म्हणती । जिभेम लावा वळणाती । जे नाम विठोबाचे नाव घेती । ते उद्धरती निश्चये ।।१४४।। जिभेनें करिता मधुरभाषण । वश होती सवृजण । परंतु वाकडीच बोलता जाण । दुर्धर प्रसंग ओढवे ।।१४५।। एक कोट्याधीश सावकार । शरीराने अत्यंत स्थूल फार । दिवाळीचे दिवशी माडीवर । बसला होता खिडकीत ।।१४६।। माडी सजवली होंती दिव्यांनी । फारच रमणीय दिसे दृष्टीनी । जो तो पाही मान वर वळवुनी । सुंदर माडीसी ।।१४७।। एक लहान मुलगा रस्त्याने । माडी पाहून आनंदाने । स्थूल ढेरपोट्या शेंठासी दृष्टीने पाहाताच हांसला ।।१४८।। ते पाहून सावकार आनंदला । म्हणे हा दिसतो रत्नपारखी मला । माझे ऐश्वर्य पाहून मुला । हर्ष झाला असावा ।।१४९।। सावकाराने वर बोलाविले मुलासी । दिवाळीचा खाऊं देण्यासी । ज्यास आनंद झाला पाहून ऐश्वर्यासी । त्यासी देण्या बक्षीस ।।१५०।। सावकार बोले आनंदानी । आपुले कौतुक ऐकावे म्हणुनी । मुला तुज फारच आनंद झाला मनी । हंसू कशाचे आले ।।१५१।। मुलगा म्हणे सावकाराशी । फारच अरूंद जीना येण्यासी । खालती कसे न्यावे आपणासी । मेल्यावर स्थूल देहाला ।।१५२।। ऐसी ऐकून बालवाणी । सावकार

संतापला मनी । त्यास काढले झोडूनी । कोंडूनी ठेविले ।।१५३।। ही बातमी पसरली गावांत त्याच्या वडिलाला झाली माहीत मुलास सोडविण्यासाठी त्वरीत । आले सावकारापाशी ।।१५४।। बाप सावकाराशी बोलला । लहान बाळ समज ना त्याला । क्षमा करावी मुलाला । अज्ञान असे तो ।।१५५।। सावकार म्हणे त्यासी । कवडीची अक्कल नाही बोलण्यासी । मी मेल्यावर मला नेतील कैसी । म्हणे या जिन्यांतून ।।१५६।। बाप म्हणे हो । त्याला पत्ताच नाही अकलेला । मेल्यावर तोडूनी देहाला । न्यावे खालती जिन्यांतूनी ।। १५७।। ऐसे ऐकताच उत्तर राग झाला अनावर । बापालाही झोडूनी फार । कोंडुनी ठेविले घरासी ।।१५८।। बातमी पसरली गांवात । आजोबासी जाऊन सांगत । मुला नातूस सोडविण्या वरील । आला सावकाराचे घरासी ।।१५९।। आजोबा म्हणती सावकाराशी । नातू मुलाची अपराध पोटी घालसी । ना ज्ञान ना अनुभव त्यासी क्षमा करूनी सोडावे ।।१६०।। माझ्या म्हाताऱ्याकडे पाहून । क्षमा करावी त्या जाण । तू आहेस धनाड्य सुजाण । क्षमा करावी तयांना ।।१६१।। सावकार म्हणे त्याला । मुलाचा बाप झाला काहीतरी बोलतो बोला । मूर्ख गाढव दिसतसें ।।१६२।। मी मेल्यावर मजसी । मावणार नाही जिन्यासी । म्हणून तोडून नेवू म्हणसी । कीती मुर्ख बोलणे ।।१६३।। आजोबा म्हणती सावकाराशी त्याला न अक्कल कवडीची । नेता न

येईल जिन्यासी । तर पेंटवून द्यावे घरासी ।।१६४।। सांगण्याचे तात्पर्य । जिभेने प्रसंग येती अनिवार्य । म्हणून सत्संगतीन होईल कार्य । सुवळण लागेल जिभेसी ।।१६५।। ते तिघही होते अज्ञानी । ना सत्संग लाभला कोणी । तेणे बेताल केली बोलणी । दुष्परीणाम भोगला ।।१६६।। हा अध्याय नित्य वाचतां मनाचे महत्व समजेल तत्वतां । त्यांस आवर घालण्याची असे अवश्यकता । तेणे सुलभ मोक्ष प्राप्ती ।।१६७।। संताची घेऊ नये कसोटी । रोष झाल्यास आपुल्या वरती । शाप भोगता दुःख कष्ट अती । देवही न येतीं धावुनी ।।१६८।। देवाचे करा सदा नामस्मरण तेणे जिभेस लागेल उत्तम वळण । अहंकाराचे बांधां धरण । तेणे भक्तिमळा उफाळे ।।१६९।। हाच असे तरण्या उपाय । ॐ मनो भगवते मंत्राने पुढील जन्माची सोय । लावावी आता पासून ।।१७०।। स्वस्ति श्री वासुदेव चरित्रामृत । सद्गुरूच प्रेरक असती येथ निमित्तमात्र मुख यशवंत ।

।। पंचमोध्याय गोड हा ।।१७१।।

# अध्याय ६ वा

श्री गणेशायनमः ।। जयजयाजी कमळलोचना । कमळ पत्रांक्षा कमलासना । असुरांतका मुरमर्दना । देवकीनंदन कंसारे ।।१।। सांडुनी आपुले श्रेष्ठपण । गोवळ्या घरी राहिलासी येऊन । यालागी तुज नंदनंदन । सकळ जन म्हणती ।।२।। ब्रम्हादिक आणि ऋषीमुनी । नित्य प्रार्थीती तुज लागूनी । तो तूं गोपवेश धरूनी । गोकुळी नांदसी गोविंदा ।।३।। सकळ ब्रम्हांडाचा तूं निर्मिता । असुनिया ती तुज यशोदामाता । कडे उचलोनीया घे तत्वतां । सांभाळकरी प्रीतीनें ।।४।। तुझ्या स्मरणे भवबंधन । तुटोनी जाय न लागतां क्षण । त्यातुज यशोदानंद येऊन । बांधू म्हणती उखळाशी ।। नित्य तृप्त असता तू जगज्जीवन । माता ती शीदोरी देतसे तुज बांधून । ती तूं वनी गोपासमवेत बैसून । स्वानंदेची भक्षिसी ।।६।। असो सर्वातरी असतां तू जगज्जीवन । कोणाचे कोणी करावे वर्णन । दिन दयाळा कृपे येथून । कथामृत बोलवी ।।७।। गतध्यायी जहालेसे कथन सर्वास कारणीभूत मन । कोणास कैसा आलासे अनुभव जाण । कथानक सूंदर सांगितले ।।८।। तैसेच मनोनिग्रह नसतां । जैमिनीची झाली कशी फजिता । वाचेस बोलण्याचे वळण नसतां । कैसा होतो अनर्थ ।।९।।

पद – संगत सज्जनसो करिये । कपटी लोकन सो डरिये ।
क्या नफा दुर्जनके संगत । छोडकर दूर रहिये ।
मानपुरी प्रभु अंतर निर्मल, श्रवण मननसो धरिये ।।१०।।

सत्संगती धरा सदैव । तेणे उपजेल सात्विक भाव । अंतर्यामी वसतील देव । मोक्ष मार्ग सुलभ ।।११।। पांडवांची संगती सुभद्रेस । सत्संगे लाभे लाभ खासच । झाल्या मनोकामना पूर्णच । यशलाभे अभिमन्यु घटोत्कचा ।।१२।। शकुनी दुष्टदुर्जनाच्या संगतीत । राजा दुर्योधन सदा रहात । तेणे सर्व कुळ नाशपावत दु:ख प्राप्त जाहले ।।१३।।

श्लोक – दुर्जनस्यच सर्पस्थ वरं सर्पों न दुर्जन: ।
सर्पो दशती काळेन, तुर्जनस्तू पदे पदे ।।१४।।

दुर्जन असे सर्पांपरी । सर्पाहून महा विषारी सर्प चावता मरे त्वरी हाल हाल करी दुर्जन ।।१५।। यासाठी ज्ञानी संतांनी । उपदेश केला उद्धरणीं । अलीप्त रहा दुर्जना पासुनी । कैसा तो सांगतो ।।१६।।

श्लोक – शकट पंचहस्तेषु दशहस्तेषु वाजिन: ।

हस्ती हस्त सहस्त्रेषु देशत्यागोपि दुर्जने ||१७||

दूर रहा भिऊन सर्वांसी पाच दहा हात गाडी घोड्यासी | हजार हात दूर हत्तीसी दुर्जनासी स्थळ सोड ||१८||

श्लोक – सत्संगांत भवति हि साधुता खलानाम
साधूनां न ही खलसंगमात खलत्वम्
आमोदं कुसुमभवं मृदेव धत्ते
मृग्दंधं न हि कुसुमानि धारयन्ति ||१९||

अर्थ – दिंडी – खला येते साधुत्व साधुसंगे साधुत्व ते न भंगे |
पुष्पसंगे मातीस वास लागे, मृत्तिकेचा पुष्पास गुण न वागे ||२०||

उदाहरणार्थ – एक गृहस्थ वनी | सांपडली राघूंची जोडी छान | पंचरंगी सूंदर शोभायमान | अर्पण केली नृपासी ||२१|| पाहतां आनंद झाला नृपासी | त्यांना बोलण्याचे वळण लावण्यासी | दिला एक पुराणिकासी | दुसरा दिला फकिराला ||२२|| उभयतांनी त्यांना जोपासिले | सुंदर पिंजऱ्यात ठेविले | उत्तम रितीने पोसिले | परिस्थिती प्रमाणे ||२३|| पुराणिकाकडे शास्त्री येती वेदांची चर्चा करिती |

गोड नर्म भाषा बोलती ऐकून शिकला पोपट ।।२४।। फकिरा घरचा पोपट । यवन भाषा बोलत । सदा जे जे एकत । तैसा तो शिकेची ।।२५।। एके समयी राजास स्मरण आले पहावे पोपटास । किती शिकले बोलण्यास । म्हणून येती फकिराकडे ।।२६।। फकिर गेला होता भिक्षेसी । राजा आला पिंजऱ्या पाशी । राघू म्हणतो लगेच । त्यासी अरे कौन बहेनचोद आदमी अंदर चला है ।।२७।। ऐकतांच ऐसे राजा संतापला । राग आपला आवरून धरला । लगेच आला पुराणिक घराला । पोपटाने पाहिले ।।२८।। आगंतव्य महाराज यावे । आसनावरी लोडाशी बसावे । पाणी मागवतो आपण प्यावें । क्षणभर घ्या विश्रांती ।।२९।। महाराज आताच लेटले । लवकरच उठतील बोले । सत्वर काम असल्या आपुले । उठवितो तयांना ।।३०।। ऐकून ऐसी मधुरवाणी हर्ष झाला राजाचे मनी । घरी आला राजधानी । बोलाविले पोपटांना ।।३१।। प्रधानासी करीतसे आज्ञा । फकिराच्या राघूस द्या सजा । अपमानिले देऊन मज शिव्या । ठार मारा त्यासी ।।३२।। राघू नृपाला म्हणतो -

श्लोक - गवाशनानां स शृणोति वाक्यम् । अहं हि राजन् विदुषा वचांसि ।
न तस्य दोषो न च मद्गुणो वा संसर्गजा दोषगुणा भवति ।।३३।।

महाराज आपण नृपाल । दया क्षमा शांती पाल । विचाराविण ना वर्तांल । म्हणून विनवितो ।।३४।। हा

नव्हे त्याचा दुर्गुण । किंवा माझाही सद्‌गुण । हा असे संगतीचा परिणाम । जैसा आम्हा लाभला ।।३५।। राजा आम्ही असे अज्ञान प्राणी । जैसे शिकवी तैशी बोलणी । अर्थ कळेना आम्हा जाणी । ऐकले तेवढेच बोलावे ।।३६।। राजा अशोक शिकारीस जातां । माध्यान्ही सूर्य शिरी येता । हिंडून हिंडून आली शीणता । विश्रांती घ्यावी वाटली ।।३७।। दाट बोरीचे झाड पाहून । राजास वाटले समाधान । बोरी खाली ठाण मांडून । बैसला सावलीते ।।३८।। पलीकडील बाजूला । दाट झाडीने न दिसे तिला । बोरे पाडण्यासी खडा फेकीला अवचित लागला रायासी ।।३९।। खड्याने फुटलें कपाळ । रक्त वाहू लागले भळभळ । शिपाई पाहून जमले सकळ । चुना लावला जखमेसी ।।४०।। खडा आला कोंठून । म्हणून शोध घेती हिंडून । तो म्हातारी दिसली भिल्लीण । खडा मारतांना ।।४१।। शिपायाने धरले तिला । थरकाप भरला अंगाला । घाबरून लागे रडण्याला । राजा जवळी आणले ।।४२।। म्हातारी रडे फार । वारंवार करी नमस्कार । दया करावी मजवर । चुकुन झाले महाराज ।।४३।। मी रोज सरपण तोडते । मोळी घेऊन गांवात जाते । जे पैसे मिळती माते । तेणे पोट भरीतसे ।।४४।। ताप आला दिवस तीन । तेणे न न उरला मज त्राण । उपाशी होती म्हणून । खाण्यासी बोरे पाडली ।।४५।। मी होते पलीकडे । मजसी कोणी न दिसले इकडे । बोरे पाडण्यासी फेकली खडे ।

भूक शमवण्यासाठी ।।४६।। महाराज मजला क्षमा करा । चुकुन घडला अपराध खरा । अन्नाचा कण नसे उदरा । आधार मजला न कोणाचा ।।४७।। शिपाई महाराजास बोलती । ही काय आंधळी होती । दगड मारतांना झाडावरती । ही खोटे बोलतसे ।।४८।। हीला झोडून काढा चांगली । शिक्षा अद्दल घडवा पुरी । सम्राटासही दगड मारी । लाज नसे मुळीच ।।४९।। म्हातारी कापे चळचळ नेत्राश्रु वाहती खळखळ । आला आपुला जवळ काळ । देवास आठवू लागली ।।५०।। महाराज म्हणती शिपायाला । घेऊन चला म्हातारीला । हजर कर दरबाराला । काय करावे ते ठरवू ।।५१।। म्हातारीस आणले दरबारी । आता पुरती झाली घाबरी । काय होणार होवो तरी । वाचण्याचा न संभव ।।५२।। जवळ बोलविले शिपायाला । म्हातारीस घाम फुटला । लुगड चोळी दिले तिला । शंभर रूपये तनखा मासिक ।।५३।। म्हातारी पडली पाया । तुला उदंड आयुष्य लाभो राया । मला आधार नव्हता राया । मज पोसलेस दानशूर दयाळा ।।५४।। ऐकून दरबारचे लोक । आश्चर्य करिती मनी देख । असा कसा न्याय विचित्र त्यांना न ते राहवले ।।५५।। ते राजासी पुसती । जखम झाली कपाळाती । नुसती न क्षमा करती । आहेर तनखाही देतां ।।५६।। कोणी केलीया अपकार । आपण न करावा प्रतिकार । करवेल तरी करा उपकार । उपदेश हा तंतांचा ।।५७।। राजा म्हणे तयाला । दगड मारी वृक्षाला । परी

तो न संतापला । गोड बोरे देईच ।।५८।। तो तर बोलून चालून अज्ञान । मी आहे सज्ञान । त्यातून राजा महान । शोभेल तैसेच केले ।।५९।। क्षमाशील गुण वृक्षापासून शत्रु मित्र भेद नसुनी । फळादी देतसे सर्वा लागुनी । तैसेच काष्ठही देतसे ।।६०।। मी असे राजा सम्राट । मज का झाले हे पद प्राप्त । याचा विचार करा ज्ञानवंत तुम्ही सारे विबुध हो ।।६१।। पूर्व कर्म पुण्यफळ । जे चित्रगुप्ताजवळ साचले । तेणेच मज जन्मा पाठविले । या राजगृही ।।६२।। पुण्य कर्म करीता करिता । तेणेच होईल मुक्तता । धर्माप्रमाणे आचरण करिता । प्रजाही वागेल तशीच ।।६३।। यथा राजा तथा प्रजा । विद्वान ही सज्ञा । प्रजेचे वर्तन धर्मजा । वाढे श्रेष्ठता राजाची ।।६४।।

श्लोक – या दृशो जायते राजां तादृश्यो स्य जनोभवेत्

राजाही पुजीतो धर्म स्तत: सर्वत्र पुज्यते ।।६५।।

अर्थ राज्य न चाले अधिकाराने । किंवा कडक शिक्षेने । शिक्षण प्रेम धर्मांचे चालतसे सुरळीत ।।६६।।

श्लोक – नैव राज्यं न राजासित् नच दंडो न दंडीक: ।

धर्मेणैव प्रजा: सर्वा रक्षति स्म परस्परं ।।६७।।

यासाठी राजाने । स्वत: वागणे धर्मांचरणे । तेणे शिस्त अंगी बाणे । प्रजेच्याही ।।६८।।

श्लोक – मंत्री दोषश्च राजानां प्रजा दोष: तथैवच ।।६९।।

प्रजा मंत्र्याचे दोष । त्यांचे जे असे पाप भोगावे लागे राजास । धर्मा जवळी क्षमा नसे ।।७०।।

श्लोक – गुरूरात्मवतां शस्ता, राजा शास्ता दुरात्मनाम ।

अथ प्रच्छन्न पापानां शास्त्रा वैदस्वतो यम: ।।७१।।

अर्थ – शिक्षा करी गुरू आत्मवंचितास । तैसेच राजा दुर्जनास । आपण केलेल्या पापास । शिक्षा करी यमराज ।।७२।। सूज्ञ बोलती कैसे अंधारात करीता कृत्ये कैसे समजतील यमधर्माते । हे तर खोटे वाटते ।।७३।। राजा सांगे प्रजेसी । राज्यकारभार करण्यासी । प्रधान मंत्री तसेच सेवकासी । गुप्तहेर ठेविती राज्यांत बाहेरी ।।७४।। तैसेच देवांनी पृथ्वीवर । सर्वत्र पसरविले गुप्तहेर बातमी पाठवी वरचेवर । चंद्रगुप्ताजवळी ।।७५।।

श्लोक – आदित्य चंद्रावनिलो नलश्च । द्यौर्भुमी रापो ह्रदयम यमश्च ।

अहश्च रात्रीच उभेच सध्ये । धर्मश्च जानाति नरस्य वृत्तम ।।७६।।

सूर्यचंद्र वायू अग्नी । प्रकाश भूमी जल मन । यम दिन रात्री संध्याकाळी धर्मैही पाळत ठेंवीतसे ।।७७।। अलीकडील आकाशवाणी । बातम्या देतसे दूरच्या वाणी । हे अनुकरण असे देववाणी । नूतन नसे काहीच ।।७८।। यासाठी सावध रहावे । शुभ कर्म सदा करावे । जैसे आपण पेरावे । तैसे फळ मिळेल

||७९|| म्हणून त्या बाईसी | क्षमा केली असेचि | न कळत दोष घडे तिसी | क्षमा धर्म आपुला ||८०|| आपला विषय असे चालला | संत साधुसंग लाभला तो न कधि वाया गेला | उपकारक ठरतसे ||८१|| मागले अध्यायी सांगितले | देव संतांचे ह्रदयी रमले संतसाधूंच्या शद्बासी देव जाणले | भक्तांसाठी सदैव ||८२|| अंबरीष राजा साठी आले गजेंद्रासी रक्षीले प्रल्हादासी तारील | कित्येक संकटी ||८३|| देवही पहा इच्छितीं | साधूसंत संगती | त्यांचा शद्बन मोडती | कालत्रयी ||८४|| या विषयीची कथा | सांगतो ती ऐका | कृष्णास प्रसंगी ऐका | दुर्वासाने छळिले ||८५|| दुर्वास ऋषी महान क्रोधी | देवादिकही घाबरतो जधी | अंगीतशी अघटीत करणी | उग्रतपश्चर्येचे फळ ||८६|| पांडव वनवासी असतां | भेंटण्या जाई जनता | भोजन सोय कशी करावी अतां | नित्य संकट द्रौपदीसी ||८७|| आलेल्या अतिथीसी | नित्य भोजन द्यावे लागे त्यासी स्वत: तेच असतां वनवासी | परी सत्वरा न भुले ||८८|| स्थितीं पाहून ऐसी द्रौपदी आळवी कृष्णासी | लाजराखे यदुराया मजसी | मदत करावे अतिथ्य ||८९|| श्रीकृष्ण आले धांवुन | ही अन्नपूर्णा स्थाळी जाण | कामधेनू असे संपन्न | सूर्यास्तापर्यंत ||९०|| रात्री पालथी तिला ठेवसी | तिचा न उपयोग रात्री तुजसी | दिली असे सूर्यनारायणानें मजसी | अर्पितसे तुजसी प्रेमाने ||९१|| कितीही जेऊं देत

दिवसभर । पांची पक्वान्ने पोटभर । त्यांना न कधी कमी पडणार । मी असतां पाठिसी ।।९२।। रोज कितीक येती जाती । भोजनाविण न परतती । पांची पक्वान्ने खाऊन तृप्ती । ढेकर देत जातसे ।।९३।। वार्ता चहुकडे पसरली । परीक्षा पहाण्या सायंकाळी दुर्वास व शिष्य मंडळ पांडवांकडे आले ते ।।९४।। दुर्वांस सांगती पांडवासी । आम्हांस द्यावे भोजनासी सायंसंध्या उरकून येतोची । शिष्यांसह माझ्या ।।९५।। सूर्यास्त होऊन गेला तरी न येती जेवण्याला । अखेर थाळी उपडी करतांच भला । दत्त म्हणूनी उभा असे ।।९६।। दुर्वास ऋषी कोपीष्ट अती शापाने ते जाळूं शकती । माहित होती त्यांची महती । म्हणून द्रौपदी घाबरली ।।९७।। यदुराया धांव आतां संकटी वेळ आली कठीण अती । परीक्षा न घ्यावी जगजेठी । भक्तासाठी धांवरे ।।९८।। भावाचा तू भूकेला । वस्त्र हरणी धांवुनि आला । बहिणीची लाज राखण्याला तैसा धांवुन ये सत्वरी ।।९९।।

– गाणे धांवा –

तुची असे त्राता श्रींहरी, तुचि असे त्राता ।
तुजविण कवणा आळवूं सदया, व्यर्थची भगवंता ।।धृ।।
भक्तिने भुलला रमापती, भक्तासाठी धावुनी येंसी ।

व्याधाचे ते आचरण कैसे, परी उद्धारीला ।।१।।
अल्पवयी । बहु ध्रुव तो असुनी, आढळपदी नेला ।।
विद्येने वश तरी गजेंद्रा, हाकेशी आला ।।२।।
गजेद्राची ज्ञाती जरी तो, विदुरा वश झाला ।
राधा बहुतचि रूपवान परी, कुब्जेंशी वळला ।।३।।
द्रव्याने वश तरी हरी नगरी, दिधली सुदाम्याला ।
वासुदेवा अनुभव एकचि, भक्ती पटे हरीला ।।४।।

ऐकुनी धांवा धांवत आला । बहु थकलो मी झालो भुकेला । देई मजला खाण्याला । कांही तरी देच ।।१००।। द्रौपदी म्हणे कृष्णासी । तुही परीक्षा कां पहासी । दुर्वासादि आले भोजनासी । म्हणुन तुज बोलावले ।।१०१।। थाळी उपडी असे केली काय देऊं तुज वनमाळी । करी कृपेची साऊली । नको पाहु परीक्षा ।।१०२।। ताई मज दे काहीही । खाण्यास जरी थोडेही । तरी तुझे ब्रीद रक्षीलही । उपेक्षा करूं नको ।।१०३।। दादा किती पहासी अंत । ठाऊक सर्व तुजसी असता । विनाकारण छळसी पुरतां । वेळ पाहून कठीण ।।१०४।। ताई त्या थाळीत बघ । जराही असेल अन्नाचा कण । तेणे पोट भरेल भक्तिभावान मज न पाहिजे अधिक ।।१०५।। त्या थाळीसी होते चिकटलेले । भाजीचे एकच पान

चुकुन राहिलेले । ते प्रेमाने श्रीहरीने खाल्ले । तेणे जहाले समाधान ।।१०६।। समाधान होता प्रभुसी । तो काय न दे आपणासी । आपण मागतां एक त्यासी । दुप्पट दे आनंदे ।।१०७।। ताई कर दुर्वांसांची व्यवस्था । पाट पाणी करून स्वस्थता बैस त्यांची जेंवणे होता । काळजी न करावी ।।१०८।। बोलावून अन्नपूर्णा देवीसी । आज्ञाकरीती स्वैपाकासी । पंचपक्कान्ने भोजनासी । वाढी दुर्वासांना ।।१०९।। जेवले सर्व पोटभर । तृप्तीचे देती ढेकर । श्रीहरीचे लागतां कर । काय रूची पदार्थाची ।। आशिर्वाद देती दुर्वास । अखंड सौभाग्य लाभो तुज । मनो कामना जाईल सिध्दीस । आशिर्वाद देतसे ।।१११।। पुढे दुसरी कथा कैसी वर्तली । ती पाहिजे श्रवण केली । तृप्त होतील ते ऐकोनीं लुटा त्याचा आनंद ।।११२।। एकदा दुर्वास ऋषी आले । कृष्णाकडे मुक्कामी राहीले । पाच सहा दिवस राहीले । पाहुणचार घेत ।।११३।। पाद्यपूजा करी रूक्मिणी कृष्ण । तैसेच उटणे लावून स्नान । देती रोज मान पान । भोजन उत्तम सुग्रास ।।११४।। फारच जपतसे रूक्मिणी कृष्ण । दुर्वांसाचा स्वभाव क्रोधी महान । जैसे सांगतील तैसेच ऐकून । सदा राही आज्ञेत ।।११५।। कृष्ण सांगे रूक्मिणीसी । दुर्वासाचा अपमान न करिसी । सांगे तैसे आचरसी । प्रेम संपादन करी ।।११६।। दुर्वासाने ऐके दिवशी । गांवांतुन हिंडण्याची इच्छा ऐसी । दर्शविताच कृष्णे सारथ्यासी । रथ मागवी तात्काळ

।।।११७।। दुर्वास निघाले बाहेर जाण्यासी । सवे घेतलें कृष्ण रूक्मिणीसी । आले ते रथापाशी । आज्ञा करीते जहाले ।।११८।। रथाचे घोडे सोडा कृष्ण रूक्मिणीस जोडा रथ  माझा सांगा ओढा । गांवांतुनी ।।११९।। रूक्मिणी झाली कष्टी । चूप रहाण्यास सांगे जगजेठी । दोंघेच रथ ते ओढिती । हाकलती दुर्वास ।।१२०।। ऐसा रथ हिंडवला गांवातून । परी न कुणाची बोलण्याची सोय जाण । भयाण शांतता पसरली गांवातून । दुर्वास परिचित सर्वासी ।।१२१।। हिंडुन आले घरासी । श्रम झाले बहुत मजसी । मोठे पातेले खीर खाण्यासी । द्या लवकर सत्वर ।।१२२।। लागलीच मागवली खीर तेथे कसला आला उशीर । सवेच बैसवी रूक्मिणी मुरलीधर । खा एकच भांड्यांत ।।१२३।। तिघेही खाऊ लागली रूक्मिणी नाराज दिसली । वटारूनी डोळे आपुली । गुपचुप बसविले रूक्मिणीसी ।।१२४।। हाताने खीर खात । तसेच कृष्णांगास खीर चोपडीत । डोक्यावर छातीस कर हात । चरणापर्यंत लाविलें ।।१२५।। एका चरणास खीर लावली दुसऱ्या चरणासी अर्धवट लाविली । अंगठाच काय बाकी उरली । तोच रूक्मिणीने रोखिले ।।१२६।। हे मुने ऋषीवरा । तुम्ही आमुचे गुरूवरा । आपल्या सेवेसी आम्ही चाकरा । तुमची सेवा करतसे ।।१२७।। आम्ही धुवावे तुमचे चरणास । तीर्थ घ्यावे उद्धारास । गुरूने शिष्य चरणास । धरणें उचित न दिसे ।।१२८।। तुम्ही

आज्ञा करा मजसी । त्यांचे चरणासी लावण्यासी । आपुला शब्द झेलण्यासी तत्पर दासी आपुली ।।१२९।। ऐकतांच ऐसे उत्तर । दुर्वास संतापले अनिवार । म्हणे मी जातो सत्वर । तुमचे कर्म तुम्ही भोगा ।।१३०।। दुर्वास गेले निघोन । रूक्मिणीस रागावती कृष्ण । काय घोटाळा केला महान । कां दुखावले तयासी ।।१३१।। रूक्मिणी तुजनसे ठाऊक दुर्वास जरी संतापि अधिक । त्यांची तपश्चर्या फारच देख । सर्वामध्ये प्रसिद्ध ।।१३२।। ऋषींमुनी अवघे संत । दिसें उफराटी करणीं करित । त्यांत असे गहन अर्थ करींत । काय ठावे तुजसी ।।१३३।। ते कधी न करिती चुकुनी । ते असती पूर्ण ज्ञानी । आपण न जाणे अज्ञानी त्यांची न करावी बरोबरी ।।१३४।। जेवढ्या अंगास लावली खीर । तेवढी काया झाली अमर । रोखतांच तूं त्यांना सत्वर । आंगठा राहूनी गेला ।।१३५।। अंगठ्यास खीर न लागत । तेवढीच जागा शिल्लक रहात । तेच स्थानी मृत्यू वसत । माझा रूक्मिणी निश्चये ।।१३६।। रूक्मिणी रडे ढळढळा क्षमा करावी घननीळा । मी महा अपराधी न कळले मला । या दासीसी । ।।१३७।। जे जे होणे - जे जे काळी । ते ते न चुके कदाकाळी । माझ्या होणाऱ्या प्रारब्धासी । लेशही यत्न न चाले ।।१३८।। जे जे लिखीत ललाटी । ते ते न चुके कल्यांती । त्या प्रमाणेच आम्ही वागती । घडवितसे इतिहास ।।१३९।। रूक्मिणी तू असे मायेचा अवतार । मी असे नारायण अवतार । दुष्टांचा

भूभार उतरविणार । म्हणूनच अवतरलो असे जाण ।।१४०।। ललाटावरील रेषा । खरी व्हावी या करीता । कपटही करावे लागे तत्वता । भक्तरक्षणार्थ ।।१४१।। त्या साठी तुज सांगतो कथा । श्रवण करी देऊन चित्ता । कपट कैसे केले भक्तासाठी ।।१४२।। राजा दुर्योधन कपटी दुर्जन । पांडवासी त्रासवी फारच छळून । भरसभेसी करी द्रौपदी वस्त्रहरण । त्या वेळी मी रक्षीले ।।१४३।। एकदा दुर्योधनासी वाटलें । आपण व्हावे अमर चांगले । म्हणून साध्वीमाता गांधारीस विचारले । यांसी काही उपाय सांग ।।१४४।। गांधारी होती महा हुषार दुर्योधनासी पाठविले सत्वर । अमर होण्यास युधिष्ठिरा विचार । सत्य मानूनि कर तैसे ।।१४५।। दुर्योधन आला धर्मापाशी गांधारीने पाठविले तुम्हापाशी । माझी अमर काया होईल कैसी । याचा इलाज सांगावा ।।१४६।। धृतराष्ट्र होता आंधळा । तो दु:खी मग मी कां पाहू सोहळा । म्हणून तेव्हां पासून कायमची पट्टी डोळा । बांधिली होती गांधारीनें ।।१४७।। ऐसे तिचे महापतिव्रतेचे तेज । जाणून होते धर्मराज । मी सांगतो तसे करी आज । दुर्योधना निश्चये ।।१४८।। गांधारी माता महापतिव्रता । नग्न जावे तिच्या पुढतां । डोळ्याची पट्टी काढून अवलोकितां । अमर काया होईल ।।१४९।। ऐसा सुलभ उपाय ऐकून । माता गांधारीस सांगितला । त्यान माताही प्रसन्न चित्ते होऊन । तिसरे प्रहरी बोलाविले ।।१५०।। गांधारी बसली

होती माडीवर | जवळ आला तिसरा प्रहर | सर्व सेवकांना पाठवून दूर नग्न होऊन जिन्यांतून चालला ||१५१|| अंतर्साक्षी भगवान श्रीकृष्ण | धर्माचा खरा भोळा सल्ला जाणून | घाबरून आले धांवून | त्याच क्षणी ||१५२|| दुर्योधन महा दुर्जन | त्याचा नि:पात करणे कठीण | जाईल म्हणून आला धांवून | जिन्यामध्ये तेधवा ||१५३|| दुर्योधनास पाहून नग्न | आश्चर्याने बोले श्रीकृष्ण | तुझे डोके फिरले दिसते जाण नग्न कोठे जातोस ||१५४|| दुर्योधन म्हणे कृष्णासी | जात आहे गांधारी भेटीसी | जेणे काया अमर पावसी | धर्मराजाने सांगितले ||१५५|| दृष्टी पडतां नग्न कायेवर | तूं होशील पूर्ण अमर | ऐसी मातेची दृष्टी प्रखर | धर्माने कथियले ||१५६|| कृष्ण म्हणे दुर्योधनासी | तू वेडा दिसतो मजशी | धर्म तुझा शत्रू अससी | हे काय विसरला असे ||१५८|| शत्रूचा सल्ला ऐकून | खरे खोटे पहावे पडताळून | मग आचरावे त्या प्रमाणे | सूज्ञ माणसाने ||१५९|| तू समंजस महाज्ञानी | कैसा भ्रम पडला तव मनी | आईच्या समोर नग्न होवोनी लाज कशी न वाट ||१६०|| तू आहेस का बाळ लहान | पोरा बाळांचा बाप होऊन | कशी सोडशी मर्यादा जाण | कांही तरी समज धरी ||१६१|| माता म्हणेल काय तुजसी | नग्न जाता तिचे पाशी | कामांध होऊन आलासी | म्हणून भस्म करीन प्रसंगी ||१६२|| तुझा कांटा निघावा परस्परे | म्हणून योजना केली युधीष्ठीरे | कैसा भोंळा राहिलास

बाबारे । मजला आश्चर्य वाटते ।।१६३।। तरी याचा थोडा विचार कर । मी देतो तुला फुलांचा हार । निदान कंबरेस गुंडाळून । लज्जातरी राखावी ।।१६४।। शत्रूने असे सांगणे । त्यापरी आपण वागणे । ऐसी मुर्खाचींही लक्षणे दिसतसे मला ।।१६५।। तुझे राज्य नको मला ते पाहिजे पांडवाला । म्हणून उलटा सल्ला दिला । कसे न कळे तुज ।।१६६।। मला दोघे सारखेच । ना लोभ ना काहीच । सत्य सल्ला देणे हिताच । कर्तव्य म्हणून सांगतो ।।१६७।। फुलांचा चोळणा दिला दुर्योधनासी । कंबर मांड्या पर्यंत झाकल्या भागासी । उघडा बंब गेला आई पाशी । तिची दृष्टी पडाया ।।१६८।। डोळ्याची पट्टी सोडिली । कित्येक वर्षे होती जी बांधली । आपली नजर मुलावरून फिरविली । पुन्हा बांधले पट्टीस ।।१६९।। गांधारी म्हणे दुर्योधनास । फुलाने जो भाग झांकलास । तो सोडून अमर काया झालास । पुष्पाच्छादित भाग मृत्युचा ।।१७०।। तुला रस्त्याने कोण भेटला । त्याचा तू सल्ला ऐकला । तेणे मृत्युस्थान राहिला । मुला तुझ्या शरीरी ।।१७१।। महाकपटी असे कृष्ण । धर्म अजात शत्रु महान । सत्यवादी साधुसमान । शत्रु मित्र मानी ।।१७२।। तेणे झाला तुझा हा घात । न चुके जे असेल दैवात । म्हणून बुद्धी सुचे विपरीत । कर्म न चुके कोणासी ।।१७३।। कृष्ण सांगे रुक्मिणीसी । भरसभेत बोलविले द्रौपदीसी । लाज सोडून दाविले मांडीसी । ती फोडणे भीमा हाती ।।१७४।। म्हणून मी कपटे

करून । ते राहू दिले मृत्यूचे स्थान । भक्तब्रीदाचे कराया रक्षण । माझे कर्तव्य असे ॥१७५॥ हा अध्याय वाचतां नित्य । भेंटी होईल साधुसंत । दर्शन देतील रूक्मिणीकांत स्वप्नात प्रत्यक्ष ॥१७६॥ घरांत नांदेल शांतता । रूक्मिणीपतीची कृपा असतां । विवंचना होतील कमता । भक्तिभावे भजकांच्या ॥१७७॥ स्वस्ति श्री वासुदेव चरित्रामृत । सद्गुरूच प्रेरक असती येथे निमित्त मात्र मुख यशवंत ।

॥ षष्टोध्याय गोड हा ॥१७८॥

# अध्याय ७ वा

श्रीगणेशायनमः ।। जयजयाजी पुराण पुरूषा । कमल पत्राक्षा कमलाधिशा । कमललोचना ऋषीकेशा । मुरमर्दना कंसारे ।।१।। तव लीला असती गहन । मर्म न कळेची ब्रह्मादिकां लागून । परी मर्म जे असे सद्भक्ता वाचून । न कळेचि कल्पांती ।।२।। सद्भक्त सांगती हांकारून । अवघा भरला असे नारायण यालागी जग संपुर्ण । तुझ्या रूपेची देखती ।।३।। परि न ऐकति अज्ञान जन । वेडा पिसा म्हणती सद्भक्ता लागून । अज्ञान डोही ते आपण बुडून । आणिका बुडविती सहजची ।।४।। या लागी ते समाधान । असावें हो रात्रंदिन । नरदेहाचे ते महत्व पूर्ण । विचारेचि जाणावे ।।५।। सत्य विवेक नसतां चित्ती । दर्शन न घडे कल्यांती विवेकाविण तुझी प्राप्ती । न घडेची सर्वथा ।।६।। जो वरी नाही तुझी प्राप्ती तो वरी सार्थक नव्हेची श्रीपती । आणिक त्या जन्म मरण पंक्ति । सर्वथाही चुकेना ।।७।। यासाठी संत समागमाची प्राप्ती तेणे भेटे रमापती । पुढे आत्मदर्शन निश्चीती । सहजची होय सर्वांते ।।८।।

श्लोक – दुर्लभो मानुषो देहो देहीनां क्षणभंगुरा: ।
तत्रापि दुर्लभं मन्ये वैकुठ प्रिय दर्शन ।।९।।

मनुष्य देह दुर्लभ जाण । क्षणभंगुर बुड बुड्या प्रमाण । त्याहून महा कठीण । वैकुंठपती दर्शन ।। पूर्व जन्म पुण्याईन । चौऱ्याशी लक्ष योनी फिरून । पाप पुण्य होई समसमान । तेव्हाच लाभे मानव जन्म ।।११।। त्या चौऱ्याशी योन्या अशा –

श्लोक – जलजा नवलक्षाश्च दशलक्षाश्च पक्षिण: ।
कृमयो रूद्र लक्षाश्च विंशल्लक्षा गवादय: ।
स्थावरास्त्रिंश ल्लक्षाश्च चतुर्लक्षाश्च मानवा: ।
पापपुण्यं समं कृत्वा नर योविषु जायते ।।१०।।

मानव चार लक्ष । पशु असती वीस लक्ष कृमी ते अकरा लक्ष । बोलीले असे शास्त्री ।।१३।। दहा लक्ष खगचर । नऊ लक्ष जलचर । तीस लक्ष स्थावर । बोंलले शास्त्रात तेही ।।१४।। ऐसी चौऱ्याशी लक्ष योनी । जितुका तितुका जाणता प्राणी । अनंत देहाची मांडणी । मर्यादा कैसी ।।१५।। देह पंचभूतांचा चा बनला । त्यात आत्मा असे ठेवला । तोच राजा असे आपुला । परी प्रधान सत्ता चालवी ।।१६।। ऐंसा अमोल देह लाभला । या जन्माविण न दुसरा आतां । सार्थक करणे अपुल्या हाता । आलेल्या जन्मासी ।।१७।।

गाणे (चाल – रे मना गड्यारे सज्जना)

रे मना, सांडी कल्पना उमज धरी कांही । उमज घरी काही ।
या नरदेहाविण गड्या गतीतुज नाही ।।१।।
आजवरी । जन्मकितीतरी तुझे ते जहाले । तुझे ते जहाले ।
किती सुख तुला ते सांग अनुभवा आले ।।२।।
मना जेथे । जन्मला तेथे । व्यर्थ तू भूलला । व्यर्थ तू भूलला ।
मी, माझे म्हणुनी, गड्या कसा तू फसला ।।३।।
आतां तरी । जाण लवकरी । उमज ही माया । उमज ही माया
जाईल अशी ही संधी तुझी रे वाया ।।४।।
भुललासी । अरे तू ज्यासी । कसारे मायेने । कसारे मायेने ।
हो सावध तु लवकरी, फससी अज्ञानें ।।५।।
उमजुनी । घेई समजुनी । सत्वरी आता । सत्वरी आता ।
हरी वीण नसेबा कुणी तुजसी त्राता ।।६।।
वासुदेव म्हणे लवकरी । भजे तू हरी ।

नाही तरी आता । खाशील अंती यमलोकीं जाउनी लाथा ।।७।।

या जगी फुकट वस्तु न मिळत । त्या साठी मोबदला द्यावा लागत । जन्मो जन्मीचा पुण्य साठा खर्च होत । तेव्हा मिळे नरजन्म ।।१८।। चंदनाची किंमत कळेना भिल्लाला । सरपण म्हणून तो जाळी चुलीला । ज्ञानी जेव्हा विकत घे चंदनाला । तेव्हांच त्याची किंमत कळे ।।१९।। कवी रामजोशी म्हणतात –

कृता त्रेता द्वापारी होती, आयुष्याची बहु भरती ।
कलिमाजी शतवर्षे नेमिली, तीही न भरती पहा पुरती ।।१।।
बारा चौदा पंधरा सोळा पंचविसामधि किती मरती ।
मागे मेले पुढे मरणार कोण करील त्याची गणती ।।२।।
आजा मेला काका मेला, याची साक्ष घे चित्ती ।
त्याचे शोक दु:खित मानस, शेवट तुमची तीच गती ।।३।।
देह आपुला जाईल यास्तव, धरा कांही सोय झटकन ।
समय पातल्या उशिर न लागे, काळ येऊनी गिळी गटकन ।।४।।

लक्ष वर्षे आयुष्य युगे कृता । त्रेता युगी दश सहस्त्रा । द्वापारी ते एक सहस्त्रा । शतवर्षे कलीयुगी ।।२०।। आयुष्य ऐसे कमी होत होत । शतवर्षे झाली कलीयुगांत । कशाचा न राहीला ताळतंत्र क्षणभंगुर आयुष्य ।।२१।। दिवसामागुन दिवस जात । वर्षांमागुन वर्ष पळत । आयुष्यही तेव्हांच संपत । काळ न कोणा ध्यानाते ।।२२।। दिसते आयुष्य शंभर जरी । किती वाया जाते पहा तरी । सुखोपभोग भोगतो किती तरी । याचा विचार केला संतांनी ।।२३।।

श्लोक – आयुर्वर्ष शतं नृणां परिमितं रात्रौ तदर्ध गतं ।
तस्यार्धस्य तदर्धमर्धम परं बालत्व वृद्धत्वयो: ।।
शेषं व्याधि वियोग दु:ख सहितं सेवादि भिर्नीयते ।
जीवे वारी तदग बुब्दुदसमे सौख्यं कृत: प्राणिनाम् ।।२४।।

कलीयुगी आयुष्य मानिती । शंभर वर्षे जरी जगती । त्यांतील अर्धे रात्रीचे जाती । झोपण्यामुळे ।।२५।। आतां उरले वर्ष पन्नास । त्यांतील अर्धे पंचवीस बालपण वृद्धावस्थेस । न कळत जाते निघुनी । उरलेल्या पंचविसांत । नाना व्याधि वियोग दु:ख । उद्योग नोकरी सेवा घडत । आयुष्य जातसे भरकन ।।२७।।खरे सुख किती भोगले । सत्कारणी किती लागले । याचा विचार करतां उमगले

साधूसंत मंडळीस ।।२८।। पाण्यावर तरंग उठती । तैसेच बुडबुडे फुगती । हवा लागताच फटकन फुटती । तैसे आयुष्य मानवाचे ।।२९।। बरे या शंभर वर्षांतून खरे सुखी आयुष्य चाळीस जाण । तेवढेच दिले होते देवानं । विचारी मानवासी ।।३०।। सर्व प्राण्यात मानव । बुद्धी विवेक ज्या ठाव । म्हणून श्रेष्ट गणला भाव । देवासही आवडे ।।३१।। परी मानव महाविचारी । चाळीस वर्षे वाटतीअपुरी । काय म्हणावे देवास तरी । गाऱ्हाणे घेऊन गेला ।।३२।। देवा अल्प आयुष्य दिले मजसी । मी काय काय करू म्हणसी । कैसे पुरतील चाळीस वर्षी भुरकन निघून जाईल ।।३३।। ज्या नसे विचार । त्यास दे आयुष्य फार । ते अनाठायी जाणार । याचा विचार करावा ।।३४।। देव म्हणे मानवासी । आयुष्य दिले असे योग्यची । आला कोठून कोठे जासी । जन्मदाता कोण असे ।।३५।। याचा करूनी विचार । तैसाच आचरी आचार । जादा आयुष्य होईल भूभार । याचा विचार करावा ।।३६।। मानव म्हणें विचार करूनी । जादा आयुष्य देण्या विनवणी । तुम्हास जाणेल निश्चित मनीं । एवढाच भरवसा ठेवावा ।।३७।। देव म्हणे माझ्याजवळ । शिल्लक ना आयुष्य तिळभर । कोणाचे आले परत जर । देईल तुला निश्चये ।।३८।। तेवढ्यात गाढव आले । आपली तक्रार सांगू लागले । दिवसभर राबून आपले पोटभर देईना मालक ।।३९।। यासाठी उकीरडे फुंकीतसे । इकडून तिकडून

पोट भरीतसे । चाळीस वर्षे आयुष्य दिले असे । कमी करावे देवराया ।।४०।। दया आली देवास । बोलविले मानवांस । वीस वर्षे गाढवाचे खास । पाहिजे कां तुला ।।४१।। मानव लोभी महान । गाढवाचे आयुष्य घेतले झटकन । आणखी मागणी मागून । देवाजवळ बैसला ।।४२।। तितक्यांत आला श्वान । आपुले गाऱ्हाणे घेऊन । चाळीस वर्षे आयुष्य कठीण । हाल माझे होतात ।।४३।। रात्रंदिन करून पहारा । मालक खाण्यासी न देती पुरा । गल्ली बोळातून फिरे वणवणा । पोट भरण्यासी ।।४४।। दया आली देवास । बोलविले मानवास । वीस वर्षे कुत्र्याचे आयुष्यती । पाहिजे का तुला ।।४५।। मानव असे लोभी अती । कुत्र्याचे आयुष्य वीस घेतलेली । परत मागणी जादा आयुष्याती । देवाजवळ चालूच ।।४६।। तोच आले वानर रडत । चाळीस वर्षे का मज देत । रानोरानी असे हिंडत । रहावया न घरदार ।।४७।। मळ्यात फळ झाडावर बसता । कुत्रे भुंकिती मज वरतां । गावातही मी शिरतां । पोरे मारती दगडानें ।।४८।। सैरावैरा भटके बाहेर । कसे तरी पोट भरे दीतभर । बसू देत ना मज क्षणभर । सर्व मागे लागती ।।४८।। दया उपजली देवास । बोलाविले मानवास । वानराची वर्षे वीस । हवीत काय तुला ।।४९।। तेवढेही आयुष्य घेऊन । झाले नसे समाधान । मागणी मागे करी मागण । पिच्छा पुरवी देवाचा ।।५०।। अखेर देवाने सांगितले । शंभर वर्षे पुरे झाले । हात जोडतो जा

आपुले । महाविद्वान आपण ।।५१।। शंभर वर्षांची बेरीज पहातां । खरे आयुष्य चाळीस असतां । यौवन सुख असे भोगता । लग्न व्यवसाय करीतसे ।।५२।। मजेसे आयुष्य भोगतसे । तोच घरांत पाळणा हालतसे । दोन तीन मुले होतसे । जबाबदारी वाढली ।।५३।। सर्वाचा खर्चाचा भार । गाढवा प्रमाणे वाही पाठीवर । खर्च भागण्यासी कष्टतसे फार । कसले जेवण नि विश्रांती ।।५४।। असे आयुष्य असे सुखकर । गाढवाचे मजेदार । चाळीस ते साठ भर । भोंगतसे मुकाट्याने ।।५५।। पुढे ऐंशी वर्षापर्यंत । कुत्र्याचे आयुष्य लागत । तो पर्यंत नातू पहात । पुढें मुले धंदा करितीं ।।५६।। नांतू घरांत खेळती । गाणे मोठ्याने ओरडती । ते सहन होईना बाबाती । म्हणून रागावती तयांना ।।५७।। मुले म्हणती बाबासी कुत्र्यावाणी कां भुंकसी । खेळू आम्ही येथेची । किंमत नसे राहिली ।।५८।। कुत्र्याचे आयुष्य मजेदार । कुत्र्यापरीं भूंकणार । कोणी न मान देणार । घरांत इतुकाही ।।५९।। तोच वानराचे आयुष्य लागतसे । वानरास पोरे हुसकावी तसे । तसेच बाहेर जावे जावे लागतसे विश्रांतीसाठी ।।६०।। बसावे झाडाखाली पारावरी । किंवा देउळाचे ओट्यावरी । आपणा सारिखेच दु:खी सारी । जमती तेथे येऊनी ।।६१।। ऐसे आयुष्य वानराचे । कंठावें लागें बाहेरच साचे । खाण्यापुरते घरी यायचे । ना झोप ना विश्रांती ।।६२।। ऐसी आयुष्याची महती । ऐकण्यास गोड अती

| अनुभवता अश्रु येती | डोळ्यातून झराझरा ||६३|| पश्चात्ताप होता अनिवार | देवाची आठवण येतसे वरवर | आतातरी आठवा मुरलीधर | सार्थक करा जन्माचे ||६४|| जन्म दुःखाचा अंकुर जन्म शोकाचा सागर | जन्म भयाचा डोंगर | अचल ऐसा ||६५|| पहाता शरीराचे मूळ | या ऐसे नाही अमंगल | रजस्वलेचा जो विटाल | त्यामध्ये जन्म यासी ||६६|| वरवर वरवर दिसे वैभवाचे अंतरी भरले नरकाचे जैसे झांकण चर्मकुंडाचे | उघडले न जाय ||६७|| लाळ थुंका आणि मळ | पीत्त कफ प्रबळ | त्याला म्हणती मुख कमळ | चंद्रासारिखे ||६८|| पोटी घालीता दिव्यान्न | गंगेचेही पीता जीवन विष्ठामूत्र याविण | न होय अधिकची ||६९|| ऐसी कारागृही वसती | नव मास भोगे आपत्ती | तापती उकडती | ऐसीया घाणीत ||७०|| गर्भी कारागृही प्राणी | पडीला अत्यंत दाटणी | कळवळोन म्हणे चक्रपाणी | सोडवी आता येथूनी ||७१|| देवा सोंडवरे येथून | मी जरूर स्वहित करीन | हा गर्भवास जरूर चुकविन | पुन्हा न येईल येथे ||७२|| प्रसुतीचे समयी | दाबामुळे जीव कासाविस होई | तेव्हा देवास आठवी | सोडवी लवकर मलारे ||७३|| गर्भी म्हणे सोऽहं सोऽहं | बाहेर पडता म्हणे कोऽहं कोऽहं | कष्ट विसरला पडले देह | तेणे सुखची मानिले ||७४|| असे दुःख गर्भवासी | होतसें प्राणी मात्रासी म्हणुनी भगवतासी | शरण जावे सार्थक ||७५|| यासाठी कविनज म्हणती –

श्लोक – पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरे शयनम्
इह संसारे खलु दुस्तारे कृपया पारे पाहि मुरारे ।।७६।।

ऐंसा नरदेह लाभला । सर्व प्राणीमात्रांत शोभला । बुद्धी जादा दिली आपणाला सर्व प्राण्याहून अधिक ।।७७।। या नरदेहाचेंनि आधारे । नाना साधनांचे द्वारें । मुख्य सारासार विचारें । बहुतची सुटलें जन्मातुनी ।।७८।। नरदेही येऊन सकळ । उद्धरागती पापलें केवळ । येथे संशयाचे मूळ । खंडून गेले ।।७९।। चौऱ्याशी लक्ष योनीत नाही गती । ऐसे सर्वत्र बोलती । म्हणून नरदेहीच प्राप्ती परलोकाची ।।८०।। संत महंत ऋषी मुनी । सिद्ध साधु समाधानी । भक्तमुक्त ब्रह्मज्ञानी । उद्धरले याच देही ।।८१।। म्हणुन नरदेह श्रेष्ठ । नाना देहामधे वरिष्ठ । जयाचे नि चुके अरिष्ट । यम यातनेचे ।।८२।। नरदेह हा स्वाधीन सहसा नव्हे पराधीन । म्हणून परोपकारी झिजवून । सार्थकी लावावा ।।८३।।

श्लोक – परोपकाराय फलंती वृक्षा: परोपकाराय वहंती नद्य: ।
परोपकाराय दुहंती गाव: परोपकाराय इद शरींरम् ।।८४।।

पद – नर जन्मामधी नरा करूनी घे नर नारायण हरी ।
तरीचरे सार्थकता जीवनी ।।८५।।

नराचा नारायण होण्यासाठी । हरींचे नांव घ्यावें ओठी । भवसागर तरून जाण्यासाठी । तेच उपयोगी येतसे ।।८६।।

श्लोक – हरिर्हरति पापानी हरि: इति अक्षर द्वयं ।

हरी नामोच्चारणें । नाश पावती पाप जाणे । अहंकारही गळे तेणे । ऐसे महात्म्य हरी नामाचे ।।८७।।

गाणे – (चाल – धाव आता सखया नरहरिरे)

भज मना सतत तू हरीरे । जेणे तुझे होईल सार्थक रे ।।धृ.।।

(चाल बदलून) चौऱ्याषीचे फेरे फिरता, कष्ट किती भोगीले ।
पूर्व पुण्य म्हणूनी गड्या मोक्ष द्वार लागले ।
आतातरी सावध तू होई रे ।।१।।
आप्त इष्ट मोह गड्या तुजसी दाविती ।
साथ परीन देती कुणी भूल पडली किती ।
उमजुनी स्वहित तू साधी रे ।।२।।
गर्भवास किती रे त्रास आजुनी सोसीसी ।

दु:ख नाठवेचि कसे रे सांग तुजसी ।
भ्रम कसा तुजसी पडलारे ।।३।।
विषयी भुललासी म्हणुनी समज तू आता ।
कष्ट होती ना कळेचि दु:ख भोगिता ।
भूल कशी पडली ती तुजरे ।।४।।
येऊनीया नरदेही भ्रमशी तू कसा ।
जन्म मरण चुकवी गड्या पण करी असा ।
गोड आता शेवट तू करीरे ।।५।।
वासुदेव प्रार्थीं तुला समज कांही तू धरी ।
फेरे फिरूनी कष्टलासी पाहे किती तरी ।
पुन: पुन: समय हा नये रे ।।६।।
श्लोक – हरे: केशव गोविंद वासुदेव जगन्मय ।
इति रयंति ये नित्य नहीतान्बाधते कली: ।।८८।।

हरीचे नाम घेता नित्य । कली न बाधे सत्य । ऐसे हरीनाम माहात्म्य असे पुराणांतरी ।।८९।। या अवघ्या प्रचंड पृथ्वीत । कोण आहे मोठा वसत । देवाहुनही जो महत । त्याची गोष्ट सांगतो ।।९०।। एकदा हस्तिनापुर नगरी । महर्षि नारदाची आली स्वारी । स्वागत करूनी बोलती परी । आपण हरीहून श्रेष्ठ ।।९१।। कारण

श्लोक – पृथ्वी तावदिय महत्सू महती तद्वेष्टन वारिधि: ।

पीतोऽसौ कलशोभ्दवेन मुनिना सव्योन्मि खद्योतवत् ।

तद्विष्णोर्दनूजाधिनाथ दमनें पूर्ण पदं नाभवत्

देवोऽसौ वसती त्वदीय ह्रदयें त्वत्तोधिक: क: पर: ।।९२।।

अर्थ – पृथ्वी एवढा मोठा पदार्थ । न दिसे अन्यवत । परी समुद्राने त्या वेष्टीत म्हणून समुद्र मोठा ।।९३।। ऐसा समुद्र महान । अगस्तीने केला प्राशन । अगस्ती काजव्यासम लहान । आकाशाहून असे ।।९४।। आकाश कसे महान । बळीराजास मागूनी जमिन । फक्त दे तीन चरण । हरी नटला वामन रूपे ।।९५।। पृथ्वी व्यापिली एका चरणें । स्वर्ग झांकले द्वितीय चरणे । जागा न उरली तृतीय चरणे । ठेवून मस्तकी बळीस घातले पाताळे ।।९६।। ऐसा विष्णु महान । नारद ह्रदयी वास करून ।

नारदासी मिळे मोठेपण भाव भक्तीने ||९७|| म्हणून तुकाराम महाराज म्हणती -

श्लोक - साठविला हरि जेणे हृदय मंदिरी |

त्याची सरली येरझार झाला सफळ व्यापार |

हरि आला हाता मग कैचि भयचिंता |

तुका म्हणे हरि कांही उरू नेदी उरी ||९८||

प्रारब्धेचि नरदेह मिळालिया वरी | विचार जागृत ठेवावा अंतरी | हाच उपाय असे निर्धारी | विवेकाविण व्यर्थ सर्वथा ||९९|| नरदेहा येऊनी करावें सार्थक | विवेक ओळखावा ब्रह्मांड नायक ||१००|| नाही तर जन्म मरण पंक्ती अनेक | न चुकती कल्यांती ||१०१||

भजन - तरज - (सुनो ऐ साहेबो तुम कों)

प्रभूका नाम लो हरदम यही जीवनका साथी है |

नही है अन्य कोई साधन कलियुगमे बताया है ||धृ.||

न है धन की गरज इसे, न है कुछ कष्टका कारन |

सहजमे नाम जो लेगा वही निजधाम जाता है ||१||

विषयका है मीठापन जो जरा तुम सोचलो इसे ।
विषयके ध्यानसे केवल जीवन बरबाद होता है ।।२।।
हमारा पूर्वसुकृत है तभी नर तन मिला हमकों ।
गमाकर व्यर्थसा इसको आखेर पछताये जाते है ।।३।।
न है परिवार ये तेरा न है संसार की चीजें ।
पडा क्यो व्यर्थ झंजटमे निकलकर सबभी जाते है ।।४।।
नही तूं साथ कुछ लाया न लेगा साथ कुछ अबभी ।
है नश्वर भोग सब सारे क्यौ मतलबको मिटता है ।।५।।
है वासुदेवका निश्चय सुनो तुम शांतीसे अबभी ।
जीवनमें नाम जो लेता वही एकसाथ आता है ।।६।।
श्लोक - जाते फिरतां देखिले जाण । त्यामाजी पीठ होताती कण ।
तैसीच गती मजकारण । भवचक्रांत पडलिया ।।१०२।।
रामानंद म्हणतात - खुंट्यासी कण धरोनी राहीले । ते काळचक्री पीठ नाही माले । तेवी श्रीराम

भजनी जेवी नटले । ते काळे ग्रासिले नाहीत की ।।१०३।।

आर्यां – जैसे तुंब्या वाचुनी प्राणी न तरे कदापि जीवनांत ।
तैसे हरी कृपेविण न तरू आम्ही भवाब्धि जीवनांत ।।

श्लोक – जीवित जन्म साफल्यं सुखं तस्यैव सार्थकम् ।
सतत रसना यस्य कृष्ण कृष्णेती जल्पती ।।१०४।।

जीवित जन्म साफल्याती । तैसेच सार्थक सुख प्राती । सदारमवी जींभ नामाती । जपा कृष्ण कृष्ण ।।१०५।। सार्थक करण्या जीवनाचे तुम्ही जमलेत येथे । साचे मज बरोबर भजन म्हणावयाचे । सर्वांनी मिळून ।।१०६।।

–भजन –

गोविंद गोविंद गावो रे भाई । हरिकिर्तनमें आके ।
ऐसा प्यारा नाम है । गोविंद माधव श्याम का ।
ऐसा प्यारा नाम है । निजमुक्ती का धाम है ।
श्रीराम जयराम जयजयराम । श्रीराम जयराम जयजयराम ।।१।।

जिसने गाया राम नही। मिले उसे आराम नही।
चुपचाप रहना काम नही। हरि किर्तनमे आके।
श्रीराम जयराम जयजयराम। श्रीराम जयराम जयजयराम ।।२।।
दो दिनका संसार है। मतलब का बाजार है।
जन्म सफल करलोरे भाई। हरि किर्तनमे आके।
श्रीराम जयराम जयजयराम। श्रीराम जयराम जयजयराम ।।३।।
सत संगत अनमोल घडी। विषय संगसे भूल पडी।
राम नाम की लगा झडी। हरी किर्तनमे आके।
श्रीराम जयराम जयजयराम। श्रीराम जयराम जयजयराम ।।४।।

ऐसे मधुर प्रवचन ऐकून। तृप्त होती सर्वांचे श्रवण। ज्याचे त्याचे तोंडी भजन। सार्थक करण्या जन्माचे ।।१०७।। कीर्तन आटोपल्यावरी। जो तो गेले आपुल्या घरी। ऐसी एकांती संधी बरी। साधिली अमरदासानें ।।१०८।। महंत सांगती वासुदेवासी। मी रोज ऐकतो प्रवचनासी। निरभिमान अधिकारी ज्ञान राशी। तुज ऐसा न पाहिला ।।१०९।। आपण आहां पूर्ण ज्ञानीं। तैसे शांत उदार

ऐकुनी । आलो असे तुमच्या चरणी । भिक्षा मागावया ॥११०॥ मी असे नाथ पंथी । वय अवघे पंचवीस वर्षी । तारूण्य आडवे तयासी । येंतसे माझ्या ॥१११॥ माझी लागेना समाधी । ब्रह्मचर्याची आहे उपाधी । मदन तो मज कधी कधी चळवीं समाधीतुनी ॥११२॥ त्या करीता मजवर । आपण करावा उपकार । तारूण्य अर्पितो तुम्हावर । वृद्धत्व द्यावे मजसी ॥११३॥ बारा वर्षे तप कराव यासी । उसने द्यावे वृद्धत्वासी । आपण घ्यावे यौवनासी । तेणे माझे सार्थक होईल ॥११४॥ वासुदेव म्हणे महंतासी । विनंती तुझी मान्य मजसी । वाढविन वारकरी पंथासी । प्रवचन करीत हिंडेल ॥११५॥ रक्षा लांबताच वासुदेवांनी । वृद्धत्व आले महंता तत्क्षणी । महंत शिरी हात ठेवुनीं । तारूण्य घेतले आपण ॥११६॥ निरोप देती महंतास । साध्य कर समाधीस । तेणे सार्थक जीवास लाभेल तुझ्या ॥११७॥ तप झाल्यावरी । पुन्हा ये माघारी । तेव्हा बदलू सारी जैसी तैसी ॥११८॥ महंत घाली नमस्कार । वासुदेव चरणांवर । तुम्हीच मज देव थोर । दिसतां आहांत ॥११९॥ तुमचा आशिर्वाद लाभला । आतां जातो तपाला । बैसतो हिमालयाला तपश्चर्या कारणे ॥१२०॥ हा अध्याय नित्य वाचता मानवास स्मरण राही चित्तां । कैसी करावी सार्थकता । आलेल्या जन्मासी ॥१२१॥ ऐसा थोर जन्म लाभला । जन्मोजन्मीच्या पुण्ये मिळाला । पुन्हा मिळेल या भरवशाला । राहू नये कोणीही

।।१२२।। या अध्यायाचे नित्य करतां वाचन । त्यांची गंडांतरे होतील निवारण । प्रत्यक्ष पाठीस राही श्रीकृष्ण घेऊन सुदर्शन सदैव ।।१२३।। शुचिर्भुती वाचावा एकांती । जेणे पांडुरंग तोषिती । प्रत्यक्ष दर्शन मिळेल आपणाती । यांत संशय नसावा । स्वस्ति श्री वासुदेव चरित्रामृत । सद्गुरूच प्रेरक असती येथ निमित्ते मात्र यशवंत ।।

।। सप्तमोध्याय गोड हा ।। १२५।।

# अध्याय ८ वा

श्री गणेशायनम: ।। जयजयाजी लक्ष्मीपती । विश्वात्मका विश्वमूर्ती । व्यक्ता व्यक्त तू आदि अंती । विवर्तरूपे नटतोसी ।।१।। निज भक्ताचे ते वचन । पाळशी तू अंगेची जगज्जीवन । आणिका दाविसी ते सत्य करून । निजकृपेची आपुल्या ।।२।। भक्त कथा तुज आवडती । भक्ताठायी तुझी प्रीती । देवभक्त ते अभिन्न असती । वर्म निश्चित हेचि पै ।।३।। तुझे आप्तेष्टादिगोत । एक असती की प्रेमळ भक्त । भक्तांचा तो आवडी मनोरथ । न सांगताची पुरविशी ।।४।। भक्त जेथे जेथे वसती । तेथे तू असंसी की रमापती । तैसाज तुझा विरह चित्ती भक्त न शाहतीच सर्वथा ।।५।। ऐसे हे देवभक्तांचे महिमान । न कळे ब्रह्मादिका लागून । तुझा तू जाणता रूक्मिणी रमण । मर्म ते आणिका कळेना ।।६।। सारासार पहातां विचारून । मर्म ते इतुकेची जाण । तू सर्वस्वे झालासे भक्ताधीन निज कृपेची आपुल्या ।।७।। गरीबांचा उद्धार करण्यासी । वासुदेव फिरती गावोगांवसी । धर्म मार्गी लावती आचरणासी । प्रेमे शिष्य वर्गाला ।।८।। नित्या सांगती भक्तासी । देव नाम घ्या रात्रंदिवशी । जो आवडतसे आपुल्यासी । सर्व एकच परमेश्वर ।।९।। कोणत्याही देवाचे नांव । घ्या ठेवुनी शुद्ध भाव ।

निश्चये येईल घेवोनी धांव । भार टाका सर्वस्वी ।।१०।। मनी नसावे द्वैत । ठाव द्या प्रेमे हृदयांत । मन करूनी भेद रहित अर्पावें तयासी ।।११।। मन असावे शुद्ध सात्वीक । ते कैसे होई ऐक । प्रयत्न करता देख । निश्चित होय शुद्धचि ।।१२।। जल असते जमीनीचे पोटांत । जर त्याची आवश्यकता भासत । तर जमींन खोदावी लागत । तेणे प्राप्ती जलाची ।।१३।। खोदण्याची जी क्रिया असत । ती सत्कर्मा प्रमाणे होत । मग जे प्राप्त होत । तेच पुण्य असे ।।१४।। शुद्ध सात्विक मनाचे ठायी । ऐहिक पारलौकीक सुखे पाही । त्याचे लाभाचे उपायी । दूर करणे पाप दोष ।।१५।। शुद्ध करीतां दुसऱ्याचे मन । आपुलेही मन शुद्ध होत जाण । वाईट विचारे दूषिता दुसऱ्याचे मन । आपुलेही मन होय दूषित ।।१६।। शुद्ध सात्विक मनाचे योगे करून । अघटीत शक्ती होतसे निर्माण । ऐंहिक पारलौकीक सुख लाभ जाण होतसे आपोआप ।।१७।। ऐसे शुद्ध सात्विक मन अर्पिता । आनंद होय भगवंता । तेणे तो येतसे हांक मारितां पदोपदी ।।१८।। वासुदेवराव आले बदनापुरी । शेंठ पन्नालाल तापडेंच्या घरी । एक वर्षापासून होते आजारी । अन्नपाणी जाईना ।।१९।। नऊ महिन्यापासून । फक्त दूध मोसंबी रस घेऊन । वर्जच झाले अन्न जाण । तेणे क्षीणता बहु आली ।।२०।। उठतां बसतांही येईना । अंथरूणासी खिळले पहाना । प्रेतकळा आली वदना । आवाज खोल गेला असे ।। दोन माणसे उठवीत । ते मग दूध

पाजत । परावलंभी जीणे जगत । पैशाचा ना उपयोग ।।२२।। पन्नालाल शेठ महाउदार । वारी करिती पंढरपूर । पन्नास वर्षे होती निर्धार । परी आता जाववेना ।।२३।। शेठ मोठें भाविक भक्त । वासुदेवांशी गुरू करीत । अन्नदान गरीबा करीत । प्रख्यात ते नगरांत ।।२४।। गरीबासी करीती मदत आपुलकीने सर्वांशी वागत । अभिमानासी हांकलून देत । लक्ष्मीनारायण नांदे ।।२५।। वारीस पंढरपूर जाण्याची । तगमग लागली फारची । परी बळ नसे तेथे उठण्यासी । माश्यापरी तळमळ ।।२६।। पैसा असून भरपूर । खर्चण्यास जरी उदार । बळावता रोग शिरजोर । कांही न उपयोग पैशाचा ।।२७।। पन्नालाल शेठ घरच्यास म्हणती । वारीस जाऊ द्या पंढरपुराती । आजवर कधी न चुकलींती । खंत जाळीतसे मला ।।२८।। घेऊन चला पंढरपुरासी । जगणार नाही निश्चयेसी । मरूं द्या जातांना वारीसी । जीव सार्थकी लागेल ।।२९।। बरोबरचे वारकरी म्हणती । आजारी अशक्तपणा फार अती । प्रवास दूरचा असे अती । तेणे नेंता न येची ।।३०।। खंड न पडावा आपुले वारीस । म्हणून पाठवा आपुल्या मुलास । म्हाताऱ्याची समजुत होईनाच । मलाच न्या म्हणतसे ।।३१।। तितक्यात येती हैद्राबादेहून । वासुदेवराव जाणून । भेटती पन्नालालास जाऊन विचारपूस करीतसे ।।३२।। महाराज म्हणती पन्नालालासी । मुलास पाठवा बदली वारीसी । पन्नालाल म्हणती वासुदेवासी । आप साथ चलो तो

मरतां नही ।।३३।। ए वासुदेव सांगती का तेढा है मेरा और पांडूरंगका । कभी न जात दर्शन करनें उसका । ऐसा कैसा पांडूरंग ।।३४।। जब तुम हो उसके भक्त । तो वो क्यू नही जानत । फौरन आकर इस वक्त । अच्छा कर देना चाहिये ।।३५।। अगर उसमे नही शक्ती । तो फत्तरको फत्तरही समजती । तो क्यो जाना पंढरपुर ती । विश्वास कैसा रखे ।।३६।। वेळ होती भर दुपार । ऐकोन वासुदेवाचे उत्तर । दारी जटाधारी दत्त म्हणून हजर । उभा राहीला सामोरी ।।३७।। दाढी होती वाढलेली । अंगात कफनी घातलेली । हाती छोटे कमंडलु धरलेली । साधुमूर्ती प्रगटली ।।३८।। महाराज नमस्कार करून । विचारिती येण्याचे प्रयोजन । काय हवे आपणा करा कथन । देण्यास बरे होईल ।।३९।। साधू बोले जो कोई । भोजन करा दे भाई । भूकने मुझे सताई । यही इच्छा है ।।४०।। पक्की रसुई है तय्यार । तुम्हारा करते है सत्कार । खानेको हो जावे तैयार । चलो घरमे भोजनको ।।४१।। साधू बोले मै जानता । किसीका हाथका नही खाता । खीचडी दो तो पकाता । और फिर खाऊंगा ।।४२।। कमंडलू होते पावशेराचे । तीन पाव खिचडी मावली असे । नवल वाटले आश्चर्याचे । ते पाहून सर्वांना ।।४३।। महाराजास वाटला हा काय प्रकार । म्हणून उठून पाहाती सत्वर । तो गळ्यापर्यंतच भरलेले साचार । आश्चर्य वाटले त्यांना ।।४४।। साधू उठून जाऊ लागला । महाराजांच्या वाटल मनाला ।

द्यावी भिक्षा साधुला । म्हणून तेथून उठल ।।४५।। सर्व बोलती महाराजांना । तुम्ही न सोडा या स्थाना । तुमची भिक्षा मी देतोना । आताच या स्थळी ।।४६।। गोंगाट ऐकून साधु परत । आला असे पहा घरांत । क्या झगडा है करत । कहो मुझे ।।४७।। लोक साधूवर खेकसले । जॉव जॉव महाराज बोले । काम करो अपना भले । क्या हमे पुछते ।।४८।। वासुदेव म्हणती त्यासी । ऐसा कैसा पांडुरंग अससी । अक्कल नही उसको जरासी । जब भक्त इतना बिमार हो ।।४९।। भक्तासाठी असेल हरी । रोगाला हरवील सत्वरी । वेळही पुरे त्यास क्षणभरी । वारी न चुकू देईल ।।५०।। ऐसे ऐकताच साधु हसला । झटकन विभुती काढून म्हणाला । महाराज तुमच्या हाते त्याला । लावा सत्वरी ।।५१।। वासुदेव म्हणती साधूला । मी कशास लावू त्याला । तुमच्या हाताने अंगाला । लाविलेले विशेष ।।५२।। आपुल्या हाते बाबा न लावती । म्हणून इतर त्यांच्याजवळ मागती । परी तो देईना त्यांना ती । त्यांच्या हाते लावण्याला ।।५३।। साधु म्हणती तयाच । महाराज उनको लगातें । तो देंता उनके हाथे । नही तो मै चला ।।५४।। सर्व वासुदेवासी विनविती । लावा न तुमचे हाती । काय बिघडले लावा ती । ऐका आमुचे ऐवढे ।।५५।। वासुदेवांनी घेतली ती विभुती । स्पर्शे चिजेचा करंट लागला हाती । परी ते बोलू न शकती । विभुती लाविली पन्नालालाते ।।५६।। तोच साधू झटकन निघाला । अधिकारी असावा

वासुदेवा वाटला । त्यामागेच धावती पाठीला । परी बोलच फुटेना ।।५७।। तितक्यांत साधु मागे वळून । पाहतसे साचूल लागून । त्यांनी भिक्षेंची केली खूण । तोंडातून शद्ब निघेंना ।।५८।। महाराज घरी जाऊ लागले । त्यांच्या मागे साधू चालले । भिक्षेसाठी होते बोलविले । घरी पोहोचले लगेच ।।५९।। घरात जाऊन सांगितले बाईस । तांदळाची भिक्षा दे साधूस । जेवढे दिले तेवढेही आंतच । पाहून चकित झाले ।।६०।। वासुदेव सांगती बाईस । पोथी उचलून ठेवी उंच । ऐसे सांगून मागे पाहात । तो साधु कोंठे दिसेना ।।६१।। साधुची शोधाशोध जहाली सुरू । आजारीही लागला पळू । ज्याला उठताही येईना जरू । तळमळ लागली साधूची ।।६२।। रस्तोरस्ती पळू लागला । साधूचा शोध घेण्याला । आजारपण ना ठाऊक त्याला । क्षणांत बरा झाला तो ।।६३।। पांडुरंग मिले महाराज की वजहसे । बिमारी हटगई जडसे । पंढरपुर जाऊगा मिलनसे । आया महाराज घरको ।।६४।। वासुदेवाच्या पाया पडला । साधु दाखवी म्हणे मला । त्यासाठी ढळढळा रडला । गुरूच्या गळ्या पडूनी ।।६५।। वासुदेव म्हणती त्याला । तुझी तळमळ पाहुनी आला । पांडुरंग स्वत: आपणासाठी भागला । कष्टविलेस तु देवा फार ।।६६।। वासुदेवांच्या डोळ्या आले पाणी विणाकारण । कष्टविला चक्रपाणी । धन्य धन्य तुझी करणी । प्रचिती दाविली सर्वांना ।।६७।। पन्नालाल शेट दुसरे दिवशी ।

गुरू व इतरासी घेउन गेला पंढरीसी । मोठ्या आनंदाने ।।६८।। तेथे केले अन्नदान बहुत । तसेच घरी आल्यावर परत । आजारी न पडला त्याप्रत । आनंदे सुख भोगले ।।६९।। पुढे काही दिवसांनी । दृष्टांत दिला पांडुरंगांनी । पैसा लावा सत्कारणी । माझे देऊळ बांध ।।७०।। तेणे तुझी समाधानी । इतरासही लाभ मिळूनी । न यावे पंढरपुरी दर्शनी तुझ्या तेथे मी राहीन ।।७१।। देऊळ बांधिले बदनापूरी । सुंदर असे ते कलाकुसरी । स्थापून श्रीपांडूरंग मंदिरी । नाव अजरामर केले ।।।७२।। त्यांच्या घरी सर्वांनी वासुदेवास गुरू करूनी । शुद्ध सात्विक आचरणी । नांवाजले बदनापुरी ।।७३।। मुलगा बद्रीशेठ सालस । सुलोचना सुनबाई शांत । गुण्या गोविंदे नांदत । लक्ष्मीनारायणापरी ।।७४।। वासुदेव भेटती सर्व शिष्यास । गरीबां घरी जाती स्वतःच । द्वैत नसे मूळचेच । शिष्य गुरू एकच ।।७५।। प्रवास करिती एस.टी. त । तैसेच । रेल्वे गाडीत । आपुल्या सारखेच जनता क्लासांत । जे जनता जनार्दन मानिती एकच ।।७६।। लहानगांवी शिष्यास भेटण्यासाठी । तेथून न मिळाली एस.टी. । तरी न माघारी फिरती । पायी जाऊन भेंटतीच ।।७७।। ऐसी ओढ ज्यांना शिष्याची । जन जागृती करण्याची । उपमा देणे योग्य चंदनाची स्वतः झिजुनी दरवळे ।।७८।। म्हणून बद्रीशेठ लक्षाधीश । ते म्हणती वासुदेवास । अबँसडर मोटार देतो फिरण्यास । गुरूदक्षिणा म्हणुनी ।।७९।।

वासुदेव सांगती तयासी । तू जरी मोंटार देसी । मी सोडीले असे मोहासी । परत न गुंतणे सूज्ञानी ।।८०।। एकदा अडकतां मोहात । अधिकाधिक गुंते न कळत । जैसा भुंगा अडके कमळांत । तैसाच हाही अडके ।।८१।। जरी शिष्य देती मोटार घेऊन । उचित नव्हे ते स्विकारण । मोहास असे आमंत्रण । मायेत परत का गूंतू ।।८२।। मोटार घेऊन हिंडता । पैसा लागेल पेट्रोल करतां । शिष्यावरी भार घालतां । उचित नव्हे गुरूसी ।।८३।। शिष्य देतील प्रेमाने घडोघडी मागणे । गुरूसी होईल लाजिरवाणे । अहंकार सोडुनि वागावे ।।८४।। गुरूसी पैसे देता । तो सत्कारणी लागला असे समजतां । त्यानेंच का होतसे सार्थकता । आलेल्या जन्मासी ।।८५।। तो जो पैसा खर्च करतां । लुळेपांगळे अनाथा देता । देवाबद्दल वाढे व्यापकता । नवीन दृष्टी मिळेल ।।८६।। गरीब दुबळ्यासी अन्नवस्त्र दान । हे असे महापुण्य । योजना करणें नीट पारखून । उत्तेजन द्या आळसासी ।।८७।। यांत चि मला समाधान । तैसाच देवालाही जाण । मी जे तुम्हा दिले ज्ञान । हीच गुरूदक्षिणा मज द्यावी ।।८८।। छत्रपती शिवाजी महाराजांनी । रामदास स्वामीस गुरू करूनी । राज्य अर्पिले त्यांचे चरणी । परी न स्वीकार केला तो ।।८९।। त्यांनी दिले छत्रपतीस । भगवे कापड निशाणास । वैराग्याचे शिक्षण वागण्यास । स्वत: आचरूनी दाविती ।।९०।। दीन दुबळ्यांचे नको दुखवूस मन । षडरिपूंना

चाकर समजून । सत्कारणी घे राबवून । हाच गुरूमंत्र जपावा ।।९१।। कल्याण सुभेदाराची सून पळवून । छत्रपती अर्पिली नजराणा म्हणून । जरी होती सौंदर्याची खाण । आई संबोधून पोहोचविली आदरे ।।९२।। ज्याने राज्य दिले गुरूते । तो काय हत्ती घोडा न दे गुरूते । परी रामदासांनी स्विकारले न ते । खरी वैराग्यवृती ।।९३।। शिवाजी म्हणती रामदास स्वामीस । तुम्ही रहावे एकाच स्थळास । सर्व व्यवस्था करतो खास । तुम्हा कारणे ।।९४।। स्वामी म्हणती शिवाजीसी । भिक्षान्ने मी भरीन पोटासी । कर्तव्य जन जागृती करण्यासी । ब्रीद असे माझे हे ।।९५।। मी स्वत: पायी हिंडेन । नको तुझे गाडी घोडा वहान । तेणे मी कर्तव्यासी मुकेन । अहंकार वाढण्यासी कारणीभूत ।।९६।। एकदा शिवाजी महाराजांनी । नजराणा पाठविला देऊ म्हणूनी । स्विकार न केला संत तुकारामांनी । जरी होती गरीबी ।।९७।। तुकाराम सांगती शिवाजीस नजराणा वाटतो विष आम्हास । ठेव ठेवील त्या परिस्थिस । आनंद मानणे संताने ।।९८।। मोहमाया अलंकार । हे तर वाटते आम्हा जहर । त्याचा न करू स्विकार । फक्त भाव प्रेम हवे आम्हा ।।९९।। जे जे असती संत । ते नसती गर्भश्रीमंत । परी उदार दयावंत । झिजती गरीबांसाठी ।।१००।। प्रत्येक शिष्याचे घरी जाती । प्रवचनांतुन उपदेश करती शुद्ध आचरणास लावती मुमुक्ष मार्गासाठी ।।१०१।। त्यांच्याच घरी होते प्रवचन । संत महिमा

सांगती विस्तारून । देव तसती । मंदिरातून । संतह्रदयी राहातसे ।।१०२।।

श्लोक - गंगा पापं शशीपापं दैन्यं कल्पतरूस्तथा ।
पापं तापश्च दैन्यं च हन्ति साधुसमागम ।।१०३।।

गंगा पाप धुते । चंद्र ताप शमविते । कल्पतरू दैन्य हरिते । तिन्ही शमविते साधुसंत ।।१०४।।

आर्या - देती फल बहू दिवसां देव शिला काष्ठ मृन्मय प्रणता ।
जलमय तीर्थेही तशी संतचि फलती नमोऽस्तुते म्हणतां ।।१०५।।

शिलाकाष्टाचे देव । तैसेच जलमय तिर्थाचा प्रभाव । फळ बहुदिवसांनी पाव । संतफल मिळे नमस्कारे लगेच ।।१०६।। शूरसेन राजा होता महान । त्यास नव्हते पूत्रसंतान । म्हणून घोर तप करून । विष्णूसी प्रसन्न केले ।।१०७।। शूरसेन सांगे विष्णूसी । पुत्रसंतान नसे ममकुशी । तेवढे मज तू देसी । तेणे मी धन्य ।।१०८।। विष्णू म्हणे शूरसेनासी । पुत्रसंतान नव्हे तव प्रारब्धासी । माझा इलाज न चाले त्यासी । दुसरे कांहीही माग ।।१०९।। तेव्हा राजास वैराग्य येऊन । वनवासा गेला राज्य सोडून । तेथे सत्पुरूष गलित कुष्टी होऊन । पडिलेला पाहीला ।।११०।। दया उपजली राजाला । काय हाल होताती याला । ब्रह्मचारी हा साधु भला । परी न भोग सुटला कुणा ।।१११।। अखेर ऐसेच होती

हाला । पुत्र ना कोणी सेवा करण्याला । तेणे वैराग्य आले जीवाला । काळ घालवावा सेवेत ।।११२।। साधुस नव्हती कशाची शुद्ध । गलीत कुष्टाचे त्रासाने बेशद्ध । राजा करी त्यास सावध । पाणी आणून पाजी ।।११३।। राजा साधूच्या सेवेत लागला । जखमा रोज धुवूं लागला । त्यावर वनस्पती लावू लागला । त्यानेच आंघोळ घाली ।।११४।। ऐसी एकनिष्ठ सेवा चाले । साधूस बरे वाटू लागले । कोण सेवा करितो म्हणून पाहिले । आश्चर्य वाटले राजास पाहून ।।११५।। राजा तू या स्थानाला । राज्य सोडून कैसा आला । माझ्या सेंवेंचे कारण मला समजू तरी दे ।।११६।। महाराज मी आहे राजा जरी । तरी न सुखी संसारी । पुत्र नाही मम वंशारी । तेणे वैराग्य आले ।।११७।। काय करू त्या राज्याला । जीवास जर सुख न आपुल्याला । म्हणून आलो वनाला । उरीत जीवन घालावे ।।११८।। तो आपणांस पाहुन । दया उपजली मला जाण वाटले । सेवा घडते करावी पूर्ण । म्हणून येथे राहिलो ।।११९।। साधु जाहाला ते प्रसन्न । तुला पांच पुत्र एक कन्या होईल जाण । राज्य करी मोठ्या आनंदान । गृही परत जावे ।।१२०।। राजा आनंदाने घरी आला । सर्व वृत्तांत कथिला राणीला । परत लागले संसाराला । गुण्या गोविंदाने ।।१२१।। थोडा काळ जातांच । गर्भवती झाली राणी खरच । खरा वाटू लागला वरच । श्रद्धा अधिक वाढली ।।१२२।। साधूचा आशिर्वाद फळास आला । पांच

पुत्र एक कन्या झाली राजाला । सर्वत्र आनंदी आनंद झाला । बहरले राज्य फुलूनी ।।१२३।। पाहून सुख सोहळा अचानक येती नारदमुनी भेटीला । माझ्या सल्याचा उपयोग झाला । फारच छान जहाले ।।१२४।। राजा म्हणे नारदासी । महाविष्णूची तपश्चर्या करण्या सांगसी । परी न उपयोग झाला तिंयेसी । तव प्रारब्धी नसे सूत सांगती ।।१२५।। तेणे वैराग्य आले मम मानसी । म्हणून गेलो वनवासी । तेथे भेट झाली साधूसी सेवाही त्याची घडली ।।१२६।। तो मजवर प्रसन्न झाला । पांच पुत्र एक कन्या तुला । होतील ऐसा वर दीला । त्याचे कृपेचे हे फळ ।।१२७।। हे ऐकून नारद सुन्न जाहला । तडक जावुनी वैकुंठाला । सर्व हकीकत सांगितली विष्णूला । ऐसी कैसी चूक तुझी ।।१२८।। शूरसेन राजास । पुत्र नाही कुशीस । म्हणून तूच सांगितले ना त्यास । मग कसे पुत्र झाले ।।१२९।। वैराग्य झाले शूरसेनासी । म्हणून गेला वनवासी । साधूची भेट होता त्यासी । सेवाही केली ।।१३०।। त्यानें आर्शिवाद दिला । पांच पुत्र एक कन्या तुला । होतील धर भरवशाला त्या प्रमाणे झालेच ।।१३१।। तेव्हा नारद म्हणे विष्णुसी । शुरसेनाची रोजतपासी । चूक झाली का पहाण्यासी । पहावें एकदा ।।१३२।। नारदाने पाहिली रोजनिशी । शूरसेनाचे प्रारब्धासी । पुत्रसंतान नव्हते कुशी । पाहून चकित जाहला ।।१३३।। नारद म्हणे विष्णूसी । संतती नसता त्याचे कुशी साधूचे

आशिर्वादासी । कैसे पुत्र जाहले ।।१३४।। साधु मानव असुनी । अशक्य दाविती शक्य करूनी । तो काय तुजहून समर्थ जाणी । महान असे होय ।।१३५।। ऐकून घेतले विष्णूनी । नारदासह आले अवनी । गांव जवळ आलेले पाहुनी । गडबड लोळू लागला ।।१३६।। माझे पोट दुखे फार । आता मी मरणार । नारद म्हणे सत्वर । हिंग ओवा डिकेमाली आणतो ।।१३७।। विष्णू म्हणे नारदासी । हा परिणाम शूळ दिसे मजसी । कोणी काळीज देईल मजसी । तरच मी वाचेल ।।१३८।। ऐसे ऐकुन नारद आला गांवात । घरोघरी असे विचारीत । काळीज द्याहो विष्णू प्रत । तेव्हांच तो वाचेल ।।१३९।। लोक म्हणती नारदासी । निघाला एवढा परोपकारासी । तुझे काळीज का न देसी । त्यासी वाचवावया ।।१४०।। परी कोणी न देई गावात । विचारून आला परत । विष्णूस सांगितला सर्व वृत्तांत । ऐंकून ऐसे विष्णु बोले ।।१४१।। आतां एकच आशा उरली । जा गावा बाहेरील साधू जवळी । ज्याने राजास संतान दिलीं । त्याला विचारून बघावे ।।१४२।। नाहीतर मी निश्चित मरणार दु:ख झाले असह्य फार । आतां न माझ्याने धरवे धीर । निरोप येई पर्यंत थांबतो ।।१४३।। नारद सत्वर आला साधूपाशी । विष्णूचे पोट दुखते म्हणून आलीसी । विष्णूने सांगितले काळीज मिळेल तरची । मि वाचू शकेन ।।१४४।। गांवात हिंडलो बहुत कोणीही काळीज न देत । विष्णूस तुमची आशा राहिली उरत । म्हणून

आलो येथेची ।।१४५।। नारदाचा प्रश्न ऐकोनी । हाती शस्त्र धरोनी । लगेच स्वत:चे काळीज कोपोनी । नारदाजवळ दिले ते ।।१४६।। नारद आला विष्णूपांसी । साधूचे काळीज दिले त्यासी । तोंच पोट दुखी थांबली झटदिशी । हातात काळीज पडतांच ।।१४७।। विष्णू म्हणे नारदासी । ज्याने काळीज दिले परोपकारासी । तो काय न देईल दुसऱ्यासी माझे पदही देईल ।।१४८।। त्यानेच दिले पुत्र संतान । माझ्या हातात नव्हते देणे । काळीज नव्हते का तुजजवळ जाण । मला देण्यासाठी ।।१४९।। ऐसे बोंलोनी सत्वर । दोघे आले साधू जवळ । अमृत दृष्टी पहाता नजर । साधू जिवंत जाहला ।।१५०।। साधू संत असती दयावंत । देव त्याचे ह्रदय मंदिरी वसत । त्यांचे कार्य देवच करत । भक्तांच्या शद्धासाठी ।।१५१।। नारदा किती सांगू तुज महती । गूरू संत साधु जे देती । ते न आम्ही देऊ शकती । आमच्याहूनी ते श्रेष्ठ ।।१५२।।

श्लोक – हरिणापि हरेणापि ब्रम्हणापि सुरैरपि
ललाटे लिखींता रेषा परिमाश्ठ न शक्यते ।।१५३।।

श्लोक – विधात्याची रेषां कवण नर तो लेश नुरवी ।
विधात्याची रेषा जगी गुरू कृपा लेंश नुरवी ।।१५४।।

कृतांताच्या दुता मरण समयी कोण फिरवी ।
कृतांताच्या दुता मरण समयी गुरू फिरवी ।।१५५।।

रेषा ललाटीची । एकदां लिहिली साची । कधी न ती पुसणारची । विधीहरी हरानेही ।।१५६।। प्रवचन आटोपल्यावर । बद्रीनाथ व सुलोचनाबाई सत्वर । घातले लोटांगण चरणावर । महाराजांच्या तेधवा ।।१५७।। लग्नासी वर्षे झाली बावीस । परी न संतती आम्हास । हयगय न केली खटपटीस । औषोधोपचारेही केलेत ।।१५८।। मुंबईचे डॉक्टर प्रख्यात । इंग्लड अमेरिकेतून शिकून येत । त्यांनीही खटपट केली शिकस्त । परी निराश जहाले ।।१५९।। डॉक्टरांनी सांगितले । गर्भाशय आहे सडलेले । संतती होणे शक्य न राहिले । आमुच्या हाती आता ।।१६०।। आम्ही आहोतच निराश । दैवात नसेल संतती खास । आपुले प्रवचन ऐकून आम्हास । पुन्हा आशा उद्भवली ।।१६१।। आपण संत आहांत अधिकारी । महान तपश्चर्या परोपकारी । निरभिमान किर्ती ऐकली थोरी । शरण आलो तुम्हासी ।।१६२।। देवास नवस केले बहुत । पोथ्या पुराणे पारायण वाचत । लक्ष प्रदक्षिणा पिंपळासी घालत । आळवितसे देवा परोपरी ।।१६३।। बद्रीशेठ सुलोचना उभयता । उदास असती सर्वदा । म्हणती हे लक्ष्मीकांता । निष्ठुर कां जाहलासी ।।१६४।। तू दयेचा सागर । तू

सर्वसाक्षी परमेश्वर । कां रूसलास अमुच्यावर । राधारमणा श्रीहरी ।। नर जसा ज्ञानाविण । वा नासिका वाचून वदन । तैसेच पुत्रविण मम सदन दिसतसे ओखट ।।१६६।। नक्षत्रे नसता निशापती । दीनवत जैसे भासती । तैसेच आम्ही निश्चिती । पुत्रावीण दयाळा ।।१६७।। दरबार शून्यराजावीण । वा सूर्यावीण गगन । कुंकुम तिलकावाचन । शोभेना कामिनी ।।१६८।। वा फुलावीण वेल । फळावीण वृक्ष न शोभेल । रात्र चंद्रावीण भयाण । जशी दिसतसे ।।१६९।। पुत्रावीण जो का नर । त्यास मिळे अधोगती साचार । ऐसे वरिष्ट पराशर । बोलले ग्रंथांतरी ।।१७०।। कां आम्ही पूर्व जन्मांत । कोणाचा केला पुत्रघात । म्हणून आम्हाप्रत । शिक्षा देसी दयाळा ।।१७१।। किंवा गाय वासराची । ताटातुट केली असे साची । म्हणून या जन्मी आमुची । केली असे ऐसी दशा ।।१७२।। पुत्रप्राप्तीसाठी । केल्या अनंत खटपटी । परी न झाला पुत्रपोटी । आमुच्या गुरूवरा ।।१७३।। तुम्ही पाहा प्रयत्न करून । जर झाला तुमच्या आशिर्वादानं । जन्मोजन्माचा ऋणी होईन । म्हणून विनवितो ।।१७४।। महाराज म्हणती तियेसी । नका घेऊ धसका मनासी । पुन्नाम नरक प्राप्ती निपुत्रीकासी । हा तर तुमचा गैरसमज ।।१७५।। निपुत्रिकासी जर नरकप्राप्ती । रामदास, साईनाथ, उपासनी संतासी । माणिक प्रभु रंगनाथासी । मिळेल गती कोणती सांगा ।।१७६।। पुन्नाम नरकापासून । जो तारी तो पुत्र जाण ।

ऐसे जरी असे वचन । तरी त्याचा अर्थ वेगळा असे ।।१७७।। पुन्नामनरक नाम विशिष्ट नरकाचे असत । पुरूषपणाचा अभिमान ह्राच नरक होत । जेणे पुरूष पापकरण्यासी प्रवृत्त होत । तो पुन्नाम बोलीला ।।१७८।। पुरूषपणाचे अभिमानें करून । अंगी वाढती रजतमगुण । त्या अभिमाने दुष्ट वासना वाढत जाऊन । पापकर्म घडतसे ।।१७९।। त्या पापकर्म योगे करून । कर्म प्रारब्ध बनोन । भोगवी यातना जन्मपरंपरा वाढवून । तोच नरक होय ।।१८०।। एवं पुरूषपण अभिमान । हे दुःखासी असे कारण । पापकर्मांने नरका जाणे कारण । म्हणून याला पून्नाम म्हणती ।।१८१।। पुरूषाचे अभिमानात । जोवरी कोंणी असत । तोंवरी परमात्म्याची प्राप्ती न होत । उपासनी बाबांचाही अनुभव हाच ।।१८२।। आपण पुरूषपणाचा अभिमान सोडता । पून्नाम नरक चुके तत्वतां । पुत्राची न आवश्यकता । पुन्नाम नरक चुकवावया ।।१८३।। संत सर्व ब्रह्मचारी मंडळी । ज्यांनी देहाभिमानाची केली होळी । त्यांना भिऊन नरक दूर पळी । कशास हवा पुत्र ।।१८४।। हा तो आहे भ्रमाचा खेळ । खेळ आटोपताच सकळ । न रहावा आशांकुर प्रबळ । पुनर्जन्मासी म्हणून समजा ।।१८५।। राजा सम्राट जडभरत । वासना राही मरतांना लाडक्या हरणांत । तेणें जन्म मिळाला त्याप्रत हरणाचा ।।१८६।। म्हणून म्हणती मरतांना । देवाचे नांव तरी ध्याना । म्हणजे वासना राही कशांत ना ।

देवाजवळ स्थान मिळे ।।१८७।। देव जे जे करीतसे । ते सर्वच चांगले असे । आपणांस कांही विचित्र दिसे । तो भ्रम जाणा निश्चिती ।।१८८।।

**भजन तरज**

बडे भाग्यसे नरतन पाया विवेक प्रभूने दिया है ।
प्रभु निर्मित है सबभी अच्छा बुरा कहनेका हक क्या है ।।१।।
बुरा जो कहते वह सब अच्छा सूक्ष्म दृष्टीसे देखो तुम ।
जहाल विषभी देखो समयपर अमृतसा बन जाता है ।।२।।
विषय और ये स्त्रीका सेवन करो शास्त्रसे सम्मतसे ।
अनुभव तुमको यही मिलेगा यह दोनो हितकारी है ।।३।।
अब कामक्रोधादि शत्रू बताये इनका उपयोग योग्य करो ।
योग्य समय पर काम लेनेसे यही सुखद बन जाते है ।।४।।
परिवार तो मतलब का है तब करलो मतलब तुमभी उससे ।
माता पिता और कांता सभीभी हित कारन बन जाते है ।।५।।

इनका त्याग तो नही हो सकता, फिर साथी करो निजसाधन मे ।
जो हट नही सकते उनको हटाना ये कैसा हो सकता है ।।६।।
त्यागका मतलब है आसक्ती छोडो हटावो इनको अब ।
मै पनको भी जडसे उखाडो फिर यही सुखद बन जाते है ।।७।।
वासुदेवका है ये इशारा सोचो समझो कुछ तो जरा ।
विवेक शक्ति को कभी न खोना फिर धोंका मिट जाता है ।।८।।

यासाठी वागावे विवेकाने । देवास न दोष देणे । फळमिळतसे आपुल्याच करणीने । म्हणून विवेक जागृत ठेवावा ।।१८९।। जीवनात दु:ख भोंगता । त्याचे कारण शोंधा तत्वता । जे करू नये ते करता । मग रडता कां दु:खात ।।१९०।। विचार पाहे तों पूरूष । विचार न पाहे तो पशू । ऐसी वचने सर्वेषु । ठायी ठायी बोलिला ।।१।।

तरज - (ईश्वरको जान बंदे मालीक तेरा वही है)
जीवन हमारा क्यो कर दुखसे भरा हुवा है ।
सोचो जराभी इसमे कारण इसे हमी है ।।१।।

टचभी तो पहले होता अच्छा बुरा है जो भी ।
फिर करना नही सो करके रोने है फिर सभीभी ।।२।।
दु:ख भोगके समय फिर मर्जी प्रभूकी कहते ।
करके यही बहाना अपना आयुब छुपाते ।।३।।
धोका प्रभूको देकर क्या वह कृपा करेंगे
रोना पडेगा हमको रोतेही फिर रहेंगे ।।।४।।

असो मी सांगतो तैसे करो । शुद्ध भाव ठेव देवगुरूवरी । स्नान करून प्रार्थना एकदांच करी । पांचशे जप करी जेवणापूर्वी ।।१९१।। श्रीसिद्धयंत्र देतो तव पूजेसी । नित्य पूजा करी त्याची । मनोभावे कर सेवेसीं । फळ निश्चित मिळेल ।।१९२।।

## श्री सिद्ध यंत्र - प्रार्थना

ॐ नम: शिवाय अदित्यं गणनाथंच देवी रूद्रंच केशवे ।
गोपालाय नमोस्तुते । पूत्रन देहि पूत्रन देहि पुत्रन देहि नमोस्तुते । आदिशक्ती नमोस्तुते ।।१।।
गोपालाय नमोस्तुते । पुत्रनदेही पुत्रनदेही पुत्रनदेही नमोस्तुते ।।२।। हा ५०० वेळा रोज म्हणावा.

सत्य करावया संतवचन । पाठी उभे असे नारायण । भक्त वचन ते असत्य । म्हणून होऊं नेंदीच कल्पांती ।।१९३।। लोटतांच थोडे दिवस । गर्भ राहील सुलोचन बाईस । प्रसूत झाली सुमुहूर्तास । पुत्र रत्न झाले ।।१९४।। पुत्र मुखाते पाहूनी । बद्रीशेठ तापडी आनंदले पूर्ण । सुलोचनाबाई म्हणे वांझपण । फेडिले सद्गुरू वासुदेवांनी ।।१९५।। हे देवा सत्गुरू वासुदेवा । तूच आमुच जीवा विसवा । तुजवर ठेविले शुद्धभावा । तेणे अमृतफळ लाभले ।।१९६।। आज समजली सद्गुरूची महती । त्याचा शब्द कधी न जय वायाती । तो खरा करण्या देव राबती प्रत्यक्ष अनुभवा आजि आले ।।१९७।। स्वस्ति श्री वासुदेव चरीत्रामृत । सत्गुरू प्रेरक असतीं येथ । निमित्त मात्र मूख यशवंत । अष्टमोध्याय गोड हा ।।१९८।।

# अध्याय ९ वा

श्रीगणेशाय नम: ।। जयजयाजी माधवा मधूसूदना । असुरांतका मुरमर्दना मदन ताता मन मोहना । प्रल्हाद रक्षका नरहरे ।।१।। जों जों ज्या रीती तुज येशरण तैसेच तू त्याचे करीशी रक्षण । तो थोर आहे की सान । ऐसे न पाहसी सर्वेशा ।।२।। तूच त्या लहान ध्रुव बाळाशी । अढळपद दिधले ऋषीकेशी । एक शुद्ध भाव तो आवडे तुजसी । अन्य न पाहसी तू गोविंदा ।।३।। शुद्ध भाव आहे जयाचे जवळी । तयानेच तुज बांधले वनमाळी । तयाची तू पूरवावया आळी । तत्पर असशी सर्वदा ।।४।। असो बहू बोली ती कासया । भावबळेची तू बांधिली पंढरीराया । शुद्ध भावाविण त्या अन्य उपाया । हाता न येंशी तू सर्वथा ।।५।। तरी शुद्ध भाव ओळखून माझा पूर्ण । करवावे ते पुढे ग्रंथ लेखन तुजविण सर्वेशा हे कार्य कठिण । होणे अशक्य माझेनी ।।६।। मि तो असे की विद्याहीन । ना कशाचा अनुभव जाण । तेथे या लेखनाचा अभिमान । व्यर्थ कासया मजलागी ।।७।। तरी तू मम ह्रदयी बैसून । कथामृत बोलवी पुढे येथून । गताध्यायो पन्नालाल शेंटास दर्शन । प्रत्यक्ष घडियल ।।८।। असो बदनापूरचे बद्रीनारायण तापडे मोठे श्रीमान । आजारी पडले टाँयफाइडन । अंथरूणावर खिळले

||९|| दूध मोंसंबी रस केवळ | द्राक्षे सफरचंदादी फळ | गात्रे झाली शिथील | त्राण न राहिला उठण्यास ||९|| मुलीचे ठरले होते लग्न | त्यातच आले हे आजारपण | काळजी पडली सकळा जाण | पत्रिकांहि छापल्या ||१०|| वऱ्हाड आले लग्नासी | आधल्या दिवशी मुक्कामासी | सद्गुरू वासुदेवही आले भेटीसी | लग्न सोहळा पहांण्यासी ||११|| बद्रीशेठास होता ताप फणफणून | सगळ्यांची तोंडे गेली सुकोन | कैसे होईल लग्न निर्विघ्न | याच काळजीने ग्रासिले ||१२|| वासुदेवास आणिले बोलावून | धरिले त्याचे चरण | प्रार्थिती सदगदीत कंठान अब्रु राखी गुरूराया ||१३|| वासुदेव सांगतो त्यासी | हिंमत न सोडावी ऐसी | मी आहे तुमच्या पाठीशी निर्विघ्न पार पडेल ||१४|| तू ऊठ बिछान्यावरून | तुझा ताप चार दिवस घेऊन | पार पाडी लग्न निर्विघ्न | तो पर्यंत मी सांभाळतो ||१५|| थाटामाटानें लग्न लागले | बद्रीशेठ हिंडू लागले | व्याहीसी आहेर केले जावयासी तसेही ||१६|| पंगतीवर पंक्ती उठू लागल्या | पक्की रसुई वाढण्याला | बूंदी लाडू  फाफडा शेव | चिवडा खारी डाळही ||१७|| जिलबी खाजा म्हैसूर | सत्तरफेनी घेवर | मोहन थाळ भरपूर | गुलाब जाम रसगुल्ले ||१८|| माव्याची बर्फी चवदार | कलाकंद लाडू दळदार | बेसन लाडू गुलजार | आग्रहे चालें जेवर ||१९|| ऐसा थाट पाहुन | व्याहीस झाले समाधान | निरोप घेती प्रेमान | जाती आपुल्या

गावासी ।।२०।। सर्व पाहुणे गेले निघोन । गेले चार दिवसही भुरकन । घरांत झाली शांतता पूर्ण । स्वस्थ चित्ते बैसले ।।२१।। नमस्कार करिती गुरूसी । तुमच्या मुळेच लग्न आटोपलेची । निर्विघ्न सूखासमाधानेंसी । धन्य धन्य गूरूराया ।।२२।। तुमचे महत उपकार । जन्मोजन्मी न फिटणार । तुम्ही मकरंद मी भ्रमर । कधी नच सोडी तुम्हाते ।।२३।। मधाची चटक लागली । चरण मी न सोडी गुरूमाऊली । तुम्हीच मोक्षाची वाट दाविली । गुरूराया समर्था ।।२४।। वासूदेव सांगती बद्रीशेठासी । कर्मभोगना सुटला कोणासी । ज्याने त्याने भोगावा आपुलाची । भोग शिल्लक न ठेवावा ।।२५।। भोग शिल्लक ठेवता । तो परत भोगण्या करिता । पुन्हा जन्म घ्यावा लागे वृथा तो तर टाळावयाचा ।।२६।। तुझा ताप घेतला उसनवारी चार दिवस झाली पूरी । अंगास हात लावून पहातरी । चटके कसे बसतात ।।२७।। हात लावूनी पहाती बद्रीशेठ । तो वासूदेवाचे शरीरी बराच ताप । परी हिंडत होते लग्नांत झोपले अंथरूणावरी ।।२८।। वासुदेव सांगती बद्रीशेठास । संभाळ दुझा तूं ताप । हात लावतांच शिष्यास । ताप भरला फणफणून ।।२९।। डॉक्टरांना बोंलाविलें इंजेंक्शन औषध घेतले तापातून बरे झाले । तींन आठवड्यानंतर ।।३०।। वासुदेवांचा चमत्कार पाहून । आश्चर्य करीती सर्वजण । काय अधिकार असे महान सद्‌गुरू माउलिचा ।।३१।। गुरू जाती नानेंगांवासी । आपुले

शिष्यासी भेटण्यासी । केशव कुळकर्णी नानेगांवकरासी । कोंडले होते घरांत ।।३२।। घरांत जातांच गुरूंना । बाईनी नमस्कार केला त्यांना । ढळढळ अश्रु आले नयना हंबरडाच फोडीला ।।३३।। बाई म्हणे गुरूमाऊलीसी । माझा पती ग्रामसेवक असली । सहा महिने रजेवर बसलासी । डोंके फिरले तयांचे ।।३४।। हातांचा करितसे चाळा । तोंडातून शब्द वायफळा । झोप नसेना मुळी डोळा । सहा महिने झाले ।।३५।। नसे वस्त्रांची शुद्धी । वेड लागले बुद्धी । ना खाण्या पिण्याची शूध्दी । नसे विश्रांती थोडीही ।।३६।। कधी खूपच हसती । घटक्यात मोठ्याने रडती । कधी कोणास मारती । पळूनही जाती बघा ।।३७।। नच ओळखती आपुली माणसे । वसकन अंगावर जातसे । म्हणून त्यांना कोंडले असे । पलीकडच्या खोलीत ।।३८।। पोराबाळांचा संसार । पतीस वेड्याचा आजार । ते न जाता कामावर । संसार कसा भागेल ।।३९।। सहा महिने घरी बसले । हातात पैसे न राहिले । वाटेल तसे खर्च केले । बरे होण्यासाठी ।।४०।। डॉक्टरांचे शॉंकही दिले । महागडी औषधही खाल्ले परी नच गुण दिसले काय करावे उमजेना ।। खर्चही झाला अतोनात । गुण न आला किंचित । अखेर तिनें जोडिले हात । सद्गुरू वासुदेवांना ।।४२।। आपण आहांत सत । कृपा करावी दयावंत । करावी जरा खटपट । आपल्या कन्येवरी ।।४३।। वासुदेव सांगती मूलासी । तोहि मुलगाच मजसी । रडू नको तू

अशी धीर मुळीच सोडू नको ।।४४।। पैशाची असेल अडचण । तर मी देतो पाठवून । मी खटपट करीन । चिंता नसावी ।।४५।। उघड खोलीचे दार । पाहू दे मला सत्वर । मुलगी म्हणे गुरूवर । धांवुनी येतो मारण्यासी ।।४३।। बाबा म्हणती तियेसी । काळजी न वाटे मजसी । चिंता असे प्रभूसी । तोच सर्व करणार ।।४७।। अखेर खोलीचे उघडीले दार । आत शिरतांच झाला चमत्कार । त्याने केला गुरूस नमस्कार । डोक्यावर हात ठेविला ।।४८।। त्या करस्पर्शे करून । वेड गेले सर्व पळून । देहशुद्धी आली जाण । मूलांना ओळखले ।।४९।। त्यास बैसविले पाटावर । रक्षा लाविली भालावर । दूध पाजले कपभर । स्वस्थ बसून राहिला ।।५०।। बाबा मुलीसी सांगत । न चुकता कर हे व्रत । तेणे न पुन्हा वेडा लागत । कायमचा बरा होईल ।।५१।। मी देतसे श्री शक्ती यंत्र । ठेवून गीतेच्या पुस्तकांत । स्नान करून पूज नित्य जप करी रोज पाचशे ।।५२।।

सर्व मंगल मांऽगल्ये शिवे सर्वांर्थ साधिके ।<br>
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोऽस्तुते ।।१।।

एकदा म्हणण्याच मंत्र

१०१ वेळा म्हणणे – देहि सौभाग्यमारोग्यं देहि मे परमं सुखम् ।

रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।।२।।

नित्य पांचशे तप केला । सव्वा महिन्यांत पूर्ण बरा झाला । परत कामावर रूजु झाला । संसार घडी बसली ।।५३।। सव्वा वर्ष जप करून । नंतर केले उद्यापन । जेवण घातले सवाष्ण ब्राह्मण । आपल्या परीने ।।५४।। आनंदी आनंद जाहला । नमन सद्गुरू वासुदेवाला । नित्य एकमाळ जपाला चालूच ठेविली ।।५५।। नमन करूनी वासुदेवासी । धन्य सद्गुरू आम्हा लाभलासी । काय पूर्व पुण्य असेल पदरासी । म्हणून भेट जहाली ।।५६।। टेंभुर्णी जवळच राजा देऊळगांवी । बालाजी मंदीर प्रसिद्ध प्रभावी । संत यात्रेकरूंची भीड धांवी । यात्रा पाहाण्यालायक ।।५७।। यात्रेकरूची भीड दाट । वर टांगली असते लांकडी मोठी लाट । कोसळते ऐन रंगात । परी न चेंगरे कोणीच ।।५८।। ऐसे सत्व बालाजीचे अजून । यात्रा भरे महिनाभर । जाण संकष्ट चतुर्थी महिना अश्विन । सोहळा फार पहाण्याचा ।।५९।। ऐशा त्या बालाजीचे मंदिरात । कीर्तन प्रवचनांचा रोज थाट । निरनिराळ्या संतांचा । कार्यक्रम होत । धूम धडाक्याने ।।६०।। तेथे दरवर्षी ठराविक दिवशी । वासुदेवांचे प्रवचन यात्रेसी । आजपर्यंत कधी न चुकलेची । एसे कधी न जहाले ।।६१।। परी योग ऐसा होता । आधल्यादिवशी वासुदेव जाता । नगरजिल्ह्यात प्रवचनाकरीता । आकर्षिले मनतयांचे ।।६२।।

त्यागांवचे मंडळींनी । उद्याही प्रवचन कराच म्हणुनी । आग्रह धरला फारच विनवणी । केली वासुदेवरावांची ।।६३।। वासुदेव तयांना सांगती । माझा दर वर्षीचा कार्यक्रम आजची । ठरला असे देऊळगांवाती । म्हणून जाणे भागच असे ।।६४।। तेथिल कार्यक्रम आटोपून । परवा येईल तुम्हा कारण तुमचे न मोडेल मन । जनता जनार्दनच मजसी ।।६५।। परी त्या गांवचें लोकच ऐकेनात मुळीच । गाडी चुकवून मुक्काम घडवितच । इलाज खूंटला वासुदेवांचा ।।६६।। आज पर्यंत उभ्या आयुष्यात । ठरलेला कार्यक्रम कधी न चुकत । देवा कैसा आणला । प्रसंग मजप्रत । अब्रू जाण्याची वेळ आली ।।६७।। अश्रू चालती घळघळा । हे रमाधवा सांवळा । उमजेना कांही झालो बावळा । शून्य दृष्टी जहाली ।। डोके जाहले सुन्न । राजा देऊळगांवी जरूर जाण । कैसे करू राधारमण । दुर्धर प्रसंग ओढवला ।।६९।। आजपर्यंत तुझे गुणगान । गावून केले जागृत जन । लिंपीत ना पैशाचा असून । अजून कस लावशी ।।७०।। ऐशा यात्रेच्या समयासी पडलो मी तोंडघशी । आता सांगू मी कवणासी । तूंच माझे गणगोत ।।७१।। खिन्न मनाने बसले सुन्न । खाण्यापिण्याची ना शद्ध जाण । रूख रूख घेतली सारखी मनानं । काय करावे उमजेना ।।७२।। तितक्यांत येती तेथील जन । बोलावण्यासी प्रवचन । अपराध केला परी न रागावणं । जन जनार्दनच समजती ।।७३।। लगेच

उठले ताडकन । अलोट गर्दी पाहून । घडलेल्या घटनेचे विस्मरण । झाले जनता जनार्दन पाहूनी ।।७४।। प्रवचन आले रंगांत । विचार डोकावले चित्तांत । नाराज होतील जनता देऊळगांवांत । परी सर्वत्र एकचि जनता जनांर्दन ।।७५।। आपुले प्रवचन आटोपून । दुसरे दिनी राजा देऊळगांवा कारण । आज करू प्रवचन । कालचे राहिले म्हणूनी ।।७६।। जाऊनी भेटती मंदिरात । पंच त्यांचा आदर सत्कार करत । आपुले कालचे प्रवचन रंगले अदभुत । फारच आवडले लोकांना ।।७७।। वासुदेव म्हणती तयासी । मी न आलो काल प्रवचनासी । नगरच्या लोकांनी येऊन दिले मजसी । म्हणून मी आज आलो ।।७८।। पंच सांगती तयांना । तुम्ही आले होते कालना । प्रवचन खूप आवडले सर्वांना । आजपर्यंत झालेल्यांत ।।७९। वासुदेवांच्या डोळ्यांतुनी अश्रु वाहती तत्क्षणी । पांडूरंगा तू श्रम घेतले मजकारणी । किती कष्टविले तुम्हाला ।।८०।। मी तुमची सेवा करतां । उलट तुम्हीच सेवा करून जाता । किती निर्दय मी तुम्हा शीणवीता । धन्य धन्य भक्त पाळा ।।८१।। तुमचे नाम साचार । भक्तवत्सल उदार । भक्तासाठी सदा तयार । सेवाकरण्यासी ।।८२।। संत एकनाथाच्या घरी । श्रीखंड्या म्हणून वावरी । रोज कावडीने पाणी भरी । परी न कळू दिले कोणास ।।८३।। जनाबाईच्या घरी । दळण दळू लागे हरी । कबीराचेही घरी । शेले विणू लागला ।।८४।। कृपा लोभ असू द्यावा ।

उपेक्षा न करी माधवा । तुमचे चरणासी विसावा । द्यावा मज वासुदेवासी ।।८५।। आता स्वानुभव सांगतो मीच । पत्नींची तब्येत अचानक एकदमच । वरचा श्वास वरच्या वरच । श्वास घेताच येईना ।।८६।। दुखणे नव्हते आधी । अचानक आलीं उपाधी । कर्म भोग न चुकला कधी । देवादिकांनाही ।।८७।। मी डॉक्टर असून । समजले न रोगाचे कारण । बोलाविले डॉक्टरास सल्याकारण । नजिकचेच डॉ. येवलकरांना ।।८८।। तेही चकित झाले । कधीपासून आजार विचारीले । अचानक आताच झाले । ब्लडप्रेशरही नॉर्मल ।।८९।। झोप लागली इंजेक्शनान । रोग पहावा एक्सरेत । म्हणून केली तपासणी बारकाईन । परी त्यातही रोग आढळेना ।।९०।। मोठ्या डॉक्टरांकडे जळगांवासी । कार्डिओ ग्राम काढला झटदिशी । रोगच नाही तुम्हासी । म्हणून सांगितले ।।९१।। जीव घाबरणे चालूच । घटक्यात बरे तर जास्तच । अंतर्ज्ञाने समजले वासुदेवास । हैद्राबादेहुन येती तक्षणी ।।९२।। पत्नींचे पाहुन हाला । भरवसा न वाटे मला । घटक्यात नाडी बंद घटक्यात चालेल क्षणाला । घाबरले सर्वही ।।९३।। उतरलेली तोंडे पाहुनी । वासुदेव म्हणती तुजकारणी । आलो मी थेट हैद्राबादेहूनी । काळजी करू नकोच ।।९४।। मुली तू घाबरू नकोस । पाठीवरून फिरविती हातास । तोच जीव थोडा शांततेस वाटू लागला ।।९५।। दूध मागविले सत्वरे । वासुदेवांनी पाजिले स्वकरे ।

मुली चिंता तू नकरे । आताच बरे वाटेल ।।९६।। वासुदेवांनी केली ग्रहशांती । अनुष्टानास बसले दिवस भरती । दुधाविण कांही न घेतलेंती । अनुष्टान संपवले ।।९७।। बरे वाटू लागले पत्नीसी । गुरूंनी श्रीसिद्धनाथ यंत्र दिले पुजेसी । तैसेच सांगितले जपासी । नित्यनम करून ।।९८।। तुळशीची कुंडी मधे ठेवून त्यांत श्री गुरूदत्ताचा फोटो ठेवून । अकरा प्रदक्षिणा करून गुरूतिर्थ नित्य घ्यावे ।।९९।। ते यंत्र गितेच्या पुस्तकांत ठेंवून । निंत्य पूजा करत । तेणे श्रीहरी येईल धांवत । तुझे रक्षण करावया ।।१००।। तेणें आता जीवा स्वस्थता लाभली भावा । दुखतांच करीतसे धावा । सद्‌गुरू वासुदेवांचा ।।१०१।। मीही मंत्र घेतला देवीचा । काय अधिकार तयांचा । पुरता न महिना झाला साचा । दृष्टांत दिला महाकाली महालक्ष्मी महासरस्वतीनें ।।१०२।। प्रथम दर्शनी दिसली देवी गौरवर्णी । दैदीप्यमान तेजस्वी पाहुनी । गाभाऱ्यात जाउन दर्शन घेऊनी । समाधान वाटले ।।१०३।। लगेच शेजारच्या देऊळांत । लक्ष्मी देव वसे निवांत । आधीच गौर वर्ण यात । प्रकाश रत्नजडीत हीऱ्यांचा ।।१०४।। तेज पाहुन डोळे दिपले । आंत जाऊन दर्शन घेतले । तेणे समाधान वाटले । माझे मनात ।।१०५।। त्यालाच लागून देवळात । पहातो मी बाहेरून आंत । तो बसले असती नीळकंठ आंत । पार्वती देवी सहीत ।।१०६।। दोघांचे रूप नीलवर्ण सुंदर । स्मृती झाली कृष्ण मुरलीधर ।

पाहून रूप सुंदर मनोहर । मन तल्लीन जहाले ।।१०७।। दर्शन जावे आंत । तो बाहेरच दरवाजाते दोन्ही बाजूस दोंन वाघ बसत । तेणें मी घाबरलो ।।१०८।। बाहेरूनच मी नमस्कार करीत । पार्वती माता म्हणे ये आंत । वाघ काही न करीतीं तुजप्रत । निर्धास्त यावें ।।१०९।। मी आत गेलो घाबरत घाबरत । नमस्कार करूनी पहातो देव:प्रत । तो पार्वती माता हसली गांलातल्या गालात । मजकडे पाहूनी ।।११०।। मी समजलो मनांत अजून कच्चा असे परीक्षेंत । वाघाची भीती कैसी अजुन तुज वाटत । म्हणून हसली पार्वती माता ।।१११।। तिनें आशिर्वाद दिला मजप्रत । अडळनिष्ठा ठेंव सतत । आहे मी तुझ्या सन्निध्य नित्य । ते हास्य अजून तरळे दृष्टीस ।।११२।। एकदा तुळजा भवानी माता स्वप्नांत आली असे मनुष्याच्या रूपात । तेणें मी न ओळखू शकलो शेवट पर्यंत । यवनाच्या वेषेत ।।११३।। पेशंट सिरीयस होता मज बोलावले त्या करिता । मी तेथे जाऊन पोहोचता । पलंगावरी बाबा दिसले ।।११४।। दर्शन दिले मजसी । आणि विचारिती कैसी । रोग्यास दिली थोडी विभूती । बरे वाटू लागले ।।११५।। आहे का भरवसा अपुला या विभुतींवर मुला । मीं होकार दिला बाबाला । ते मजसी म्हणालें ।।११६।। चल जाऊ यात्रेला । अंबा माता दर्शनाला । तेंहीं होते मज संगतिला । आले यात्रेत ।।११७।। यात्रा भरली दुकानात । जवळच हार फूल आणि पान । अंबिकेचे घेतले दर्शन । बाहेर

आलो जावया ।।११८।। मुला मी देतो तुजसी । ह्या बांगड्या घेसी । मी म्हणालो कां देता मजसी । मी तर पुरूष असें ।।११९।। जर घड्याळ असते । तर वापरले जाते । झटकन दाविती बाबा घड्याळाते । घें घड्याळ म्हणती ।।१२०।। मी म्हणालो बाबासी । काय करू घड्याळासी । असता ते मजसी । कां घेऊं दुसरे ।।१२१।। जर सोन्याचे लॉकेट असते । तर वापरले असते । कारण मज जवळ नसे ते । म्हणून मी म्हणतसे ।।१२२।। सोन्याचे लॉकेट बाबा देती । चमचम करतसे अती । पाहुन मी भांबावलो पुरती । नको मजला लॉकेट ।।१२३।। बाबा मजला म्हणती । मी देतो प्रेमे तुजप्रती । पाहून तुझी भक्ती । संतुष्ट असे ।।१२४।। मी म्हणालो बाबासी । सदगुरू वासुदेव सांगती मजसी । लोभ न धरावा मुळी मानसी । सर्वाचा आशिर्वाद असावा ।।१२५।। बाबा आपण झटपट देती कैसे । उलगडा न मजला झालासे । ते म्हणती सावकाशे । तुळजाभवानी व अजमेरचे खाजा आम्ही आलो ।।१२६।। त्यांच्या जवळ ना भेद भाव । सर्वाचा असे एकच देव । अज्ञानाचा पडे आपणा प्रभाव । तेणे भ्रमराचे मन ।।१२७।। श्रीसंत एकनाथ महाराजास । मलंग वेष्येत येती दर्शन देण्यास ओळखू न शकले ते गुरूदत्तात्रयास । तैसेच माझे जहाले ।।१२८।। माझ्या मोठ्या आजारांत । खाजा येती स्वप्नांत । तुळजाभवानींचा फोटो देत । मजसी तेधवा ।।१२९।। त्यांचे मी धरीले चरण । खूप धरिले आवळून ।

आशिर्वाद मजसी देऊन । अदृश्य जहाले तत्क्षणी ।।१३०।। तो खरोखर दूसरेच दिवशी । पोष्टाने फोटो आला मजसी । बैसलेली सिंहाच्या रथेसी । दुर्गामाता ।।१३१।। चौथा अनुभव मजसी । धाकटा मुलगा बसला परीक्षेसी । मॅट्रीक नापास होताची । पुढे शिकेना म्हणतसे ।।१३२।। ऐसे वर्ष घालवले एक । वासुदेवराव येती अचानक । वृतांत सांगितला सकळीक । काळजी करू नका म्हणतसे ।।१३३।। मुलाच्या अंगावरून । हात फिरवुन सांगती गोडीने । तू हुषार असून । कां बसेना परीक्षेसी ।।१३४।। तू बस परीक्षेसी । नक्कीच पास तू होसी । मी आहे तुझ्या पाठीसी । काही काळजी करू नको ।।१३५।। भरंवसा नव्हता आम्हासी । परत बसेल परीक्षेसी । कृपा होताच वासुदेवांची । बसला परिक्षेसी ।।१३६।। त्याला नित्य पूजण्यास दिले यंत्र । तसाच लिहीण्यास मंत्र । तेणे फरक पडला बुद्धीत । बी.ए. पास जहाला ।।१३७।। सद्‌बुद्धी उपजली त्याला । म्हणे तुम्हास गुरू करणे मला । गुरूपदेश पहा घेतला स्वखुशीने ।।१३८।। गुरूंच्या अंगात जरी फणफणे ताप । तरी प्रवचनात नसे खंडणा देख । प्रवचन करतां पळून जातसे ताप । स्वत: प्रत्यक्ष पाहिले ।।१३९।। प्रवचन आटोपल्यावर । परत ताप भरे अंगभर । परी खंत नसे तिळभर । नश्वर देहाची ।।१४०।। ऐसे अनुभव असती अनेक । त्यातील सांगितले त्रोटक । आता दुसरे अनुभव सुरेख एका तुम्ही श्रोते हो

।।१४१।। वासुदेव ठिकठिकाणी फिरून । रोजचे प्रवचन करून । जन जागृती करती महान । भक्तीमार्गा लावती ।।१४२।। महाराज फिरत फिरत । सुप्रसिद्ध श्रीक्षेत्र शेगांवी जात । जेथे श्री संत गजानन महाराज प्रख्यात । होऊन गेले ।।१४३।। ते संस्थान मोठे सुंदर । तेथील ट्रस्टही प्रामाणिक उदार । करीतसे चोख व्यवहार । तेणे बहुत नांवाजले ।।१४४।। प्रर्भाती नित्य वाजतसे चौघडा । तो जना सुचना आळस सोडा । अंगणात घालावा सडा जेणे देव येती घरा ।।१४५।। प्रात: स्नान पूजा आरती । गजानन महाराजांची दिव्य ती । पाहून वाटे रहावेच तेथी । ऐसे मन रमतसे ।।१४६।। रोज चाले अन्नदान । पाहुन कारभार प्रामाणिक छान । भक्ती उमजे करावे वांन । तेणें अन्नछत्र चालूच ।।१४७।। वासुदेवराव जाती देऊळांत । गजानन महाराजांचे दर्शन आंत । पंचास समजले हेही संत । पंच भेटती तयांना ।।१४८।। ते वासुदेवास म्हणती । तुम्ही कीर्तन प्रवचन करीतीं । धर्म भास्कर प्रवचन पटू प्रवचन केंसरी पदव्या तुम्हाती । विनंती माझी ऐंकावी ।।१४९।। येथे करावे प्रवचन । तुम्हास देऊं मानधन । तृप्त करावें आमुचे श्रवण । ऐसी विनंती चरणी असें ।।१४९।। वासुदेव म्हणती तयांना । मी करीत प्रवचना । मी घेंत नसे मोबदला धना । उभ्या आयुष्यात ।।१५१।। देव मातांपित्यांचे गुणगान सदा । पोटासाठी न माझा धंदा । मी तो सेवक असे पांडुरंगा । पैसे घेतां लाच

होईल ।।१५२।। वासुदेवांनी प्रवचन केले । त्यांनी त्यांची मने रमली । आग्रह करून ठेवून घेतलें । सात दिवस प्रवचन ।।१५३।। तेव्हा पंचाला समजले । हे असती लेखक चांगले । बऱ्याच संत पोथ्या प्रसिद्ध केले । असती महाराजांनी ।।१५४।। गजानन महाराजांची पोंथी असे लिहीली दासगणू हाती । आम्हास हवी पाद्यपूजा नमनाष्टके ती । तुम्ही करूनी द्यावी ।।१५५।। तुम्हास देऊं त्याचे पैसे । फुकट काम सांगत नसे । तेवढें करून द्या उत्तमसें । विनंती माझी ऐकावी ।।१५६।। वासुदेव सांगती पंचाला । मी घेतच नसतो पैशाला । जरूर लिहून देतो तुम्हासी आठच दिवसांत ।।१५७।। तैसे वासुदेवांनी लिहून दिले । विनामुल्य काम केले पंचांनी त्यांचे स्वागत केले । नारळ उपरणें देऊनी ।।१५८।। संत संताचा कारभार । अज्ञानी आहोत आपण समजण्या फार । एकमेंका भेटती सदर । अणुमहिमा सिद्धीने ।।१५९।। असो पुढे काय झाले । ते पाहिजे श्रवण केले । मलकापुरासी जोशी नामे । सद्गृहस्थ रहातसे ।।१६०।। तो नेहमी जाई शेंगांवासी । दर्शन करण्या गजानन महाराजाशीं । तळमळ होती गुरू करण्यासी परी गुरू आढळेंना ।।१६१।। मलकापुरास वासुदेवांचे प्रवचन । झाले होते चार पांच दिन । जोशी येतसे ऐकण्यास जाण । तेणें मन भारावले ।।१६२।। सदगुरू करण्या म्हणूनी । गेला वासुदेव होते त्या स्थानी । परी ते गेले निघुनी । खिन्न मनी जाहला ।।१६३।। तळमळ

लागली गुरू करण्यासी । वासुदेवराव देवासी काही सुचेना त्यासी । रात्रंदिन ध्यास ।।१६४।। स्वप्नी येत शेगावचे संत गजानन कां तळमळसी गुरू कारण । उद्या खामगांवी दत्ता वैद्यास भेट जाऊन दहसी येती माझे वासुदेव ।।१६५।। मी आंगठी देतसे तुला । ती देई वासुदेव रावाला । माझी भेट असे बंधुला । तैसे सांग तयासी ।।१६६।। डोळे उघडून पाहिले । तो उशाशी खड्याची आंगठी मिळे । जी गजानन महाराजांनी होती ठेवले स्वप्नामध्ये ।।१६७।। त्याप्रमाणे जोशी गेले खामगावासी । वासुदेवरावांची करीती चौकशी । वैद्य म्हणती काही न कल्पना मजसी । बसा दहावाजेपर्यन्त ।।१६८।। दहा वाजण्याच्या बेतात । तोच वासुदेवराव पुढे दत्त । हजर झाले भक्ताप्रत । तळमळ पाहुनी ।।१६९।। अनुग्रह घेतला जोशीनी । सदगुरूस सांगितले त्यांनी । भेंट दिली गजानन महाराजांनी । आपुल्यासाठी आंगठी ।।१७०।। वासुदेवांच्या नयनी । आनंदाश्रु आले भरूनी । दादा शिणला मजकारणी । धाकट्या बंधूस भेटण्या।।१७१।। ऐसा अधिकार वासुदेवांचा । संतच जाणती ऐकमेकांचा । आपण म्हणती मानव साचा । नसे परिक्षा संताची ।।१७२।। लक्ष्मण विष्णू जोशी विप्र उर्फ साकेगांवकर । महाराज असती तपोवर । योगी मार्गातले ।।१७३।। ध्यान धारणा समाधी लाविली । अनुष्ठानेंही बहूत केली । राहणी असे ती साधी । योगमार्गी ।।१७४।।

संतसंत  अद्वैत वर्तती । जे देवासीहीं द्वैत न धरती । त्यांना सांगण्याची गरज नसेती । कैसे भेंटती  ते न कळें ।।१७५।। साकेगांवकर महाराजांनी । किर्ती ऐंकली होती कर्णी । श्री संत वासुदेवहि अवतारी म्हणुनी । पहावे एकदां कसे ते ।।१७३।। साकेगांवकर एरंडोलला । ऐंकिती श्रीसंत वासुदेव लिला । परी चूकामूक होतसे भेंटीला । असे झाले किती वेळां ।।१७७।। परंतू सांकेगांवकरांना । तळमळ लागली भेंटण्या । भेंटावे संत वासुदेवांना । लवकरच ।।१७८।। मनांत असतां तळमळ । देवही येंती जवळ । वासुदेवांना कळले सकळ । भेट द्यावी बंधुला ।।१७९।। श्री संत साकेगांवकर । गेले होते शेगावी नगर । जेथे श्रीसंत गजानन मंदीर । फार प्रसिद्ध असतसे ।।१८०।। साकेगांवकरांनी आत जाऊन । गजानन महाराजांचे घेतले दर्शन । सभामंडपी बैसले येंऊन । शांत चित्त होऊनी ।।१८१।। तेथे लावलीं समाधी । योगमार्गानें होते शोधी । ज्याच्यासाठी तळमळ ऐंवढी । भेटी येती तत्क्षणी ।।१८२।। श्रीसंत वासुदेव भेटती तयांना । एकमेकांस देली अलींगना । दसऱ्याच दिवशी आपण भेटतो नाव । तैशाच परी भेटले गुरू आणि राजाला । रिक्त हस्ते न जावे भेटीला । एसा दंडक असे घातीला । पुराणानंतरी ।।१८३।। सत्पुरूष जे असती । ते आपुला मार्ग कधी न सोडीती । आचरण करूनी दाविती । आपुणाते ।।१८४।। योग समाधीत असता साकेगावकर महाराज बसतां । श्री संत

वासुदेवांनी दिधले त्यांचे हस्ता । श्रीफळ पाच रूपये ।।१८५।। समाधी उतरल्यावर । डोळे उघडती साकेगावकर । श्रीफळ पाच रूपये हजर । जवळ पाहूनी चकित जहाले ।।१८६।। हे येथे कैसें आले । साकेगांवकरांना न उमगले । स्वप्नांत आपणास पैसे मिळाले । परी जागृतीत न दिसती ।।१८७।। वासुदेवांनी समाधीत असतां दिधले । साकेगावकरांनी जाणले । परी प्रत्यक्ष भेट पाहून वाटले । आश्चर्य खरोखर ।।१८८।। परत समाधी लाविती । गजानन महाराज भेटी येती । सांकेगांवकर त्यांना विचारिती । मज जवळी श्रीफळ पाच रूपये कोणी ठेविले ।।१८९।। गजानन महाराज सांगती । ज्यांच्या भेंटीसी तळमळे दिवस रात्री । ते भेटून प्रसाद प्रत्यक्ष देती समाधीत असतांना ।।१९०।। पाहूनी ऐसा चमत्कार । आनंदले पूर्ण सांकेंगांवकर । म्हणती वासुदेव पूर्ण अवतार । मजसी कळोन आले ।।१९१।। एकतुनी जवळ नानेगावांत वतनदार कुळकर्णी प्रख्यात । रंगनाथ स्वामींचेच शिष्य वसत । गुरूबंधु वासुदेवांचे ।।१९२।। त्यांचे चिरंजीव केशवराव । तैसेच असती वसंतराव । तिसरे वकील बळवंतराव । प्रख्यात जालन्यासी ।।१९३।। ते म्हणती वासुदेवासी । अनुग्रह द्यावा आम्हासी । वासुदेव सांगती तयासी । आषाढी ऐकादशीस देईन ।।१९४।। तीन दिवसात येतो फिरून । एरंडोल गांवी जावून । निश्चिंतरहा मनानं । लवकरच परत येईल ।।१९५।। वासुदेव आले एरंडोलासी ।

सारखा पाऊस पूर नदीसी । वाटले उत्तम संधी आली घरासी । अनुग्रह घ्यावा आपण ।।१९६।। मी सांगितले वासुदेवासी । आज असे आषाढ शुद्ध एकादशी । जैसे येती पुंडलीकाचे भेटीसी पंढरीसी पांडूरंग ।।१९७।। तैसे आम्हा लाभले गुरूवर । आजचे सुमुहूर्तावर । अनुग्रह द्यावा सत्वर । सार्थकी करावे जीवन ।।१९८।। अनुग्रह दिला आम्हा उभयतासीं । तोच त्यांना आठवण आली झटदिशी । आज तर अनुग्रह देणें नानेंगांवासी । वतनदार कुलकर्णींकडे ।।१९९।। पाऊस सारखा धो धो वर्षत दुथडी भरून अंजनी नदी वहात । वाहनें थबकली अडकून मार्गात । पलीकडे जाता येईना ।।२००।। एरंडोल असे जळगांव जिल्ह्यासी । नानेगांव जालना जिल्ह्याच्या शेवटासी । आतां काय करावे विचारासी । वासुदेव हळहळले ।।२०१।। तिकडेहि पाउस वादळ फार । विजाही कडाडती घोर गंभीर । निराश झाले नानेगांवकर । गुरूभेट आशा मावळली ।।२०२।। तिकडची जमिन काळीभारी । खडाही न लागे खोल खणले जरी । खोल रूतती पाय त्यावरी । तेणे आशा दुरावली ।।२०३।। ऐसा विचार करूनी बसत । तोच वासुदेवराव हजर दारांत । प्रेमानंद उसळला हृदयांत । साष्टांग नमन घातले ।।२०४।। पाऊस रिमझिम वर्षत । वासुदेवांजवळ छत्रीही नसत । परी न कपडे ओले न डागही दिसत । तेणे आश्चर्य वाटले ।।२०५।। अनुग्रह दिला केवशराव, वसंतरावांना । तैसेच बळवंतराव

वकिलांना । तेणे झाले समाधाना । त्यांच्या चित्तांत ।।२०६।। तेथेही आषाढशुद्ध ऐकादशीस । त्याच दिवशी अनुग्रह दिला एरंडोलास । ही वार्ता कळता आम्हास । आश्चर्य वाटले फार ।।२०७।। आम्ही विचारिले गुरूसी । आपण येथे असता मुक्कामासी । मग कैसे गेले नानेगांवासी । आश्चर्य वाटले बघून ।।२०८।। गुरू सांगती आम्हासी । आम्ही इच्छिलेल्या स्थलासी । प्रगट होण न अशक्य आम्हासी । बहु रूपे वर्ततो ।।२०९।। ऐसा पाहून चमत्कार । आठवला श्री नरसिंह सरस्वती अवतार । जो गुरूचरित्री वर्णिला साचार । तैसाच वासुदेवरावांचा ।।२१०।। श्री नरसिंह सरस्वती । आठही गांवी पूजा घेती एकाच दिवसी भक्ताप्रती । तैसाच अनुभव आज आलासे ।।२११।। स्वस्ति श्री वासुदेव चरित्रामृत । सद्गुरूच प्रेरक असती येथ निमित्त मात्र मुख यशवंत ।
नवमोध्याय गोड हा ।। २१३ ।।

# अध्याय १० वा

श्रीगणेशायनमः ।। जयजयाजी देवकीनंदना । वासुदेव सुता कंस कंदना गोकुळ वासिया मुरमर्दना । कृष्णा विष्णो जगत्पते ।।१।। तू असुनी या सर्वाभूती । मायायोगे ती सकळाशी भ्रांती । पडुनिया तुज सकलची धुंडीती । नाना रीती जगदीशा ।।२।। अविद्यात्मक त्या कर्मांनुष्ठान । तुज आकळु म्हणती मुढपणे । आणिक वेदाध्ययादी ती साधने । अट्टाहासेची करीताती ।।३।। जैसाका जन्मांध ग्रामाभितरी भिक्षेसाठी हिंडे घरोघरी । चिंतामणी तो लागतांची पाये दुरी । अंधत्वे लोटोनिया देतसे ।।४।। या परी ते सकळ जन । अज्ञान डोही गेले बुडून । वायाच उफराटे करीती यत्न । विवेक तो सांडूनी सर्वथा ।।५।। गंध असूनिया नाभीस्थानी मृग तो हिंडे रानोरानी । तैसे स्वस्वरूपाते नेणूनी प्राणी । वायाची भटकती अज्ञाने ।।६।। ऐशारीती जीवाप्रती । भोगाव्या लागती जन्ममरण पंक्ती । अज्ञानेची ते सर्वदा निश्चिती । जन्म मरण चुकेना ।।७।। नाना शास्त्राचे करीता अध्ययन । मर्म ते नेणुनिया बावरे मन । मृग जळा परी जिवा भ्रमण सैरावैरा घडेकीं ।।८।। तरी तर्क कुतर्का सोडोनी । रत व्हावे ते सत्याचरणी । तवेच ईश्वर भजनें । सादर असावे सर्वदा ।।९।। सत्याचरणी रमतां जयाचे मन मन । त्याचे ते खूंटले येथेची भ्रमण । चित्त शुद्धी तीं न लागतां क्षण । यत्नेवीण होतसे ।।१०।।

चित्तशुद्ध जहालीयावरी । मग तू नसेचि श्रीहरी दुरी । परी हेची न घडेचि निर्धारी । सत्याविणेचि सर्वथा ।।११।। कोठे काही किंचित जाण । न घडे की श्रीहरी तुज वाचून । ऐसा तू श्रेष्ठ जगज्जीवन । संताधिन जहालासी ।।१२।। गताध्यायीचे ते कथन । बदनापुरचे बद्रीशेठ तापडी माहान । त्यांचा ताप चार दिवस उसनवारी घेऊन । परत केला नंतर ।।१३।। नानेगांवचे कुळकर्णी । वेड लागले होते म्हणूनी । पत्नीकडून जप करवूनी । बरा झाला पहातो ।।१४।। राजा देऊळगांवी प्रवचन असतां । वासुदेव अडकले नगर प्रांता । अंतरीची तळमळ जाणतां । पांडुरंग स्वतः जाऊनी करीती प्रवचन ।।१५।। लेखक यशवंताचा स्वावुभव । खामगांवचे जोशींचा शुद्ध भाव । अनुग्रह देती स्वप्नाप्रमाणे । शेगांवचे श्री गजानन देती आंगठी ।।१६।। सत्य म्हणजे हरीरूप जाण । त्याविण न दिसेचि पदार्थ आन । अंतरबाह्य तो भरलासे पूर्ण । सत्य स्वरूप श्रीहरी ।।१७।। सत्य बोलण्याने होतो त्रास । परी श्रीहरी तारी त्यास । याविषयी सूंदर गोष्ट तुम्हास । सांगती धर्मराजाची ।।१८।। धर्म राजा होता सत्याचे प्रतीक । कधींखोटे बोलणें त्या न ठाऊक । विश्वासह शत्रु पक्षाचा त्यावर देख । सत्यवादी म्हणून ।।१९।। धर्मंराजाशी नव्हता शत्रू कोणी । असला तरी धर्मांस समजती आपला म्हणुनी । डाव पेच ना कधी त्याचें मनी । शुद्ध सोज्वळ मन त्याचे ।।२०।। कौरव पांडवाचे युद्ध चालता । पाच सहा

दिवसा झाले तत्वता । परो हार जीत दिसून न येता । कारण शोंधांवे लागेल ॥२१॥ पूर्वींची लढाई धर्म नियमाप्रमाणे । संध्याकाळ होताच युद्धविराम । रात्रीं न न धोका कोणासी म्हणून सामसूम । निर्धास्त झोपत असती ॥२२॥ शत्रूला जागे करून । मग होतसें लढाई नियमान । निशस्त्रीवर हल्ला न करिसी शस्त्रानं । ऐसे खरें धर्मयुद्ध ॥२३॥ रोज जो तो अपुल्या डावात । सैन्य रचून ठेवत । जयप्राप्तीसाठी खटपट । जो तो करीतसे ॥२४॥ सायंकाळी युद्ध थांबल्यावर कौरव पक्षाकडे जाती रोज युधिष्टीर । उद्याची सैन्य रचना विचारिती सत्वर । धर्मही सांगे सत्यते ॥२५॥ त्यामुळे त्याला तोड शोधून । शत्रू करिती तयारी पूर्ण । तेणे पांडवांचे मनोरथ चूर्ण । होतसे रोजच्या रोज ॥२६॥ है पाहून अर्जून म्हणे । युधीष्टिराला तिकडे जाऊ न देणे । आपला डावपेच समजतो तेणे । भोळे धर्मराज सांगती ॥२७॥ म्हणून जय मिळण्याचे लक्षण । आपणा न दिसे अजून । काय करावा इलाज म्हणून । कृष्णासी विचारिती ॥२८॥ कृष्ण म्हणे अर्जुनासी । तू उगीच का काळजी करिसी । मी युक्ती सांगतो तुजसी । तेवढेच तू करी ॥२९॥ कौरवासी भेटण्या जाऊ दे धर्मासी । थोड्यावेळाने पाठव सहदेवासी । कृष्णानें सांगितले काही विशेष नाही तुजसी । धर्मासी एकांतात सांगावे ॥३०॥ त्याप्रमाणे नाटक बरोबर केले । धर्मासी बाहेर बोलावून सांगितले । विशेष काही नाही कृष्णाने

सांगितले । सहदेव लगेच परतला ।।३१।। पाहूनी हे नाटक सारे । धर्मासी विचारिती कौरव सारे । सहदेवाने काय गुपित सांगितले कानात रे । सांग आम्हासी ।।३२।। धर्म सत्यवादी प्रामाणिक । खोटे बोलणे त्यास न ठाऊक । धर्म सांगे सर्वादेख । आज विशेष काही नाही । कृष्णाचा निरोप ।।३३।। एकोनि धर्मराजाचे उत्तर । कौरव विचारिती सत्वर । तू सत्य बोलणारा उदार । मग खरे का सांगत नाहीस ।।३४।। विशेष जर नव्हते तर का पाठवले सहदेवाते । शिवाय तुद बोलून एकांते । तू खोटे बोलत असशील ।।३५।। धर्म जीव तोडून सांगे सत्य । परी कौरवा वाटे असत्य । धर्मासी टाचून बोलत । तेणे संतापला धर्मराज ।।३६।। जीव तोडून सत्य सांगून । असत्य वाटे तुम्हा गीर्वाण । आजपासून मी येणार नाही । पुन्हा बोलावले तरी ।।३७।। या कृष्ण नाटकान । धर्म कौरवात झाली तेढ निर्माण । पुन्हा न म्हणती धर्म जातो म्हणून । तेणे विजय जाहला ।।३८।। नित्य सत्य बोलता । सात्विक गूण वाढती । अंगता । देवास होय आवडता । त्यामुळे ।।३९।। सत्य स्विकारावा उसाचा रस । असत्य ऐकावे ते चोयटीस । सत्य वसे ज्याचे वाचेस कोटीतीर्थे सत्त्यापाशी ।।४०।। सर्व व्रताचे फळ । सत्यापाशी असे अढळ । सत्य पवित्र । निर्मळ । सत्य ब्रह्म साचार ।।४१।। सत्त्या एवढे नाही तप । असत्या ऐवढे नसे पाप । सत्य नेई देवा समीप । असत्य घाली नरकांत ।।४२।। सत्या ऐवढा जप

नसे | सत्यासारखा मित्र न दिसे | सत्यापाशी देव वसे | असत्य नाशी सर्वही ||४३|| असत्य बोलणे महापाप | त्याची कल्पना तुम्हा न देंख | म्हणूनि करितो उल्लेख | तुम्हा कारणे ||४४||

श्लोक – शतसूक्ष्म समः स्थूल | शतस्थूल समागवाः ||
शतगोवा समोविप्र शत विप्र समोयती ||
शतयती समोनारी | शतनारी समोर्भकः |
शत अर्भक योनृतं | नाननृतात पातकं परम ||४५||

अर्थ – शंभर सूक्ष्म जीव मारतां | एक स्थूल देहाची घडे हत्त्या | शतस्थूल देह मारतां | गाय मारल्याचे पाप ||४६|| शत गाई मारीतां | एक विप्र हिंसा तत्वता | शत विप्र हिंसता | एक यती हत्त्या पाप ||४७|| शतयती मारतां | एक नारी हिंसा हत्त्या | शत नारी मारता | अर्भक हिंसा घडतसे ||४८|| शंभर अर्भक मारता | जेवढे पाप होतसे देखा | एकदांच खोटे बोलतां | तेवढे महापाप होतसे ||४९||

सम्यक ध्यायते परमात्मानं अस्यां सा संध्या ||५०||

रोज संध्या करावी ब्राह्मणाने | अर्ध्य द्यावे तीन जाणे | तैसेच गायत्री मंत्र जपणे | नित्यकर्म ब्राह्मणासी ||५१|| अर्ध्य द्यावयाचे कारण | सांगेन कथा विस्तारोन | राक्षस मदेह दारूण | तीस

कोटी असती देखा ।।५२।। सूर्यासवे युद्धासी नित्य येती परियेसी । भय वाटे देवासी । सूर्यां होईल अपजय ।।५३।। अपजय होता सूर्यांसी । उदय अस्तमान नव्हेचि । कर्मे न चालती सर्वची । हा: हा: कार होईल ।।५४।। याचि कारणे अर्ध्य देती । तीचि वज्त्रायुधे होती । जावोनी दैत्यासी लागती । पराभविती प्रति दिवशी ।।५५।। तीन अध्र्याचे कारण

श्लोक – प्रथमं वाहन नाशाय । द्वितीयं शस्त्र नाशन ।

असुराणां वधार्थाय तृतीयार्ध्य विदुर्बुध ।।५६।।

दैत्य असती ब्रह्मवंश । त्यासी वधिलिया घडती दोष । प्रदक्षिणा करीतां जाती दोष । चार पावले फिरतां भूप्रदक्षिणा पुण्य ।।५७।। नित्य करितां गायत्री जपास । प्रतिदिवशी करावा एकादश । पापाचा होय सर्वनाश । त्रीदिन पाप जाय ।।५८।। एकशे आठ जप करीता । अघोर पातक जाय त्वरीता । केल्याने हजार एक चित्ता । उप पातके नाशती ।।५९।। तू गायत्री मंत्र जपसी यशवंता । तेणे पाप निवृत्त होतसे पूर्णता । कोणत्या पापासी किती जपता । ते पाप स्पर्श न होतसे ।।६०।।

श्लोक – परान्ने शत गायत्र्या श्राद्धान्नेच शतत्रय ।

पंचशत पुसवने सहस्त्र प्रेत कर्मणी ।।६१।।

अर्थ - गायत्री जपावा परान्न घेता एकशे । श्रद्धान्न भोजनी तीनशे । पुसवन विधीत पांचशे । प्रेत संस्कारात हजार ।।६२।। ज्यासी येत नसेल गायत्री । त्याचे पापनाशनाची यूक्ती । गीता वाचावी वा एकावी नित्यती । किंवा पूजा करी गीतेची ।।६३।।

श्लोक - महापापादी पापानी गीताध्यायी करोतिचेत ।
न किंचित स्पृश्यते तस्य नलिनीदल अम्भसा ।।६४।।

अर्थ - जलांत राहतसे रात्रंदिन । कमल पुष्प उमलून । त्यास जल न राही कधी चिकटून । तैसे पाप न स्पर्श गीताध्ययनी वा संग्रही ।।६५।। माझी शंका गुरूदेवा ऐसी । मी वापरीत असे जानव्यासी । नऊ देवता वसती त्यासी । हे मी जाणतसें ।।६६।। ओंकार अग्नी भगु सोम । पित्री प्रजापती वसु धर्म । सर्वदेव नववे महत्तम । वसती यज्ञोपवीतात ।।६७।। परी प्रत्येक जानवे तीन पदरी । किती घ्यावी लांबी सूत तरी । याचे शास्त्रार्थ असेल जरी । तरी शंका निवरावी ।।६८।। बरा प्रश्न विचारलासी यशवंता । शहान्नऊ चौगे लांबी घेती यज्ञोपविता ।।६९।। चौगे म्हणजे चार बोटांनी मापितां । चार वेदांचा संबंध म्हणून ।।७०।। शहान्नऊ चौगेच कां घ्यावे । याचा शास्त्रार्थ सांगतो पाहे । एक लाख ऋणांचा भरणा आहे । वेदाच्या तिन्ही कांडात ।।७१।। कर्म उपासना ज्ञान हे तीन कांड । ऐंशी हजार

ऋचा असती कर्मकांड । सोळा हजार ऋचा उपासना कांड । ऐसी बेरीज शहान्नऊ हजार होतसे ।।७२।। म्हणून शहान्नव चौगे जानवे घेती । चार हजार ऋचा ज्ञानकांडात असती । परी न उपयोग त्याचा संन्यास गृहस्थाश्रमासी । म्हणून ज्ञानकांडातील वर्ज्य केले ।।७३।। जानव्याचे तीनच पदर घेती । कारण ब्राम्हण क्षत्रीय वैश्य वापरती । त्याची दुप्पट कां करिती । आश्रम सूचक म्हणून ।।७४।। त्याची परत तिप्पट जरीती । कारण प्रत्येकी तीन ऋण फेडावें लागती । देव, ऋषी, पितृ, ऋण फेडल्याविण ती । आत्मस्वरूप न समजणार ।।७५।।

– पद –

(चाल – अब तेरे सिवा कौन मेरा कृष्ण कन्हैया)

तुज जन्म दिला कोणि कशासाठी मानवा ।
विचार करूनी अती तरी आठव माधवा ।।धृ.।।
जन्मचांच तीन ऋण दिले शिरावरी ।
मातृ पितृ देव ऋषी संत मुनी करी ।
फेडल्याविना न मुक्ती तुज कधीतरी ।

देव ऋण फेडीं सदा स्मरूनि श्रीहरी ।।१।।

सत्य शांती दया धैर्य सुबुद्धी सरळमन ।
निर्भयता संयम निर्लोभ सौजन्य ।
प्रेम दातृत्व सोशिकता क्षमा स्वाभिमान ।
पवित्र्य निगर्व वसतां फिटे देव ऋण ।।२।।

ऋषिमुनी संत महाग्रंथ निर्मिती ।
मुक्तीप्राप्तीसाठी मार्गदर्शन करती ।
श्रवण मनन वाचन कर तू ग्रंथाती ।
गीता भागवत ज्ञानेश्वरीही ऋण फेडती ।।३।।

जन्मदाते जे तुझे माता आणि पिता ।
देवासमान पूज्य मानी, सेवा कर आतां ।
नसतां ते काय करूं करूं नको चिंता ।
प्रेमे श्राद्ध करिता स्मरण ऋण मुक्तता ।।४।।

देखिला न देख कुणी पहा आजवरी
अणुरेणु भरलासे या चराचरी ।।
संत मुनी वासुदेवहि सांगती याच परी ।
संतसेवा यशवंतास घडो परोपरी ।।५।।

पूजा अर्चांदि यज्ञकर्म करीता । स्त्रीसह पूजेस कां बसता । याचा भावार्थ मथिता । सांगावा सद्‌गुरू ।।७६।। वासुदेव सांगती यशवंता । यज्ञयागातील ज्या देवता । ज्या असती परमेश्वरी स्वभावता । तेणे कार्य त्वरीत होय ।।७७।। आपण व्यवहारात । पुरूष पुरूषांशी मोकळे बोलत वागत । परंतु स्त्री जेव्हा बोलत । संकोच वाटे मनासी ।।७८।। तैसेच देवदेवतेची पूजा करतां । जैसे ब्रह्ममाया न ये तोडता । त्यावीण ब्रम्हास नसे चैतन्यता । म्हणून दोहोंची पूजा करावी लागत ।।७९।। पुरूष पुजेने देव होती तुष्ट । परंतु देवतांमध्ये राही संकोच अस्पष्ट । यासाठी स्त्रीयांची पूजा वरीष्ट । देवता पूजनी आवश्यक ।।८०।। म्हणून मी सदा सांगतो नित्य । जेथे पतीपत्नीचे एकचित्त । तेथे राही लक्ष्मीसह लक्ष्मीकांत । हेच यातील वर्मं ।।८१।। कर्म करिता स्त्रीयांचे हातून । देवता होती लवकर प्रसन्न । समसमान शील म्हणून । तात्काळ फलद्रूप होय ।।८२।। स्त्रीयास म्हणती अबला । अवजड काम

करणे तियेला । फार होतील श्रमाला । म्हणून युक्ती शोधीली ।।८३।। म्हणून स्त्रीयांनी पतीजवळ बसून । त्यांचे उजव्या हातास स्पर्श करून । करवावी सत्कर्मे त्याजकडून । जणू हस्तस्पर्शे आपणची ।।८४।। परमेश्वर क्रिया कर्तुत्वरहित । तैसेंच स्त्री जातीही होत । म्हणून स्त्रीयांचे द्वारे जी सत्कर्मे होत । ती लवकर पोहोचती देवतांना ।।८५।। पुरूषांसी उद्धरावया लागून । क्रिया कतृत्वरहित स्त्रीजातीच कारण । सात्विक गुणांनी सत्कर्मे करावी पुरूषान । ऐसेच उपासनीबाबाही सांगती ।।८६।। आता एरंडोलचे शिष्य दत्तूशेठ सोनार । लोखंडी कामांत वाकबगार । उपरती झाली अनिवार । गुरू करावा म्हणूनी ।।८७।। ते धुंडितसे गुरूसी । वासुदेव आले एरंडोलासी । त्यांची प्रवचनें ऐकून त्यासी । वाटले ह्यांनाच गुरू करावा ।।८८।। आज करू उद्या करू म्हणता । सवड न ये काम करता । निश्चित झाले उद्याकरिता । म्हणून देखती गुरूसी ।।८९।। सर्व शिष्याघरी आले । परी गुरू न भेटले । दामोदरशेठ वाणी यांनी सांगितले । मालेगांवच्या मोटारीत बसवून आलो ।।९०।। दामोदरशेठाच्या घरी बसून । रडू लागला मोठ्यानं । माझा आळस नडला जाण । गुरू करण्याकारणें ।।९१।। धिक् धिक् माझे जिणे । वृथा जन्म लाजिरवाणे । कैसे होईल माझे तरणे । या भवसागरातुनी ।।९२।। माझा आळस मला भोवला । गुरू गेले निघोन मालेगांवला । गुरू करण्याच्या तयारीत होतो मी आजला ।

काय तरी मी अभागी ।।९३।। गुरू करावयाचा आज म्हणुनी । ध्यास लागला अंत:करणी । अश्रु वाहती सारखे नयनी । पूर्ण पश्चाताप जाहला ।।९४।। तोच तेथे वासुदेवराव हजर । दत्त म्हणुन सत्वर । भक्तासाठी लगेच हजर । गावाला गेले तरी ।।९५।। दत्तू शेठानी घातले लोटांगण । गुरूमाऊली मजकारण । आलात सत्वर धावून । गुरू करण्यासाठी ।।९६।। धन्य धन्य गुरूवरा आज जाणिले मी । तुमच्या अधिकारा । क्षमा करा मज पामरा । नसता त्रासविले तुम्हाला ।।९७।। ।।९८।। धन्य माझी गुरूमाऊली । वत्सासाठी धावूनी येई । पान्हा देऊन शांतवी । कसा फेडू उपकार ।।९९।। देवा किती अससी तू उदार । तव कृपे मिळाले गुरू थोर । जराही नसे ज्या अहंकार । ऐसे लाभले मज दिनासी ।।१००।। दामूशेठ होती चकीत । अजून न झाले दोन तास । गुरू असतील मालेगावच्या रस्त्यांत । मालेगावासी लागती चार तास ।।१०१।। मग हे कैसे येती अचानक । म्हणून मनी होता आशंका । गुरू सांगती चूप बैस एक । अनुग्रह देऊ लवकर ।।१०२।। ते उभयंता जाण्यानिघत । कालिका छापखान्यात । दत्तूशेठास अनुग्रह देऊन होताच । तोच गुप्त जाहले ।।१०३।। सर्वत्र केला तपास । परी न भेटले आम्हास । आश्चर्य वाटले सकळीकांस । कैसे गुप्त जहाले ।।१०४।। पुढे दत्तुशेठाची झाली भरभराट । विहिरीस पाणी लागले अतोनात । ऐसी पुरविली त्यांची मात । सद्‌गुरू

वासुदेवांनी ।।१०५।। एकनाथ ढोलूशेठ सोनार । वासुदेवांचा आवडता । शिष्य फार । गुरूजी असती मराठी शाळेवर । एरंडोल रहीवासी ।।१०६।। तीन मुलीं उपवर । एका मागून एक लवकर । काळजीत होतें फार । कैसे करावे आता ।।१०७।। हातात नाही पैसा । लग्ने करू कैसा । विवंचना करी रात्रदिवसा । चैन नसे जीवास ।।१०८।। गुरूमाऊली घरी आली । सुकलेली तोंडे पाहिली । काळजी करतोस कसली । कर्ता सदरता तोच असे ।।१०९।। वासुदेवांनी केले अनुष्टान ग्रहशांती । मंत्र दिले जपण्याती । तेणे घरबसल्या स्थळे येती तिघांचेही ।।११०।। गुरूंचा शब्द वाया न गेला । इकडून तिकडून पैसा झाला गोळा । थाटानें जाहला लग्न सोहळा । पार पडले निर्विघ्न ।।१११।। एकामागून एक पार पडले । काळजी निवृत्त झाले । तैसेच नातूही झाले । आनंदी आनंद जाहला ।।११२।। एका मुलीचीं प्रसुती होती कठीण । डॉक्टर सांगती जळगांवी भागच जाण । परी गुरूंनी करीता अनुष्ठान । सुखरूप झाली मोकळी ।।११३।। वैद्य रमाकांत विनायक । असे स्टेट बँकेत सेवक । नव्हता झाला परमनंट। चार वर्षे नोकरी करूनही ।।११४।। सद्गुरू वासुदेवास गुरू केल्यावर । मंत्र देतो त्याचा जप तू कर । सहा महिन्यात परमनंट ऑर्डर । येईल तुला निश्चये ।।११५।। लहानपणापासून आई विण रमाकांत अनाथ । अल्लडपणाही त्याचे अंगी असे खेळत । गुरूदेव प्रेमे ती संबोधिती

अडभंगनाथ । कोण्याचेही काम करण्या तत्पर ।।११६।। ऐशा प्रेमळ रमाकांता वर । पूर्ण गुरूकृपा झाल्यावर । काय न होईल त्या पुण्यावर । सहा महिन्यात परमनंट जाहला ।।११७।। गुरूमंत्र जपतो स्नानानंतर । एवढेच करितो दिन भर । जात नाही नोकरीवर । गुरूवर पूर्ण भरवसा ।।११८।। गुरू आर्शिवादे लग्नही जमलें । मोठ्या थाटाने पार पडलें । घरकुल पहा डवरले । आई नव्हती बालपणापासून ।।११९।। आनंदी आनंद जाहला । गुरू आर्शिवाद लाभला । दोन मुले झाली त्याला । घरकुल दिसे बहरलेले ।।११४।। कितीही असो घोर संकटी । गुरूंच्या नावे रक्षा लावतो ललाटी । तेणे होय निर्विघ्न मुक्ती रमाकांताचा स्वानुभव ।।१२१।। ऐसे अनुभव असती अनेक । जे मिळाले ते सांगतो त्रोटक त्याचें स्वानुभव सुरेख । ऐका तुम्ही श्रोतेहो ।।१२२।। चिंधू महादू वाणी । तलाठी होते कासोदे स्थानी । लिंपीत ना चहापाणी । काम चोख ठेवितसे ।।१२३।। कलीयुगामध्ये सर्व उलट । खऱ्याचे होते खोटे । सोन्यासी कस जसा लावत । तैसे परी होतसे ।।१२४।। सोन्याचा कस लावतांना । कसोटी वर ध्यास ती पहाता । कसोटी राही तशीच ना । परी सोन्यासी झीज असे ।।१२५।। दुर्जन छळती सात्विकाला । कारण खोटे काम करेना । असा माणूस नकोचना । पुढाऱ्याचेही न ऐकी ।।१२६।। अशास करावी अद्दल शिक्षा । त्यांचा उतरविण्यासाठी नक्षा । विरूद्ध

खोटे अर्जफाटे वरीष्टा । जेणे मिंधा राहिला ॥१२७॥ ज्याची सर्व्हिस पुरी होत आली । त्यावर रचिली खोटी चहाडी । नोकरी सोडून लावू देशोधडी । म्हणून फिर्यांद ठोंकली ॥१२८॥ सद्गुरू वासुदेवास सांगितला वृत्तांत । काही काळजी करू नको बस स्वस्थ । अखेंर होईल सत्याचे सत्य । नामस्मरण न सोडी ॥१२९॥ खटला चालू कोर्टात । तोवरी सस्पेंड असत । सत्याचा वाली भगवंत । त्यापुढे न चाले कोणाचे ॥१३०॥ अखेर काय जाहले । निर्दोष म्हणून सुटले । पुन्हा कामावर घेतले नोकरी सुरूच ॥१३१॥ वासुदेव सद्गुरूच्या कृपेने । सत्याचा जय झाला बघुन । आश्चर्य वाटले महान । दुर्जन पडले तोंडघशी ॥१३१॥ दृढ भावना वासुदेवावर । बसली त्यांची निरंतर नोकरीवरून झाले रिटायर । पोथ्या पुराणे वाचती ॥१३२॥ अजुन गोरगरीबांना सल्ला देती पैशाविन । स्वता झिजती सत्कारणा । सद्गुरू कृपे ॥१३३॥ कलीयुग म्हटल्यानंतर । महाभारतातील गोष्ट आठवली सूंदर । त्याचा उहापोह करू नंतर । शेवटल्य अध्यायी ॥१३४॥ पाटील वसंत बळीराम । रहातसे वरसाडे ग्राम । शिक्षक होते प्रथम । नाशिक जिल्ह्यात ॥१३५॥ बाळेकुंद्रीकर महाराज अवधूत । प्रसिद्ध होते फार तेथे । नेहमी लाभ घेतसे सत्सगांत । बारा वर्षे पर्यंत ॥१३६॥ पुढे योग आला धावत । बदली जहाली जळगांव जिल्ह्यात । एरंडोलला असता वसत । म्हणे भाग्य माझे उदेले

||१३७|| वासुदेवरावांचा सत्संग लाभत । त्यांची प्रवचने येत ऐकण्यात । तेणे बुद्धी झालो गुरू करण्याप्रत वासुदेवरावांना ||१३८|| घरांत नव्हती शांतता । पत्नी आजारी सदैव रहातां करावे तरी काय आता । उबगलो होतो संसारास ||१३९|| वासुदेवरावासी गुरू करूनी सर्व हकिगत घातली कानी । अनुष्ठान केले स्वता गुरू महाराजांनी नवग्रहशांतीचे ||१४०|| यासी न खर्च फार लागत । नऊ सुपाऱ्या नवग्रहांच्या असत । हळद कुंकु अक्षदा पूजा साहित्य । दक्षिणा अवघी दोनच रूपये घेत । अनुष्ठानासो बसती स्वत:च ||१४१|| असो त्यांचा आशिर्वाद मिळता । विघ्ने पळी बारा वाटा । जैसे शार्दूल गर्जता । प्राणी पळती सळोपळो ||१४२|| पत्नीचा आजार गेला पळोन । मुलींचीही झालीत लग्न । तैसेच मुलांचेही शिक्षण घडी बसली जीवनाची || १४३|| गंगाधर त्रिंबक वाणी । सुलोचना नामे त्यांची पत्नी बरीच वर्षे झालीत लग्न होऊनी । परी संतान होईना ||१४४|| मोठ मोठ्या डॉक्टरांनी । केली खटपट त्या कारणी । अखेर हात टेकले त्यांनी । संतती होणे अशक्य ||१४५|| धार्मिक विधीही केले बहुत । वाटेल तसा पैसा खर्चत । परी न पदरांत यश येत । तेणे नाराज जहालें ||१४६|| वासुदेवांची कीर्ती ऐकून । इच्छा झाली गुरू करून । वासुदेवांशी पहावे विनवून । ह्या बाबतीत ||१४७|| वासुदेवांसी गुरू करून । त्यावर श्रद्धा ठेविली पूर्ण । त्यांनी

सांगितल्याप्रमाणे | अनुष्ठान आचरण करीती ||१४८|| मनांत असतां भाव | कां पावणार नाही देव | वासुदेवांच्या तपश्चर्येचा प्रभाव | त्यांना दिसू लागला ||१४९|| बाई राहिली गरोदर | आनंदाला ना पारावार | जीवनाचे सार्थक होणार | सद्‌गुरू कृपे ||१५०|| इकडे दिवस आले भरत | आई गीताबाई अंथरूणावर खिळत | कैसे होणार या विवंचनेत | रात्रंदिन असे ||१५१|| तोंड होते टापसलेले | हातपायही सुजलेलें | पोट मोठे जड जहाले | पांडुता वाढली अंगात ||१५२|| उठता बसता येईना | अन्नही मुळी जाईना | औषधेही देती विविध नाना | परी न फरक इतुकाही ||१५३|| ऐशा त्या समयासी वासुदेवराव येती घरासी | जाणीव जाणिली परिस्थितीसी | पाणी मंत्रून दिले पिण्यास ||१५४|| चार पाच दिवसांत | फरक दिसू लागला आजारात | थोडी थोडी भूक वाढत | सूजही कमी जहाली ||१५५|| उठतां बसताही येऊ लागले अन्न जावू लागले | कामही थोडे होऊ लागले | काळजी झाली निवारण ||१५६|| सुखरूप झाली प्रसूती | कन्या रत्न झाले प्राप्ती | भरभराटलीही संपत्ती | सद्‌गुरू आशिर्वाद ||१५७|| ह्याचाच वडिल बंधू माधव त्यासही होता पुत्र अभाव | गुरू कृपेचा पहा प्रभाव | त्यासही पुत्ररत्न झाले ||१५८|| शकुंतला रत्नाकर जोशी | पचांगकर्तें पद्माकरांच्या सुनेसी | सूंदर स्वप्न पडले एके दिवशी | ते मी तुम्हा सांगतो ||१५९||

रमणीय होते वन सुंदर । त्यात छोटीसी होती कुटीर । तीत शकुंतला व पुतणी दोघीच हजर । बाकीचे बाहेर गेलेले ।।१६०।। पुतणीच्या अंगावर अलंकार । निर्जन वन वाटे भेसूर । तेणे भीती वाटली फार चोरांची ।।१६१।। तितक्यात मोटरसायकल स्वार । येतांना दिसला दूरवर । तेणे दोघी घाबरल्या फार । पलंगाखाली लपल्या ।।१६२।। तितक्यात दरवाजा लोटल्याचा कर्र आवाज आला त्याचा । चाहूल म्हाताऱ्या माणसाचा लागला असे ।।१६३।। दाढीवाला म्हातारा आला घरात । शकुंतलेला घाबरलेली पहाता । मुली तू घाबरू नको रहा निश्चिंत । तू माझी मुलगी असे ।।१६४।। शकुंतला बघ जरा समोर । तो दिसे महादेवाची पींड सुंदर । नंददीपही तेवत मनोहर । दर्शन घ्यावे बाबा म्हणती ।।१६५।। शकुंतला बाबा म्हणून प्रथम पाया पडत । तोच गुरूच झाले प्रगट । पुतणीही त्यांचे चरण धरत । ते म्हणती सुखी रहा मी असे पाठीसी ।।१६६।। महादेवाचेही घेतले दर्शन । तेथेही दिसे गुरूचे अधिष्ठांन । नमस्कार करून वर केली मान । तो लगेच गुप्त जहाले ।।१६७।। मधुकर नागेश्वर जोशी । नाझर असती कोर्टांसी । जळगांवचेंच रहिवासी पेंशनात आलेले ।।१६८।। कर्म मार्गी सनातन । सोवळ्यात सदा आचरण । पारनेरकर गुरूंचे शिष्य जाण । अध्यात्मज्ञानी अजोड ।।१६९।। ते गुरूसमान मानिती । वासुदेवासी । त्यांचाही सत्संग लाभला त्यासी । पाहून त्याचा निरभिमान

ज्ञानासी | बंधुनाही देती अनुग्रह ||१७०|| वासुदेवाच्या सत्सगांने | प्रेम बहरले अंत:करणे | उत्कट ईच्छा येता मनात भेटणे | नेंमके अवतीर्ण होती त्यावेळी ||१७१|| मधुकरांचे कडक सोवळे पाहून | वासुदेवराय देती दृष्टांत छान | भावश्रद्धा प्रिय फार नारायण | हरी विजयांतील कथा ||१७२|| एकदा श्रीकृष्ण भगवान | जो सर्वांचा भोक्ता नारायण | गेले ऋषींच्या आश्रमा जाण | जेवावया मागितले ||१७२|| सोवळे आचरण कर्ममार्गी असून | कृष्ण अवतार न जाणले हे अज्ञान | गवळ्याचा पोर म्हणून परत पाठविलें अभिमानें ||१७३|| तोच ऋषिपत्नी किर्ती ऐकून | भावश्रद्धा जडली पूर्ण | न विचारिता ऋषिकारण | जेवण दिधले भगवंता ||१७४|| तेणे झाल्या मोक्षाच्या अधिकारी | नुसती देवास न देता शिदोरी | कडक तपश्चर्या करून अघोरी | दुर्दैव न लाभ ऋषींना ||१७५|| हेच तत्व वासुदेव बाणती | कोंठेही कोणाकडे जेवती | तेंणे महत पुण्य भक्ता लाभती | अतिथीसत्कार शिकती यापासून ||१७६|| पैशाची हाव नसे मुळीच | पैसाच लागे त्यांचें पाठींस | झिडकारूनी देती हावेस | मोहास टाकले गाडून ||१७७|| औरंगाबादेहून येत असता | कपडे घड्याळ तिकीट पिशवीत ठेविता | पिशवीच चोरली गेली पहा न कळता | अजिंठालेणीस समजले ||१७८|| कंडक्टरने तिकीट विचारिता | खाली उतरले काही न बोलता | पायीच निघाले मुलीकडे अजिंठा | भर उन्हाच्या वेळी

।।१७९।। घाटातून जातांना पाहून । माल ट्रक वाल्याने मोटार थांबवून । त्यांना घेतले आंत बसवून । जळगांवास सोडले ।।१८०।। उलट दक्षिणा दिली ड्रायव्हरने । मी तुमचाच शिष्य असे म्हणें । सुखी आहे तुमच्या आर्शिवादाने । कृपालोभ असु द्यावा ।।१८१।। ते आलेत आमुच्या घरी । पंचा लावून स्नान करी । तेच धोतर नेसून आले बाहेरी । तेव्हा समजले धोतर चोरी गेलें ।।१८२।। दुसरें धोतर दिले त्यांना । गरीब शिष्याने मागितले नेसण्या । तात्काळ देवून टाकले त्यांना । हांव न धरली कसलीही ।।१८३।। पोवळ्याची माळ आम्ही दिली । जप करण्यास चांगली । एका भक्तानें ती मागितली । देवूनी टाकिती सत्वर ।।१८४।। भाजी भाकरीही प्रेमे खात । शेष प्रसाद म्हणून आम्हा देत । सुदैव म्हणून ते आम्हा लाभत । अमृताहुनी श्रेष्ट ।।१८५।। सद्गुरू पारनेरकरही गेले । तैसेच सद्गुरू वासुदेवरावही अंतरले । पोरके झालो छत्र गेले । तयांना शतश: प्रणाम ।।१८६।। शिंपी द्वारकाबाई काशिनाथ । यांचा नातू सिरियस अस्वस्थ । डोळे भिजुनी पडला अचेष्टित । पाणी पळाले तोंडाचे ।।१८७।। डॉक्टर गेले होते बाहेरी । आता काय करावे तरी । तोच कल्पना चाटली अंतरी । रक्षा लाविली गुरू नामे ।।१८८।। गुरूदेवा धावा सत्वरी । माझी श्रद्धा तुमच्यावरी । जीवदान द्या नातवास तरी । करूणा माझी ऐकाही ।।१८९।। तोंच पापण्या हलती । श्वास चालें खाली वरती ।

उमेश उमेश हाता मारिती । तोच तो आला शुद्धीवर ।।१९०।। द्वारकाबाई मनाच्या चंचल जप करतां होईना अचल । कोणत्या मंत्राने मन स्थिरावेल । सारखा गोंधळ मनामधे ।।१९१।। कित्येक दिवसापासून । चल बिचल होतसे मन । गुरूतर गेले वैकुंठाभुवन । कोंण दाखवील मार्ग ।।१९२।। टाकतां भार गुरूवर । होता पहाटे चारचा सुमार । अंगण झाडत असतां झरझर । गुरू दिसले येतांना ।।१९३।। जवळ येऊन थांबले । म्हणे तुझे कां मन गोंधळले । मी ज्या मंत्रा उपदेशीलें । तोच जपावा सदैव ।।१९४।। नमस्कार केला चरणी । हात फिरवला शिरावरूनी । चला गुरूराया घ्या चहापाणी । म्हणून विनविले गुरूला ।।१९५।। गुरू म्हणती बाई । मला जायची आहे घाई । शिष्यास भेटून लवलाही । जाणे असे गावाला ।।१९६।। थोड अंतर चालती । तोच गुप्त झाले न दिसती । गुरू तर गेले वैकुंठा प्रति । जागृतावस्थी भेटती प्रत्यक्ष ।।१९७।। दयाराम भिका कासार । यांची कन्या प्रमिला थोर । गुरूमहाराजांचा लोभ तिजवर । कलेचे करिती कौतुक ।।१९८।। गुरू घरी आल्यानंतर । थोडे लेटती पलंगावर तोच निघती सत्वर । शिष्या घरी भेटण्या ।।१९९।। मनी लागला गुरूचा ध्यास । विसरले का जाता वैकुंठास । अजुन कां न मिळे दृष्टांतास ।।२००।। ध्यास करीत झोपलो ।।२०१।। त्याच रात्री स्वप्नी दृष्टांत मिळे । किर्तनासी गेले होते सगळे । घरी

आल्यावर आश्चर्य वाटले । पलंगावरी दिसती गुरूमहाराज ।।२०२।। चाहूल लागताच ते उठले । सत्वर त्यांचे पाय धरले । आशिर्वाद देती होईल भले । लगेच गुप्त जहालें ।।२०३।। पाटील जिजाबाई कालेश्वर । यांचा मुलगा सुरेश डॉक्टर । एकदम बिघडली तब्येत फार । रक्ताच्या वांत्या जहाल्या ।।२०४।। तेणे झाला फार गलतान । बोलण्यासही न उरले त्राण । सर्वच गेले घाबरून मुळीच काही सुचेना ।।२०५।। जिजाबाईने केला धावा रक्षण करावे सदगुरू वासुदेवा । रक्षा लाविली त्यांचे नावा । बंद झाली रक्त वांती ।।२०६।। जिजाबाई धार्मिक प्रेमळ । गुरूवर श्रद्धा अढळ श्रद्धेचे मिळाले उत्तम फळ । जैसा भाव तैसा देव ।।२०७।। राजेंद्र यशवंत भुसनळे । लग्नास गेले गावी येवले । रात्रीचे वेळी पोहोचले । तब्येत अचानक बिघडली ।।२०८।। शीतपित्ताच्या गुथा अंगावर । खाजवून झाला अती बेजार । स्वत: असुनी डॉक्टर औषधाविण काय करेंल ।।२०९।। रात्र फार झालेली । दुकानेही बंद झालेली । शेवटी आठवली गुरूमाऊली । भार त्यावर टाकावा ।।२१०।। जमिनीची माती लावली भाळी । आता लाज राखावी गुरूमाऊली । तोच हळुहळु शांतता लाभली । सद्‌गुरूभाव औषधाने ।।२११।। चंद्रकांत नथ्थूशेठ वाणी । मालक श्रीराम ट्रेडींग कंपनी । मालेगाव प्रख्यात म्हणुनी । साड्यांचें ठोक व्यापारी ।।२१२।। नदीचे पाण्यासारखा व्यापार । कधी झरझर

कधी अडखळणार । परी सद्‌गुरू कृपा झाल्यावर विघ्ने पळती बारावाटा । पैका मिळविला श्रमाने । इमानदारी सचोटीने । अमृतापरी गोड बोलणे । तेणे संतोषे श्रीहरी ।।२१४।। एकदां चंद्रकांत शेठास । किर्तनकार येती भेटण्यास । धार्मिक उदार सालस । थोरांचा आश्रम कोणा न लगे ।।२१५।। बुवा म्हणती चंद्रकांत शेंठासी मला जाणे आहे नाशकासी । मोटारीतून पोहचवून द्या मजसी । स्टँडवर ।।२१६।। बुवा बसती मोटारीत । ड्रायव्हिंग करिती शेठ चंद्रकांत । स्टार्टर दाबती जोरात परी चालूच होईना ।।२१७।। मशीन उघडून पहाती । दोष न दिसे अंती । घाम गळे अंगाती । श्रमुनी थकवा आलासे ।।२१८।। तोच समोरून येतांना । वासुदेवराव दिसले त्यांना । नमिले सद्‌गुरू चरणा । आशिर्वाद देती त्यासी ।।२१९।। वासुदेवराव विचारिती त्याला । इतका घामाघूम कशाने झाला । कोठे जाणे आहे तुला । सांगावे मजसी ।।२२०।। चंद्रकांत सांगती गुरूसी । स्टँडवर पोंहचविणे बुवासी । खटपट केली बहुतची । परी मोटार चालेंना ।।२२१।। वासुदेव म्हणती चंद्रकांतासी । शंका न घे मनासी । मी हात लावतो मोटारीसी । चालू कर सत्वर ।।२२२।। गुरूस्पर्शताच मोटारीस । सुरू झाली लगेच । जाणले सद्‌गुरू पात्रतेस । धन्य धन्य गुरूराया ।।२२३।। गुरू मजला सांगतो । प्रवचन कर या पुढती । जनसेवा अंगीकार ती । तेणे मी संतोषे ।।२२४।। गुरू आज्ञानुसांर । सेवाव्रत

घेतले शिरावर । स्वाध्याय कार्याचा अनुचर । झालो गुरूकृपे ।।२२५।। गुरू आशिर्वादाने । व्यवहार होती सुरळीतपण । जीवन नौका संथपणे । चालविता धनी गुरूच ।।२२६।। वासुदेवराव जाती भेटण्या गोंडगावासी वाणी मोतीराम व पंढरीनाथ शेठासी । तो लोकांची भीड दिसली दृष्टीसी । वाळवंटी नदी पात्री ।।२२७।। महाराज तेथे जावूनी पहाती । दोन दिवसापासून ट्रॅक्टर रूतलेते । चालू होईना निघना वरती । बहु प्रयत्न करूनी ।।२२८।। पाहुनी परिस्थिती केविलवाणी । महाराज द्रवले मनी । धांवुनि येतू चक्रपाणी । सोडवी संकटातुनी यांना ।।२२९।। गर्दी हटवून बाजूला । महाराज भेटती ड्रायव्हरला । हात लावतांच लागेल चालायला । ड्रायव्हींगसाठी बस वरती ।।२३०।। वासुदेवांची मूर्ती पाहून । हसू लागले सकळ जन । जे ओढवेनाही मालट्रकने । कैसे चालेल यांच्याने ।।२३१।। वासुदेवांनी ट्रॅक्टरवर । थाप मारताच सत्वर । सुरू झाले घरघर । लगेच चालू लागले ।।२३२।। ऐसा पाहुनी चमत्कार । आश्चर्य वाटलें लोका फार । वासुदेवांचा करिती जयजयकार । श्रद्धा वाढे संतांवर ।।२३३।। सद्गुरूचे पाय धरा सत्वर । त्याविण न होणे उद्धार । षडरिपुसी ते घालती आवर । शांती दाते गुरूच ।।२३४।। म्हणून विनवा गुरूसी । शांती द्यावी हृदयासी । जन्म बंधनांतुन मुक्त होसी । ऐसे सामर्थ्य गुरूचे ।।२३५।।

– गाणे –

यावे गुरूदेवा वासुदेवा, आतां ।
मम ह्रदयासी द्या शांतता ।। धृ. ।।
पंचभुतांचा देह हा नटला ।
तुझ्या कृपे तो संशय फिटला ।
जीव अती विटला ।।१।।
धगधगती काम क्रोध हे सदा ।
तव नामासी मुकतो कितीदा ।
टाळील कोण आपदा ।।२।।
लोभ, मोह, मद, मत्सर तेही ।
आत्म्याला गुरफटले पाही ।
धडपड सुटण्या दाही ।।३।।
पंचभुतांचा सुरेख पिंजरा ।

कोंडुनि ठेविलें, राघू आत्म्याला ।
षड्रिपु टोची कावळा ।।४।।
आत्मा मालक असुनी नोकर ।
षड्रिपु त्या धरिती धारेवर ।
घाली आतां देवा आवर ।।५।।
तव नामाच्या सामर्थ्याने ।
मुक्त होतील जीव बंधनें ।
यशवंता हेचि मागणे ।।६।।

स्वस्ति श्री वासुदेव चरित्रामृत । सद्गुरूच प्रेरक असती येथे । निमित्त मात्र मुख यशवंत ।। दशमोऽध्याय गोड हा ।।२३६।।

## अध्याय ११ वा

श्रीगणेशायनमः ।। जयजयाजी अंजनीतट विहारा । कमलावर करूणाकरा । नारायणा सर्वेश्वरा । सत्व माझे घेऊ नको ।।१।। मी सत्व घेण्या नसे पात्र । मी हीन दीन पामर पतीत । विषयासक्त माझे चित्त । अनाधिकारी अज्ञान ।।२।। जपतपादी कांही क्रिया । म्या न केल्या देवराया । नामी विश्वास ठेवूनिया तुझ्या मात्र राहीलो ।।३।। समर्थाचे आश्रया जातां । याचक न पावती विन्मुखता । तुझ्यावरी अवघी अनंता । भिस्त असे यशवंताची ।।४।। माझ्या सारख पतीत जन । तुझ्या संग्रही म्हणून । तुज लाधले मोठेपण पतीत पावन म्हणुनी ।।५।। याचा विचार काहीतरी । करूनीया हे श्रीहरी । संकटे अवघे निवारी । पोर आपुले म्हणूनी ।।६।। एरंडोल उर्फ एकचक्रनगरी जी म्हणवित पांडव नगरी । भीमासी आशिर्वाद देऊन श्रीहरी । बकासुराते मारविले ।।७।। येथे हनुमान जननी अंजनी तीरी । पुराण प्रसिद्ध सिद्धेश्वर मंदीरी । शांडील्य ऋषी तपश्चर्या करी । आपुल्या प्राप्तीसाठी ।।८।। पद्मालय उर्फ प्रवाळ तीर्थ । ऋद्धी सिद्धी गणपती वसत धरणीधर सहस्त्रार्जून तपश्चर्या करीत । ऐसी पवित्र भूमी ।।९।। ज्याभूमी देवऋषी संतांची लागली पदधुळी । तेथे जन्मलो वाढलो स्फूर्ती मिळाली आगळी । पूर्ण कृपा सर्वाची लाभो मज वनमाळी । सद्गुरू महती लिहावया

||१०|| मागिले अध्यायी सांगितले होते | महंत अमरदास आले होते वासुदेवाजवळ झाले मागते | वृद्धावस्था तपासी ||११|| त्याप्रमाणे वासुदेवरावांनी | अदलाबदल केली एकमेकांनी | जरा देऊन घेतले तारूण्य | त्याच्या तपासाठी ||१२|| बोलता बोलता गेले दिवस एक तप गेले निघून तेव्हाच | वासुदेव हिंडले चोहीकडेस | भक्ती मार्गांस लावण्या ||१३|| सार्थक जाहले जीवन | उभयताची तपस्या पूर्ण | एकमेकांच्या आधाराने | जशी ब्रह्म आणि माया ||१४|| तप झाल्यावर पूर्ण | एकमेकांची देवाणघेवाण | पूर्ववत करण्याकारण | ठरवलें महंतांनी ||१५|| तपश्चर्येने महतासी | सिद्धी मिळाल्या दासी | अणुसिद्धीनें आला झटदिशी | जरी होता हिमालयी ||१६|| तो न दिसे कोणास | वासुदेवांनी पाहिले त्यास | दोघे होते पोहोचले समान पदास | याकारणे जाणले ||१७|| वासुदेव पुसती महंतासी तू कोणे कारणे आलासी | सांगावे तू मजसी झटकन ||१८|| महंतांनी केला नमस्कार | गुरूमहाराज अनंत उपकार | त्वरीत तो माझ्याने कधीं न फिटणार | वाहणा जरी मम चर्माच्या केल्या ||१९|| धन्य धन्य गुरूदेवा | सद्गुरूसत वासुदेवा | तुझा महिमा किती वर्णावा | अशक्य ते ब्रह्मासी ||२०|| आज आलो मी आपणापासी | परत पूर्ववत बदल करण्यासी | तप झाले असे पूर्णची | तारूण्यवृद्धत्व बदलण्या ||२१|| वासुदेव सांगती त्यासी माझी हरकत नाही त्यासी |

घेतले दान परत करण्यासी । असे मी बांधलेला ।।२२।। वासुदेव रक्षा लावती त्यास । वृद्धत्व जाऊनी झाला तरूणच । प्रफुल्लित दिसे चद्रापरीस । वृद्धावस्था गेली निघोनी ।।२३।। अमरदास महंत घेसी रक्षेसी । लावती कपाळी वासुदेवासी । तोच बिजली सणसणली मेंदूसी । तारूण्य निघुनी जाताची ।।२४।। बारा वर्षाचें वृद्धापकाळ । प्रवेश करताच तात्काळ । एकदम आली असे भोवळ । शक्ती खेंचली गेलीच ।।२५।। महंत वासुदेवास नमस्कार करत । काही काम पडल्यामजप्रत । बोलावताच मी येईन त्वरीत । तुम्हासाठी धावुनी ।।२६।। अमरदास गेले निघोनी । वासुदेवराव खिळले अंथरूणी । उठण्या बसण्याचीही शक्ती नसेंना । गलतान झाले फारच ।।२७।। गालफडे पहा बसली । डोळे खोल गेलेली । बोलण्यास त्राण न उरली । डोळे झाकुन पडती ।।२८।। त्वचा शिथिल लोंबू लागली । अन्नपाणी जाईना मुळी । चमच्याने दूध पाजण्याची पाळी आली वासुदेवावर ।।२९।। इतका अशक्तपणा पाहुनी । संतांचे हाल न व्हावे अधिक म्हणूनी । स्वत: यमराज आले तत्क्षणी त्यांना घेण्यास ।।३०।। तें म्हणती वासुदेवास । मी स्वत: आलो तुम्हा नेण्यास । मनूष्य पाहूनी पाठवितो नोकरास तुमची योग्यता पाहुनी ।।३१।। वासुदेव म्हणती यमराजास । तुलाच म्हणतांना धर्मराजा खास । नीतीन्याय सुत्रे आहे ना स्वर्गास । मग कसा घेण्यास येसी ।।३२।।

श्लोक – सरलें आयुष्य असेल सत्य परी जो का काळ जाय देवभजनात ।
तो न होय उणा सद्‌गणतीत वर्म निश्चित जाणिजे ।।३३।।

सोळा वरूषे आयुष्य मार्कंडेयातें । आपणच गेला ना तया घेण्याते । त्यावेळी महादेवांनी काय सांगितले आपुणाते । हरी भजनाचा काळ अधिक धरावा ।।३४।। विचारूनी यावे मालकाते । माझे म्हणणे बरोबर की चुकते । माझे आयुष्य अजुन वाढले बारा वरूषे । धर्मन्याय शास्त्रे ।।३५।। परी धर्मराजा तुजसी । एक मागणे आहे मजसी । इच्छामरण दे मजसी । लवकरच मी येईन ।।३६।। काहीना राहीलें भेटणें । त्यांना उपदेशाच्या चार गोष्टी सांगणे । अधिकाचे वाण घेऊन करतो येणे । येतोच मीहून लवलाही ।।३७।। यमराज म्हणे वासुदेवासी । संतुष्ट झालो सोडिले मोंहासी । तुझ्यासारखा न ये कोणी स्वखुशी । इच्छा मरण दिले तुज ।।३८।। यमराज म्हणे वासुदेवासी । इच्छामरण दिले तुजसी । पूर्वी दिले होते भिष्माचार्यासी । त्याप्रमाणे तुज दिले असे ।।३९।। ऐसे बोलून यम राज । स्वर्गात गेले कामराज । लवकर जाणे आहे मज । म्हणुन काम झटपट आवरणे ।।४०।। आम्हास पाठविला संदेश । करावयाचा आहे तुम्हा उपदेश । मला सोडूनी हा पाश । जायचें आहे लवकरी ।।४१।। आम्ही भेटलो जाऊन त्यांना । झोपले होते पलंगावर बिछाना । उठण्याचाही

त्राण राहिना । फारच अशक्त जहाले ।।४२।। वासरास पहाताच माता । आनंदे धांवे भटी करीता । घी पान्हा देऊ वत्सा । हंबरतच ये धावुनी ।।४३।। तैसे आम्हास पहाता । टवटवी आली चेहऱ्यावरती बोलू लागले आर्द्रता । भेट आपुली अखेरची ।।४४।। मला नसे आजारपण । महंत अमरदासाकारण । जे पूर्वी बदलले तारूण्य म्हातारपण । ते वापीस केले आम्ही ।।४५।। म्हणून असे अशक्तपणा । यमराजही आले होते घेण्या । अजून बारा वर्षे मज मरण ना दृष्टांत दिला तयासी ।।४६।।

परत जाणे लवकर । सर्वांसी भेटून सत्वर । देवाची अवज्ञा न करणे बर । त्यांचेही काम असेल ।।४७।। जो नरसींह अवतारी प्रल्हाद । राम अवतारी अंगद । कृष्ण उद्धव प्रसिद्ध । पुढे नामदेव जाहला ।।४८।। संताही घ्यावे लागे अवतार वता । देव सांगतील तैसे साचार । करावया जगदोद्धारा आम्हा सारख्यास पाठविती ।।४९।। आता आले देवाचे बोलावणे । ते सांगतील तसे साचार करावया जगोदोद्धार । आम्हा सारख्यास पाठविती ।।४९।। आता आले देवाचे बोलावणे । ते सांगतील तैसे वागणे । मातृ पितृ अज्ञा न मोंडणे ज्ञानी माणसाचे हे काम ।।५०।। मी विचारिले गृहप्रत । पुरूषोत्तम वा अधिक मासात । धोंड्याचे वान असे देत । याचा भावार्थ न समजे मजसी ।।५१।। गुरू म्हणती यशवंत बरा प्रश्न विचारीला तत्वता । पुरणाचे धोंडे करून देतों । वान

सद्‌गुरूसी किंवा ब्राह्मणासी ।।५२।। सद्‌गुरू सांगती स्त्रीयासी । महत्व असे या पुरूषोत्तम मासी तरी तुम्ही खावे धोंड्यासी । या महिन्यात ।।५३।। धोंडे कशास म्हणत । हे तर तुम्ही जाणत । दगड खाता यावेंत । परमेश्वर प्राप्ती लागो ।।५४।। परमेश्वर मूर्ती असे पाषाणाची । म्हणून तद्वत वृत्ती करावी मनाची । मग बऱ्या वाईटाची समज न राही ।।५५।। मन:स्थिती दगडासम होवोन । बऱ्या वाईटाचा न स्पर्श जाण । तेणे वासना विकार होई शून्य । तोच देव समजावा ।।५६।। म्हण असे चणे खावे लोखंडाचे । तेव्हा अंगी देवपण येतसे । लोखंड दगड भद नसे । मुळीच काही ।।५७।। खाण्यासी दोन्ही कठीण । पचविता न ये जाण । त्याचा सखोल अर्थ घेऊन । तैसे वागावे आपण ।।५८।। तात्पर्य मनोवृत्ती सदोदीत ठेवावी पाषाणवत । होउ न द्यावा परिणाम तेथ । सुखदु:खाचा ।।५९।। मधुर खाता गोडी वाटे । कडू खाता दु:ख वाटे । मधु कडु खाता । समान वाटें । तेच लोखंडाचे चणे किंवा धोंडे ।।६०।। हा अर्थ खरा धोंड्याचा । करता म्हणून करती साचा । परी अर्थ त जाणती त्याचा । यशवंता ।।६१।। मी विचारले गुरूसी शिमगाही याच रीती करसी । हाच अर्थ लागतसे त्यासी । असे मला वाटते ।।६२।। गुरू सांगती यशवंता । बरोंबर बोललासी । तत्वता अर्थ पहावा सखोलता । म्हणजे कळो येईल ।।६३।। सर्वच सण उत्तम जाण । वस्त्र घर तसेच पक्वान्न । हे

असे प्रतिष्ठेचे कारण अहंपणा वाढवी ||६४|| उलट अवस्था भोगल्यावीणा | त्याची न कल्पना येईल कोणा | जशी उन्हावीण सावली जाणा | मग महत्व कळते ||६५|| ऐसे घाणेरडे प्रकार करत | सणानिमित्त जे घडत | तेणे दोषक्षालन होत | प्रतिष्ठेचा ||६६|| उत्तम कनिष्ठ मानापमान आल्यावाचून | अद्वैताचा अधिकारी न होय जाण | तेणे अद्वैत बाणावे लागे अंगी जाण यशवंता ||६७|| खरकटी भांडी घासावया लागून | राख माती घेती जाण | दुष्ट संस्कारे घाण झाले जे मन | ते शुद्ध होण्यासाठी धूलीवंदन ||६८|| तुकारामाची सदा वैखरी | निंदकाचे घर असावे शेजारी | आपण वाईट समजतो खरी | परी त्याने आपलें पाप जाय धूवोनी ||६९|| आपणास वाटे हा अपमान | परी तो सोसून दोषमार्जन | होतसे आपला जाण यशवंता ||७०|| श्रीसंत साईनाथ गजानन | शिष्या देती तैसेच बेदम मारती जाण त्यांचे दोष क्षालनासी ||७१|| तेणे परीक्षा शिष्याची अहंकार न गेला त्याची श्रद्धा किती असे भक्ताची | कसोटीच समजावी ||७२|| एकदा उतरला या कसोटीत | विलीन होतसे तो गुरूंत | तेथे अद्वैत नसे रहात ब्रह्मस्थानी पोहोचला ||७३|| रंगपंचमीस रंग टाकिती | द्वैतभाव विसरण्याती हाच उद्देश असे त्याती | अरे यशवंता ||७४|| माझी शंका असे गुरूदेवा | प्राण जाता जातसे जीवा | देह पंचभूती मिळते तेव्हा | जीव जातो का शिवात्मा ||७५||

जीव शिवात्मा जाता । राहील कैसी पुनर्जंन्मता । शंकेची करावी निरसनता । सदगुरू वासुदेवा ।।७६।। सद्गुरू म्हणती यशवंता उत्तम शंका झाला विचारीता । त्याचे निरसन करतो आता । नीट समजाऊन घे ।।।७७।। कित्येक म्हणती लोक । अज्ञान म्हणून देख । करिती कल्पना अनेक मृत्यूनंतर काय घडे ।।७८।। सोंन्यत सोने जय मिळोन । तैसा जीव जय शुद्ध आत्म्या मिळोन । परी ते असती विषयसक्त म्हणोण । काहीतरी बडबडती ।।७९।। सोन्याचे असती दोन प्रकार । शुद्ध आणि हिणकस दुसरं । हिणकस असे ते मिश्र । शुद्धांत न मिसळती शुद्ध ते केल्याविण ।।८०।। तैसा जीवात्मा असे विषय वासनेनें मिश्र । हिणकस सोन्यासम दूषित कर्में भरीत । तेणे अशुद्ध असा हा फार । कैसा शुद्ध आत्म्यांत मिळे ।।८१।। पाण्यांत तेल टांकतां । एकमेक येती सन्निंधता । मिश्र न होता दिसे तरंगता । त्या पाण्यामध्यें । त्या पाण्यामध्यें ।।८२।। याचे कारण पाणी शुद्ध असे । परी तेलास रूपांतर न झालेंसे । जोवरी त्याचे तैलपण कायम असे । तोवरी न मिळे शुद्ध जली ।।८३।। तैसा ईश्वराचा शुद्ध जीवात्मा आणि मानवाचा अशुद्ध जीवात्मा । दोघे जरी असे आत्मा परी जीवदशा असे मानवात्मा ।।८४।। जीवदशा म्हणजेच हिणकसपणा । तीच असे उपाधी जाणा । ती शुद्ध केल्याविना । कैसा मिळेल शिवात्म्यासी ।।८५।। हिणकस सोने शुद्ध करून । पहातो

कसोटीवर घासून । शुद्ध दिसल्यावर पूर्ण । मगच मिसळी शुद्ध सोन्यांत ।।८६।। तैसी सुटता उपाधी दिशा । कसोटीस उतरला परमेशाच्या । मग भेद न राहीला त्याचा । शिवात्म्यात मेळवी ।।८७।। जीवास येण्या शुद्धता सत्संग घ्यावा संता । जन्म घ्यावे लागे होईतो शुद्धता । एकाच जन्मा नोहे ।।८८।। जितकी अशुद्धता असेल आपणात । शुद्धतेसाठी जितका वेळ लागत । तोपर्यंत जन्म न सुटत । कोणाचेही यशवंता ।।८९।। श्रीसंत ज्ञानेश्वरांनी । उपासनी साईबाबांनी । ही सर्व शंका निरसली । तैसेच मीही सांगतो ।।९०।। यासाठी एक यशवंता । जितके ग्रंथ येतील वाचता । तेणे ज्ञान ज्योत जीवाची उजळेल तत्वता । शुद्धता होई लवकर ।।९१।। म्हणून मी सदा म्हणतसे –

कृष्ण गोविंद गोंपाल गाते चलो ।
मनको विषयोके विषसे हटाते चलो ।।धृ।।
वक्त आवेंगा ऐसा कभी ना कभी ।
हमभि पायेंगे प्रभुकी कभी ना कभी ।
ऐसा विश्वास दिलमे जमाते चलो ।।१।।

विश्वास ठेवा माझ्या वचनावर । सत्संग आचरून होईल जीवशुद्ध सत्वर । तो पर्यंत जन्म घ्यावे

लागणार । पुढे पोहोचाल निश्चित ।।९२।। जेजुरी तिरूपती महालक्ष्मी जागृत दैवत । त्यांचे दागिनें चोरीस का जात देव काय तेव्हा होते करीत । देवपणा गेला कुठें? ।।९३।। नास्तिक विचारिती ऐसे प्रश्न । त्याने मति कुठीत होते जाण । तरी आपण करावी शंका निवारण । सद्गुरू वासुदेवा ।।९४।। वासुदेव म्हणती यशवंता सुंदर प्रश्न झाला विचारितां । त्याचे निरसन करतो आता । ऐक लक्ष देऊन ।।९५।। असाच प्रश्न मथुरबाबूंनी । रामकृष्ण परमहंसास ज्ञानी । कालीकेच्या दागिने चोरी प्रकरणी । केला होता तेधवा ।।९६।। आपुल्या अंगावरचे दागिने राखायची कुवत नसणे याला काय देव म्हणणे । मजला न काही समजत ।।९७।। रामकृष्ण सांगती त्यासी । किती अज्ञान तू अजून अससी । जरा विचार करून पहासी । म्हणजे समजेल आपोआप ।।९८।। जेथे लक्ष्मी बसे चरण चुरत । त्याचें ऐश्वर्य असे अमार्यांदित । हे दागिने वाटती मौल्यवान तुजप्रत । देवासी वाटे मातीमोल ।। देवाचे दागिनें चोरीला गेले । म्हणून मी देवा दोष लाविलें । यांत माझे काय चुकले । मथुर बाबू वदती ।।१००।। रामकृष्ण म्हणतीं मथुर बाबूसी । दोष न लावावा देवासी तुझ्या दागिन्यांनी किती भर पडलीसी । अमर्याद ऐश्वर्यात ।।१०१।। जड जवाहीर सोन रत्न । कितीक भरल्या जमीनीत खाण । समुद्रास म्हणती रत्नाकर म्हणून । तेंथेंही गडगंज संपत्ती ।।१०२।। देवाच्याच संपत्तीतून घेऊन । तू

म्हणविसी मालक म्हणून । ही चोरी नव्हे तर काय आणखीन । किती शहाजुक चोर म्हणावा ।।१०३।। याचा करावा विचार । तुझ्या दृष्टीने असे फार । पाण्याचा थेंब पडता सागर समुद्रास भरती येईल कां ।।१०४।। ऐशा अमर्याद ऐश्वर्याद ऐश्वर्यात । जेथे लोळे भगवंत । त्याची सेवा जे करत । तेणेच सार्थक जीवनाचे ।।१०५।। भाव धरी संतापायी । तेणे देव पडे पायी । समर्थ रामदास दे ग्वाही । याचा भावार्थ सांगावा ।।१०६।। गुरू म्हणती यशवंता । मी कोणत्याही रूपांत दर्शन देता । येतो परीक्षा पहाण्याकरीता । तैसेच उपदेशाशी ।।१०७।। एक गोष्ट सांगतो तुला । एक ब्राह्मण नित्य रमे पुजेला । त्याची भक्ती पाहून संतुष्टला । देव हजर जाहला प्रत्यक्ष ।।१०८।। हे ब्राम्हणा मी तुला वर देतसें भला । काय मागायचे तुला । सत्वर मागावें ।।१०९।। ब्राह्मण गेला भांबावून । काही सुचेना मागण । विचार करकरून । बरकत मागितली अखेर ।।११०।। तथास्तु म्हणून देव गेले । आजूबाजूला काही न दिसले । देवापुढे थोडे तांदुळ दिसले । ते लागला उचलू ।।१११।। तांदूळ घेतो भरून । तो पुन्हा जमीनीवर ढीग पूर्ण । ऐसा भरता भरता थकून । पोतें भरली कितीक ।।११२।। अखेर शेवटी थकला भरभरून । भूक गेली खरबडून । बायकोस म्हणे भात करून आण या तांदळाचा ।।११३।। सत्वर केला भात । ब्राह्मण जेवण्यास बसत । घास गिळता पोटात । तोंडात

घास तयारच ।।११४।। तोंड बंद करता येईना पोटांत रिकामी जागा ना । पाणी पिण्यासही वाव ना । ब्राह्मण गेले वैकूंठा ।।११५।। पुढच्या विधी करीता । ब्राह्मण मिळेना नेण्याकरीता । गेला एकाएकी जेवतां । जो तो येण्या घाबरती ।।११६।। केस करील सरकार । कैसा एकाएकी मेला सत्वर । जाब द्यावा लागणार । म्हणून कोणी न जाती ।।११७।। बाईची पाहून परिस्थिती भयाण । आलीत आठ दहा संभावित जण । प्रेतास बांधिती तिरडीवर नेऊन । तो परत दुसरे प्रेत घरांत हजर ।।११८।। माणसे घाबरली फार । प्रेतासी नेती सत्वर । चिता चेतवून त्यावर टाकिती ते प्रेतास ।।११९।। प्रेत टाकीती चितेंवर । तोच खांद्यावर प्रेत तिरडीवर हजर । त्यासही टाकिती सरणावर । परी पुन्हा हजर खांद्यावरी ।।१२०।। पाहून ऐसा चमत्कार जीव घेऊन पळती सत्वर । तरी प्रेत हजर खांद्यावर । ऐसा चमत्कार बरकतचा ।।१२१।। यासाठी योग्य विचार करून । मागून घ्यावा वर आपण । नाहीतर फजीता होईल जात । बरकत वरा सारखी ।।१२२।। तरी खोल विचार करून । ऐसा वर मागाव जाण । जेणे आपुले स्वहीत साधुन । अपाय होणार नाही ।।१२३।। एके गांवी रामभट रहात । दरिद्रता होती तेथे नांदत । आईवडिल आंधळे असत । मूलबाळही नव्हतेच ।।१२४।। नित्य देवाची पूजा करी । त्यावीण ना अन्न पाणी घेई । कितीतरी वेळ त्यात जाई । परी न सोडी व्रत आपुले ।।१२५।। ऐसी पाहुन

पूर्ण भक्ती । देवीस उपजली दया अंती । भक्तास वर द्यावा म्हणून ती । प्रकट झाली समोर ।।१२६।। हे ब्राह्मणा मी तुजवर प्रसन्न झाली भक्ती पाहून थोर । मागून घेई एक वर । तुला काय पाहिजे ते ।।१२७।। ब्राम्हण करी विचार । कोणता मागावा वर । आईबापास डोळे मागू तर मजला निपुत्रिकच म्हणतील ।।१२८।। पुत्र मागू जर त्यास । दरिद्रतेने घडे उपवास । पोषण कैसें करूं मुलास । काय तरीं मागावें ।।१२९।। मागून घ्यावी श्रीमंती तर घरांत आईबाप आंधळे असती । पुत्र नसुनी संपत्ती । काय तिचा उपयोग ।।१३०।। आपणास हवे तीन वर । परी देवीं देई एकच वर । तेणे पडला महाविचार कोणता वर मागावा ।।१३१।। तोच कल्पना सुचली त्यास । देवी मज द्यावा वर असाच । सोन्याच्या वाटीत माझ्या मुलास । दूध पितांना पहावे आईबापांनी ।।१३२।। तथास्तु म्हणून देवी पावली अंतर्धान । आईबापास मिळाले नयन । ऐश्वर्य लाभले सुवर्ण रत्न । शिवाय पुत्रही एकाच वरे ।।१३३।। देव येती देण्यास दर्शन । आपुले नेहमीचे रूप बदलून । भक्ताची परीक्षा पहाण्याकारण । परी पूर्ण तोच ओळख ।।१३४।। एकनाथ महाराज संत । ज्यांचे गुरू जनार्दन स्वामी असत । गुरू सेवा केली अतोनात । त्याचे फळ मिळाले ।।१३५।। जनार्दन स्वामी नोकरीस असती । सेनापती असतो किल्यावरती । स्वामी समाधी लावून बसती । तो परचक्र आले अचानक ।।१३६।। सेवक

आला सांगण्यासी । शत्रूचा जोर फार वाढलासी । हिंमत खचली सैन्याची । पराभवाची दिसती लक्षणे ।।१३७।। तरी स्वामीस पाठवून द्यावे त्वरीत । तो पर्यंत मी सावरून धरत । करीतो आटोकाट प्रयत्न । लवकरच पाठवावे ।।१३८।। एकनाथ करिती विचार प्रसंग महा अनिवार । समाधी लावून गुरू बसती वर । कैसे त्यांना उठवावे ।।१३९।। गुरूंचा पोषाख होंता बाहेर । लगेच चढविला आपण सत्वर । हाती घेऊन ढाल तलवार । आले रणांगणावरी ।।१४०।। मालक आलेंले पाहून हिंमत वाढली सैन्यामधून । खूप धूमचक्री गाजले रण ।। अखेर जय जाहला ।।१४१।। काम आटोपल्यावर । गुरूची वस्त्रे काढून ठेविती खुंटीवर । गुरूच्या सेवेत परत तत्पर । जसे काहीच न घडले ।।१४२।। गुरूंची समाधी उतरली । परी न जाणीव लढाईची दिली । शेवटी त्यांना कळून चुकली एकनाथाची सेवा ।।१४३।। तेणे जहाले गुरू प्रसन्न । म्हणती श्री गुरूदत्तात्रयाचे दर्शन । उद्या निश्चित घडविन । येतील मज भेटण्यासी ।।१४४।। लगेच दुसरें दिवशी । श्री गुरूदत्त आले भेटीसी । मलंग वेष धरला होतांची । बरोबर कुत्रेही सोबतीला ।।१४५।। फाटक्या घामट चिंध्या गुंडाळलेला । डोईवर फेटा बांधला । गुरूजवळ येऊन बसला । परी न एकनाथांनी ओळखिले ।।१४६।। मलंग म्हणे जनार्दन । मला न काही सुचेना भुकेन । झोळीतील घे तुकडे आणलेंले मागून । दूध काढ कुत्रीचे ।।१४७।।

स्वामीनी दूध काढले । त्यात तुकडे बुडविले दोघेही एकत्र जेवले । मिटक्या मारीत ।।१४८।। तेणे भ्रम जाहला एकनाथासी । ब्राह्मण असून कैसे हे खासी । मलंगाच्या वाटीत एकत्रची । कैसे गुरू म्हणावे ।।१४९।। गुरूंनी मुद्दाम एकनाथासी । सांगितले वाटी धुवून आणायासी । पुन्हां विचार आला मनासी । गुरूचे उष्टे घ्यावेच ।।१५०।। वाटी पाण्यानें धुवुनी । टाकती ते पिऊनी । परत करण्यास येती वळुनी । तोच मलंग गेलें निघोन ।।१५१।। गुरू पुसती एकनाथासी । दत्ताचे दर्शन झालें ना तुजसी । एकनाथ सांगती गुरूसी । अजुन न आले भेटण्या ।।१५२।। गुरू सांगती एकनाथासी । दत्ताचा उष्टा प्रसाद होता वाटीसी । तुला मिळावा म्हणून तुजसी । धुवून आणण्यास सांगितली ।।१५३।। एकनाथ म्हणती गुरूसी । तुमचा प्रसाद म्हणूनी प्यालीची । गुरू सांगती तयासी । मलंग वेषेतीलच होते श्रीगुरूदत्त ।।१५४।। शिष्यासाठी परत । गुरूदत्तात्रयासी विनवीत । आपण यावे मुळच्याच रूपात । दर्शन घडवावें शिष्यासी ।।१५५।। तात्काळ दत्त देती दर्शन । सहाभुजा कमंडलू माळ धरून । एकनाथांनी धरीले चरण । तेणे जहाले समाधान ।।१५६।। देव कोणत्या रूपात येती । ते फक्त संत जाणतीं । शिष्यानें पूर्ण श्रद्धा ठेवावी गुरूवरती । गुरूप्रमाणेंच वागावे ।।१५७।। याचे गोष्ट सुंदर । आवडेल तुम्हास फार । म्हणून आवरेना धीर । गोष्ट सांगण्यासी ।।१५८।। एकदा

श्रीरामदास स्वामी समर्थ । उद्धव व कल्याण शिष्यासहीत । आले माहुरगडाच्या देऊळात । श्रीगुरूदत्तास भेटण्या ।।१५९।। तेथे बसले होते काही ब्राह्मण । करावया अनुष्ठान । बारा वर्षांपासून श्रीगुरूदत्तभेटीस ।।१६०।। स्वामी विचारीती त्यांना । कसले करता अनुष्ठान त्यांनी सांगितले स्वामींना । दत्तदर्शना करता ।।१६१।। स्वामी म्हणती तयासी । आम्ही थांबतो येथेची । तुमच्यामुळे आम्हासी । दर्शन घडेल दत्ताचे ।।१६२।। ते सांगती स्वामिसी । बारा वर्षे झाली अनुष्ठानासी । परी न घडले दर्शन आम्हासी तुम्हासी लवकर कसे होईल ।।१६३।। स्वामी त्यांना सांगती । श्रीगुरूदत्त भेटी येती । अनुष्ठानाचे फळ मिळेल तुम्हाती । येथेच दोन तासात ।।१६४।। ब्राह्मण पाहून स्वामीसी । म्हणती हा वेडा दिसतो आम्हासी । देव म्हणजे काय वस्तु अससी । झटकन त्यांना दिसेल ।।१६५।। श्री समर्थासारखे अधिकारी । दर्शनासी येऊन बसल्यावरी । कैसे राहवेल स्वस्थ श्रीगुरूदत्तातरी । प्रगट होतील तात्काळ ।।१६६।। भव्य शुभ्र दाढी शोभत । सुलेमान मण्यांचा हार गळ्यात । कवड्यांचा खुळखुळा हातात । फिरंग वेष धरिला ।।१६७।। हाताने दाढी कुरवाळीत । बरोबर रेडा असत । तीन मुले त्यावर बसत । सहा बकऱ्या बरोबर ।।१६८।। पंचवीस कोंबड्या टोणग्यावरी लादून । बायको हाकलीतसे मागून । चार कुत्रेही बरोबर घेऊन । सर्व मंडळी देवळांत उतरली

||१६९|| एक रेडा म्हणजे अहंकार | सहा बकऱ्या म्हणजे षडरिपु धर | पंचवीस कोंबडी म्हणजे पंचवीस तत्वें वर हांकतसे बायको ती मायाजाण ||१७०|| चार कुत्रे वेद असती | जागा पाहून फिरंग खूष होती | खाना खानेका इरादा है बोलती | इसवास्ते हंडी पकाव ||१७१|| बायकोने तीन दगड मांडलें | घागरभर पाणी हंडीत चढविले | आणि नवऱ्यासी विचारिले | हजरत हंडीमे क्या डालना ||१७२|| फकीर बोले तिजसी | मुरग्या काटो पकावण्यासी | तोच बाईने पंचविस कोंबड्या कापल्या सत्वर ||१७३|| तरी हंडी मुळीच भरेना | अखेर त्यांचा विचार घेऊन पुन्हा | सहा बकऱ्या चार कुत्रे कापून त्यांना हंडीत टाकले तरीं रिकामीच ||१७४|| स्त्री बोले फकिरासी हजरत इससे भी हंडी भरी नही जरासी | तो फकीर बोले तिजसी रेडा काट डालो अंदर ||१७५|| हंडी रिकामीच पाहून | पुन्हा विचारी सल्याकारण | छोकरे काट डालो हुकुम केला फकिराने ||१७६|| निर्दयपणे स्त्रीनें मुलास तिहीचे कापून टाकले मास | परी हंडी रिकामीच | अब क्या डालना विचारिले ||१७७|| फकीर म्हणे तिजसी देवलेमे बैठे बम्मन पहासी | उनको काटो झटदिशी | सुरा घेऊन निघालीच ||१७८|| पोरांना कापलेले पाहून | थरकाप भरला अंगी ब्राह्मण | ती मारण्यास येतांना पाहून | जीव घेऊन पळाले ||१७९|| अनुष्ठान राहीले अपुरे | चंबू गबाळे माळा धोतरें | टाकून पळाले पहारें जीव

वाचविण्यासाठी ।।१८०।। स्त्री बोले फकीराना । बम्मन भाग गये अब क्या करना । फकीर बोले स्त्रीस जाना । काट डालो ये तीन बम्मन ।।१८१।। सुरा घेऊनी आली धावुनी । समर्थासी प्रथम मारण्या कारणी । समर्थ जाणती अंत:करणी । हंसत मान पुढे वाकविली ।।१८२।। ते पाहून लगेच परतली । उद्धव कल्याणाकडे आली । त्यांनीही मान पुढे वाकविली गुरूप्रमाणे ।।१८३।। हा पहाताच चमत्कार । नाटक संपले सत्वर । श्री गुरूदत्तात्रयावतार । प्रगट झाले तत्क्षणी ।।१८४।। शिष्यासह समर्थ करिती नमस्कार । दत्तगुरू हात फिरविती डोक्यावर । याला म्हणतात अढळ श्रद्धा गुरूवर । म्हणून प्रत्यक्ष दर्शन जहाले ।।१८५।। दया उपजली समर्थासी । विनीविती ते गुरूदत्तात्रयासी । जे बारा वर्षापासून बसले अनुष्ठासी । त्यांनाही द्यावे दर्शन ।।१८६।। श्रीगुरूदत्त समर्थासी सांगती । दर्शनासी अधिकारी लोक लागती । ते लोभाने अनुष्ठान करती । अजुन अनाधिकारी आहेत ।।१८७।। त्यांना तू मंत्र उपदेशीता । अधिकारी होतील तत्वता । येताच त्यांची योग्यता । दर्शन देईन त्यांनाही ।।१८८।। त्या ब्राह्मणांना आणले बोलावून । समर्थानी सांगितले समजावून । गेले तुम्ही मलंगास भिऊन तेच होते दत्तगुरू ।।१८९।। पश्चात्तापाने तें पोळले । समर्थांसी त्यांनी गुरू केले । दत्तांनी त्यांना दर्शन दिले अधिकारी झाल्यावर ।।१९०।। जैसी श्रद्धा देवावर तैसीच ठेवा गुरूवर देव

गुरूत भेद न कर । तेणे सार्थकता होईल ।।१९१।। देह प्रारब्धानचरोंधे । प्राप्तस्थिती मध्ये आनंद मानावा विबुधे । खोटी तळमळ करू नये ।।१९२।। जैसे असेल पूर्वसंचित । ते न कोणी बदलत । मुकाट्यान सोसून शांत । रहाणे मार्ग उत्तम ।।१९३।। पिता असोनि समुद्र । बहीण लक्ष्मी मेहूणा श्रीधर । शंख भिक मागे दारोदार । संचितासी काय करील ।।१९४।। दुर्योधन सार्वभौम नृपवर । बोधकर्ते कृष्ण विदुर थोर केला सर्व गोत्र संहार । संचितासी काय करील ।।१९५।। पोटी जन्मला राम अवतार । वसिष्ठ गुरू असती शिरावर । दशरथासी शोकसागरा संचितासी काय करील ।।१९६।। रामा सारखा भर्ता । राजा जनक असता पिता । कारागृही रावणाच्या जानकी संचिता । संचितासी काय करील ।।१९७।। राया द्रुपद कुमारी । पांच पांडव पति भारी । दुर्योधन सभेस उभी करी । संचितासी काय करील ।।१९८।। अर्जुना सारखा विंर पिता । कृष्णा सारखा मामा असता । अभिमन्यूस जयद्रथे मारीली लत्ता । संचितासी काय करील ।।१९९।। पोंटी जन्मला बनमाळी । मायबापे पडली बंदीशाळी । शरपंजरी पडला भीष्मबळी । संचितासी काय करील ।।२००।। पांडवराजे हस्तिनापुरचे । सेवक जाहले विराटाचे । अर्जुनास शृंगार स्त्रीयेचे । संचितासी काय करील ।।२०१।। पुण्यशील उदार भारी । हरीश्चंद्र राजा डोंबाघरी । शेवटी पहा भरतसे पाणी ।

संचितासी काय करील ||२०२|| संचित प्रारब्धाचा ठेवा | तैसाच घडे भोग मानवा | थोराथोरासी पडला गोवा | इतरांचा पाड काय ||२०३|| आपुलें कर्म आपण भोंगसी | विनाकारण दोष न द्या देवासी | तैसाची आपुल्या गुरूसी | पुढे चांगले होईल ||२०४|| सर्वत्र भरला परमेश्वर | एकमेकास द्या आदर | दुखवू नका ऐकमेकाचे अंतर | तेणे तुष्ट परमेश्वर ||२०५|| हाती असता सत्ता | दुरूपयोग न करा सर्वथा | न्यायासनी बैसता | लाचलुचपत घेऊ नका ||२०६|| पोषाख करावा आपुला साधा | जेणे अहंकाराची न वाढेल बाधा | प्रेमाने शांतीने शांतीने बोलून सदा आळवाना श्रीहरी ||२०७|| नामस्मरण सोडू नका | तोच आहे आपुला पैका | मोक्ष मार्गासी जाण्या देखा | शिदोरी असे तीच ||२०८|| त्यांना थोडे बरे वाटल्यावर | परभणीस गेले सत्वर | मुलाबाळाचा पाहून संसार | त्यांना भेटून घरी आले ||२०९|| तें आग्रह करिती रहाण्यास | म्हणती मला जाणे भागच | मी न राही आता खास | माझी ही भेट शेवटची ||२१०|| औरंगाबाद सिल्लोड जालना | येथे जावून भेटती सर्वांना अधिकाची वाने घेऊन नाना | शिष्यांनाही भेटून येती ||२११|| सर्वास सांगती ही भेट शेवटची | मला झाली घाई वर जायची | ती न आतां टाळायाची | स्वेच्छेने मी जातसे ||२१२|| मग ते येती टेंभुर्णीस | आपुल्या पिढीजात घरास | मुली मुलं नात नातू येती भेटीस |

सर्वांशी बोलती मनमोकळे ।।२१३।। सौ. कुमुद निलीमा सुनांना मांगती । आज आहे जाणे वरती । जेवण खाणे आटोपून घ्याती । बसा मजजवळी येऊन ।।२१४।। आम्ही म्हणालो गुरूसी । काही दिवस रहा तरी । ऐसी आमुची इच्छा खरी । पूर्ण करा गुरूराया ।।२१५।। आपण सांगत होते । बारा वर्षे न भय माते । मग कसे जाता लवकरांते । सांगावे गुरूरांया ।।२१५।। आपण सांगत होते । बारा वर्षे न भय माते । मग कसे जाता लवकरांते । सांगावें गुरूराया ।।२१६।। आपण इच्छा मरणी असता । जाण्याची कां घाई करीतां । भीष्माचार्यही थांबलें जाता । योग्य काळपर्यंत ।।२१७।। आपणा काही अशक्य नाही । बंदा गुलाम काळही । आपण आहांत आमुचे आई । सोडू नका आम्हाते ।।२१८।। वासुदेव देती आम्हा उत्तर । हे जरी आहे खरं । तरी कोणी व्हावे चोर । लपून बसावे ।।२१९।। चांगदेव पहा पुणतांब्यात । चौदाशे वर्षे वाचले सत्य । मीही आणिल्या मनात । बरेच वर्षे वाचेन ।।२२०।। परी त्यात न अर्थ काही । ती तर अवघी असे चोर शाही । आज्ञा होताच लवलाही । जावें सूज्ञान वैकुंठी ।।२२१।। भोजनोत्तर लेकी सुना । नातवंडे शिष्य आप्त जाणा । मुलगे बैसले सन्निधाना । प्रभाकरही बैसले शेजारी ।।२२२।। सर्वांची मुखे अवलोकून एकाग्र केले आपुले मन । चित्ती साठविला नारायण । जगन्निवासी श्रीहरी ।।२२३।। अवघा करून दानधर्म । रामकृष्ण हरी नाम । वासुदेवांचा

प्राण वैकुंठधाम । पहावयासी निघाला ।।२२४।। आता तुम्ही अवघे जण । प्रार्थना म्हणा माझ्या प्रमाण । आहे अमुचे आता प्रयाण । चार वाजतां ।।२२५।।

श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव ।
प्रद्युन्म दामोदर विश्वनाथ मुकुंद विष्णो भगवन्नमस्ते ।।१।।
गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु गुरूर्देवो महेश्वरः ।
गुरूः साक्षात् परमब्रह्म तस्मै श्री गुरूवेनमः ।।२।।

वासुदेव सांगती मोठ्यांने । मी गेलो ऐसे न मानणे । अक्षयी मी तुम्हा कारणे आहे तुमच्या ह्रदयात ।।२२६।। पूर्ण श्रद्धा ठेवा मजवरी । दृष्टांत देईन मी जरूरी । कोणत्याही रूपाने येईल तरी । ओळखा मज निश्चये ।।२२७।। या बद्दलची उदाहरणे । सोडवून दाखविली तुम्हा कारणे । शिक्षण दिले असे पूर्णपणे । पास होऊनी श्रेय मिळू द्या ।।२२८।। चलन वलन राहिलें । महाराज स्वच्छे शिव झाले । दिव्य ज्योतिशी मिळाले । श्रींहरीच्या वैकुंठी ।।२२९।। गेला गेला ज्ञानदिवा । गेला जीवीचा विसावा । गेला अमृताचा ठेवा । आज आमुच्या मधूनी ।।२३०।। एकोणावीसशे दोन शकीं । अधिक ज्येष्ठ वद्य त्रयोदशी । बुधवारी शिवरात्रीसी । दुपारी चार वाजेशी । वैकुंठी गेले ।।२३१।। इसवीसन

एकोणावीसशे ऐसी । अकरा जून तारखेसी । बुधवारासी गेले वैकुंठा ।।२३२।। त्यांना असती तीन कुमार । प्रभाकर दुर्गादास भास्कर । तिघेही उदार  धीर । वडिलाच परी असती ।।२३३।। कुमुद निलिमा ह्या सुना । कुसुम, प्रमिला, सुमन ह्या कन्या । नात नातूही बरेंच ।।२३४।। वासुदेव दिसती साधे बापुडे । परी ज्ञानाचे प्रत्यक्ष गाढे । रमानाथ त्यांचे पुढे । तिष्ठत असे सेवेसी ।।२३५।। वसंतराव पाटील गुरूजींची । रजनी नामे कन्यासाची । जी दिली असे सुरत शहरासी । सासरी होती तेधवा ।।२३६।। ज्या दिवशी महाराजांचे निर्याण । त्याच दिवशी पडले तिला स्वप्न । झोपली होती शांततेन । तोच दार ठोठावलें ।।२३७।। गुरूचा परिचित आवाज ऐकूनी । दार उघडले तत्क्षणी । तो महाराज पायात धोतर अडकुनी । पालथे पडले घरांत ।।२३८।। होईना चलन वलन । खूप पाहिले हलवून । बाबा बाबा मोंठ्यान ओरडून । परी न उपयोग जहाला ।।२३९।। शेवटी करीता तपास । बाबा गेलें वैकुंठास । नवल वाटले पाहून दृष्टांतास । मनी खूप हळहळली ।।२४०।। सौभाग्यवती शांताबाई आनंदा पाटील यांचा दृष्टांत ऐकाल । फारच नवल वाटेल । वाचतांना ।।२४१।। जो बाबांचा निर्याण दिन ।। त्याच दिनी देती दर्शन । बोलती स्वप्नांत येऊन । शांताबाईच्या ।।२४२।। पांढरी स्वच्छ दाढी साधू रूपात । चेहरा ठेवण नेहमीचीच असत ।। त्यांच्याशी बोलत चालत । पायी गेले पद्मालया

||२४३|| तेथील गणपतीचे पीठ मंदीर | साडेतीन पीठातील प्रसिद्ध थोर | यात्रा भरली होती चौफेर कमळेंही भरपूर तलावात ||२४४|| घरांतील सर्व बरोबर असत | पद्मालयास जाऊन पोहोचत | तलाव दुधाने गच्च भरलेला पहात | गुरू बसती त्याकाठी ||२४५|| जवळ बोलाविती मुलाबाळांना | एक एक ग्लास दूध पाजिती सर्वांना | पाहून आश्चर्य वाटले मना | तोच लोभ सुटला एकाला ||२४६|| बाबा हा दुधाचा तलाव | विकत द्या मजसी एकमेव | नका करू लिलाव भाव | एक लाख रूपये देतो तुम्हासी ||२४७|| बाबांनी होकार देवून | त्वरीत निघाले परत रस्त्यानं | विक्री करीतां स्पर्श करताच लोभी माणसान | दुधाचे पाणी जहाले ||२४८|| पायीच येती सर्व शांताबाईच्या शेतात | तोच विहीरी जवळ बसलेले दिसत | सर्व येऊन बाबांचे चरण धरत | बहुत श्रम झाले आपणासी ||२४९|| शांताबाई म्हणे बहुत तहान आम्हास | विहीरीला नसे पाणी काहीच लांबून आणते मी पिण्यास | तुमच्याही करिता ||२५०|| बाबा म्हणती तियेसी | येथेच देतो पाण्यासी | पाय लावतांच पेरूच्या झाडासी | झरा वाहे झुळझुळ ||२५१|| गोड शीतल स्वच्छ पाणी पिऊन | सर्वांची तृप्ती झालेंली पाहून || आतां मळा करा तुम्ही येथून | पुढे जाऊन गुप्त जहाले ||२५२|| आंब्याच्या झाडाचे स्थानी | जेथे गुप्त झाले महाराज येऊनी | तेथे येऊन पहातात सर्वजणी | तो सर्व

देवांचे दर्शन जाहले ।।२५३।। शांताबाई बाबा बाबा करत । पळू लागली ईकडून तिकडे शेतांत । वेडी पिसी झालेली दिसत । बाबांना धुंडण्यास ।।२५४।। राहिले न कसले भान । बाबा बाबा सारखे हांक मारण । पकडून बैसविले बैलगाडी जुंपून । घरी येण्यासी निघालो ।।२५५।। तोच अर्ध्यारस्त्यावर बाबा भेटती सत्वर । समजूत घालीती शांता शांतता घर । यापुढे सुखी होशील ।।२५६।। सद्गुरू गेल्यानंतर । दृष्टांत दिला मजला सूंदर । शस्त्राने ना मरण ना अग्नीने जळणार । ना भिजणार पाण्यानेही ।।२५७।। मला न कसली भिती । मी पाहोचलो ब्रह्माती । सदैव राहीन शिष्यांवरती । माझी दृष्टी यशवंता ।।२५८।। झटदिशी श्लोक आठवला गीतेचा –

श्लोक – नैनं छिन्दन्ति शस्त्राणी नैनं दहती पावकः ।
न चैन क्लेदयन्त्यापो न शेषयति मारूतः ।।२५९।।

परमपूज्य विनोबाजी म्हणतात –

शस्त्रे न चिरिंती हयास, हयास अग्नि न जाळितो ।
पाणी न भिजवी ह्यास हयास वारा न वाळवी ।।२६०।।
चिरवे जाळवे ना हा, भिजवे वाळवेहि ना ।

स्थिर निश्चय हा नित्य सर्व व्यापी सनातन ||२६१||

गुरूंचा ध्यास होतांच मनी | त्यांच्यावर रचिली काही गाणी | त्यांची पोथी घेतली लिहीण्याकारणी | तो पुन्हा दृष्टांत देतसे ||२६२|| गुरू महाराज बसले एका स्थानी | मी गेलो त्यांचे भेटी कारणी | मस्तक ठेविले त्यांचे चरणी | आशिर्वाद देती मजला ||२६३|| गुरू बोलती यशवंता | तू जे लिखाण झालास लिहिता | मजजवळी आणून दे आतां | तपासून मी देईन ||२६४|| पुराणिक प्रतिभा प्रभाकर | चोपडे गांवासी रहाणार | सद्गुरू स्वप्नांत मृत्यूनंतर | दर्शन देती तियेला ||२६५|| दार लावून घरात असता | सद्गुरू आले अवचिता | प्रतिभा म्हणून हाका मारता | आवाज आला कानासी ||२६६|| लगेच उठुनी दाराजवळ येत | तों खिडकीतूनी वासुदेवांचे दर्शन घडत | तिला दार उघडण्याचे भान न रहात | तो गजाचे खिडकीतून आंत आले ||२६७|| सद्गुरूचे धरिले चरण | आनंदाश्रुंनी त्यावर सिंचन | तुझे भले होईल सांगून | गुप्त होती तात्काळ ||२६८|| लक्ष्मण सखाराम साळी सर | यांची कन्या तारामती थोर | रात्रंदिन काळजीत फार | कैसी होईल प्रसूती ||२६९|| प्रसुतीचा कठीण समय येतां | गुरूंच्या नावानें रक्षा लावता | प्रत्यक्ष दृष्टीस गुरू दिसले धांवुनी येता | पुत्ररत्न जाहलें सुखरूप ||२७०|| बोले तैसा चालें त्याची वंदावी पाऊले | मागल्या

अध्यायात होते सांगितले । कलीयुगाची माहिती सांगेन ॥२७१॥ कलीयुग म्हटल्या नंतर । महाभारतातील गोष्ट आठवली सुंदर । कलीयुगातील भविष्य अगोदर । कैसे सांगती कृष्ण पांडवांना ॥२७२॥ एकदा श्रीकृष्णांनी पांडवांना धर्मराजास सोडून इतरांना । सकाळीच अरण्यात पाठविलें त्यांना । विशेष दृश्य निट पाहुन येण्यासी ॥२७३॥ दुसरे दिवशी सकाळी भीम अर्जुन । तसेच नकुल सहदेव जाण । चारी दिशास चार जाऊन । विशेष दृश्य शोधिती ॥२७४॥ सायंकाळी सर्व परत येती । दुसऱ्या दिवशी श्रीकृष्णास भेटती । तेव्हा श्रीकृष्ण भीमास विचारिती । काय विशेष पाहिले ॥२७५॥ नम्रतेनें भीम म्हणाला देवा दोन सोंडेचा हत्ती दिसला । कृष्ण सांगती कलीयुगाला । दोन तोंडी माणसे होतील ॥२७६॥ एकदा एक बोलतील । लगेच पुन्हा दुसरें बोलतील । बोलण्याचा ना ताळमेळ । कलीयुगी राहील ।॥२७७॥ अर्जुना तू कोणती गोष्ट न्याहाळीली । अर्जुन सांगे गाय व्यालेली पाहिली । वासराने लाथ मारिली । गाईच्या तोंडावर ॥२७८॥ तेव्हा देव सांगती अर्जुना कलीयुगात मुले आईबापांना । विचारणार नाहीत मुळीच ना । किंमत ना राहील काहीच ॥२७९॥ बायकोच्या नादाने तिचेच ऐंकतील । आईबापांना घराबाहेर काढतील । मातृपितृ प्रेम न राहील । ऐसी कलीयुगाची लक्षणे ॥२८०॥ काय पाहिले कृष्ण नकुला विचारी । नकुल सांगे दोन कोरड्या

विहीरी । दोन कोरड्या विहीरी । दोन बायका पाणी पिण्यासी येती तेथवर । पांच पांच मुला घेऊन ।।२८१।। कृष्ण सांगती याचा भावार्थ । कलीयुगी अन्नधान्याचा ठणठणात मुलाबाळांचा घरांत सुळसुळाट : वाढेल भरमसाट सकळ ।।२८२।। सहदेव सांगे कृष्णाप्रत । मी डोंगराचे बाजूने होतो हिंडत । डोंगराचें कडे व झाडे कोसळत । असतांना मी पाहीले ।।२८३।। अंगावर पडतील म्हणून होतो घाबरत । तो काय आश्चर्य दिसले मजप्रत । गवताच्या आधारे काही होते अडकत । म्हणून कसाबसा जीव घेऊन कलीयुगास । धर्म कोसळतील ऐसेची । कोणाचा पायपोस ना ना कुणाला ।।२८५।। निधर्मी म्हणजे जेथे धर्म नाही । तेथे देव रहाणार कसा पाही । कड्यासारखेच गडगडाल लवलाही । अडकालच जर लागला गवताधार ।।२८६।। रामनाम हेच गवत । धर्म कड्यासी जो अडकवीत । धर्मऱ्हास थांबवून होईल जागृत । उध्दरतील सर्व जन ।।२८७।।

श्लोक – नामांत शक्ति इतुकी अघ ते हराया

पाप्या न शक्ति इतुकी अवघे कराया ।।२८८।।

ऐसी शक्ति असे नामस्मरणाची । म्हणून आपण करूं नंतर भजनची । हीच शिकवण देती संत वासुदेव आपणासी । उद्धार व्हावया । सकळांचा ।।२८९।। श्रीसंत वासुदेव चरित्र । तारक असोनी

परमपवित्र । अनुभव येण्या मात्र । सबळ निष्ठा पाहिजे ।।२९०।। या ग्रंथाची अवतरणिका । देतो आतां तुम्ही ऐका । वेळ उगा दवडू नका । पूर्ण व्हावे सावध ।।२९१।। प्रथमोध्यायी मंगलचरण । वासुदेवांचे बालपण शिक्षण । नोकरी आग्रह करिती भक्तगण । अनुग्रह देण्यासी ।।२९२।। गुरूरंगनाथ स्वामी ज्यांनी । समाधी घेतली होती एकतुनी । भक्तगणांचा आग्रह पाहुनी । नेंती त्या गुरू समाधीसी ।।२९३।। दगडांच्या पादुकांमधून । औन्दुबर उगवले चमत्कार पूर्ण हाच आशिर्वाद अनुग्रहा कारण । वासुदेवा मिळाला ।।२९४।। दुसऱ्या अध्यायी पत्नी सुलोचना । संसार करीतसे मनोभावना । कथिले असें पतिव्रताख्याना । दत्तजन्म कथासार ।।२९५।। तृतीयाध्यायी देहावसान । झाले होते सुलोचनाबाईचे जाण । परत आला होता प्राण । अमावस्या टाळण्यासी ।।२९६।। पुढे गुडीपाडव्याच्या दिवशी । त्यागेल्या वैकुंठाशी । गाठी भेटी घेऊन सर्वांशी । बोलत बोलत गेल्या ।।२९७।। जन येऊन सांत्वन करिती । परि महाराज त्यांना उपदेशिती । वैराग्य वृत्ती बाणली पूर्ण तो । तया सुख दुःख सारखच ।।२९८।। चवथ्या अध्यायी वासुदेव सांगती प्रवचन । अमरदास महंत येती ऐकण्याकारण । ब्रह्म माया केली असे निरसन । तैसेच इतरही ।।२९९।। राम सर्वत्र भरला कसा पहावे । एकादश महात्म्य जाणावे । महात्म्य एका पतिसेवें । किती असते ते ।।३००।। पाचव्या

अध्यायी मन रस ना संयमन । किती आवश्यक असे जाण । कैसे येती विघ्न महान । त्यास आवर न घातल्याने ।।३०१।। सहाव्या अध्यायी सत्संग महती । भिल्लीणीसी राजाने दाविली क्षमा वृत्ती । दुर्वास ऋषी परीक्षा घेती द्रौपदीची वनवासी ।।३०२।। दुर्वास ऋषी कृष्णाची परीक्षा घेती । त्यांची अमर काया करण्या खीर लाविती । परी मृत्यूस्थान राहिलेच शेवटी । आंगठ्यामध्ये ।।३०३।। दुर्योधन अमर कायेसाठी । नग्न जातसे माता गांधारी पुढती । शिरजोर होईल म्हणून कृष्ण तो । युक्तीने विघ्न आणितसे ।।३०४।। सातव्या अध्यायी मनुष्य देह महती । खरे आयुष्य मानवास किती । तैशीच सांगितली देव नाम महती प्रवचन सुंदर ।।३०५।। ऐकून अमरदास महंत । वासुदेवासी पहा प्रार्थत । तारूण्य देवूनी वृद्धत्व घेत बारा वर्षासाठी उसने ।।३०६।। आठव्या अध्यायी अनुभव असती । पन्नालालशेठ तापडी बदनापुराती । वर्षभर अंथरूणावर खिळती । उठता बसताही येईना ।।३०७।। वारी चुकेल पंढरीची ध्यास घेतला रात्रदिवशी । तळमळून सांगे वासुदेवासी । तोच दर्शन देती पांडूरंग ।।३०८।। पुत्र नव्हता शूरसेनाच्या नशिबांत । देवानेही होते टेकले हात । साधुच्या सेवेने आशिर्वाद मिळत । पुत्र जहाले तयाला ।।३०९।। सुलोचनाबाई तापडेस । डॉक्टरांनीही आशा सोडली अवस्थेस । वासुदेवांच्या कृपेने तीस । पुत्र पहा जहाला ।।३१०।। ताप बद्रीशेठाचा घेतला

होता । उसनवारी चार दिवसा पुरता । मुलीचे लग्न आटोपलें असता । वासुदेवांनी परत केला नवमाध्यायी ।।३११।। वेड लागले होते केशव कुळकर्णी । बरें केले पहा वासुदेवांनी । यशवंता दिधले दर्शन देवींनी । तैसेंच दावी चमत्कार ।।३१२।। राजा देऊळगावी किर्तन । त्यांना येता न आले म्हणून । होते वासुदेवाचे नित्याप्रमाणे । पांडुरंग स्वत: करून जाती ।।३१३।। शेगांवचे गजानन महाराजांनी । जोशींच्या स्वप्नात जाऊनी । प्रत्यक्ष दिली अंगठी आणुनी । वासूदेवास देण्यासी ।।३१४।। साकेगांवकर महाराजासी । समाधीत असता शेगांवासी । पांच रूपये नारळ देऊनी भेटीसी अंतर्धान पावलें वासुदेव ।।३१५।। दहाव्या अध्यायात । परमेश्वर  देत सत्यास साथ । किती मोठे पाप बोलता असत्य । ते वर्णिले सविस्तर ।।३१६।। संध्या जानवे गायत्री । यांचे महत्व समजावती । प्रत्येकास तीन ऋण फेडावे लागती । सविस्तर कथिले असे ।।३१७।। यज्ञकर्म करित असता । स्त्रीसह पूजेस बसण्याची आवश्यकता । याचें विवेंचन केले तत्वता । या अध्यायात ।।३१८।। गुरू करण्याचा ध्यास लागला दत्तूशेठ सोनारास । गुरू निघून गेले होते गावास । परी अनुग्रह देऊनी गुप्त झाले ।।३१९।। मुलींच्या लग्नाची काळजी एकनाथा । स्थळे आली कुठेही न फिरता । प्रमोशन लाभले गुरू देखता । गुरूकृपेने एकनाथ गुरूजीसी ।।३२०।। काळजी होती वैद्य रमाकांतासी । परमनट झाला

स्टेट बँकेसी । लग्न होउन दोन पुत्रासी । सुखी जाहला गुरूकृपे ।।३२१।। वसंतराव पाटील यांची पत्नी । आजारी होती बरेच दिवसापासुनी । तेही कंटाळले होते खर्च करूनी । गुरूकृपे बरी झाली ।।३२२।। शकुंतला रत्नाकर जोशी । गुरू भेटले स्वप्नी तिजसी । मी आहे तुझ्या पाठीसी काळजी करू नको ।।३२३।। मधुकर नागेश्वर जोशी । वासुदेवराव त्यांना उपदेशी अती सोवळे वाढवी । अहंकारासी भाव श्रद्धेनें देव वश होय ।।३२४।। अकराव्या अध्यायात केले कथन । संत वासुदेव व अमरदासानं । बदललें पूर्ववत वृद्धत्व तारूण्य । तेंणे गलतान झाले वासुदेव ।।३२५।। यमराजही येती घेण्यांस । वासुदेव दाविती धर्म नियम त्यास । तेंणे इलाज खुंटला यमराजास । इच्छा मरणही मागितले ।।३२६।। अधिक मासातील धोंड्याचे वान । तैसेच शिमगा रंगपंचमीचे महिमान । जीव जातांच शिवात्म्यात होतो का विलिन याचे विवेचन केले असे ।।३२७।। परमेश्वर होता प्रसन्न । बर देती ब्राह्मण । एकनाथ महाराजासी दर्शन । तैसेच समर्थ रामदासासी ।।३२८।। कोणासी चुकले ना संचित । त्र्याएसी वर्षानंतर वासुदेवांचा अंत । त्यानंतरही त्यांनी दिलेले दृष्टांत । कलीयुगातील नाम माहात्म्य ।।३२९।। श्रीसद्गुरू संत वासुदेव चरित्र । जहाले अकरा अध्यायापर्यंत । दशेंद्रिय दमन करा दहा अध्यायाप्रत । वैकुंठी जाल एकादशांत ।।३३०।। रूद्र असती एकादश । सद्गुरू जाती

शिवरात्रीस । म्हणून हे अध्याय वाचतां एकादश । सायुज्य मुक्ती मिळेल ।।३३१।। दया क्षमा शांती महाउदारा । शिष्यास भरवुनी ज्ञान चारा देऊनि निज विश्रांती आसरा । येरझारा चुकविसी ।।३३२।। केवळ संतांचे दर्शन । करी सकल दोषांचे क्षालन । जयासी लाभले संत वासुदेवांचे सन्निधान । काय ते पुण्य वर्णावे ।।३३३।। जैसी भावना तैसें फळ । जैसा विश्वास तैसे बळ । अंत:करण जैसे प्रेमळ । बोधही निर्मळ तैसाच ।।३३४।। दैव आले उदयासी । म्हणून गाठी पडली सद्गुरूसी । तो जवळ असता उशाशी । पाप्यासी न दिसे ।।३३५।। संत वासुदेव सद्गुरूनाथा । ज्ञान योगिया समर्थ सत्ता । दिव्य दृष्टीने पाही तत्वता । भविष्य त्रिकालाचे ।।३३६।। ऐशा गुरूसी जावें शरण । भाव भक्तीत जडे मन । तयासी ज्ञान मिळे संपूर्ण । सार्थक जन्माचे ।।३३७।। एसे सद्गुरू कृपाळू । भक्त जनांचे कनवाळू । निराधारासी प्रतिपाळू । संत वासुदेव ।।३३८।। तयांच्या चरणी लीन रहावे । भाव भक्तीत मन ठेवावे । नामस्मरण नित्य करावे । निश्चित सुख मिळेल ।।३३९।। हा अथांग भवसागर । तारावया तुझा अवतार । उद्धरूनी नेसी पैलपार । सद्गुरू संत वासुदेव ।।३४०।। श्री सद्गुरू वासुदेवराया । भक्ता करीता सगुणी काया । मूळभक्ती उभारिला पाया टेंभुर्णी गावी ।।३४१।। प्रत्येक अध्यायांत केले कथन । ज्ञान बोध विवेचन संत । वासुदेव समर्थ पूर्ण ।

भक्तीद्धारासाठी ।।३४२।। हे एकादश रूद्रमंदीर एकाहून एक श्रेष्ठतर । ज्ञान ओघ वाहे झरझर । पुनीत व्हावे स्नान करूनी ।।३४३।। हा ग्रंथ वाचितां नित्य । ऐश्वर्य लाभले त्या प्रत । ऋण मोचन होईल समस्त । शत्रूही मित्र होतील ।।३४४।। शत आवर्तने करीता भक्ती युक्त । मनोकामना होतील तृप्त । श्रीहरीचे वास्तव्य घरांत । रक्षितील सदैव ।।३४५।। सोमवारी ग्रंथ पुजन । अथवा प्रदोषकाळी शिवरात्री लक्षून । शुचिर्भुंत करीता श्रद्धे पारायण । स्वप्नी दृष्टांत देतील ।।३४६।। यांत दिलेली यंत्रे । श्री देवी नवनाथतत्रे पुजून अनुभव घ्यावा स्वतंत्रे । दिव्य शक्ती दिसेल ।।३४७।। श्रीसंत वासुदेव पंचानन । येऊ न देई कदा विघ्न । भक्तांचे करण्या संरक्षण । सदैव जागृत असती ।।३४८।। दशमी एकादशी द्वादशीला । तैसेच गुरूपौर्णिमेला । भक्तीभावे वाचीला ग्रंथाला । भाग्य लाभेल तयांचे कृपे ।।३४९।। मी तो असे गुरूंचा चाकर । बुद्धी देऊन तेच लिहवून घेणार । पडली ती सेवा करणार । दुसरें न ठावे मज ।।३५०।। हे संत वासुदेव आख्यान । प्रतिदिनी करीतां पठण अश्वमेधाचे पुण्य जाण । लाभेल त्या वाचकाला ।।३५१।। यशवंत बाळकृष्ण भुसनळे विरचित । हा सद्गुरू संत वासुदेव चरित्र ग्रंथ नौका होवो भाविक प्रत । भवसिंधु तराया ।।३५२।। मी असे सद्गुरूचा पोपट । जितुके पढविले तितकेच बोलत । कमी जास्त चूक झाल्या मज प्रत । क्षमा करावी वाचकांनी

आर्या – जैसे जल स्वातीचे पडतां शिंप्यात बनती मोती ते ।
तैसें सद्‌गुरू बोधे मोत्यापरी भूषवा तुम्ही गुरूते ।।३५४।।
आर्या – ॐ नमो सद्‌गुरू वासुदेवाय मंत्र मुखी राहो ।
त्यांची चरित्र पोथी सद्‌गुरू चरणी यशवंतही वाहो ।।३५५।।
श्री सद्‌गुरू वासुदेवा माझ्या ठायी कृपा कटाक्ष असो ।
कमळी भूंगा तैसा त्वचरण युगी मदीय चित्त वासो ।।३५६।।

संत चरित्रे असती गहन । परी वदविता असे रूक्मिणी रमण । यशवंत त्या सर्वथा निमित्त कारण । दासानुदास तुमचा ।।३५७।। भक्त मंडळी घेती शंकेला कळसाध्याय फार मोठा जहाला । मंदिराचे कळसाला । उंचीच शोभा वाढवी ।।३५८।। नदी जेथे सागराला मिळते । तेथे अफाट पात्र नदीचें शोभते । गुरू ज्ञान सागरी होता मीलनाते । माझे मीपण विरलें असे ।।३५९।। स्वस्ति श्री वासुदेव चरित्रामृत । सद्‌गुरूच प्रेरक असती येथ । निमित्त मात्र मुख यशवंत ।

।। एकादशो ऽ ध्याय गोड हा ।।३६०।।

।। इति श्री संत वासुदेवराव महाराज चरित्र समाप्त ।।